

REFBK-0009739

म. ग्रं. सं. ठाणे
विषय ने- प्रवास
सं. नं. २२२

# प्रवासी जादूगार

आफ्रिका, इंग्लंड, जपान इत्यादि देशांचें नव्या धर्तीनें
लिहिलेलें चटकदार प्रवास वर्णन

22880 वि. ३.५
क्रमांक 222 नों. दि. 9/11/58

जादूगार रघुवीर
M. B. H. S. (London)

REFBK-0009739
REFBK-0009739
९७३९
संग्रह शाखा

आवृत्ति तिसरी १९५७ ) ☆ ( किमत अडीच रुपये

प्रकाशिका :
**सौ. शकुंतला भोपळे**
८४१ सदाशिव पेठ,
भाऊमहाराज बोळ, पुणें २

आवृत्ति पहिली नोव्हेंबर १९५४
आवृत्ति दुसरी मे १९५५
आवृत्ति तिसरी मे १९५७


सर्व हक्क प्रकाशिकेच्या स्वाधीन

मुद्रक :
**म. बा. जोशी**, बी. ए.
ज्ञानविलास प्रेस,
२७ बुधवार पेठ, पुणें २



लेखक

मला प्रवासासाठीं प्रोत्साहन देणाऱ्या
माझ्या प्रेमळ पत्नीस—




मी केलेल्या जगप्रवासाचे प्रमुख मार्ग

महाराष्ट्रांतील प्रसिद्ध शिक्षणतज्ञ डॉ. **ग. श्री. खैर**

एम. ए. पीएच. डी. यांनीं करून दिलेला

# लेखकाचा परिचय

श्री. रघुवीर आमच्या संस्थेचे विद्यार्थी होते, तेव्हांपासून मी त्यांना ओळखतों. कोणतीहि नवीन गोष्ट समजून घेण्याची जिज्ञासू वृत्ति आणि आनंदी स्वभाव या दोन गुणांमुळें त्यांनीं अभ्यासा–बरोबर व्यायाम, योगासनें, वक्तृत्व, यासारख्या इतर विषयांतहि विद्यार्थीदशेंतच प्रगति केली. एखादा नवीन खेळ अथवा कला शिकावयाचें मनांत आलें कीं त्यासाठीं वाटेल ते परिश्रम घेऊन तें साध्य करण्यासाठीं त्यांची सारखी धडपड चालत असे. एकदां व्यायामांत कमी गुण मिळविल्यामुळें मी त्यांच्यावर खूप रागावलों. त्याचा परिणाम असा झाला कीं, पुढील एका वर्षांत त्यांनीं व्यायामांत भरपूर प्रगति करून शक्तीचे प्रयोग करण्यास सुरुवात केली. शक्तीच्या प्रयोगाबरोबरच आमच्या संस्थेंत शिकविली जाणारी धनुर्विद्या त्यांनीं आत्मसात केली. शब्दवेध, स्पर्शवेध, भ्रमरवेध इत्यादि धनुर्विद्येंतील अवघड प्रकारहि त्यांनीं साध्य केले. त्यानंतर धनुर्विद्येचा अधिक अभ्यास करण्यासाठीं ते राजकोटला श्री. राणा नांवाच्या गृहस्थाकडे कांहीं दिवस राहिले. श्री. राणा यांनीं धनुर्विद्येबरोबरच श्री. रघुवीर यांना उत्तमपैकीं जादूचे व हिप्नॉटिझमचे प्रयोग शिकविले. श्री. रघुवीर यांनीं योगासनांचाहि चांगला अभ्यास केला असून, ते सहा तास जमिनींत पुरून घेऊं शकतात.

वस्तुत: एका आडवळणाच्या खेड्यांतील पोरका मुलगा प्रयत्न आणि चिकाटीच्या जोरावर काय करूं शकतो याचें श्री. रघुवीर एक उत्तम उदाहरण म्हणून सांगतां येईल. श्री. रघुवीर यांचा जन्म मावळ तालुक्यांतील कादव नांवाच्या चार घराच्या एका छोट्या खेड्यांत (२४ मे १९२४) झाला. लहानपणींच आई-वडील निवर्तल्या-मुळें वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत ते आपल्या चुलत्याच्या घरीं गुरें वळणें, घरकाम करणें इत्यादि कामें करीत असत. १९३६ मध्यें त्यांच्या

आयुष्याला एक निराळें वळण लागलें. त्या वर्षीं ते संस्कृत शिकण्यासाठीं लोहगड गांवीं गेले. पण जिभेवर खेडवळ भाषेचे संस्कार असल्यामुळें त्यांना ती विद्या शिकणें जमलें नाहीं. त्यांनीं शालेय शिक्षणाला आरंभ केला. बुद्धिमत्ता चांगली असल्यामुळें रघुवीर हे एका वर्षांत दोन दोन इयत्ता पूर्ण करून फायनल पास झाले. त्यानंतर आमच्या अनाथ विद्यार्थी गृह या संस्थेंत त्यांनीं पुढील शिक्षणास सुरुवात केली.

श्री. रघुवीर यांनीं, इ. स. १९४६ मध्यें भावेस्कूलमधून मॅट्रिक पास झाल्यावर हिंदुस्थानचा प्रवास केला. योगासनें, धनुर्विद्या, जादूचे प्रयोग हीं साधनें त्यांच्याजवळ होतींच. मुंबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली इत्यादि प्रमुख शहरांतील शाळा—कॉलेजांतून त्यांचे प्रयोग झाले. इ. स. १९४८ मध्यें सौ. हिराबाई बडोदेकर यांच्या संगीत पार्टीबरोबर पूर्व आफ्रिकेच्या प्रवासाची त्यांना संधी मिळाली. आफ्रिकेंतील प्रवासाचे अनुभव त्यांनीं 'सकाळ' व 'स्वराज्य' पत्रांतून प्रसिद्ध केले. त्यावरून त्यांच्या निरीक्षणशक्तीची वाचकांना कल्पना आल्याशिवाय राहिली नाहीं.

आफ्रिकेचा दौरा यशस्वी रीतीनें पार पाडून परत आल्यानंतर त्यांनीं स्वतंत्रपणें इंग्लंड व युरोपमधील आणखी कांहीं देशांचा प्रवास केला आणि अलिकडेच पूर्वेकडील जपान आदि देशांचा दौरा संपवून ते परत आले आहेत.

श्री. रघुवीर यांनीं जादूचे प्रयोग करून आत्तापर्यंत निरनिराळ्या सार्वजनिक संस्थांना देणगीदाखल ४८ हजार रुपये मिळवून दिले आहेत, याचा या ठिकाणीं मुद्दाम उल्लेख केला पाहिजे.

प्रवास पुष्कळ लोक करतात; पण समाजाचें व संस्कृतीचें निरीक्षण करण्याची दृष्टि थोड्यांनाच असते. त्यांतल्याहि फार थोड्यांना आपले अनुभव, निरीक्षण व विचार लिहिण्याची कला साधते. अशा थोड्यांपैकीं श्री. रघुवीर आहेत. त्यांचे अनुभव आबाल—वृद्धांना मनोवेधक वाटतील.

अनाथविद्यार्थी गृह, पुणें २<br>ता. १–१०–५४

**ग. श्री. खैर**

# दुसऱ्या आवृत्तीसंबंधीं—

' प्रवासी जादूगार ' पुस्तकाची ही दुसरी आवृत्ति वाचकांच्या हातीं देतांना मला अतिशय आनंद होत आहे. ' केवळ चार महिन्यांत दोन हजार प्रतींची पहिली आवृत्ति संपण्याचा हा मराठी प्रकाशन–क्षेत्रांत तरी विक्रमच म्हटला पाहिजे ' असें एका प्रकाशकानें मला म्हटलें तेव्हां माझें मन अभिमानानें भरून आलें असल्यास आश्चर्य नाहीं. अर्थात् या यशाचें सर्व श्रेय मी माझ्याकडे घ्यावयास तयार नाहीं. ज्या सहृदय वाचकांनीं माझ्या पुस्तकाचें सक्रिय स्वागत करून मला प्रोत्साहन दिलें त्यांचाहि या यशांत फार मोठा वाटा आहे, हें मला आनंदानें मान्य केलें पाहिजे. या परिचित–अपरिचित वाचकांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

हें पुस्तक लिहिण्याच्या व प्रकाशित करण्याच्या कामीं मला अनेक मित्रांचें सहाय्य झालें. पुस्तकांतील मजकूर प्रथम ' स्वराज्य ' साप्ताहिकांत क्रमशः प्रसिद्ध झाला होता. तो पुनर्मुद्रित करण्याची परवानगी त्या साप्ताहिकाचे संपादक डॉ. ना. भि. परुळेकर यांनीं दिली. त्याबद्दल त्यांचे व माझे गुरुजी डॉ. ग. श्री. खैर यांनी माझा व पुस्तकाचा परिचय करून दिला त्याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

' सकाळ ' चे सहसंपादक श्री. मो. स. साठे आणि ' राज्यशास्त्राचा विकास ' या ग्रंथाचे लेखक श्री. स. मा. गर्गे या मित्रद्वयानें वेळोंवेळीं उपयुक्त सुधारणा सुचवून आपुलकीनें मला सहकार्य दिलें. त्यांचे व माझे स्नेहसंबंध लक्षांत घेतां आभार मानणें औपचारिकपणाचें ठरेल. दोघांचाहि मी ऋणी आहें.

ज्ञानविलास प्रेसचे मालक श्री. म. बा. जोशी यांनीं कामाची गर्दी असतांहि अगदीं थोड्या अवधींत अतिशय आकर्षक छपाईचें काम करून दिलें. तसेंच, चित्रकार श्री. के. व्ही. पुंडे यांनीं मुखपृष्ठावर कल्पकतापूर्ण चित्र काढून दिल्याबद्दल, त्याचप्रमाणें कव्हरछपाई व

आंतील आर्टपेपरची फोटो छपाई के. जोशी अँड को. यांनीं केल्या-बद्दल या सर्वांचा मी आभारी आहें.

मी लौकरच सोव्हिएट रशियाचा प्रवास करणार आहें. तेथील ग्रामीण जीवनाचा जास्तींत जास्त अभ्यास करण्याचा माझा विचार आहे. तेथील अनुभवासंबंधीं मला पुस्तक प्रकाशित करतां आल्यास माझ्याप्रमाणेंच प्रवासवर्णनाची आवड असणाऱ्या असंख्य वाचकां-नाहि आनंद होईल अशी मला आशा आहे.

## तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्तानें—

प्रवासाची गोडी अवीट असते. पण मनोरंजक प्रवास वर्णनें वाचण्याचा आनंद त्यापेक्षाहि अवीट असतो. 'प्रवासी जादूगार'ची दुसरी आवृत्ति अगदीं अल्पावधींत संपल्यावरून माझें वरील विधान वाचकांना सहज पटण्यासारखे आहे. आज तिसऱ्या आवृत्तीच्या प्रकाश-नाचा योग आला आहे. त्याबद्दल मी वाचकांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. या आवृत्तींत कांहीं नवी सुंदर छायाचित्रें समाविष्ट केली आहेत. पहिल्या दोन प्रमाणेंच या आवृत्तीचेंहि वाचक सहर्ष स्वागत करतील अशी मला खात्री वाटते.

भारतीय जादूची शाळा
८४१ सदाशिव पेठ,
भाऊमहाराज बोळ, पुणें २
१-५-५७

जादूगार रघुवीर

ग्रंथ व ग्रंथालय

# ‘ प्रवासी जादूगार ’ संबंधीं

# कांहीं निवडक अभिप्राय

[ प्रस्तुत पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर लेखकाकडे अनेक परिचित-अपरिचित वाचकांचीं पत्रें आलीं. त्यांत माहित्यिक, पत्रकार, शिक्षक, विद्यार्थी इत्यादि सर्व प्रकारच्या वाचकांचा समावेश आहे. तसेंच महाराष्ट्रांतील प्रमुख वृत्तपत्रांनींहि त्यावर चांगले अभिप्राय व्यक्त केले. त्या सर्व पत्रांचा आणि अभिप्रायांचा या ठिकाणीं उल्लेख करणें शक्य नाहीं. वानगीदाखल त्यांतील निवडक अभिप्राय पुढें दिले आहेत. त्यावरून मराठी वाचकांनीं पुस्तकांचें किती उत्सुकतेनें स्वागत केलें याची सहज कल्पना येऊं शकेल. —लेखक ]

मराठींतील एक प्रथितयश साहित्यिक आणि ‘ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ’ या अभिनव प्रवासवर्णनपर पुस्तकाचे लेखक

**श्री. अनंत काणेकर लिहितात :—**

“ . . . आपलें पुस्तक इतक्या आकर्षक पद्धतीनें लिहिलें आहे कीं हातांत घेतल्यावर संपविल्याशिवाय खालीं ठेववेना. विशेषत: आफ्रिकेचीं वर्णनें फार आवडलीं. अशीं पुष्कळ पुस्तकें आपण लिहावीं . . . ”

**किर्लोस्कर मासिकाचे संपादक लिहितात :—**

“ . . . आपल्या पुस्तकाची ३ री आवृत्ति इतक्या अल्पावधींत निघत आहे, ही एकच गोष्ट या पुस्तकानें मराठी वाचकांचीं मनें किती चटकन आकर्षित केलीं आहेत हें सिद्ध करण्यास पुरेशी आहे. प्रवासवर्णन म्हणजे केवळ नद्या, पर्वत, प्रेक्षणीय स्थळें यांचा तपशील नव्हे. प्रवासाला निघणाऱ्या व्यक्तीला आलेले अनुभव व

भिन्न भिन्न स्थळें, निसर्गदृश्यें, व्यक्ति, समाज यांची त्याच्या मनावर झालेली प्रतिक्रिया यांच्या वर्णनानेंच कोणत्याहि प्रवासवृत्तांत खरा जिवंतपणा येतो. आपल्या पुस्तकाच्या यशाचें हेंच रहस्य आहे. आपलें प्रवासवर्णन वाचून अनेक हिंदी तरुणांना प्रवास करण्याची गोडी समजेल व प्रवास करण्याची आवड महाराष्ट्रांत वाढीस लागेल अशी खात्री आहे. "

### रविवार सकाळ, पुणें

प्रवास, अनुभवाचा साठा आणि मार्मिक निरीक्षणाची जोड मिळाल्यामुळें श्री. रघुवीर यांच्या लेखणींतून जिवंत प्रवासवर्णन उतरलें आहे. याची साक्ष हें पुस्तक वाचीत असतांना पानोपानीं येते . . . शब्दांचें अवडंबर न माजवितां विचार मांडण्याची शैली त्यांना इतकी सहज साधली आहे कीं पुस्तकाचीं दोनचार पानें वाचलीं कीं, त्याच्यापुढें काय, अशी उत्सुकता वाचकाच्या मनांत आपोआप उत्पन्न होते. या पुस्तकाच्या वाचनानें आपणहि प्रवासाला निघावें व जग पाहून यावें अशी उर्मी अनेकांत निर्माण झाल्यास नवल नाहीं.

### लोकसत्ता, मुंबई

हिंदी माणूस जात्याच प्रवासाला नाखूश असतो. अशा स्थितींत श्री. रघुवीर यांनीं १७ देश पायाखालीं घालावे हें खचित अभिनंदनीय आहे. या प्रवासाचें फळ म्हणजेच हें पुस्तक होय. प्रत्येक देशांत सामान्य लोकांत राहून तेथील लोकजीवनाची लेखकांनीं जवळून पहाणी केली आहे. मधून मधून तेथील लोककथा, लोकांचे समज वगैरेंची माहिती त्यांनीं दिली आहे. कोलंबोंतील चहा पिणारे हत्ती, आफ्रिकेंत केसांना इस्त्री करणाऱ्या बायका, तेथील हलता पण न पडणारा दगड वगैरे अनेक प्रकारची माहिती अतिशय उद्बोधक आहे. पुस्तक आबालवृद्धांना प्रिय होईल.

...राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ
अनुक्रम ...................... विः .........
क्रमांक ...................... नोंः दिः ......



**साप्ताहिक मौज, मुंबई**

श्री. रघुवीर स्वतःच्या जबाबदारीवर, पैशाचें फारसें पाठबळ नसतांहि इंग्लंडला व अलीकडे जपानला जाऊन आले. अत्यंत गरिबींतून वर आलेल्या या तरुणाचें एकमेव धन म्हणजे त्याचा चौकस स्वभाव. त्यामुळें केवळ जादूच्या राज्यांत मुलूखगिरी करून रघुवीर थांबले नाहींत. ते गेले तेथें धडाडीनें काळ्या, गोऱ्या, पिवळ्या लोकांत मिसळले. बाजारपेठेपासून तों जंगल–शेतापर्यंत हिंडून परक्या लोकांच्या बरोबरीनें काम करून त्यांनीं त्यांच्या भाषा, चालीरीती आणि दैनंदिन जीवनांतील लकबा आत्मसात केल्या. केवळ प्रवाशापुढेंच नव्हे, तर भूगोलाचे कंटाळवाणे धडे अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांपुढेंहि असलीं प्रवासवर्णनें अनेक दृष्टचा आदर्श म्हणून ठेवलीं जावींत.

**दैनिक भारत, पुणें**

य पुस्तकांत आफ्रिका, युरोप आणि जपानचा प्रवास अत्यंत मनोरंजकपणें लिहिला आहे. प्रवासांतील बारीक सारीक गमतींनीं पुस्तक वाचण्याची उत्कंठा वाढते. लेखकाची निरीक्षणशक्ति, प्रवा–साची आवड, प्रत्येक गोष्टीबद्दल जिज्ञासा व कुतुहल यामुळें त्या त्या ठिकाणचे रीतीरिवाज, त्या लोकांच्या आवडी–निवडी, पेहराव वगरे गोष्टी वाचकांना भूगोलाप्रमाणें क्लिष्ट न होतां मजेदार वाटतात. अशा चटकदार प्रवासवर्णनाचा आपल्याकडे अभाव आहे; यापुढें लेखकाचा रशियास जाण्याचा विचार आहे. 'प्रवासी जादूगार-' प्रमाणें 'रशियांतील जादू' लवकरच वाचकांना वाचावयास मिळो. आपल्या देशांत राहून दुसऱ्या देशाची काल्पनिक सफर करण्यासाठीं आबालवृद्धांनीं हें पुस्तक जरूर वाचावें.

**सोलापूर समाचार, सोलापूर**

जादूगार रघुवीरबरोबर आपण स्वतः प्रवासास निघालों आहोंत असें हें पुस्तक वाचतांना वाटतें आणि एक एक आठवण वाचीत

वाचीत वाचक रंगून जातो. त्यामुळें पुस्तक केव्हां संपतें हें समजतहि नाहीं. परदेशांत पुष्कळजण जातात. पण अशा मनोरंजक माहितीचा संग्रह करून तो सोप्या भाषेंत वाचकांना उपलब्ध करून देणारे फारच थोडे . . . पुस्तकांतील छायाचित्रांमुळें पुस्तकाच्या सौंदर्यांत भरच पडलेली आहे. 'प्रवासी जादूगार' हें पुस्तक लिहिण्यापूर्वी घेतलेल्या परिश्रमाची झळ न लागतां पुस्तक वाचतांना वाचकांना स्वत: प्रवास केल्याचें श्रेय लाभतें. म्हणून प्रत्येकानें या 'जादूगाराला' आपल्याजवळ अवश्य बाळगावें.

**दक्षिण विभाग स्त्री संस्था संयुक्त समितीच्या अध्यक्ष लिहितात—**

'प्रवासी जादूगार' हें पुस्तक वाचून मला अत्यंत आनंद झाला. 'प्रवासवर्णन लिहावें तर असें' असा सहजोद्गार वाचतां वाचतां माझ्या मुखांतून निघून गेला. अत्यंत सोप्या भाषेंत आणि मुलांना सुद्धां वाचण्यांत गोडी वाटावी, रस वाटावा अशा शुद्ध आणि सोप्या भाषेंत आपण जें प्रवासवर्णन लिहिलेंत तें मराठी भाषेंतील प्रवास वर्णनाच्या दालनांत आदर्श ठरेल अशी माझी खात्री आहे.

**एक विद्यार्थी, एम. एम. हायस्कूल, उंबरगांव (जि. ठाणें) लिहितो—**

दहाव्या इयत्तेंत पहिला नंबर पटकावल्याबद्दल मला तुमचें 'प्रवासी जादूगार' हें पुस्तक मिळालें. तें मी संपूर्ण वाचलें. त्यांतील आपली वर्णन करण्याची पद्धत मला फार आवडली. खरोखर तीं प्रवासवर्णनें वाचल्यावर आपणच त्या वातावरणांत हिंडत आहोंत असा भास झाल्याखेरीज रहात नाहीं. मला हें पुस्तक मिळाल्यामुळें दोन फायदे झाले. ते म्हणजे एक जगप्रवासाचें आकर्षक असें वर्णन वाचावयास मिळालें व त्याबरोबरच कांहीं प्रसिद्ध स्थळांचीं, प्राण्यांचीं व माणसांचीं छायाचित्रें माझ्या संग्रहीं राहिलीं.

# अनुक्रम


**विषयांची सूचि** पृष्ठ

(१) काळ्या खंडाची सफर ... ... १५
(२) गोऱ्या लोकांच्या देशांत ... ... १२५
(३) पूर्वेकडील फेरफटका ... ... २०१

**नकाशांची सूचि**

(१) जगप्रवासाचा मार्ग ... ... ९
(२) आफ्रिकेंतील प्रवासाचा मार्ग ... ... १६
(३) जपान ... ... २०२


**चित्रांची सूची** पृष्ठसंख्या

सिंहाची झडप ... ... ... १७
निग्रोंचें वाद्य ... ... ... १७
भांग पाडणारी स्त्री ... ... ... १७
मोटारीपुढें सात सिंह ... ... ... ३२
हत्तीचे प्रचंड दांत ... ... ... ३३
निग्रो स्त्रियांची शिरोभूषणें ... ... ... ४८
चित्ता ... ... ... ४९
निग्रो मित्र ... ... ... ४९
निग्रो पुरुषांची शिरोभूषणें ... ... ... ६४
झेब्र्यांचा कळप ... ... ... ६५
निग्रोचा कान ... ... ... ६५
माणसाळलेली मगर ... ... ... ८०
मगरीचें अंडें ... ... ... ८१
मान हलविणारा दगड ... ... ... ९६
निसर्गाचें बांधकाम ... ... ... ९७

चित्रांची सूची


| | पृष्ठसंख्या |
|---|---|
| फूटपाथवरील चित्रकार ... ... ... | १४४ |
| इंग्रज शेतकरी मित्र ... ... ... | १४४ |
| टॉवर ऑफ लंडन ... ... ... | १४५ |
| चौकांतील जादूगार ... ... ... | १४५ |
| अस्वलाचें पिलू ... ... ... | १६० |
| बागेंतील थिएटर ... ... ... | १६० |
| इंग्रज कुटुंब ... ... ... | १६१ |
| जाहीरातबाजीचा नमुना ... ... ... | १७६ |
| जपानी भोजनपद्धति ... ... .. | १७७ |
| जपानमध्यें सत्कार ... ... ... | २०६ |
| कामाकुरामधील बुद्धमूर्ति ... ... ... | २०७ |
| जपानी शेतकरी ... ... ... | २०८ |
| इंदिरा हत्तीण ... ... ... | २०८ |
| जपानी कुटुंब ... ... ... | २०९ |
| शेतकरी कुटुंबांत ... ... ... | २०९ |
| अणुबाँबमुळें जखमा ... ... ... | २२४ |
| हिरोशिमा शहर (उध्वस्त) ... ... ... | २२५ |
| हिरोशिमा शहर (नवें) ... ... ... | २२५ |
| अणुबाँब स्फोटाचें ठिकाण ... ... ... | २४० |
| जपानी पहिलवान ... ... ... | २४० |
| बांबूची भिंत ... ... ... | २४१ |
| जपानी समाजदृश्यें ... ... ... | २५६ |
| जपानी समाजदृश्यें ... ... ... | २५७ |

# काळ्या खंडाची सफर




पूर्व आफ्रिकेंतील श्री रघुवीर यांचा प्रवासाचा मार्ग व भेट दिलली प्रमुख स्थळें



झाडाला बांधून ठेवलेल्या हरिणावर झडप घालून सिंहीण फडशा पाडीत आहे. शेजारीं तिचे तीन छावे आहेत. अशा वेळीं थोड्या अंतरावर मोटारींत बसून सिंहाच्या जीवनाचा अभ्यास करतां येतो.



भोपळचाला भोपळे जोडून तयार केलेलें आफ्रिकेंतील एक नाविन्यपूर्ण वाद्य



निग्रो स्त्री तीक्ष्ण हत्यारानें भांग पाडीत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## अनपेक्षित लाभ

गुजराथ प्रांतांत अनेक ठिकाणीं जादूचे कार्यक्रम संपवून मी नुकताच पुण्याला परतलों होतों. एका वर्तमानपत्रांत, 'सौ. हिराबाई बडोदेकर आफ्रिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत' अशा अर्थाचा मजकूर वाचला. मनांत सहज विचार आला, मला त्यांच्याबरोबर जाण्यास मिळालें तर किती बहार होईल! हा विचार मी माझ्या एका मित्राजवळ बोलून दाखविला. तो म्हणाला, "हिराबाई संगीताच्या कार्यक्रमाकरितां जाणार, तेथें तुझ्या जादूचा काय उपयोग?" मित्राचा प्रश्न समर्पक होता. पण मला राहवलें नाहीं. मी हिराबाईंच्या बंगल्यावर गेलों व त्यांच्याबरोबर प्रवासाला येण्याची इच्छा दर्शवली. "आमच्या पार्टीची सर्व तयारी झाली आहे, तेव्हां यापुढें तुम्हांला कसें नेतां येईल?" हिराबाईंच्या या प्रश्नानें मी अगदीं निराश झालों. "मला बरोबर नेतां आलें नाहीं तरी चालेल. परंतु आपण माझा कार्यक्रम एकदां अवश्य पहा," असें मी म्हणतांच हिराबाईंनीं होकार दिला व दुपारीं त्यांच्याच घरीं एक तासाचा कार्यक्रम झाला.

दुसरे दिवशीं सकाळीं एक मनुष्य माझ्याकडे आला व "हिराबाईंनीं बोलाविलें आहे" असा त्यानें निरोप सांगितला. मला इतका आनंद झाला कीं क्षणाचाहि विलंब न लावतां हिराबाईंच्या बंगल्यावर गेलों. मुख्य हॉलमध्यें हिराबाईंचे मॅनेजर श्री. सुपेकर बसले होते. त्यांनीं माझी विचारपूस केली व तुमच्या 'एंट्री परमिट' करतां आज आफ्रिकत

सरकारला लिहित आहोंत, असें ते म्हणाले. या अनपेक्षित लाभामुळें मी आनंदानें जवळ जवळ वेडा झालों होतों. मला धड एक शब्द सुद्धां बोलतां येईना. मी माझें नांव, पत्ता वगैरे माहिती दिली. ' आफ्रिकन सरकारकडून उत्तर येतांच पासपोर्टकरितां परत यावें लागेल ' असें सांगून मॅनेजर दुसऱ्या कामाकरितां निघून गेले.

मला आफ्रिकेला जायला मिळणार, एक नवीन देश पहायला मिळणार; तेथील चालीरीति, भाषा, निसर्ग सर्वच कांहीं नवीन. पण हें सर्व केव्हां ? परमिट आलें तर ! एकादी अवघड गोष्ट साध्य करून घ्यावयाची असेल तर नकळत देवाचें, स्मरण होतें. मग या बाबतींत मी तरी अपवाद कसा असेन ? रोज सायंकाळीं आमच्या अनाथ विद्यार्थी गृहांतील रामाचें दर्शन घेऊन ' भीमरूपी महारुद्रा 'चा जप करूं लागलों आणि शेवटीं बारा दिवसानंतर परवाना आल्याचें समजलें.

## तयारीचीं चक्रें सुरू झालीं

परवाना हातांत पडतांच सर्व कामांची तयारी अगदी जोरांत सुरू झाली. माझा पगार ठरला. कपडे काय करावेत याविषयीं विचारविनिमय झाला. आफ्रिकेला जाण्यास मला परवाना मिळाला. ही बातमी माझ्या सर्व मित्रांना जितक्या लवकर सांगतां येईल तितकें बरें, म्हणून मी सर्वांकडे सायकलवर दिवसभर हिंडलों. मित्रांनीं माझ्या यशाबद्दल छोटा सत्कारहि केला.

आफ्रिकेला जाणारी आमची 'आरुंडा बोट' मुंबईहून सुटण्याला अजून १५ दिवस अवकाश होता. पासपोर्टवर मामलेदार, कलेक्टर इत्यादि अधिकाऱ्यांच्या सह्या घ्यावयाच्या होत्या. त्याचप्रमाणें कॉलरा, पिवळा ताप, देवी इत्यादींचीं प्रतिबंधक इंजेक्शनें घेण्याचें कामहि चालू होतें. इंजेक्शननें थोडा ताप येई; पण कामाच्या गडबडीमुळें त्याचें भान रहात नसे.

आफ्रिकेच्या प्रवासाकरितां कांही खास वस्तू बरोबर घ्याव्या लागतात. त्यांत मच्छरदाणी, बुटाचे दोन जोड, हॅट, क्वीनिनची बाटली इत्यादींचा समावेश होतो. त्याशिवाय उलन सूट, ओव्हर कोट, यांचीहि जरूरी भासते. मॅनेजर म्हणाले, आफ्रिकेंत कांहीं महिने

कडक थंडी असते. आफ्रिका खंड अति उष्ण, मग तेथें इतकी कडक थंडी कशी ? पण अशा शंकांची त्या वेळीं जरूर नव्हती.

शेवटच्या पंधरा दिवसांत मी आफ्रिकेविषयीं खूप विचार करीत असे. तेथील निसर्ग, रानटी प्राणी, काळेकभिन्न निग्रो, सर्वांविषयीं मोठे गंमतीचे विचार मनांत येत आणि विचार करीत करीत झोप-ल्यामुळें, आफ्रिकेच्या जंगलांतून मी चाललों आहें, मध्येंच एकादा प्रचंड हत्ती माझेसमोर येऊन उभा राहिला आहे, अशीं किती तरी स्वप्नें पडत. शाळेमध्यें दुर्लक्षित झालेला आफ्रिकेचा भूगोल त्या दिवसांत मोठ्या आपुलकीनें वाचून काढला. त्यांतील चित्रें बराच वेळपर्यंत टक लावून पाहिलीं पण अशीं चित्रें पहात असतांना वाट, आपण थोड्याच दिवसांत आफ्रिकेंतील नैसर्गिक जीवन अगदीं जवळून पहाणार आहोंत, मग हीं कागदी चित्रें कशाला ?

बोट सुटण्यास चार दिवस राहिले होते. पुण्यांतील सर्व मित्र-मंडळींचा निरोप घेऊन मी मुंबईला जाण्यास निघालों. पुणें सोडतांना बरेंच वाईट वाटलें. स्टेशनची पाटी, प्लॅटफॉर्मचे दगड, कितीतरी वेळ न्याहाळून पाहिलें. खरंच मी परत या दगडावर पाय ठेवण्यास येईन का ? वियोगाच्या कल्पनेनें न कळत माझे डोळे ओले झाले.

## मुंबईतील चार दिवस

मुंबईतले चार दिवस अगदीं गडबडींत गेले. पासपोर्ट ऑफिसमध्यें जाऊन 'नो ऑबजक्शन' सर्टिफिकेट मिळविलें. त्यासाठीं फारच त्रास सोसावा लागला. दोन तास ऑफिसचे बाहेर बसून होतों. आंतला माणूस मोठ्यानें गप्पा मारतांना व हंसतांना ऐकूं येई. जणूं त्याला बाहेर तिष्ठत बसलेल्या माणसांची कल्पनाच नव्हती. 'नो ऑबजेक्शन' प्रमाणेंच बरोबर असलेल्या सामानाची यादी करणें त्रासाचें काम होतें. कारण माझ्या जादूच्या पेटींत बारीक सारीक अनेक वस्तू होत्या. शिवाय जादूच्या उपकरणांचीं काय वर्णनें लिहावीत हेंच कळेना. कशींतरी दोनशें वस्तूंची वर्णनें लिहिलीं व नंतर बाकी 'जादूचें व धनुर्विद्येचें बारीक सारीक सामान' असें लिहून सर्व वस्तू

बॅगेंत भरल्या. वस्तूंचीं नांवें व वर्णनें लिहीत असतांना, काय काय वस्तू पसरून ठेवल्या आहेत हें पाहण्यासाठीं घरांतील माणसांची गर्दी झाली होती. बॅगा भरून होतांच, नांवांचीं, वर्गांचीं व गांवांचीं अशीं तीन तीन लेबलें चिकटविण्याचें काम संपवून मी झोपलों. मनांत विचार सुरू झाले, 'उद्यां तारीख २४ डिसेंबर १९४८. सकाळींच आमची बोट सुटेल व ती दूर दूर अथांग समुद्रांत निघून जाईल आणि फेसाळत हंसत नवजीवन शोधण्याकरितां निघालेल्या सागरी लाटां-प्रमाणें माझ्याहि नवजीवनास सुरुवात होईल.'

सकाळीं ९ वाजतां सामानासह आम्ही डॉकवर गेलों. एजंटनें सामान तपासण्याची सोय करून ठेवली होती. तेथेंच आमची वैद्यकीय तपासणी झाली. ही तपासणी म्हणजे, डॉक्टर फक्त नाडी पाहतो व 'ओ. के.'चें सर्टिफिकेट देतो. नाडीशिवाय कांहींहि तपासलें जात नाहीं अगर प्रश्नहि विचारले जात नाहींत. तें काम उरकतांच पासपोर्ट दाखवून बोटीच्या कडेस लावलेला प्रचंड जिना चढून आम्हीं बोटींत प्रवेश केला.

केवढी ही प्रचंड बोट! जणूं छोटें गांवच. प्रवाशाप्रमाणें त्यांना पोंचविण्यास आलेल्या नातेवाईकांचीहि भरपूर गर्दी होती. माणसें एकमेकांस भेटत होतीं. कोणी हंसत होते, तर कोणी आजूबाजूच्या लोकांस न समजेल अशा तऱ्हेनें रडून आपल्या प्रियजनांना निरोप देत होते. बाहेर भराभर सामान चढविणाऱ्या क्रेनचा कर्ऽऽकर्ऽऽ असा कानठळ्या बसविणारा आवाज येत होता. माझे मित्र डॉकवर पोंचविण्यास आले नसल्यामुळें इतरांचे निरोप घेण्याचे प्रकार पाहाण्या-व्यतिरिक्त मला कांहींच काम नव्हतें.

## किनारा सोडला

भोंगा वाजवून नातेवाइकांस खालीं उतरण्याची सूचना मिळाली. माणसें खालीं जातांच दुसरा भोंगा वाजला व शिडी वर घेण्यांत आली. बोटीवरचा बँड वाजूं लागला व एक छोटी बोट आमच्या

बोटीस किनाऱ्यापासून दूर ओढूं लागली. आमची बोट किनाऱ्यापासून दूर जात होती. इतका वेळ दुसऱ्यांची गंमत पहात होतों. पण किनाऱ्याची भूमि दुरावत चालली तसतशी माझी मन:स्थिति जरा विचित्र होऊं लागली. कांहीं तरी अमोलिक ठवा आपल्यापासून दूर जात आहे, असा मला भास झाला. किनाऱ्यावर हात वर करून निरोप देणाऱ्या लोकांकडे व लहान लहान होत जाणाऱ्या इमारतींकडे मी वेड्यासारखा कितीतरी वेळ पहात होतों. त्या धुंद मन:स्थितींतून जागा झालों तों पायलट उतरण्याकरतां बोटीनें वाजविलेल्या भोंग्यामुळें. पायलट उतरला व आमच्या बोटीनें आफ्रिकेचा मार्ग आक्रमिण्यास सुरवात केली.

माझ्या खोलींत एकंदर चार माणसें होतीं. सर्वजण आमच्या पार्टींतले असल्यामुळे गप्पा व विनोदास खूपच रंग चढे. हिराबाईंचे भाऊ सुरेशबाबू विनोदी चुटके सांगण्यांत मोठे पटाईत. प्रत्येक चुटक्याचे शेवटीं हास्याचा होणारा प्रचंड गडगडाट ऐकून आजूबाजूच्या प्रवाशांना आमचा हेवा वाटला असेल. दुसरे दिवसापासून ते प्रवासीसुद्धां आमच्या खोलींत येऊन गप्पांत सामील होऊं लागले.

## मी भविष्यवादी बनलों

मी जादूगार आहें हें समजल्यावर बऱ्याच लोकांनीं माझी ओळख करून घेतली. "आपण जादूगार आहांत तेव्हां थोडें भविष्य जाणत असालच ! " हा प्रश्न बहुतेकांनीं मला विचारला. प्रथम प्रथम मी कांहींच उत्तर देत नसे. मी भविष्याविषयीं बोलत नाहीं हें पाहून कांहीं लोक मला बोलत बोलत बाजूला नेत व हळूच म्हणत, "सांगा ना आमचें भविष्य !" आणि लोकांच्या आग्रहावरून मीहि त्यांचें भविष्य सांगू लागलों. खरें म्हटलें तर या शास्त्रांतलें मला कांहीं समजत नाहीं. पण लोकांची व स्वत:ची करमणूक करण्याकरतां भविष्य सांगण्यास सुरवात केली. हाताच्या रेषा पाहून कांहीं लोकांना मीं पुढीलप्रमाणें भविष्य सांगितलें—"आपण अतिशय कष्ट करून पैसा मिळवितां; पण पाहिजे तितका तो शिल्लक राहत नाहीं. आपण

स्वभावानें जात्याच शांत आहांत. पण रागवल्यानंतर अगदीं वाघा-प्रमाणे संतापता. एकाच वेळीं आपल्या मनांत अनेक विचार येतात व अशा वेळीं आपणांस काय करावें हें समजत नाहीं. " हें भविष्य आजूबाजूला कोणी नसतांना एकेकास सांगत असे व तें लोकांना इतकें पटे कीं अगदीं अल्पावधींत एक नांवाजलेला भविष्यकार म्हणन लोक मला ओळखू लागले.

रोज सायंकाळीं बोटींत आमच्या पार्टीच्या नृत्याच्या व गायनाच्या तालमी होत. अगदीं ऑफिसरपासून ते खलाशापर्यंत बहुतेक लोक दरवाजांत डोकावून जात. तालमीची चुणूक पाहून हे कार्यक्रम आफ्रिकेंतील लोकांना निश्चित आवडतील असें बऱ्याच लोकांनीं सांगितलें लोकांच्या उत्तेजनामुळें तालमीची कालमर्यादा अधिकाधिक वाढत गेली.

डेकवर गप्पा मारतांना लोक म्हणत, ' आफ्रिकेचा प्रवास म्हणजे अगदीं कंटाळवाणा. झाडें, डोंगर अगर पक्षी यांपैकी कांहींहि दिसा-वयाचें नाहीं. वर आकाश आणि खालीं पाणी. नजर पोहोचेल तेथवर पहावें. नाहींतर स्वस्थ पडून रहावें. परंतु ह्या ट्रीपमध्यें हिराबाईच्या पार्टीमुळें नवचैतन्य निर्माण झालें आहे. कोणाच्याहि तोंडावर औदासिन्य दिसत नाहीं. जो तो सदा हंसतमख असतो.'

## ' महाराजा क्लास '

आफ्रिकेच्या बोटीवर डेकवरून प्रवासी नण्याची सोय असते. डेकचें भाडें अत्यंत कमी असतें. या वर्गांत मजूर वर्गाचा भरणा जास्त असला तरी, वरच्या वर्गांत जागा न मिळाल्यामुळें डेकनें जाणारे इतरहि कितीतरी लोक असतात. हे लोक या क्लासला ' महाराजा क्लास ' म्हणतात. आमच्या बोटींत एक आईस्क्रीमवाला डेक क्लासनें प्रवास करीत होता. आतांपर्यंत त्यानें भारत–आफ्रिकेच्या सोळा वाऱ्या केल्या होत्या. दर वेळीं आफ्रिकेस परत जातांना कोणी ना कोणी हिंदी मनुष्य धंद्याकरितां बरोबर नेत असे. या वेळीं तेरा वर्षांचा गुजराती मुलगा त्याच्या बरोबर होता. आफ्रिकेंत हातगाडीवर

आईस्क्रीम विकून बरीच कमाई होते असें तो म्हणाला. सदर गृहस्थानें आफ्रिकन लोकांविषयीं अनेक गमती जमती सांगितल्या. एकदां त्यानें नोकरीला ठवलेल्या निग्रो गड्यास आईस्क्रीमचें भांडें बाहेरून स्वच्छ करण्यास सांगितलें. गड्याला कामाची कल्पना नीट न आल्यामुळें त्यानें आईस्क्रीममकट भांड पाण्याच्या पिपांत बुडविलें व ४५ रुपयांचें आईस्क्रीम खराब केलें.

आईस्क्रीमवाल्याप्रमाणेंच गोंधळेकर नांवाचे एक गृहस्थ सेकंड क्लासनें प्रवास करीत होते. आपल्या मुलांना भारतांत शाळेंत घालण्याकरतां ते आले होते. त्यांचें घर कंपाला गांवीं आहे. त्यांनीं आमच्या सर्व पार्टीला जेवणाचें, राहाण्याचें आमंत्रण देऊन ठेवलें.

## ‘ हम कुर्सीपर बैठेंगे ’

एकदां रात्रीं बोटींतील सिनेमा पाहाण्याकरतां डेकवरचे कांहीं शीख लोक आले. सिनेमा सेकंड व इंटर क्लासकरतां असल्यामुळें डेकवरच्या लोकांना दारावरचा मनुष्य आंत सोडीना. शेवटीं नाहीं होय करतां त्यांना उभें राहण्याची परवानगी देण्यांत आली. हा आपला अपमान आहे असें समजून, “ हम कुर्सीपरहि बैठेंगे ” अशा तऱ्हेची आरडाओरड सुरू झाली. बोलाचालीवरून प्रकरण हातघाईवर आलें. शेवटीं कॅप्टन आला व त्यानें शिव्या देत धक्के मारून डेकवरच्या लोकांना घालवून दिलें. एक गोरा माणूस हिंदी लोकांशीं अशा तऱ्हेनें वागलेला पाहून सर्वांनाच वाईट वाटलें. पण करणार काय ? आमची लायकी आम्हीच घालवून बसल्यावर दोष कोणाला द्यावयाचा ?

वरील प्रकरणाची चर्चा बोटीवर दोन दिवस चालू होती.

बोटींत एक करमणुकीचा कार्यक्रम होणार होता. पण वरील प्रकारानंतर तो होऊं शकला नाहीं.

अशा तऱ्हेच्या अनेक गमती घडत होत्या. त्याबरोबरच आमची बोट आफ्रिकेच्या जवळ जवळ जात होती. आठ दिवसांच्या प्रवासामुळें सर्वजण थकले होते व कधीं एकदां जमीन पाहातों असें झालें होतें.

## काळ्या खंडाची पांढरी रेषा

३१ डिसेंबरची रात्र बोटीवरच्या खलाशांनीं मोठी मजेंत घालविली. खलाशांच्या खालच्या केबीनमध्यें रात्रीं तीन वाजेपर्यंत गाणें चालू होतें. आज सर्व प्रवासीसुद्धां लवकर उठले होते. कारण इंग्लीश कॅलेंडरप्रमाणें नव वर्षाच्या पहिल्या दिवशीं आमची बोट पूर्व आफ्रिकेच्या मोंबासा बंदरीं लागणार होती.

आज आफ्रिका दिसणार. माझ्याप्रमाणें प्रथम प्रवासाला निघालेल्या लोकांनाच नव्हे, तर सदोदित प्रवास करणारांना सुद्धां आनंद झाला होता. मी सहा वाजतां डकवर गेलों. आमचें सामान बांधण्याचा प्रश्न नव्हता. कारण आम्ही दारेसलामला उतरणार होतों व तेथें पोहोंचण्यास चार दिवस अवकाश होता. सूर्यप्रकाशाबरोबर दूर अंतरावर खडूनें काढावी तशी एक पांढरी रेषा दिसूं लागली. लोक म्हणत, हाच तो मोंबासाचा किनारा. काळें खंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या देशाचें दर्शन मला एका पांढऱ्या रेषेनें झालें. ती रेषा म्हणजे किनाऱ्यावरची पांढरी स्वच्छ बारीक वाळू होय.

किनाऱ्याचें दृश्य पहात असतांनाच आमच्या बोटीचा वेग कमी होऊन ती थांबली. आफ्रिकेंत दूर अंतरावर बोट थांबवून सर्व प्रवाशांची कसून डॉक्टरी तपासणी होते. या तपासणींत देवीसारख्या एखाद्या साथीच्या रोगानें कोणी आजारी असेल तर, बोट नजीकच्या बेटावर कांहीं वेळ थांबवितात व नंतर ती किनाऱ्याला लागते. सुदैवानें अशा तऱ्हेचा रोगी आमच्या बोटीवर कोणी नव्हता.

थोड्या वेळानें किनाऱ्याहून एक छोटी बोट येतांना दिसली. बोटीपेक्षां बोट चालविणारे निग्रो खलाशी पहाण्याची इच्छा अनिवार झाली होती. छोटी बोट जवळ येतांच दोन धिप्पाड निग्रो खलाशी दिसले. त्यांचा पोषाख मोठा मजशीर होता. शर्ट व हाफपॅंट पांढरी होती आणि डोक्यावर गोंड्याची मुसलमानी लाल टोपी होती. मूळच्या काळ्या शरीरावर पांढरा स्वच्छ पोषाख मोठा खुलून दिसत होता. डॉक्टर बोटीवर आले. सर्व प्रवाशांच्या रांगा बनविल्या गेल्या व

तपासणीस सुरुवात झाली. डॉक्टर प्रत्येक प्रवाशाकडे प्रथम नीट न्याहाळून पाही, नंतर डोळ्याची खालची पापणी तपाशी व शेवटीं नाडी पाही. डॉक्टर इतकें कसोशीनें तपाशीत होता, तरी अर्ध्या मिनिटापेक्षां जास्त वेळ लागत नव्हता. रांगा भराभर पुढें सरकत होत्या. या तपासणीनंतर पासपोर्टवर शिक्के मारले गेले व बोट मोंबासाच्या किनाऱ्याकडे जाण्यास निघाली.

पांढऱ्या किनाऱ्याचे मागील बाजूस छोटीं छोटीं लाल कौलांचीं घरें दिसूं लागलीं. या घरांची रचना आकर्षक होती. लहान मोठ्या झाडांमध्यें असलेलीं हीं घरें युरोपियन लोकांनीं खास स्वतःकरिता बांधून घेतलीं आहेत असें नंतर समजलें. युरोपियन लोकांच्या या घरांप्रमाणेंच बाजूस असलेल्या मोंबासा शहरांतील उंच इमारती-सुद्धां लक्ष वेधन घेत होत्या.

प्रवासांत ओळख झालेले व मोंबासाला उतरणारे लोक एकमेकांचे निरोप घेत होते व "आमच्या घरीं अवश्य या" असें बजावीत होते. निरोपाच्या या देवघेवीत आमची बोट धक्क्यास लागली. सामान उतरवून घेणारा निग्रो हमालांचा तांडा वर चढण्याच्या पवित्र्यांत उभा होता.

## गोरा निग्रो

साधारणपणें गोदींत काम करणारीं सर्व माणसें तगडीं असतात. पण निग्रो लोकांच्या तगडेपणास तुलना नाहीं. फाटक्या अर्ध्या चड्या घातलेल्या निग्रो हमालांचा स्नायून् स्नायू मोजून घेतां येण्यासारखा होता. दंड, मांड्या, छाती, मान, सर्वच कांहीं भरदार दिसत होतें. त्या सर्व काळ्याकुट्ट हमालांमध्यें एक गोरापान निग्रो हमाल होता. त्याच्याकडे पाहून मला आश्चर्य वाटलें. मी एका खलाशाला त्याच्या वर्णाबाबत विचारतां तो म्हणाला, "हा हमाल सिसील बेटावरून आला आहे. आपली बोट तेथें थांबली नाहीं. पण वाटेंत एक सिसील बेट लागतें. तेथें कितीतरी गोरे निग्रो आहेत. ही सर्व प्रजा युरोपियन

व अरबी लोकांपासून झालेली आहे. या निग्रोंचा रंग फक्त गोरा असतो, बाकी शरीराची सर्व ठेवण इतर निग्रोंप्रमाणेंच असते."

## हमालांची धांवपळ

शिडी लागतांच हमालांची आंत येण्याची गडबड सुरू झाली. एक प्रकारचा कसला तरी वास सर्वत्र पसरला. निग्रो लोक जी तंबाखू वापरतात त्याचा तो वास होता. 'खबोदाड (खबरदार), कुईडा,व पोल्ले पोल्ले' वगैरे शब्द हमाल सामान घेऊन जात असतांना म्हणत. आपल्याकडचा खबरदार हा शब्द निग्रोंच्या तोंडून ऐकतांच मोठी गम्मत वाटली. धडधाकट निग्रोंची कामाची पद्धत तितकीशी आकर्षक वाटली नाही. कारण सामान वाहून नेत असतांना योग्य ती काळजी घेतली जात नव्हती. बॅगा धडाधड आपटल्या जात होत्या. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, आपली हिंदी पद्धत त्यांनीं उचलली होती.

सामान गेलें. मोंबासाला उतरणारे प्रवासीहि गेले. आमच्या पार्टीचें स्वागत करण्यास डॉ. कर्वे आले होते. त्यांनीं आग्रह करून आम्हा सर्वांना त्यांचे घरीं येण्याचें आमंत्रण दिलें. 'मोंबासाला बोट एक दिवस थांबणार आहे, तेव्हां एक जलशाचा कार्यक्रम आम्ही आखीत आहोंत' असें ते म्हणाले. आम्हीं सामानाची व्यवस्था लावून व केबीनला कुलूप लावून डॉ. कर्वे यांचेकडे जाण्यास निघालों.

दरवाज्यावर पास देऊन आम्ही मोटारींत बसलों. खऱ्या अर्थानें आफ्रिकेचें दर्शन अजून झालें नव्हतें. कारण जिकडे तिकडे आधुनिक सुखसोईंनी सुसज्ज असें मोंबासा शहर दिसत होतें. किनाऱ्यावरून दाट झाडी दिसत होती. पण आम्ही रस्त्यानें जाऊं लागलो, तसतशी ती अगदीच तुरळक आहे असें निदर्शनाला आलें. आमच्या मोटारीनें गांवांत प्रवेश केला. ती वेळ दुपारची होती. त्यामुळें उन्हाची जाणीव होत होती. मी माझा कोट काढून हातांत घेऊं लागलों. पण तसें करणें हें 'आऊट ऑफ एटिकेट्स' आहे हं लक्षांत येतांच परत तो अंगांत घातला. रस्त्यानें जातांना निग्रो स्त्रिया व मुलें दिसलीं. शहरी स्त्रियांचा पोषाख युरोपियन पद्धतीचा होता व त्यांनीं डोक्यास रंगीत

रुमाल बांधले होते. लहान मुलांना पाठीवरून घेऊन जाण्याची पद्धत दिसली.

डॉक्टरांचे घरीं जेवण झालें. बोटींतील त्याच त्या जेवणाचा कंटाळा आला होता. त्यामुळें हें जेवण रुचकर वाटलें. परंतु त्यांत आफ्रिकेंतील असा एकहि खास पदार्थ नव्हता. जेवणानंतर विश्रांति घेण्याकरतां मी आरामखुर्चीत बसलों तों माझे डोक्यांत घण घण असा आवाज होऊं लागला डॉक्टर म्हणाले, " इतके दिवस बोटींत बसल्यामुळें तसा आवाज येत आहे."

## आफ्रिका कीं गुजरात ?

सायंकाळीं डॉक्टरांकडील एका माणसाला बरोबर घेऊन मी गांवां-तून फेरफटका मारण्यास गेलों. दुकानावरच्या पाट्या वाचीत अस-तांना मला गुजरातमध्यें असल्याचा भास झाला. बहुतेक दुकानांचे मालक गुजराती लोक होते. माझ्या बरोबरचा माणूस म्हणाला, " आफ्रिकेंतील मुख्य भाषा स्वाहिली असली तरी दुय्यम भाषा म्हणून गुजराती वापरली जाते. येथें गुजराती शाळा आहेत, देवळें आहेत व गुजराती पद्धतीच्या खाणावळी आहेत. कांहीं निग्रोसुद्धां गुजराती बोलतात." रस्त्याच्या कडेच्या इमारती पहात मी चाललों होतों. रस्ते स्वच्छ होते व जिकडे तिकडे शांतता होती. निग्रो लोक एकमेकांशीं बोलतांना हळूहळू बोलत होते. पण त्यांचें हसणें मात्र अगदीं गडगडाटाप्रमाणें. गुजराती व मुसलमानांच्या दुकानांची मांडणी आकर्षक दिसली. एक दोन दुकानांत मी मुद्दाम गेलों. वस्तूंच्या किंमती विचारल्या. पण आपल्याकडील किंमतीपेक्षां त्या महाग वाटल्या.

मोंबासाचें मार्केट नमुनेदार आहे. मार्केटमध्यें निग्रो व्यापारीहि दिसले. बहुतेकांचा व्यापार भाजीपाला विकण्याचा होता. मार्केटच्या दरवाज्याबाहेर एक गलेलठ्ठ निग्रो डोक्यावर पिसें बांधून व एका पायांत दोन घुंगरें बांधून गाणें म्हणत नाचत होता. शब्द अगदीं भराभर उच्चारीत होता. त्याच्याजवळ तंबाखचीं वाळलेलीं पानें

होतीं. तीं पानें विकण्याकरतांच तो तेथें उभा राहून ग्राहकांचें लक्ष वेधण्यासाठीं गाणें म्हणत होता.

मार्केटच्या बाहेर कांहीं मुसलमानी हॉटेलें होतीं. शेजारीं पानाचें दुकान व त्याच्या शेजारींच पोळ्या करण्याची शेगडी उघड्यावर होती. पोळ्या करण्याची तऱ्हाहि निराळी होती. मैदा पातळ भिजवून त्याचा गोळा हातानें दाबीत दाबीत चापट केला जाई व नंतर कढई पालथी घालून त्यावर थापीत असत. ती गंमत पाहण्याकरतां हॉटेलाचे भोंवती बरींच माणसें उभीं असलेलीं दिसलीं.

समुद्रकिनाऱ्याकडे न जातां आम्ही एका बागेंत गेलों. बागेच्या बाहेर फळांचीं दुकानें होतीं. फळें फार स्वस्त होतीं. २० सेंटला (२ आण्यास) उत्तम शहाळें मिळालें.

बागेंत थोडा वेळ फिरून आम्ही घरीं आलों तो टेबलावर जेवणाची सर्व व्यवस्था केलेली होती. रात्रीं फक्त हिराबाईंचें गाणें होणार होतें. त्यामुळें मला कांहींच काम नव्हतें. जेवण करून मी बसनें बोटीवर आलों. बसमध्यें दोन वर्ग असतात. वरच्या वर्गाचें भाडें दुप्पट होतें.

## लवंगाचें बेट

२ जानेवारी १९४९ रोजीं आमची बोट दारेसलामला जाण्यास निघाली. वाटेंत झांजीबार लागलें. हें छोटेंसें पण मोठें मजेशीर बेट आहे. बोट किनाऱ्यापासून दूर उभी राहते व पडावांतून बेटावर जावें लागतें. गांवांत अरबांची वस्ती जास्त आहे. पांढरा पायघोळ झगा घातलेल्या अरबांजवळ एक नक्षीकाम केलेला सुरा असतो. तो ते पुढील बाजूस कट्यारीप्रमाणें खोंचून ठेवतात. या बेटांतून लवंगांचा मोठा व्यापार चालतो. किनाऱ्यालगत लवंगाचे मोठमोठे साठे दिसले. कांहीं घरांचे परसांतूनहि लवंगाचे फड वाळत होते. झांजीबारमध्यें हस्तीदंत व कापड स्वस्त मिळतें असें बोटींतले लोक म्हणत होते. तेथील केळींहि फार प्रसिद्ध आहेत. एकेक केळ लहान दुध्या भोपळ्याएवढें मोठें असतें. केळांची पावडर बनवून ती परदेशीं पाठविली जाते व कांहीं केळीं जनावरें पोसण्याकरतां उपयोगांत आणलीं

जातात. मी बोटीवर परत आलों तों तेथेंहि एक फळांचें दुकान निग्रो व्यापाऱ्यानें थाटलेलें दिसलें. अशा तऱ्हेच्या तात्पुरत्या दुकानाची परवानगी कंपनीकडून व्यापाऱ्यांना मिळते.

बोटीच्या आजूबाजूला निग्रोंचीं मुलें लहान लहान होड्यांतून आलीं होतीं. तीं मुलें पाण्यांत टाकलेलें नाणें बुडी मारून तें तळाशीं पोंचण्याअगोदरच पकडीत. माशांच्या चपळाईनें पाण्यांतून सुळकांडी मारीत तेव्हां त्या मुलांची हालचाल पहाण्यासारखी असे. मला मुलांची खप गंमत वाटली. जवळ जवळ पांचसहा आणे मीं पाण्यांत टाकले असतील.

झांजीबारनंतर आमची बोट सरळ दारेसलामला जाणार होती. प्रवास कांहीं तासांचा होता. तरीसुद्धां कधीं एकदां दारेसलामला पोंचतों असें झालें होतें. कारण प्रयोगाकरतां लागणारें कितीतरी सामान मला जमवावयाचें होतें; शिवाय दारेसलामला नवीन सहकारी मिळणार होता. त्याला प्रयोगांतल्या खाचाखोचा समजावून सांगावयाच्या होत्या. पुण्याहून सहकारी नेणें फार खर्चाचें होतें. म्हणून तो तेथेंच घेण्याचें ठरलें.

दारेसलाम बंदरामध्यें बोट एका चिंचोळ्या खाडींतून जाते. १९१४ चे लढाईचे वेळीं हा मार्ग दोन बोटी बुडवून बंद करून टाकला होता. दारेसलाम गांव मोठें असलें तरी बोट धक्क्याला लागते नाहीं. ती पाण्यांत दूर उभी करून नावेंतून किनाऱ्यावर जावें लागतें. मोंबासाप्रमाणें येथेंहि पासपोर्टवर शिक्के वगैरे मारून घ्यावे लागत. एका ऑफिसरनें माझ्या पासपोर्टवरील 'जादूगार' हा धंदा पाहतांच माझ्याशी हास्तांदोलन केलें. तोहि जादूगार होता. पासपोर्ट ऑफिसरला जादूचा छंद पाहून मला खरोखरीच आश्चर्य वाटलें.

दारेसलाममधील अनेक महाराष्ट्रीय लोक आम्हाला भेटण्याकरितां बोटीवर आले होते. इतक्या दूर अंतरावर मोठमोठ्या हुद्यावर असलेली ती महाराष्ट्रीय मंडळी पाहून मोठा आनंद झाला. माझी उतरण्याची व्यवस्था श्री. दाणी यांचेकडे केली होती. सामानाची व्यवस्था लावून आम्ही खास लाँचनें किनाऱ्यावर गेलों. मोटारी

उभ्या होत्याच. त्यांत बसून मी विन्हार्डी गेलों. मला पाहून सौ. दाणी व त्यांच्या मुलांना आश्चर्य वाटलें. कारण माझ्या रघुवीर नांवावरून मी कोणी तरी उत्तर हिंदुस्थानी असेन अशी त्यांची कल्पना झाली होती. तसेंच, जादूगार म्हणजे एकादा जाडाजुडा व लांबलांब मिशांचा प्राणी असेल असें चित्र त्यांनीं मनांत रंगविलें होतें. मी उत्तर हिंदुस्थानी नाहीं व शुद्ध मराठी बोलणारा पुण्याचा आहे हें ऐकतांच त्यांना आपलेपणा वाटूं लागला. श्री. दाणी यांचें सर्व आयुष्य पुण्यांत गेलें आहे व त्यांचें घरसुद्धां पुण्यांतच आहे. घरांतील माणसांनीं पुण्याबद्दल मला कितीतरी प्रश्न विचारले.

एकदां श्री. दाणींनीं मला विचारलें, "काय रघुवीर, आवडली का आफ्रिका?' श्री. दाणींच्या त्या प्रश्नास काय उत्तर द्यावें हें समजेना. कारण आफ्रिकेविषयीं माझ्या ज्या कल्पना होत्या त्या निव्वळ कल्पनाच ठरल्या. गोरीला माकड, सिंहाच्या डरकाळ्या, नयनरम्य निसर्ग, यांपैकीं मला कांहींहि दिसलें नव्हतें. इतकेंच नव्हे तर, अधून मधून दिसणारे निग्रो लोक वगळल्यास दारेसलाम म्हणजे छोटी मुंबईच. वाहनांची रहदारी, शाळा, इमारती, सुंदर सुंदर रस्ते व घाम आणणारी उष्ण हवा, सर्व कांहीं मुंबईप्रमाणें. मी बोलत नाहीं असें पाहून दाणी म्हणाले, "बरोबर हीच स्थिति माझी झाली होती. पहिल्याप्रथम या देशाविषयीं काय सांगावें हें समजत नाहीं. पण तुम्हीं जरा बारकाईनें पाहिलेंत तर निग्रो लोक मोठे दयाळू आहेत हें कळून येईल." मी दाणींना म्हणालों, "घनदाट जंगल कोठें आहे हो?" "असें जंगल तुम्हाला युगांडा प्रांतांत दिसेल. येथें जवळपास तें नाहीं आणि त्याच जंगलांत आफ्रिकेची सारी संपत्ति साठवलेली आहे." श्री. दाणींनीं माझ्या शंकेचें निरसन केलें.

दारेसलाममध्यें असतांना श्री. माणिक नांवाच्या एका पोलीस ऑफिसरची ओळख झाली. धनुर्विद्येंतल्या माझ्या नैपुण्यावर ते बेहद्द खूष होते त्यांना शिकारीचा नाद होता. मलाहि शिकारीची

आवड आहे ह त्यांना समजतांच त्यांनीं शिकारीचा एक बेत निश्चित केला. आमच्या पार्टीतील कांहीं लोकांनीं त्यांत मोठ्या आवडीनें भाग घेण्याचें ठरवलें. एका काळोख्या रात्रीं श्री. माणिक, त्यांचे दोन अधिकारी मित्र, दोन निग्रो गडी आणि आमच्या पार्टीतील पांच माणसें असे दहा लोक दोन मोटारींतून रात्रीं साडेआठचे सुमारास दारेस्लामहून निघालों. आमचेबरोबर तीन रायफली, एक शॉटगन व दोन पिस्तुलें होतीं. शिकारीची जागा शहरापासून तीस पस्तीस मैल दूर होती.

वाटेंतल्या प्रवासांत माणिकचंदांनीं पूर्वीं केलेल्या अनेक शिकारीच्या धाडसी कथा सांगितल्या. त्यांच्या कथांत आम्ही इतके रंगून गेलों कीं जंगलाचे तोंडाशीं केव्हां येऊन ठेपलों हें समजलेंदेखील नाहीं. मोटारी थांबवून सर्वांनीं थर्मासमधील चहा घेतला. मोटारीवरील सर्च लाईटचा झोत फिरविणारा मनुष्य टपावर आरूढ होतांच आम्ही बंदुकी सरसावून बसलों. सर्च लाईटच्या शिकारीची पद्धत पुढीलप्रमाणें असते:—मोटारीचा वेग कमी करून ती रस्त्यानें सावकाश चालविली जाते. टपावर बसलेला मनुष्य सर्च लाईट आजूबाजूस फिरवीत असतो. त्या लाईटमध्यें जंगली प्राण्यांचे डोळे लाल दिसतात व हे प्राणी प्रकाशाकडे पहात जाग्यावर उभे राहतात. जंगलांत लाल डोळे दिसतांच टपावरील मनुष्य मोटार थांबवण्याची खूण करतो व नंतर चमकणाऱ्या डोळ्यांचा अंदाज घेऊन शिकारी गोळ्या झाडतात.

त्या रात्रीं आम्ही पहाटें ४ वाजेपर्यंत भटकत होतों. शिकार ही वळवाच्या पावसाप्रमाणें असते. जेव्हां सांपडेल तेव्हां भरपूर; नाहीं तर कितीहि प्रयत्न केला तरी कांहींसुद्धां मिळत नाहीं. इतका वेळ भटकल्यानंतर आम्हाला फक्त दोन हरणें व सात ससे मिळाले. मोठी शिकार एकहि मिळाली नाहीं.

शिकारीच्या या प्रकाराप्रमाणें आणखी कांहीं प्रकार आफ्रिकेंत प्रचलित आहेत. सर्वांत न्यामा नांवाचा जो प्रकार असतो तो फार सोपा.

मेलेलें जनावर एका झाडाला बांधतात. जनावराच्या चारी बाजूला विशिष्ट प्रकारचे सांपळे बसविलेले असतात. जंगली जनावर-विशेषतः सिंह–मांस खाण्याला आलें कीं त्याचे पाय सांपळ्यांत अडकतात. त्यांतून सुटण्यासाठीं जनावर फार धडपड व आरडाओरड करतें. ओरडून ओरडून जनावर थकल्यावर निपचित पडून राहतें. या शिकारीच्या प्रकारांत शिकाऱ्याला जवळ थांबावें लागत नाहीं. तो सकाळी आरामशीर उठन येतो व जनावराला गोळी झाडून ठार मारतो. पण अशा शिकारींत एक धोका असतो. सापळ्यांत नर अडकला तर मादी जवळच्या झुडपांत दडून बसून येणाऱ्या शिकाऱ्यावर हल्ला करण्याचा संभव फार; पण मादी सांपळ्यांत अडकली असेल तर नर मात्र तेथें बसून राहात नाहीं, असा निरीक्षक शिकाऱ्यांचा अनुभव आहे.

या दोन्ही प्रकारांव्यतिरिक्त तिसरा एक प्रकार आहे आणि तो मात्र खरोखरीच धाडसाचा आहे. त्यांत शिकारी आपल्या एक दोन साथीदारांसह खांद्यावर बंदुक टाकून जंगलांत पायीं जातो व रानटी प्राण्यावर समोरासमोर हल्ला करतो. अशा प्रकारच्या शिकारी फक्त युरोपियन लोकच आफ्रिकेंत करतात. कारण जंगलांत खांद्यावर बंदुक टाकून जाण्यांत अनेक धोके असतात. कांहीं माकडें इतकीं हुषार असतात कीं बंदूकधारी माणसावर हल्ला करून ते बंदुकी पळवून नेतात अगर मोडून टाकतात.

परदेशी शिकारी बंदुकीच्या सहाय्यानें शिकार करतात, तर मासाई लोक बंदूक वापरणें कमी प्रतीचें समजतात. हे लोक भाल्यांचे सहाय्यानें शिकारी करण्यांत पटाईट आहेत. प्रसंग निकडीवर आल्यास भाल्याचें टोंक विषारी करण्याचीं साधनें त्यांचेजवळ असतात. मसाई शिकाऱ्यांचा पोषाख नेहमींप्रमाणें नसतो. ते डोक्यावर झाडांच्या फांद्या बांधतात व तोंडास लाल माती लावून त्यावर पांढरे पट्टे ओढतात. मसाई शिकारी दिसण्यांत उंच व शरीरानें किडकिडीत असतो.



पूर्व आफ्रिकेंतील जंगलांतून जाणाऱ्या या रस्त्यावर सात सिंह आरामांत बसले असून त्यामुळें मोटारींची वाहतूक थांबविणें भाग पडलें आहे (पृ. १०२



हत्तीचे प्रचंड दांत. दांतांची लांबी साडेसहा फूट आहे.

ालय, ठाणे. स्थल
वि:
नों: दि:

## चाल करून जाणाऱ्या म्हशी

आफ्रिकेंत सर्वांत अवघड शिकार म्हणजे रानटी म्हशींची समजली जाते. या म्हशी अत्यंत ताकतवान व रागीट असतात. शिकाऱ्यावर एकजुटीनें चाल करून जाण्याची पद्धत या म्हशी व हत्ती–शिवाय दुसऱ्या कोणत्याहि प्राण्यांत सांपडत नाहीं. रानटी म्हशीला गोळी लागली कीं ती ज्या बाजूनें गोळी आली असेल त्या बाजूला वळून शिकाऱ्यावर सरळ हल्ला करते. लागोपाठ तीन चार गोळ्या मस्तकांत शिरल्या तरी सुद्धां ती जमिनीवर पडत नाहीं. जखमी म्हैस ज्या दिशेनें पळाली असेल त्या दिशेनें इतर रानटी म्हशी धावूं लागतात व शिकाऱ्यास वेढा देतात. शिकारी झाडावर बसलेला असेल, तर त्या झाडाच्या आसपास तीन-तीन दिवस त्या थाबल्याचीं उदाहरणें सांगितलीं जातात.

निग्रो लोकांना रानटी म्हशीचें मांस फार आवडतें व कांहीं टोळ्या या भयंकर म्हशींची शिकार करण्यांत कल्पकता वापरतात. त्यांच्या शिकारीच्या कांहीं पद्धति आहेत. त्यांपैकीं एक पुढीलप्रमाणें आहे :–

टोळीचे दोन गट पाडून त्यापैकीं एक गट दूर व दुसरा कळपाचे आसपास झाडांवर दडून बसतो. म्हशींचा कळप जवळ येताच एका म्हशीचे नेमके डोळे बाणानें फोडले जातात. म्हशीला बाण लागतांच कळपास शत्रूची जाणीव होते व शत्रूचा शोध करण्याला म्हशी कान टवकारतात. इतक्यांत दूर अंतरावरचे लोक गोंगाट करूं लागतात. म्हशींचा कळपच्या कळप त्या दिशेनें धावू लागतो. गोंगाट करणारे लोक झाडांवर अगोदर बांधून ठेवलेल्या दोरांवरून झोके घेत घेत दूर जातात. इकडे कळप दूर गेल्याची खात्री झाल्यावर शिकारीजवळ लपून बसलेले लोक खालीं उतरतात व डोळे फोडलेल्या म्हशीला हत्यारानें ठार करतात. मेलेली म्हैस झाडांच्या फांद्या व पानाखालीं झाकून ठेवतात. शत्रूचा पाठलाग करणाऱ्या म्हशींना आपल्या ज़खमी म्हशीची आठवण होते व त्या पाठलाग सोडून परत येतात. परंतु जखमी म्हैस तेथें दिसत नाहीं. शेवटी थोडा वेळ शोध करून कळप

घनदाट अरण्यांत नाहींसा होतो. तास दोन तासानें निग्रो खालीं उतरून मेलेल्या म्हशीला उचलून आपल्या वस्तीकडे परततात.

निग्रोजवळ तेथील सरकारनें हत्यारें दिलेलीं नाहींत. त्यामुळें त्यांना सर्व रानटी प्राण्यांच्या शिकारी बाणांनीं व भाल्यांनीं अगर निरनिराळ्या युक्त्या योजून कराव्या लागतात. पाणघोड्याची शिकार करण्यास सरकारी खास परवाना लागतो. परंतु चोरून मारून टोळीवाले पाणघोड्याच्या शिकारी करीत असतात. पाणघोड्याची शिकार विषारी बाणानें केली जाते. अशा प्रकारें मारलेल्या पाणघोड्याचें बरेचसें मांस वाया जातें; म्हणून उंचीनें ठेंगू पण शरीरानें जाडजूड अशा या ताकतवान प्राण्याची शिकार एका धाडसी प्रकारानें केली जाते.

## पाणघोड्याची शिकार

पाणघोडा हलत्या प्रकाशाला शत्रू समजतो. त्यामुळें रात्रीचे वेळीं तळ्याच्या काठानें जाणाऱ्या मोटारीवर धडक घेऊन त्यांचा चक्काचूर केल्याचीं कांहीं उदाहरणें आहेत आणि पाणघोड्याच्या ह्याच संवयींचा उपयोग निग्रो लोकांनीं शिकारीकरितां करून घेतला आहे.

मोठमोठाल्या तळ्यांत पाणघोड्यांचा कळप कोठें आहे हें हेरलें जातें. नंतर त्या बाजूला एक मोठें झाड पाहून ठेवतात. झाडाच्या बुंध्यापासून सुमारें अडीच ते तीन फुटाचे अंतरावर उलटे खिळे मारून ठेवले जातात. झाडावर कांहीं दगड नेऊन ठेवण्याची प्रथा आहे. पाणघोडा दिवसभर पाण्यांत राहतो व रात्रीं गवत खाण्याला बाहेर येतो. अंधार पडण्यापूर्वी एक दोर व एक मशाल घेवून निग्रो लोक खिळे मारलेल्या झाडावर जाऊन बसतात. पाणघोड्याचा कळप बाहेर आल्यावर त्यांतील एकादा पाणघोडा चरत चरत झाडाजवळ आला कीं एका निग्रोच्या कमरेस दोर बांधून त्याला खालीं सोडतात. त्याच्या हातांत मशाल असते. पेटलेली मशाल पाणघोड्यापुढें हलवतांच पाणघोडा नेहमींच्या संवयीप्रमाणें त्याला धडक मारण्यास धावतो. पाणघोडा जवळ आला रे आला कीं झाडावरचे

लोक मशालवाल्या निग्रोला झटकन वर ओढतात. अतिवेगामुळें पाणघोड्याची धडक झाडावर बसते. झाडाला मारलेले उलटे खिळे त्याचे मस्तकांत घुसतात. लगेच त्या जखमी प्राण्यावर झाडावर ठेवलेल्या दगडांचा वर्षाव केला जातो. थोड्याच वेळांत तें प्रचंड धूड जमिनीवर कोसळतें.

## पाणघोड्याची धडक

या शिकारींत दोन गोष्टींची खबरदारी घ्यावी लागते. एक म्हणजे मशालवाल्या निग्रोला झटकन वर ओढण्यास हवें. त्यांत जरा का ढिलाई झाली कीं त्या निग्रोची चटणीच व्हायची. दुसरी खबरदारी म्हणजे वर बसलेल्या माणसांनीं झाडाला नीट घट्ट धरून बसण्यास हवें. पाणघोड्याच्या धडकेनें सारें झाड गदगदा हलतें. घट्ट न धरल्यास पिकलेल्या जांभळांची डहाळी हलवल्यानंतर तीं जशीं बदाबद खालीं पडतात, तशीं सर्व माणसें खालीं कोसळायचीं व डोक्यांत झाडावर ठेवलेले दगड पडून पाणघोड्याबरोबर बघ्यांचीहि शिकार व्हायची.

## मगर मारणें सोपें, काढणें अवघड

पाण्यांत राहणाऱ्या पाणघोड्याची शिकार जितकी मनोरंजक व धाडसाची, तितकीच मगरीची शिकारहि मनोरंजक आहे. या शिकारींत धाडस मात्र विशेष लागत नाहीं. आपण टारझनच्या सिनेमांत मगरी पाहतों ती अगदीं सत्य स्थिति आहे. बहुतेक तळीं मगरीचीं आगरें आहेत. कोणत्याहि जनावराला या तळ्यांत पाणी पिण्याला जातां येत नाहीं. कारण या क्रूर मगरी मोठमोठीं जनावरें पाण्यांत ओढून नेतात. मगरींची शिकार दुपारचे वेळीं करणें अत्यंत सोपें. त्या वेळीं तळ्यांत असलेल्या लहान बेटावरील दगडांवर त्या ऊन खाण्याला बसलेल्या असतात. शॉटगन घेऊन डोळे मिटून तिचा चाप ओढला तरीसुद्धां एकादी मगर मेलेली दिसेल. मगर मारणें जितकें सोपें तितकेंच ती पाण्याबाहेर काढणें अवघड. कारण इतर मगरी आपल्या शेपटीचे तडाखे बोटीवर फडाफड मारीत असतात. मेलेली मगर

पाण्याबाहेर काढणारे कांहीं निग्रो कोळी वाकबगार आहेत. आकडे व दोराच्या सहाय्यानें ते तिला पाण्याबाहेर काढतात. मगरीची शिकार मांसाकरितां व कातड्याकरतां केली जाते. कातड्यापासून मनीवॅग्ज, वाहाणा, ढाली वगैरे वस्तू तयार केल्या जातात.

## सर्व धंद्यांत हिंदी लोक

शिकारी करण्यांत दारेसलामच्या माणिकचंदाप्रमाणें तेथील कांहीं शीखहि प्रवीण आहेत. या शिखांचा धंदा जंगलांतील लाकडें कापण्याचा व जमीन लागवडीखालीं आणण्याचा आहे. तसें म्हटलें तर आपल्या हिंदी लोकांनीं तिकडे सर्व धंदे उचलले आहेत. भंगीसुद्धां गुजरात-मधून गेले आहेत.

## आफ्रिकेंत 'हनुमान व्यायाम शाळा'

दारेसलामच्या मुक्कामांत मला हरजीभाई नांवाचे एक गुजराती गृहस्थ भेटले. ते शाळेंत शिक्षक असले तरी त्यांना व्यायामाची फार आवड. 'हनुमान व्यायाम शाळा' नांवाची एक संस्था त्यांनीं किसरू स्ट्रीटजवळील मैदानावर स्थापन केली आहे. व्यायाम शाळेची इमारत सर्व साधनांनीं परिपूर्ण आहे. माझा एक कार्यक्रम या शाळेचे मदती-करतां झाला. अगोदर गांवांत झालेले कार्यक्रम लोकांना खूप आवडले होते. त्यामुळें या कार्यक्रमाला खूप गर्दी झाली. व्यायामशाळेस सुमारें दोन हजार शिलिंगांचा फायदा झाला.

## मराठा मंडळाचें कार्य

माझा कार्यक्रम हनुमान मंडळांत झाला, तसाच सौ. हिराबाईंच्या गाण्याचाहि एक कार्यक्रम मराठा मंडळांत झाला. त्या कार्यक्रमाला इतकी गर्दी झाली कीं मंडळाची जागा शेवटीं अपुरी पडली. हें मराठा मंडळ दारेसलाममधील महाराष्ट्रीय मंडळींनी स्थापन केलें आहे. आफ्रिकेंत सर्वांत जास्त महाराष्ट्रीय दारेसलामला आहेत. त्यांनीं स्थापन केलेली मराठा मंडळ ही संस्था सर्वात जुनी समजली जाते. या मंडळाचे जागेंत टेनीस, बॅडमिंटन खेळण्याची सोय आहे. शिवाय बाहेरगांवाहून आलेल्या पाहुण्यासाठीं मोफत

जागाहि मिळते. या मंडळाचें वैशिष्ठ्य म्हणजे दरवर्षी मंडळाचे सभासद एकाद्या मराठी नाटकाचें गुजराथी भाषांतर करून तें रंगभूमीवर आणतात. नाटकाच्या प्रयोगांना सर्व हिंदी लोक येतात व त्याचे तीन चार प्रयोग करावे लागतात.

आमच्या पार्टीचा मुक्काम दारेसलाममध्यें पंधरा दिवस होता. तेवढ्या दिवसांत बरेंच पाहण्यास व शिकण्यास मिळालें. येथील मुक्कामानंतर आम्ही डोडोमा नांवाचे गांवीं जाण्यास निघालों.

## काळ्या पाण्याचा रोग

दारेसलाम सोडतांना बरेच महाराष्ट्रीय आम्हाला निरोप देण्याला आले होते. गांव मोठें असलें तरी स्टेशन अगदीं साधें आहे. आमच्या मळवलीचें स्टेशनसुद्धां त्याचेपुढें चांगलें ठरेल. गाडी छोटी, पण चांगली होती. त्यांतल्या त्यांत आमचा सेकंड क्लास फारच चांगला होता. डब्यांत झोपण्याची व्यवस्था उत्तम होती. झोपतांना मच्छरदाणी लावण्यास विसरूं नये, अशा अर्थाची पाटी होती. गाडींत डासांचे थवेच्या थवे हिंडत असतात. डास चावल्यानंतर मलेरिया होणें हें विशेष समजलें जात नाहीं. डांसापासून होणारा भयंकर रोग म्हणजे ब्लॅक वॉटर डिसीझ होय. हा रोग झालेल्या माणसाला लघवी काळी होते व त्यांतच तो दगावतो. दारेसलाम येथें असतांना श्री. तांबट नांवाचे एक गृहस्थ या रोगानें मेलेले आम्हीं प्रत्यक्ष पाहिले. असल्या रोगापासून बचाव करावयाचा असेल तर आठवड्यांतून तीन चार वेळां क्विनिन खावें लागतें. मच्छरदाणीशिवाय झोपतां कामा नये आणि म्हणूनच जाळ्यांच्या खिडक्या असूनसुद्धां रेल्वेमध्यें मच्छरदाणी लावण्याची खबरदारी घ्यावी लागते.

## निग्रोची कलाकुसर

आफिरकेंत मोठीं शहरें जवळ जवळ नाहींतच. त्यामुळें गाडींत दोन दोन दिवस काढावे लागतात. परंतु हा प्रवास कंटाळवाणा वाटत नाहीं. कारण आजूबाजूचा रम्य निसर्ग व जंगली प्राणी प्रवाशांची करमणूक करीत असतात. मधून मधून लागणाऱ्या लहान लहान

स्टेशनांवर निग्रो लोक लाकडी खेळणीं व कोटी (खुर्च्या) विकण्यास आणतात. हे निग्रो लाकडांपासून प्राणी तयार करण्यांत हुषार आहेत. आमच्यापैकीं बहुतेकांच्या बॅगा या खेळण्यांनीं भरल्या होत्या.

## भांग पाडणाऱ्या स्त्रिया

डोडोमाला आल्यावर खऱ्या आफ्रिकेंत आल्यासारखें वाटलें. या शहरांत निरनिराळ्या जातींचे निग्रो पाहण्याला मिळाले. येथील निग्रोंचा वर्ण अगदीं डांबराप्रमाणें काळा होता. त्यांचे ओठ जाड होते व डोक्यावरचे केस बारीक, राठ व कुरळे होते. या निग्रोंची भांग पाडण्याची प्रथा मोठी विचित्र आहे. आपणाकडे जसे धंदेवाईक गोंदणारे लोक आहेत, त्याप्रमाणें आफ्रिकेंत भांग पाडण्याचा धंदा करणाऱ्या स्त्रिया आहेत. भांग पाडणाऱ्या स्त्रीजवळ एक मडकें असतें व त्यांत एक विशिष्ट झाडाचा चीक असतो. त्याचप्रमाणें एका पिशवींत हत्यारें असतात. त्यांपैकीं एक हत्यार आपल्याकडील चांभाराजवळच्या तीक्ष्ण रापीप्रमाणें असतें.

## डोक्यावर इस्त्री फिरवितात

ज्या स्त्रीचा अगर पुरुषाचा भांग पाडावयाचा असेल ती व्यक्ति भांग पाडणाऱ्या स्त्रीसमोर बसते. भांग पाडणारी स्त्री आपलीं हत्यारें नीट लावून घेते व जेथें भांग पाडावयाचा असेल तेथें पांढरी रेषा आखून घेते. नंतर रापीसारख्या हत्यारानें रेषेच्या खालील डोक्याचे भागाचें कातडें कुरतडण्याला सुरवात करते. रक्त वहातच असतें. कातडे खोदून झालें कीं मडक्यांतील चीक जखमेवर लावतांच रक्त थांबतें. अजूनहि भांग पूर्ण झाला नाहीं. त्यानंतर केस व्यवस्थित बसवून त्यावर ओलें फडकें ठेवलें जातें व शेवटीं शेजारीं पेटत असलेली गरम इस्त्री त्यावर फिरविली जाते. अशा तऱ्हेचा पाडलेला भांग कायमचा राहतो. भांगाची ही पद्धत परदेशी माणसाचे अंगावर कांटा उभा करणारी असली तरी, निग्रो लोक मोठ्या आवडीनें असे भांग पाडून घेतात. इतकेंच नाहीं तर, कांहीं स्त्रियांचे डोक्यावर छोटे छोटे पांच सहा भांग असतात.

## काळ्या रंगाचा बुरखा

आतां आपण निग्रोंचा पोषाख पाहूं.

शहरांत राहणारे निग्रो हाफ पँट व रंगीत शर्ट वापरतात. कांहीं शिकलेले लोक सुटाबुटांत असतात. शहरी स्त्रियांचा पोषाख अगदीं इंग्लिश मडमेप्रमाणें असतो. मात्र कांहीं निग्रो मुसलमानी धर्माचे आहेत. त्यांच्या स्त्रिया काळ्या रंगाचा बुरखा घेतात. अति उष्ण प्रदेशांत काळ्या रंगाच्या बुरख्यापासून उकडत कसें नाहीं याचें आश्चर्य वाटतें.

## वल्कलावर गवताचें भरतकाम

शहरांतले लोक कापड वापरीत असले तरी, खेड्यांतले लोक अजूनहि वल्कलें वापरतांना दिसतात. वल्कलाला 'बुगू' म्हणतात. तें शालीसारखें सुंदर दिसतें. वल्कलाच्या पिशवीवर निग्रो स्त्रियांनीं गवतापासून केलेलें भरतकाम पाहण्यासारखें असतें व तीं चादरी-एवढीं मोठीं असूं शकतात. जाड्या वल्कलांचा उपयोग सतरंजी-प्रमाणें केला जातो. त्यांत लाकडाचे सर्व गुणधर्म आहेत. फरशीवर एकेरी घालून झोपलें तरी थंडी वाजत नाहीं अगर विजेला हात लावला तरी शॉक बसत नाहीं. त्यांत एक मात्र मोठा धोका आहे. एकादी ठिणगी त्यावर पडली कीं तें जळतें. हीं वल्कलें धुतां येतात.

## पायाला छिद्र पाडणारा किडा

डोडोमाचे डॉक्टर पानवलकर म्हणाले, "रघुवीर, बूट घातल्या-शिवाय बाहेर जात जाऊं नका." मी कारण विचारतां त्यांनीं सांगि-तलें कीं, "येथें डुडू नांवाचे किडे आहेत. त्या किड्यांच्या लाळेमध्यें असा कांहीं गुणधर्म आहे कीं ते पायाला छिद्र पाडूं लागले असतां समजत नाहीं. मात्र पायांत एका ठराविक भागापर्यंत हा किडा गेला कीं पाय सुजतो. अगदीं हत्तीच्या पायाप्रमाणें जाड होतो आणि ताप येऊं लागतो. शेवटीं हा किडा ऑपरेशन करून काढावा लागतो. कांहीं निग्रो अशा तऱ्हेचा किडा शस्त्राच्या सहाय्यानें बाहेर काढण्यांत हुषार आहेत." आफ्रिकेला येण्यापूर्वी बुटाच्या दोन जोड्या घेण्या-करतां कां सांगण्यांत आलें होतें याचें कारण आतां समजलें.

## मुसलमानांचा बहिष्कार

डोडोमा गांवचें थिएटर मोठें मजेशीर होतें. त्यांत फक्त पंचाहत्तर माणसांना बसण्याची सोय होती. स्टेजसुद्धां इतकें लहान कीं धनुर्विद्येचे प्रयोग करतांना फार त्रास होई. शिवाय कार्यक्रमाला जेमतेम ३५ ते ४० माणसें येत. असें कां होतें ह्याचें कारण शोधल्यानंतर समजलें कीं डोडोमाच्या मुसलमानांनीं कार्यक्रमावर बहिष्कार घातला आहे. कारण आमच्या पार्टींत एकहि मुसलमान नव्हता. गांवांत आमच्या पार्टीविषयीं आणखी एक अफवा पसरली होती. हिंदुस्थान सरकारनें ही पार्टी पैसे जमविण्याकरितां पाठविली आहे आणि या पार्टीला जे पैसे मिळतील त्यापासून दारूगोळा खरेदी केला जाणार आहे व तो पाकिस्तानविरुद्ध वापरला जाणार आहे. या साध्या उदाहरणावरून हिंदुस्थान–पाकिस्तानचें वेड परदेशांतहि कसें पसरलें आहे याची कल्पना येईल.

थिएटरमध्यें कार्यक्रमाला गर्दी होत नाहीं असें पाहतांच डॉ. पानवलकरांनीं माझा एक कार्यक्रम रीगल क्लबमध्यें ठरविला. या कार्यक्रमाला मात्र खूप गर्दी झाली. हिंदी लोकांप्रमाणेंच किती तरी निग्रो व युरोपियन लोक कार्यक्रम पाहण्यास आले होते.

## वेड्यांच्या इस्पितळांत

डोडोमाचे मुक्कामांत आम्हाला एक वेड्यांचें हॉस्पिटल पाहण्याला मिळालें. मी पूर्वीं गुजरातमधील वेड्यांचें हॉस्पिटल कार्यक्रमाच्या निमित्तानें पाहिलें होतें. त्या व या हॉस्पिटलमध्यें खूपच फरक दिसला. सर्वत्र स्वच्छता, नैसर्गिक बाग व वेडे सुधारण्याचीं अद्यावत साधनें तेथें होतीं. नैरोबीच्या एका महाराष्ट्रीय गृहस्थाचा मुलगा येथें पेशंट म्हणून आला होता. ह्या हॉस्पिटलमध्यें वैचित्र्य खूप पाहण्यास मिळालें. दोन तीन निग्रो वेडे एका कोपऱ्यांत बसून कोणाला ऐकूं न जाईल अशा तऱ्हेनें गप्पा मारीत होते व मधूनच मोठ्यांदा सर्वजण हंसत. एक निग्रो म्हातारा आमचेसमोर आला व स्वाहीलींतून म्हणाला, "मला विनाकारण येथें डांबून ठेवलें आहे. माझें घर

तिकडे आगीनें जळत आहे व तें विझविण्यास हे लोक मला जाऊं देत नाहींत." त्यानें हें वरील वाक्य पूर्ण केलें व जोरानें रडण्यास सुरुवात केली. आजूबाजूचे वेडे त्याचे डोळे पुसून सांत्वन करूं लागले. एक सोळा–सतरा वर्षांची मुलगी हातांत ताट घेऊन आमच्या समोरून गाणें म्हणत गेली. ती गाणें चांगलें तालांत म्हणत होती. पण डॉक्टर म्हणाले कीं ही सुद्धां एक सुधारत असलेली वेडीच आहे.

हॉस्पिटलचे मुख्य डॉक्टर शीख होते. त्यांनीं हॉस्पिटलच्या प्रगतीची बरीच माहिती दिली. त्यांचा निरोप घेऊन आम्ही घरीं येण्याला निघालों.

## पोटासाठीं कंदमुळें, दारूसाठीं पैसे

पाटीदार समाजाच्या रमण नांवाच्या तरुणाशीं माझी ओळख झाली. शरीरानें तगडा असलेला हा तरुण ट्रक ड्रायव्हिंगचें काम करीत असे. एके दिवशीं मी त्याच्या ट्रकमधून जंगलांत गेलों.

रमण व मी ज्या कुपावर लांकडें आणण्याला गेलों तेथें बरेच निग्रो काम करीत होते. दिवसभर काम केल्यावर निग्रो मजुरांना दोन शिलिंग पगार मिळत असे. कामाचे श्रम व महागाई यांच्या मानानें पाहतां ही मजुरी फार कमी वाटली. पण रमण म्हणाला, " हे निग्रो पोटाकरितां पैसा मिळवीत नाहींत. कारण पोट भरण्याकरितां मोहोगो नांवाचीं कंदमुळें भरपूर मिळतात. या कंदमुळांमुळें भूक लागत नाहीं. तीं खाण्याचा प्रकार मात्र जरा वेगळा आहे. प्रथम मोठमोठे कंद घरीं आणून त्यांच्या साली काढतात. नंतर फोडी करून त्या वाळवितात व त्यांचें पीठ करून तें उकडून तिखट मीठ न लावतां खाल्लें जातें. ओलीं कंदमुळें भाजून खाल्ल्यास रताळ्याप्रमाणें लागतात. पण तीं पचनाला फार जड असतात. निग्रो पोटाकरतां कष्ट करीत नाहींत, तर इंग्लिश दारूची बाटली व नक्षी असलेली पांढरी टोपी विकत घेण्याकरतां ते पैसे साठवितात. जो मनुष्य इंग्लिश दारू सेवन करील तो मोठा समजला जातो. नक्षीदार टोपी हें तर आपल्याकडील अंगठीप्रमाणें त्यांचें भूषण आहे."

## लांकडाच्या गिरणींत

डोडोमांत आमचा मुक्काम दोन दिवसांनीं वाढवावा लागला. कारण पुढील मुक्काम टवोरा नांवाचे गांवीं होता व तेथें दोन दिवस थिएटर मिळणार नव्हतें. मुक्काम वाढल्याचें समजतांच मला आनंद झाला. मीं रमणबरोबर परत जंगलांत जाण्याचा बेत केला व त्याला त्याप्रमाणें निरोप पाठविला.

आम्ही लांकडें कापण्याची गिरणी पाहण्याला गेलों होतों. गिरणी जंगलाचे जवळच एका माळावर असल्याचें समजलें. गांवापासून गिरणीपर्यंतचा प्रवास चार तासांचा होता व रस्ता चांगला नव्हता. मोटार सुरू करण्यापूर्वीं पेट्रोल भरून घेतलें. आमची मोटार गिरणीच्या दिशेनें धावूं लागली, तेव्हां रस्ता किती खराब आहे याची कल्पना आली. रस्त्यावरची लाल माती मोटारीच्या वेगामुळें आकाशांत उंच उधळत होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंचीं झाडें अगदीं लाल झालीं होतीं. मोटारीला बसणारे हदरे प्रथम जाणवले नाहींत. पण एक तासाच्या प्रवासानंतर पाठ भरून आल्यासारखें झालें. मोटारींतून जात असतांना हरणें, शहामृग व रानगाई दिसल्या. रमण म्हणाला, " हे शहामृग दिसण्यांत ओबडधोबड असले, तरी पळण्यांत त्यांचा पहिला नंबर आहे. ताशीं साठ मैल वेगानें ते पळूं शकतात. शहामृगाच्या फऱ्याचें मांस खाण्यास रुचकर तर आहेच; पण तें औषधी समजलें जातें."

## ' एक छोटा ताईत दे '

आमची मोटार गिरणीचे आवारांत येतांच तीन-चार शीख स्वागत करण्यास सामोरे आले. या गिरणींत यंत्रावर काम करणारे सर्व शीखच आहेत. शिखांना आफ्रिकन लोक सिंगासिंगा म्हणतात व इतर हिंदी लोकांपेक्षां शिखांना ते फार भितात.

रमणनें तेथील लोकांशीं माझी ओळख करून दिली. मी जादूगार आहें हें समजतांच सर्वांना आनंद झाला. थोडा वेळ कांहींतरी प्रयोग करून दाखवा, अशी विनंती करण्यांत आली. माझ्याजवळ दोनचार

प्रयोगांचें सामान नेहमीं असतेंच. मीं आढेवेढे न घेतां प्रयोग करण्याचें कबूल केलें. बाहेरच्या आवारांत असलेल्या निग्रो मजुरांना बोलावण्यांत आलें व माझा कार्यक्रम सुरू झाला. पंधरा वीस मिनिटें प्रयोग चालू होते. निग्रोंना व शिखांना ते फार आवडले. एका निग्रोनें रमणला बाहेर नेलें व दोघे कांहीं तरी चर्चा करूं लागले. चर्चा माझ्याविषयीं असावी अशी मला शंका आली. मधूनच ते दोघे माझ्याकडे पहात होते. थोडा वेळ बोलणें झाल्यावर रमणनें मला हांक मारली व म्हटलें, "ह्या निग्रोची बायको भूतबाधेनें आजारी आहे. तेव्हां ती जादूनें बरी करतां येईल का? येत असेल तर एक छोटा ताईत दे. ताइताची किंमत देण्यास हा निग्रो तयार आहे." 'मी असलीं कामें करीत नाहीं' हें सांगतांच दोघेहि निराश झाले; पण माझा त्याला अगदीं निरुपाय होता.

## निग्रो स्त्रियांचा पाहुणचार

प्रयोग झाल्यावर थोडा वेळ हिंडून यावें व मग परत जावें असा बेत ठरला. जवळच एक पांच सहा घरांचें खेडें होतें. मीं खेडें पाहण्याची इच्छा प्रदर्शित करतांच रमण व एक निग्रो माझेबरोबर येण्यास निघाला. त्या खेड्याचें नांव मतुपा.

खेड्याची रचना चांगली नव्हती खेड्यांतील पुरुष शिकारीस व कामास गेले होते. कांहीं स्त्रिया उंच उखळींत धान्य कांडण्याचें काम करीत होत्या. कांहीं स्त्रियांनीं अगदीं तुळतुळीत गोटे केले होते. आपलेकडील वडार जातीप्रमाणें या स्त्रियांनीं अंगांत चोळीसारखें कोणतेंच वस्त्र वापरलेलें नव्हतें. आम्हांला पाहतांच बहुतेक स्त्रिया घरांत गेल्या. मुलें मात्र आमचेभोंवती उभीं होतीं. आमच्या बरोबरच्या निग्रोनें, आम्ही सहज आलों आहोंत, असें सांगितल्यावर एका स्त्रीनें आमचेसमोर एक केळीचा घड आणून ठेवला. खेड्यांत आलेल्या पाहुण्यास कांहीं ना कांहीं खाण्याला द्यावें लागतें व तें त्यानें थोडेंतरी खावें लागतें, असा रिवाज असल्याचें रमणनें सांगितलें.

आम्हीं त्या घडांतील दोन दोन केळीं खाल्लीं व परत गिरणीकडे जाण्याला निघालों.

या खेड्यांतील एका स्त्रीचे पायांत, आपल्याकडील मारवाडी स्त्रिया हातांत हस्तीदंती बांगड्या घालतात, तसल्या बांगड्या दिसल्या. मी त्या स्त्रीविषयीं विचारतां रमण म्हणाला, "ती स्त्री टोळीच्या नायकाची वायको आहे. नायकाच्या वायकोला असे हस्तीदंती दागिने वापरावे लागतात."

## रात्रीचा प्रवास धोक्याचा

आम्हाला खेड्यांत जाऊन येण्याला तास दीड तास लागला. रमण म्हणाला, "आपण येथें जास्त वेळ थांबलों तर घरीं जाण्यास वरीच रात्र होईल व रात्रीचे वेळीं मोटार चालविण्यांत फार धोका असतो." सर्वांचा निरोप घेऊन आम्ही मोटारींत बसलों. रमणनें मोटार चालू केली व अगदीं वेगानें डोडोमाचे दिशेला सोडली.

"काय रे रमण, मघाशीं तूं म्हणालास कीं रात्रीं मोटार चालविणें धोक्याचें असतें, तें कसें?" त्याचा चेहरा गंभीर झालेला दिसला. एखाद्या धोक्यांतून तो नुकताच वाचला असावा असें दिसलें. थोडा वेळ विचार करून तो म्हणाला, "निग्रोंच्या कांहीं टोळ्या वाटमारी करण्यांत हुषार आहेत. त्यांच्या अनेक पद्धति आहेत. दोन महिन्या-पूर्वी घडलेला एक प्रसंग सांगतों–

"मी व माझा मित्र मोटारमधून नकुरूला जात होतों. वेळ रात्रीची होती. माझ्या मित्राचें सिनेमाचें थिएटर आहे व सिनेमाच्या यंत्राचा एक भाग आणणें आवश्यक होतें म्हणूनच आम्ही रात्रीं प्रवास करीत होतों. जंगलांत एक मुलगा रस्त्यांत आडवा पडलेला दिसला. मेल्या-प्रमाणें त्याचे हातपाय ताठ झाले होते. आम्ही मोटार थांबविली व मुलाजवळ गेलों. मुलानें शिटी वाजविली व झुडपांत दडलेले वीस बावीस निग्रो एकदम पुढें आले. आम्हाला स्वाहिली भाषा येत होती; पण तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आम्हांला झाडाला बांध-ण्यांत आलें व मोटारींतील जेवणाचे डबे, पेट्रोलचे कॅन्स व आमच्या

खिशांतील पैसे चोरांनीं लांबविले. सुदैव कीं आमच्यावर शस्त्र चालविण्यांत आलें नाहीं. पहाटें एक मोटार आली. आम्ही आरडाओरड करून तिला थांबण्यास सांगितलें व आमची सुटका करून घेतली."

रमणवर आलेला प्रसंग मोठा बाका होता. अशा तऱ्हेचा प्रसंग आपल्यावर न यावा म्हणून मनांतल्या मनांत मी देवाची प्रार्थना केली. निग्रोंचे वाटमारीचे प्रकार अनेक आहेत. रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांना दोर बांधून अगर रस्त्यांत दगड रचून मोटार अडविण्याचा एक प्रकार आहे. आमच्या सुदैवानें तशा तऱ्हेचा प्रसंग त्या दिवशीं आला नाहीं. आमची मोटार रात्रीं ९ वाजतां डोडोमाला सुखरूप आली. घरांतील मंडळी माझी वाट पहात होती व नाना तऱ्हेच्या शंकाकुशंका त्यांचे मनांत येऊन गेल्या होत्या.

## बार्शी लाईट रेल्वेची आठवण

डोडोमा ते टबोरा बराच लांबचा प्रवास आहे. वाटेंत एक छोटासा घाट लागतो. घाटांत गाडी इतकी हळू चालते कीं आपल्या बार्शी लाईटची आठवण होते. इंजिनमध्यें कोळसा वापरीत नाहींत; लाकडें वापरतात. जंगलामध्यें रेल्वेच्या कडेला लाकडांचे ढीगच्या ढीग दिसले. गाडी थांबली कीं निग्रो हमाल इंजीनचे मागच्या डब्यांत लांकडें भरीत व नंतर गाडी चालू होई. कांहीं झाडांचीं लांकडें ओलींच जळतात असें आम्हाला समजलें. वाटेंत निलगिरीच्या झाडांचीं जंगलें दिसलीं.

## पासासाठीं तिप्पट पैसे

आमची गाडी टबोरा स्टेशनांत पहाटें पांच वाजतां पोंचली. थंडी खूप पडली होती. मॅनेजरनें गरम कपडे कां घेण्याला सांगितलें याची कल्पना ह्या वेळीं आली. सामान उतरवून घेण्यास मी मागें थांबलों व इतर सर्व लोक आमच्याकरतां राखून ठेवलेल्या घरीं गेले. जवळ जवळ एक तासानें सामान घेऊन मी बिऱ्हाडीं गेलों. स्टेशनमास्तरनें सामान काढण्याला जातीनें मदत केली होती. मी त्याचा पत्ता उतरून घेतला व त्याला कार्यक्रमाचा पास पाठविल्याचें कबूल केलें.

या पासावरून आठवण झाली. आफ्रिकेमध्यें अशा तऱ्हेचा पास एखाद्याला मिळाला कीं त्याला मोठा अभिमान वाटे. एक पास मिळविण्याकरतां लोक वाटेल तें काम करण्याला तयार होत. वेळप्रसंगीं पास मिळविण्यासाठीं तिकिटाचे दुप्पट तिप्पट पैसे खर्च करीत. पास मिळविण्याचा छंद अगदीं श्रीमंतापासून तों गरीब मजुरापर्यंत कितीतरी लोकांना दिसला.

आम्हाला मिळालेलें घर चांगलें होतें. तेथील गुजरात्यांनीं कांहीं उत्सव करावयाचा ठरविला होता. त्यामुळें एक दोन रात्रीं निरनिराळ्या लोकांचे घरीं जाऊन भजन म्हणून यावें लागलें. पहिले दिवशीं आम्ही सर्वजण गेलों होतों. पण नंतर फक्त हिराबाई व त्यांचे साथीदार गेले.

टबोऱ्यामधील एक कार्यक्रम भरदार झाला; व दुसऱ्या कार्यक्रमाला येथेंसुद्धां मुसलमान आले नव्हते. कांहीं लोक म्हणत कीं डोडोमाच्या मुसलमान व्यापाऱ्यांनीं तारा पाठवून कार्यक्रमास न जाण्याविषयीं येथील मुसलमानांना विनंति केली होती. ही बातमी खरी कीं खोटी हें जरी सांगतां आलें नाहीं तरी कार्यक्रमास मुसलमान येत नसत हें मात्र खरें.

लोकांचा कार्यक्रमाला पाठिंबा नाहीं, हवा रोगट व आजूबाजुला पाहाण्यासारखें कांहीं नाहीं. त्यामुळें दोन दिवसांतच आम्हास टबोऱ्याचा कंटाळा आला. माझें व श्री. जोगांचें खूपच डोकें दुखलें. पडशाखोकल्यासारख्या लहान मोठ्या तक्रारी सर्वांच्याच होत्या.

आमच्या घरासमोर निग्रो जमीनदाराचें घर होतें. त्याच्या बायकोनें पार्टींतील एका बाईस विचारलें, 'तुम्ही कितीजणी सवती आहांत ?' बाईनें 'एकहि सवत नसल्याचें' सांगताच त्या निग्रो बाईला मोठें आश्चर्य वाटलें. कारण आफ्रिकेंत माणसाची श्रीमती त्याच्या बायकांच्या संख्येवरून समजली जाते. या दृष्टीनें निग्रोच्या समजुतींप्रमाणें आपण हिंदुस्थानी माणसें अगदींच दरिद्री गणलीं जाऊं.

## ओल्या खजुरांचा मेवा

या निग्रो बाईनें ज्या दिवशीं आम्ही मॉंझाला जाण्यास निघालों, त्या दिवशीं एक ओल्या खजुराची डाहाळी पाठविली. टबोराला खजुरांचीं खूप झाडें आहेत. एकेका डाहाळीस शेंकडों पिवळ्या खजुरा असतात. एक दोन खाल्ल्यास त्या बऱ्या लागतात. पण जास्त खाल्ल्यास तोंडाला तोठरा बसतो व तोंडाची चव जाते. बाजारांत सर्वत्र हा मेवा विकला जातो.

आतांपर्यंतचीं गांवें सोडतांना आम्हांला वाईट वाटलें. पण टबोरा सोडतांना मुळींच वाईट वाटलें नाहीं. येथें वाईट वाटण्याइतके जवळचे संबंधच आले नव्हते. सामानाची बांधाबांध करून आम्ही खास रिझर्व करून ठेवलेल्या डब्यांत बराच वेळ अगोदर येऊन बसलों. स्टेशनमध्यें चित्रांचा सिनेमा घेऊन लाकडाच्या झांजा वाजवीत 'नागुरी नागुरी' ओरडत एक निग्रो हिंडत होता. मी १० सेंटचें एक नाणें देऊन पेटीस असलेल्या लहान भोंकांतून तो पाहिला. तीं सर्व नग्न स्त्रियांचीं चित्रें होतीं. मोठ्या माणसाप्रमाणें लहान मुलें सुद्धां हा सिनेमा स्टेशनमध्यें पहात होतीं.

## लांबटांग्या जिराफ

'नवी विटी, नवें राज्य' त्याप्रमाणें मॉंझा गांवाविषयीं आमचे विचार सुरू झाले. विषुववृत्ताजवळचें हें गांव कसें बरें असेल ? ज्या अर्थी मॉंझाची लोकवस्ती भरपूर आहे त्या अर्थी आमचे बरेच कार्यक्रम त्या ठिकाणीं होतील असे कितीतरी विचार मनांत येऊन गले. दीड दोन दिवसांचा गाडींतील प्रवास; पण थकवा कांहींहि आला नाहीं. तासन् तास आम्ही निसर्ग व जंगली प्राणी पाहण्यांत घालवीत असूं. बाहेर उन्हाचा त्रास होऊं लागला कीं पत्ते खेळण्याला सुरवात होई. आणि मधूनच पत्त्यांचे, जादूचे प्रयोग सुरू होत. आमच्या पार्टींतले बहुतेक लोक जादूगार बनले होते. पत्त्याच्या लहान मोठ्या ट्रिक्स करणें त्यांच्या अगदीं हातचा मळ होता. पत्त्यानंतर गाणें अगर तबलावादन होई. मध्येंच कोणाला जंगली

जनावरांचा कळप दिसल्यास ओरडून सर्वांना तें दृश्य पाहाण्याची सूचना दिली जाई. आपल्याकडे गाडीच्या धडधडाटाला भिऊन बुजलेल्या गाई–म्हशी बहुतेकांनीं पाहिल्या असतील. अगदीं त्याचप्रमाणें हीं जनावरें बुजत. पण प्रत्येकाच्या पळण्याच्या तऱ्हा वेगवेगळ्या. शहामृग आपली उंच मान वर खालीं करीत व पिसें उभारीत पळत, तर जिराफ लांब लांब टांगा टाकून हुदडक ऽ हुदडक ऽ आवाज करीत दूर जाऊन उभे रहात. सर्वांत नयनमनोहर दृश्य हरणांच्या पळण्याचें. लहान मोठीं शेंकडों हरणें डोळ्यांचें पातें लवतें न लवतें तों हवेत लांब लांब उड्या मारीत अदृश्य होत आणि अशा तऱ्हेनें हे सर्व प्राणी पळूं लागले कीं झाडांवर बसलेलीं माकडें चीत्कार करीत इकडून तिकडे उड्या मारीत. आफ्रिकेंतील प्राण्यांची ही मुक्त क्रीडा जन्मांत कधींही विसरणें शक्य नाहीं.

## जुळें होणें वाईट

टबोरा सोडल्यानंतर वीस बावीस तासांनीं आम्हांला झाडें नसलेला बोल्का प्रदेश लागला. त्या प्रदेशांत मोठीं झाडें मुळींच नव्हतीं. मधूनअधून लहानलहान झुडपें दिसत. या प्रदेशांत हिंडणाऱ्या निग्रोंचीं शरीर लाल होतीं व डोक्याचे केस लांब होते. कानाच्या खालच्या पाळींचीं भोकें इतकीं मोठीं होतीं कीं त्यांत सर्वसाधारण माणसांचें मनगट सहज जाईल. मी एका निग्रो प्रवाशाला या जातीविषयीं विचारलें. तो म्हणाला, "कियुमू लोकांची ही एक पोटजात आहे. या प्रदेशांत पाणी मिळत नाहीं. म्हणून पाण्याचे शोधार्थ खांद्यावर भोपळे टाकून हे मैलच्या मैल चालत जातात. या लोकांचा शिकार हाच मुख्य धंदा असतो. उन्हापासून त्रास होऊं नये म्हणून सर्व अंगाला हे लाल माती लावतात व शिकार केलेल्या प्राण्याचे केस झाडाच्या चिकानें डोक्याला चिकटवितात." या लोकांत कांहीं गमतीदार चाली आहेत का असें विचारतां निग्रो प्रवासी म्हणाला, " या लोकांत बाईला जुळें होण अत्यंत वाईट समजलें जातें. जुळ्यापैकीं एक मूल पापी व एक मूल पुण्यवान् समज-

## आफ्रिकेंतील निरनिराळ्या जमातींच्या स्त्रियांचीं शिरोभूषणें व अलंकार



झुलु स्त्री



सांबारु स्त्री



किप्सीगिस तरुणी



नायजेरियाची राणी



आफ्रिकेंत वाघ नाहींत; पण जंगलांत अशा क्रूर
चित्त्यांची गांठ पडण्याची शक्यता फार



निग्रो मित्रांसमवेत श्री. रघुवीर

तात. पुण्यवान मूल शोधून काढण्याची प्रथा मोठी गमतीदार आहे. मूल जन्मल्याचे सातवे दिवशीं हा समारंभ असतो. प्रत्येक टोळींत अंगांत येणाऱ्या कांहीं बायका असतात. या बायकांना मुद्दाम बोलाविलें जातें. वाद्यें वाजूं लागतांच बायकांच्या अंगांत संचार होतो. वाजणारीं वाद्यें म्हणजे नगारे व टाळ्या. जन्मलेल्या दोन्ही मुलांना आणून जमिनीवर झोपवितात. मध्यें एक जोडनारळ (आपल्याकडील जोड केळ्याप्रमाणें असतो.) ठेवला जातो. अंगांत आलेल्या स्त्रिया मुलांच्या अंगावर गार पाणी शिंपडतात. दोन्ही मुलांपैकीं ज्या मुलाचा हात अगोदर नारळाला लागेल तो पुण्यवान व मागून लागणारा किंवा अजिबात हात न लागणारा मुलगा पापी समजला जातो. त्या पापी मुलाची गांवांत मिरवणूक काढली जाते व नंतर गांवाबाहेरच्या टेकडीवर खड्डा खणून त्यांत मुलगा जिवंत पुरतात. सध्यां ही प्रथा कायद्यानें बंद केली आहे. पण या जंगलाच्या रहिवाशांना त्यांनींच केलेले कायदे तेवढे माहीत असतात आणि ते पाळण्यांत आपण चूक केल्यानें देव आपणावर कोपेल अशी त्यांना भीति वाटते."

या निग्रो प्रवाशाकडून मला आणखी बऱ्याच चालीरीती समजल्या असत्या; पण त्याला ज्या गांवीं जावयाचें होतें तें जवळ आल्यामुळें आम्हांला बोलणें थांबवावें लागलें.

# २

## निसर्गानें केलेलें बांधकाम

माँझा गांवाचे अलीकडे मोठमोठ्या दगडाच्या उतरंडी दिसूं लागल्या. अशा तऱ्हेच्या उतरंडी आपल्याकडे हैद्राबादच्या बाजूला आहेत. परंतु येथील उतरंडी दाट जंगलामध्यें असल्यामुळें विशेष मजेशीर दिसतात. गाडींतले सर्व प्रवासी बाहेर वाकून कांहींतरी पहात होते. एक प्रवासी म्हणाला, "थोड्याच वेळांत 'गेट वे ऑफ माँझा' येईल." आम्हीं मुंबईहून निघतांना 'गेट वे ऑफ इंडिया' पाहिलें होतें. तशाच प्रकारचें एखादें बांधकाम असावें अशी माझी कल्पना झाली. पण आमची गाडी प्रत्यक्ष गेटवे ऑफ माँझामधून गेली, तेव्हां अंगावर कांटाच उभा राहिला. हें गेटवे ऑफ माँझा म्हणजे डोंगरावरचे दोन प्रचंड दगड ढासळून त्यांची रेल्वेवर झालेली नैसर्गिक कमान होय. या प्रचंड कमानीला कोठेंहि सिमेंट अगर मनुष्यानें दिलेला आधार नाहीं. इतकेंच नव्हे तर कमानीवर असलेले लहान लहान दगड गाडी जातांना थरथर हलतांना दिसतात. कमानीचे बाजूस एक हिरव्या पानांचा ढीग दिसला. कांहीं निग्रो लोक या कमानीला देव मानून बाजूस पानें टाकतात, असें त्याचें कारण समजलें. कमानींतून बाहेर पडतांच दूर अंतरावर गर्द झाडींत वसलेलें माँझा गांव दिसूं लागतें. अंतरावरून माँझाचें दृश्य मोठें नयनमनोहर दिसतें. गर्द झाडींतलीं पांढरीं लहान घरें म्हणजे झाडांना आलेल्या मोठ्या पांढऱ्या फुलांचा गुच्छच! एका बाजूला प्रचंड व्हिक्टोरिया सरोवर व दुसऱ्या बाजूस उंच डोंगर या दोहोंमधून वांकडीं तिकडीं वळणें घेत गाडी माँझा स्टेशनांत प्रवेश करते. माँझा व्यापारी पेठ

असल्यामुळें स्टेशन चांगलें बांधलें आहे. बाहेरगांवीं पाठविण्या-करितां ठेवलेल्या फळांच्या करंड्या व केळांचे घड सर्वत्र दिसले.

माँझा हें टांगानिका रेल्वेचें शेवटचें स्टेशन त्यामुळें ब्रेकमधील आमचें सामान काढण्याला पोर्टरनें तब्बल अडीच तास लावले. इतर सर्वजण पुढें गेले. मी व बाबूराव सामानावर देखरेख करण्यासाठीं मागें थांबलों. थांबण्याचें मुख्य कारण म्हणजे आफ्रिकेंत चोऱ्या फार होतात. देखतां देखत सामान पळवून नेलें जातें. दुसरें कारण हमाल ट्रंका व्यवस्थितपणें काढीत नाहींत, त्यामुळें त्या मोडण्याची फार भीति.

ग्रं. क्र. ८७३८

## बोलण्याची सोय नव्हती

सामान काढून ट्रकमध्यें भरलें तो वेळ रात्रीं साडेआठची होती. आम्ही दोघे उघड्या ट्रकमधील सामानावर बसलों होतों. भोंवतीं इतकीं चिलटें घोंगावत होतीं कीं तोंड उघडून बोलणें कठीण होऊन बसलें. गांवाशेजारीं सरोवर असल्यामुळें चिलटें असण्याची शक्यता आहे. पण अशींच चिलटें घरांतून अगर थिएटरमध्यें असतील तर कार्यक्रम कसा होणार ?

आमची उतरण्याची सोय एका बोर्डिंगमध्यें केली होती. पण आयत्या वेळीं बोर्डिंगच्या व्यवस्थापकांनीं नकार दिल्यामुळें रात्रीच्या मुक्कामाचा मोठाच प्रश्न उभा राहिला. एका झाडाखालीं ट्रक उभी करून आम्ही मॅनेजरची वाट पहात बसलों. सुमारें दोन तासानंतर मॅनेजर आले व आम्हाला पाटीदार समाजाच्या धर्मशाळेंत घेऊन गेले. ती इमारत चांगली नसली तरी, गांवांत मध्यवस्तींत असल्यामुळें सर्व दृष्टींनीं सोइस्कर होती. सर्वांना जागा पसंत पडली व लगेच सामान उतरवून घेतलें. जेवणें रात्रीं एक वाजतां पार पडलीं.

रात्रीच्या दगदगीमुळें दुसरे दिवशीं उठण्याला बराच उशीर झाला. आम्ही उठून बाहेर येतों तों लोकांचा मोठा जमाव धर्मशाळेपुढें दिसला. हे लोक पार्टींतील नटनटींना पाहाण्याला आले होते. गांवांत बातमी पसरली होती कीं हिंदुस्थानमधील प्रसिद्ध नटनटी माँझाला

कार्यक्रम करण्याकरितां आल्या आहेत. परंतु लोकांना खरी परिस्थिति समजली तेव्हां ते निघून गेले. आम्हांला मात्र चर्चा करण्याला विषय मिळाला.

## बाजारांत भाषा शिकलों

पार्टीचा बाजारहाट करण्याचें काम माझ्याकडे होतें. कारण मला स्वाहीली भाषा थोडी येत होती. शिवाय बाजारांत हिंडणें मला मनापासून आवडे. स्वाहीली भाषा येत होती तीहि सतत हिंडण्यामुळेंच. पुस्तकी अभ्यास झाला नव्हता. 'नटाका माजी मोटो, लिझीसा ऊसाफिशें चिनीक्वा साबूनी ना माजी' ( गरम पाणी हवें आहे, सैंपाकघरांतली जमीन साबणानें धुवून काढ ) वगैरे ऑर्डर्स मी आमच्या पीशीला ( आचाऱ्यास ) देत असें. परंतु कोणी फर्डे स्वाहीली बोलूं लागल्यास त्याला 'पोलेपोले' म्हणून हळू व सावकाश बोलण्यास सांगावें लागे. कारण मला घाईचे उच्चार समजणें कठीण जाई.

## निग्रोंना तिखट वावडें

मॉंझाचें मार्केट आमच्या घरासमोर होतें. त्यामुळें फक्त अर्ध्या तासांत मी भाजीपाला घेऊन येत असें. या मंडईंत टोमॅटो, मका, मुळे, मिरच्या आणि चाकवत स्वस्त मिळत असे. बाकीच्या भाज्या फारच महाग. वाण्याच्या दुकानांत बहुतेक माल मिळत असे. मात्र तांदूळ अगदीं खराब व एक रुपया शेर मिळत. कांहीं वेळां चांगले तांदूळ मिळविणें हें एक मोठें दिव्यच होऊन बसे. मला रोज मिरच्या खरीदतांना पाहून आमच्या नोकरांना आश्चर्य वाटे. कारण आफ्रिकन निग्रो तिखट मुळींच खात नाहींत. अगदीं उत्तम आमटी निग्रोला दिली तरी तो खाणार नाहीं. कारण तिखट, मीठ, गूळ घालून केलेले पदार्थ त्यांना आवडत नाहींत. परंतु कांहीं न घालतां उकडलेलें मोहोगोचें पीठ ते मिटक्या मारीत खातात.

## गोड पाण्याचा समुद्र

मुक्कामाच्या पहिल्या दिवशीं सायंकाळीं आम्ही व्हिक्टोरिया

सरोवराकाठीं फिरावयाला गेलों होतों. सरोवर कसलें तें! त्याला गोड्या पाण्याचा समुद्रच म्हटलें पाहिजे. पठारावर असलेल्या त्या सरोवराचा घेर आठशें मैलांचा आहे. अनेक गांवें त्याचे कांठीं वसलीं आहेत. टांगानिका, युगांडा व केनीया या तीनहि वसाहतींना या सरोवराच्या सीमा लागलेल्या आहेत. सरोवरांत मोठमोठ्या बोटी चालतात.

## मगरींची झडप

काठापासून आम्ही अगदीं दूर उभे होतों. जवळ गेल्यास सरोवरांत असलेल्या मगरी माणसांवर हल्ला करतात. सरोवरांत माणसाला पाय ठेवतां येत नाहीं व जनावरें पाणी पिण्याला जात नाहींत, इतका दरारा मगरींनीं निर्माण केला आहे. आमच्याबरोबर थिएटरच्या मालकांचा मुलगा होता. तो म्हणाला, "गेल्या महिन्यांत तीन माणसें मगरीनें ओढून नेलीं. हा प्रकार ज्या धक्क्यावरून बोटी सुटतात तेथें झाला. सरोवरांतील मगरी फार लबाड आहेत. कोणी प्राणी पाणी पिण्यास आंत जात नाहीं. म्हणून त्याच बाहेर काठावर येऊन गवतांत लपून बसतात व शिकारीवर झडप घालतात. मगरी मारण्याचे खूप प्रयत्न झाले. पण त्यांची संख्या एवढी मोठी आहे कीं शेवटीं ते प्रयत्न अर्धवट सोडून देणें भाग पडलें. या मगरी क्रूर असल्या तरी एका विशिष्ट जातीच्या मुंगसाला फार भितात. हें मुंगूस आलें रे आलें कीं सर्व मगरी भराभर पाण्यांत पळ काढतात. मुंगुसाच्या अंगाला येणारा विशिष्ट वास मगरीला सहन होत नाहीं."

## पांढऱ्या पट्ट्यांचे कावळे

सरोवराच्या आजूबाजूला आम्हांला खूप चित्रविचित्र पक्षी दिसले त्यांत लांब शेपटीचे कांहीं नवीन पक्षी होते. त्यांचा आवाजसुद्धां निराळा वाटला. पाणकोंबड्या, बदकें व कावळे आपल्याकडील पक्ष्यांपेक्षां मोठे आहेत. कावळ्याच्या अंगावर पांढरे पट्टे असून आवाज घोगरा व कानठळ्या बसविणारा असतो. हे कावळे हरणाच्या कळपावर हल्ला करून प्रथम हरणाचे डोळे फोडतात व नंतर

सर्वांगावर चोची मारण्यास सुरुवात करतात. माणसेंसुद्धां या कावळ्यांच्या वाटेला जात नाहींत.

## निग्रोंची स्मरणशक्ति

तळ्याकाठीं फिरून आम्ही परत येत असतांना मिशनऱ्यांची एक शाळा दिसली. आम्ही शाळेंत गेलों. शाळा-प्रमुखाला आनंद झालेला दिसला. त्यानें सर्व शाळा फिरून दाखविली. या शाळेंत ९७ निग्रो विद्यार्थी निरनिराळ्या प्रकारचें धंदेशिक्षण घेत होते. विद्यार्थ्यांना खाणें, कपडे व शिक्षणाचीं साधनें मोफत पुरविलीं जातात. आपल्या धर्माचा प्रसार करण्याकरतां जंगलामध्यें राहून त्यागमय जीवन कंठणाऱ्या मिशनऱ्याबद्दल कोणालाहि आदरच वाटला असता. शाळेंतील निग्रो विद्यार्थी अगदीं शिस्तींत वागत होते. सर्व आवारांत इतकी स्वच्छता होती की कागदाचा तुकडा अगर पाला पाचोळा सांपडणें कठीण ! “अजून निग्रोमध्यें शिक्षणाची आवड पाहिजे तितकी उत्पन्न झाली नाहीं.” असें फादर म्हणाला. “परंतु निग्रोंना एकादी गोष्ट समजाऊन सांगितली कीं त्यांच्या मनावर ती खोलवर बिंबते. एक वेळ सांगणारा विसरेल; पण निग्रो विद्यार्थी मात्र विसरणार नाहीं.” फादरच्या या वाक्याचें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. आम्हीं कितीतरी निग्रो असे पाहिले आहेत कीं, त्यांना हिंदी सिनेमांतील एकादें पद दोन तीन वेळां म्हणून दाखविलें कीं ते अगदीं जसेंच्या तसें नसलें तरीं त्याचा बराचसा भाग म्हणून दाखवितात. जी गोष्ट गाण्याची तीच स्वयंपाकाची. एकदां आमटी कशी करावयाची ती दाखवा, कीं मग रोजच्या रोज तशीच आमटी निग्रो आचारी तुम्हांला करून वाढील. हा अनुभव आमच्याप्रमाणें बहुतेकांना आला होता. आम्ही शाळेंतून बाहेर जाण्याला निघालों तेव्हां जातां जातां फादरनें आम्हांला प्रार्थना मंदिर दाखविलें.

## पहिलाच कार्यक्रम रंगला

गांवांत आमच्या कार्यक्रमाची खूप जाहिरात झाली होती. रात्रीं

बडे बडे ऑफिसर कार्यक्रम पाहण्याला येणार होते. मॅनेजरांनीं सांगितलें, "पहिल्या कार्यक्रमावर येथील पुढील मुक्कामाचें भवितव्य अवलंबून आहे. तेव्हां मन लावून कामें करा."

थिएटरमध्यें दोन तास अगोदर जाऊन पडद्याची व लाईटची व्यवस्था केली. माझें सामान लावून मी मेकप करून बसलों. प्रत्येक-जण आपली तयारी करीत होता. एकंदर वातावरणावरून कार्यक्रम फारच चांगला होईल असें वाटत होतें. बरोबर साडेनऊ वाजतां पडदा वर झाला. कार्यक्रमाची सुरुवात नृत्यानें झाली व सुरुवातीसच एका माणसानें पंचवीस शिलिंग बक्षीस दिल्याचें जाहीर केलें. आफ्रिकेंत अशा प्रकारें बक्षीस देण्याची फार प्रथा आहे. ज्या कलाकाराचा कार्यक्रम आवडेल त्याला स्टेजवर जाऊन बक्षीस देण्यांत येतें. मॉँझाच्या पहिल्या कार्यक्रमांत सर्वांत जास्त बक्षीसें आमच्या पार्टीला मिळालीं. त्यांतल्या त्यांत हिराबाईंच्या भावाच्या पांच वर्षांच्या छोट्या मुलीला बरींच बक्षीसें मिळालीं. कार्यक्रम सुरुवाती-पासून शेवटपर्यंत रंगत गेला व त्याच रात्रीं तीन चार खासगी कार्य-क्रमांचीं आमंत्रणें मिळालीं.

नेहमींप्रमाणें कार्यक्रमानंतर मला बरेच मित्र मिळाले व फावल्या वेळीं प्रेक्षणीय स्थळें पाहण्याचा माझा कार्यक्रम सुरू झाला. मॉँझा-जवळ एक 'शिनीयांगा डायमंड माईन्स' नांवाची हिऱ्याची खाण आहे. या खाणींत चोप्रा नांवाचे पंजाबी गृहस्थ मॅनेजर आहेत. श्री. चोप्रांचे चिरंजीव नुकतेच विलायतेहून वकीलीची परीक्षा देऊन आले होते. या बापलेकांशीं माझी चांगली ओळख झाली. त्यांनीं हिऱ्यांची खाण दाखविण्याचें कबूल केलें. ती खाण पाहून येण्याला एक दिवस लागणार होता.

## मान डोलवणारा दगड

दुसरे माझे मित्र म्हणजे 'मॉँझा व्हालेंटियर कोअर'चे सेक्रेटरी प्रवीणचंद्र हे होत. श्री. प्रवीणचंद्र यांचा तेथें मोठा व्यापार आहे. दाराशीं मोटारी असल्या [illegible] मिळाओं. त्यांच्याबरोबर

आम्ही माँझाचा विमानतळ पाहून आलों. पण विमानतळ पाहण्याकरितां घालविलेला वेळ फुकट गेला असें वाटलें. कारण, कांहींच पाहण्याला मिळालें नव्हतें. फक्त गवती मैदान व निग्रोंचीं जनावरें पाहिलीं; पण परत येतांना मात्र एक अद्वितीय दृश्य पाहण्याला मिळालें. तळ्याकांठीं एका मोठ्या दगडावर दुसरा मोठा दगड एका लहान टेकूवर उभा आहे. साधें वारें वाहूं लागलें तरी वरचा दगड हलतो; पण पडत मात्र नाहीं. निसर्गानें केलेला तो चमत्कार मानवी मनाला थक्क करून सोडणारा आहे. निसर्गाची ही करामत पाहण्यास रोज अनेक लोक येत असतात. आम्ही जवळ जवळ अर्धा पाऊण तास निरनिराळ्या ठिकाणाहून तो दगड पहात होतों. घरीं आल्यावर मी माझ्या सहकाऱ्यांना या दगडाची माहिती सांगितली. तेव्हां सर्वांनाच आश्चर्य वाटलें.

## कार्यक्रम यशस्वी; पण–

थिएटरमध्यें गर्दींत पार पडणारे कार्यक्रम व गांवांत सर्वत्र होणारें स्वागत यामुळें दिवस कसे निघून जात हें समजत नव्हतें; पण नेहमीं सर्व गोष्टी सुरळीत पार पडत नाहींत हेंच खरें.

थिएटरमध्यें आमचा कार्यक्रम रंगांत आला होता. टाळ्यांच्या कडकडाटानें थिएटर दुमदुमून जात होतें. रात्रीं साडेअकराचा सुमार असेल. एक मनुष्य ओरडत ओरडत थिएटरमध्यें आला व 'चोर चोर' म्हणूं लागला. थोडा वेळ कांहींच समजलें नाहीं. नंतर समजलें कीं, आम्ही ज्या धर्मशाळेंत रहात होतों ती धर्मशाळा चोरांनीं फोडली. सुदैवानें त्या कार्यक्रमाला पोलीस ऑफिसर आले होते. ते ताबडतोब कांहीं लोकांसह तिकडे रवाना झाले. कार्यक्रम बंद करून मी व इतर दोघेजण घाईघाईनें घराकडे धांवत सुटलों.

चोरांनीं घराच्या मागचा दरवाजा फोडला होता. चोर आंत प्रवेश करणार इतक्यांत शेजारीं राहणाऱ्या एका गुजराती गृहस्थाला त्याची चाहूल लागली. कोण आहे हें पाहण्यास तो बाहेर आला. चोरांनीं त्याच्या दिशेनें पांगा (मोठा सुरा) फेकून मारला. बाका प्रसंग

ओळखून तो गृहस्थ जोरजोरानें ओरडूं लागला. लगेच रस्त्यानें जाणाऱ्या एका माणसानें ती बातमी थिएटरमध्यें आणली. पोलिसांनीं घर उघडून आंत प्रवेश केला. पण विशेष कांहीं चोरीला गेल्याचें दिसलें नाहीं. कांहीं भांडीं व एक टोपली चोरट्यांनीं बरोबर नेली होती. आम्ही मागचे परसांत गेलों तेव्हां शेजारचा गुजराथी म्हातारा विव्हळतांना ऐकूं आलें. त्याच्या हाताला झालेल्या जखमेंतून रक्त वाहात होतें. सर्व शर्ट रक्तानें लाल झाला होता. त्याची जखम बांधून आम्ही थिएटरकडे गेलों. प्रेक्षक बसून होते. अर्थात् अर्धवट राहिलेला कार्यक्रम आम्ही पूर्ण केला.

## चोरी झाली असती तर–

कार्यक्रम उरकून आम्ही घरीं आलों तेव्हां दोन वाजून गेले होते. स्वयंपाक करून जेवण होईपर्यंत चार वाजले. चोर कोण असावेत, आंत कसे आले असतील इत्यादि अनेक तर्कवितर्क चालले होते. कांहीं-जण म्हणत, चोर पहाटे परत येण्याचा संभव आहे. त्यामुळें मला झोप आली नाहीं. अंथरुणावर पडून होतों. माझ्या मनांत सहज एक विचार आला, समजा, चोरांनीं सगळें घर धुवून नेलें असतें तर काय झालें असतें? मला स्टेजवर घालण्याच्या रंगीबेरंगी पोषाखांत हिंडावें लागलें असतें आणि स्टेजवरचा आधुनिक अर्जुन गांवांत हिंडतांना लोकांना विनामूल्य पहावयास सांपडला असता.

## चोरांची करामत

या चोरीच्या निमित्तानें आफ्रिकेंतील निरनिराळे चोरीचे प्रकार ऐकण्याला मिळाले. येथें 'हुकिंग' नांवाची एक चोरीची पद्धत आहे. चोरांच्या जवळ एक लांब काठी असते. काठीच्या टोकाला हूक बस-विलेला असतो. हुकाच्या सहाय्यानें चोर खुंटीवरचे कपडे खिडकीजवळ अलगत आणतो व खिशांतलें सर्व सामान काढून घेऊन परत कोट जाग्यावर ठेवतो. कांहीं वेळां या चोरीमुळें भांडणें होतात. कारण खिशांतले पैसे कोणी चोरले हें समजणें कठीण असतें. विनाकारण घरांतील लोकांत गैरसमज वाढतात. अशा प्रकारची चोरी शामलाबाई

माजगांवकरांचे पार्टीतील लोकांची दोन तीन वेळां झाली. एकदां तर पार्टीतील डान्सर झोपले असतां चोरानें त्यांच्या डोक्यावरच्या खुंटीचा कोट हुकाच्या काठीनें काढला. जादूगार एकादी वस्तू अधां-तरीं करतो, त्याप्रमाणें कोट अधांतरीं चाललेला पाहून डान्सर उभे राहिले. पाहतात तों शेजारच्या खिडकीशीं चोर उभा! आरडा-ओरड करतांच काठी टाकून चोर पळाला. चोराला कोट मिळण्या-एवजीं डान्सरला चोराची काठी मिळाली.

खिडकीचे गज वाकवून धडधाकट निग्रो सहज आंत येऊं शकतात. परंतु घरांत माणसें असतांना मारामाऱ्या करून ते चोरी करीत नाहींत; तर घरांतील लोकांना गुंगी आणण्याकरितां एका वनस्पतीचा धूर घरांत सोडतात व नंतर चोरी होते. या धुराचा परिणाम चोरी करणारावरहि एकादे वेळीं होण्याचा संभव असतो. म्हणून ही प्रथा प्रचारांत विशेष नाहीं. काठीच्या सहाय्यानें चोऱ्या होऊं नयेत म्हणून आफ्रिकेंत बहुतेक घरांच्या खिडक्यांना बारीक जाळ्या बसविल्या आहेत. या जाळीचा दुहेरी फायदा होतो. चोरी होत नाहीं व लहान कीटकहि आंत येत नाहींत.

## स्तुति करण्यामागचा डाव

एकदां सायंकाळच्या वेळीं कार्यक्रम नव्हता. मी व पार्टीतील डान्स मास्तर श्री. निकम गांवांत हिंडण्याला गेलों होतों. मॉंझाचें हिंदू देवा-लय पाहिलें. तें पाहण्यासारखें आहे. परदेशीं गेलेल्या लोकांनीं प्रार्थनेकरितां हें देवालय बांधलेलें आहे. देवालयांतून आम्ही बाहेर पडलों तेव्हां एका हिंदी गृहस्थानें आम्हांला बोलावलें. जवळ गेल्या-वर त्यानें आमच्या पार्टीच्या कार्यक्रमाची खूप स्तुति केली. ‘आतांपर्यंतचा एकहि खेळ चुकविला नाहीं’ असेंहि तो म्हणाला. कांहीं वेळां अति स्तुतिहि नकोशी वाटते. मी त्याच्या तडाख्यांतून सुटका करून घेण्याच्या उद्देशानें म्हणालों, “आम्ही फिरायला निघालों आहोंत. कोठेंतरी लांब जाऊन येण्याचा विचार आहे.” त्यावर सदर महाशय म्हणाले; “चला, ती पहा माझी गाडी पलीकडे उभी

आहे. आपण त्यांतूनच गांवाबाहेर हिंडून येऊं." परक्या माणसाबरोबर गांवाबाहेर जाणें जरा धोक्याचेंच. पण श्री. निकम बरोबर असल्यामुळें मीं त्याला होकार दिला.

सायंकाळचे वेळीं नव्या कोऱ्या हिलमनमधून तळ्याकाठची सहल मोठी आल्हाददायक होती. सरोवराकाठीं दिवसभर भक्ष्यासाठीं तिष्ठत उभे राहून थकलेल्या बगळ्यांचे थवेच्या थवे आमच्या डोक्यावरून जात होते. आकाशांत होणाऱ्या त्यांच्या रांगा भरधाव मोटारींतून जातांना मोठ्या मजेशीर दिसत . लहान लहान डबक्यांतील बेडकांनीं डराव डराव ओरडण्यास सुरुवात केली होती व मधूनच एखाद्या रातकिड्याचें किर्रऽऽ ऐकूं येई. गांवाबाहेर एके ठिकाणीं मोठा जाळ दिसला. मीं नवीनच ओळख झालेल्या गृहस्थांना विचारलें, "हा जाळ कसला ?" त्यांनीं माहिती सांगण्याऐवजीं मोटार थांबविली व आम्ही त्या जाळाचे दिशेनें जाऊं लागलों. एक लांबच्या लांब शेकोटी पेटवून बाजूच्या एका झाडाखालीं दहाबारा निग्रो बसले होते. आम्ही जवळ जातांच एक निग्रो सामोरा आला व त्यानें "काय पाहिजे" असें आम्हांला विचारलें. बरोबरच्या गृहस्थांनीं शेकोटीबद्दल माहिती विचारली. निग्रो म्हणाला, "ही केळीं पिकविण्याची भट्टी आहे. या जाळाच्या तीन फुटाखाली शंभर दीडशें केळीचे घड जमिनींत पुरून ठेवले आहेत. इतर वेळीं केळीं पिकविण्याला उशीर लागतो व तीं घडावर असतांना वरून खालीं पिकत जातात. पण या भट्टीच्या आगीमुळें एका दिवसांत सर्वच्या सर्व केळीं पिकून तयार होतात. नैसर्गिक पिकलेल्या केळयांची चव जरा चांगली असते; तरीपण धंदा म्हणून बाजारांत विकण्याकरितां अशा प्रकारें केळीं पिकविणेंच फायद्याचें असतें."

## मित्रांचा कावेबाजपणा

निग्रो माहिती सांगण्यांत रंगला होता. पण जों जों अंधार पडूं लागला तों तों जंगलांत राहणें धोक्याचें वाटूं लागलें. शिवाय आमच्याजवळ एकहि हत्यार नव्हतें. भट्टीच्या हलणाऱ्या ज्वालांचा

प्रकाश जेव्हां निग्रोंच्या तोंडावर पडे तेव्हां तो फारच भयानक दिसे. एक केळीचा घड विकत घेऊन आम्ही घराकडे निघालों. वाटेंत आमचे ते नूतन मित्र म्हणाले, "तुमच्या पार्टीतल्या मुली दिसण्यांत फार सुंदर आहेत, नाहीं?" त्यांच्या बोलण्याचा रोख ओळखणें कठीण नव्हतें. आमची इतकी खुशामत हा गृहस्थ कां करीत होता त्याचें उत्तरहि त्याच्या वरील प्रश्नांत मिळालें होतें. मी त्याला म्हणालों, "आपला तर्क कदाचित् बरोबर असेल; पण मला मात्र त्यांत विशेष कांहीं कळत नाहीं." माझ्या या सडेतोड उत्तरामुळें महाशयांनीं विषय पालटला व इतर गप्पांना सुरुवात केली.

## उघड्या मैदानावर कार्यक्रम

केळ्यांची भट्टी पाहून आम्ही घरीं आलों, तों पार्टीचे मॅनेजर व इतर सात आठ लोक आमची वाट पहात होते. सर्व गांवाकरितां उघड्या मैदानावर त्यांना माझा एक कार्यक्रम करावयाचा होता. कार्यक्रमाला मी होकार देतांच ते लोक तयारी करण्याकरितां निघून गेले. येणाऱ्या उत्पन्नाचा निम्मा भाग शाळेच्या मदतीस घेऊन उरलेली निम्मी रक्कम मला मिळणार होती. या प्रयोगांत जमिनींत पुरून घेणें हा नवा प्रयोग करण्याचें ठरलें.

## जमिनींत पुरून घेतलें

दुसरे दिवशीं सकाळपासून सायंकाळपर्यंत मी कार्यक्रमाचे गड-बडींत होतों. पोलीस ऑफिसर जमिनींत पुरून घेण्याला परवानगी देईना. जेव्हां मी स्वतः गेलों तेव्हां त्यानें मागील शिफारसपत्रें पाहून परवानगी दिली. सर्व पोलीस लोकांना कार्यक्रमाचे पासेस द्यावे लागले. अशा तऱ्हेचे पास एकाद्या माणसानें दिले नाहीं तर त्याच्या कार्यक्रमांत हे पोलीस कांहीं ना कांहीं व्यत्यय आणल्याशिवाय रहात नाहींत. पास देणें व घेणें हा प्रकार अगदीं राजरोस चालतो. इतकेंच नाहीं तर, घरच्या मंडळींचेहि पास ऑफिसर लोकांना द्यावे लागतात. माझा हा कार्यक्रम उघड्यावर होता म्हणून जागेचा प्रश्न नव्हता. पण असा कार्यक्रम थिएटरमध्यें असेल तर बरीचशी

जागा फुकटच्या लोकांनीं अडविल्यामुळें कार्यक्रम करणाराचें आर्थिक नुकसान होतें.

## जादूगारास बाहेर काढा

रात्रीं ८ वाजतां मेकअप करून मी स्टेजवर उभा राहिलों तों हजारों लोक समोर बसलेले दिसले. आतांपर्यंत इतकी प्रचंड गर्दी माझ्या कोणत्याहि कार्यक्रमाला झाली नव्हती. गांवांतले चार प्रतिष्ठित डॉक्टर आले. माझी नाडी व हृदय तपासलें व नंतर मी बाजूला खणलेल्या खड्ड्यांत पुरून घेण्याकरितां उतरलों. खड्ड्यांत मी अर्धा तास बसणार होतों; तोंपर्यंत लोकांना कंटाळा येऊं नये म्हणून छोटया नीलाचा नाच ठेवला होता. जेमतेम वीस मिनिटें झालीं असतील नसतील तोंच लोकांनीं ओरडण्यास सुरवात केली– 'झालेला वेळ पुरे आहे. जादूगाराला अगोदर बाहेर काढा.' हा गोंगाट इतका वाढला कीं २२ मिनिटानंतर खड्डा उकरून मला बाहेर काढण्यांत आलें. मला सुखरूप बाहेर आलेला पाहून लोकांनीं टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. बरीच बक्षीसी मिळाली. त्या दिवसाचा सर्व कार्यक्रम चांगला झाला. घरीं आल्यावर पशाचा हिशेब झाला. दोन हजारावर शिलिंग माझ्या वाटयास आले. इतकी प्रचंड रक्कम एका कार्यक्रमाची बिदागी म्हणून तोंपर्यंत कोठेंच मिळाली नव्हती.

## हिऱ्याची देणगी नाकारली

माँझा गांवानें मला पैसा दिला, तसा मानहि दिला. घराच्या बाहेर पडणें कठीण झालें होतें. गांवांत जिकडे तिकडे प्रयोगाची स्तुति चालू झाली व जमिनींत पुरून घेणाऱ्या 'महान जादूगारा'स पाहण्याला अनेक लोक येऊन जात होते. पण माझे ते प्रयोग आफ्रिकेंतील लोकांना नवीन व आश्चर्यकारक वाटत असले तरी त्यांपेक्षां कितीतरी चांगले प्रयोग करणारे जादूगार भारतांत आहेत याची मला कल्पना होती.

एका श्रीमंत व्यापाऱ्यानें आमच्या सर्व पार्टीला जेवणाचें आमंत्रण

दिलें. अशा तऱ्हेचीं आमंत्रणें बहुतेक गांवांत येत असत. जेवण रात्रीचें असल्यामुळें घरीं येण्याची घाई नव्हती.

जेवण झाल्यावर पार्टींतल्या लोकांना मोटारींतून घरीं पोचविण्यांत आलें. मला मात्र मागें थांबण्याला सांगितलें. व्यापाऱ्याच्या या वर्तनाचें सर्वांनाच आश्चर्य वाटलें. जोग हलक्या आवाजांत म्हणाले, "रघुवीर, बहुतेक एकादी मोठी रक्कम बक्षीस म्हणून मिळण्याची शक्यता आहे. उद्यां पार्टी दिली पाहिजे हं!" "एक काय, दोन पार्ट्या देईन" असें म्हणतांच सर्वजण हंसले व मोटारींत बसले.

शेटजींचा बंगला बराच विस्तीर्ण होता. कांहीं तरी बोलण्यास हवें म्हणून मी म्हणालों, "या बंगल्याला रंग चांगला दिलाय हं." त्यावर शेटजी म्हणाले, "दोन वर्षे झालीं या रंगाला, जेव्हां दिला तेव्हां पहावयास हवा होता. अगदीं पॅलेसप्रमाणें हा बंगला दिसत होता." बोलतां बोलतां आम्ही शेटजींच्या खोलींत गेलों.

थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर शेटजींनी मला जमिनींत पुरून घेण्याचा प्रयोग कसा साध्य केला हें विचारलें. 'आसनांचे व प्राणायामाचे सहाय्यानें हा प्रयोग करतां येतो' असें मीं सांगितल्यावर शेटजी म्हणाले, "माझें मधून अधून पोट दुखतें त्याला कांहीं आसनांचा व्यायाम सांगतां का?" जेवण झालें होतें तरी दोन साधीं आसनें मीं करून दाखविलीं व 'हीं आसनें केल्यास कदाचित् आपली पोटदुखी थांबण्याचा संभव आहे कारण मला सुद्धां अशा प्रकारची पोटदुखी लहानपणीं होती' असें सांगितलें. शेटजींनीं व्यायामाचे प्रकार टिपून घेतले. झोंप येऊं लागल्यामुळें मी घरीं जाण्याची इच्छा प्रदर्शित केली. शेटजी उठले व त्यांनीं फडताळा-प्रमाणें भिंतींत असलेली तिजोरी उघडली व आंतून एक पिशवी काढली. पिशवींतले कांहीं चमकणारे दगड त्यांनीं हातावर घेतले व म्हणाले, "हे सर्व 'अनकट डायमंडस्' आहेत. दिसायला साधे असले तरी फार मौल्यवान् आहेत. यांतील एकादा तुम्ही आपल्याकरितां घ्या." पैलू न पाडलेले ते हिरे वरवर गारगोटीप्रमाणें दिसत होते. शिवाय असा ओबड धोबड हिरा घेऊन मला कांहींच फायदा नव्हता.

कारण पैलू पाडणें हें काम बरेंच खर्चाचें व अवघड. शिवाय मुंबईच्या कस्टममधून सुटणें शक्यतेपलीकडेंचें, हिऱ्यांचा चोरटा व्यापार चालतो हें मी ऐकलें होतें व अशी जोखीम थोड्या मोहाला बळी पडून जवळ बाळगणें मला योग्य वाटलें नाहीं. मी म्हणालों, " आज नको. पुढील गांवीं जाण्यापूर्वी मी आपणांकडे येऊन एक हिरा घेऊन जाईन." शेवटीं त्या भयंकर बंगल्यांतून बाहेर पडल्यावर मला हायसें वाटलें.

## रम्य तें स्मशान !

माँझा सोडण्याचे एक दिवस अगोदर प्रविणचंद्र आले व त्यांनीं सर्वांना हिंदूंचें स्मशान पाहण्यास नेलें. स्मशान गांवाबाहेर आहे. आजूबाजुचें वातावरण फारच रम्य आहे. स्मशानांत सर्वत्र झाडें दिसतात. माणसांना जाळण्याची व्यवस्था आधुनिक आहे. प्रेताबरोबर येणाऱ्या लोकांना बसण्याकरितां बाक आहेत. एका लोखंडी टेबल-वजा जागीं प्रेताला जाळलें जातें. प्रेत जळल्यानंतर टेबलाखालचे भागांत राख आपोआप एकत्र होण्याची सोय केली आहे. गांवामधून इतक्या लांब प्रेत आणण्यासाठीं एक खास गाडी ठेवली आहे. ही सर्व व्यवस्था पाहिल्यावर ' मरण आलें तर माँझास यावें ' असा विचार मनांत आल्याशिवाय राहिला नाहीं.

हिंदूंच्या स्मशानाप्रमाणेंच सरोवराकांठीं ख्रिश्चन धर्मीयांचें स्मशान आहे, वृक्षराजींत सर्वत्र क्रॉसच क्रॉस दिसतात. यांत कांहीं थडगीं फार पूर्वींची आहेत. १९१४ च्या लढाईंत कामीं आलेल्या वीरांचीं थडगी येथें आहेत. त्यांच्या नांवाच्या पाट्या थडग्यावर लागल्या आहेत. नेहमींप्रमाणें अज्ञात शिपायांचें थडगेंहि येथें पाहण्याला सांपडतें. या स्मशानांत मुंग्यांचें एक भलें मोठें वारूळ दिसलें. मुंग्या आपणांकडील मुंग्यांपेक्षां थोड्या मोठ्या व रंगानें अगदीं लाल भडक दिसत होत्या. कांहीं मुंग्या तोंडांत पानें धरुन चालल्या होत्या. दुरून पाहिल्यास त्या छत्री चालल्यासारख्या दिसत

# ३

## पाण्यावर तरंगणारीं बेटें

माँझाहून बुकोबाला जाण्याच्या दिवशीं जवळ जवळ सत्तर-ऐंशी माणसें भेटण्याला येऊन गेलीं. पंधरा दिवसांच्या वास्तव्यामुळें माँझा-विषयीं एक प्रकारचा जिव्हाळा उत्पन्न झाला होता. येथील बहुतेक कामें पार पडलीं होतीं. दोन गोष्टी मात्र वेळेच्या अभावीं करूं शकलों नाहीं. शिनियांगाची हिऱ्याची खाण पहावयाची राहिली व निग्रोंच्या खेडयांत जाऊन नाचाविषयीं माहिती मिळविण्याची राहिली. हिऱ्याची खाण पुन्हा पाहतां येणें शक्य नाहीं. पण पुढील गांवीं निग्रोंचा नाच पाहणें शक्य होतें.

लोकांनीं दिलेल्या फळांच्या व मिठाईच्या करंडया बरोबर घेऊन आम्ही बोटीच्या धक्क्यावर गेलों. आफ्रिकेंत पाहुण्याला फळें व मिठाई भेट देण्याची प्रथा आहे. बोटीवर आमच्या पार्टीला निरोप देण्या-करितां बरेच लोक आले होते. व्हिक्टोरिया सरोवरांतून जाणाऱ्या बोटी हलत नाहींत. त्यामुळें प्रवासी नेहमीं खूप असतो. आमच्या शेजारच्या कॉटवर एक निग्रो वकील झोंपला होता. तो बराच बोलका होता. त्यानें व्हिक्टोरिया सरोवराविषयीं एक गमतीची माहिती सांगितली. तो म्हणाला, "हें सरोवर जगांतलें दुसऱ्या नंबरचें मोठें सरोवर आहे; परंतु पठारावर इतकें मोठें सरोवर जगांत कोठेंही नाहीं. या सरोवरांत तरंगणारीं बेटें आहेत. हीं बेटें वाऱ्याच्या झोताबरोबर इकडून तिकडे वाहात जातात. कांहीं प्रसंगीं बोटीच्या मार्गावर हीं बेटें येतात, अशा वेळी त्यांना दुसऱ्या लहान बोटीकडून दूर ओढून काढावें लागतें व नंतर मोठ्या बोटींना मार्ग मोकळा होतो. तरत्या बेटावर माणसें रहात नाहींत. डांस, टोळ व मगरी

## आफ्रिकेंतील वन्य पुरुषांचीं— शिरोभूषणें व अलंकार



मसाई तरुण



कुओ पुरुष



सुक योद्धा



उम्बरे पुरुष



निग्रोच्या कानाचें भोक इतकें मोठें आहे कीं त्यांतून मनगट सहज आरपार जाऊं शकेल



पाणी पिणारे झेब्रे

यांचीच वस्ती तेथें आहे. असें बेट ज्या गांवाजवळ जातें तेथील लोकांचें फार नुकसान होतें. बेटावरील टोळ पिकावर हल्ला करतात, डास माणसांना चावतात व मगरी जनावरांना पाण्यांत ओढून नेतात. असें बेट गांवाजवळ आलें कीं, श्रद्धाळू लोक देवाची प्रार्थना करतात. परंतु सरकारतर्फे त्यावर कीटकनाशक द्रव्यें पाइपाच्या सहाय्यानें उडविलीं जातात व हें बेट दूर ओढून नेलें जातें." वकीलसाहेबांची माहिती सांगून होतांच मी विचारलें, "हीं बेटें तयार कशीं झालीं ?" त्यावर त्यांनीं उत्तर दिलें, "फार पूर्वी वादळामुळें तळ्याकांठचे अनेक वृक्ष पाण्यांत पडले. वृक्षांबरोबर वेलीहि पाण्यांत गेल्या. वेलीमुळें झाडें एकत्र गुरफटलीं गेलीं. वादळामुळें त्यावर माती उडाली व बेटें तयार झालीं. अशा प्रकारचीं बेटें लहान असतात."

आमच्या प्रवासांत तरंगणारीं बेटें पाहावयास मिळालीं नाहींत पण त्या बेटांच्या सत्यतेविषयीं ऱ्याच गोष्टी ऐकण्याला मिळाल्या. इतकेंच नाहीं तर, निग्रो माता आपल्या मुलांना धाडसी वीरांच्या गोष्टी सांगतांना, 'तो वीर तरत्या बेटावरुन दूर दूर गेला व त्याला तेथें एक मोठा मासा भेटला' अशीं वाक्यें वापरतात.

## निग्रोचा रंग काळा कां ?

वकीलसाहेबांनीं, निग्रो लोक काळे कां असतात यावर खेड्यांतल्या लोकांमध्यें प्रचलत असलेली गोष्ट सांगितली. ते म्हणाले, "देवानें प्रथम एक माणूस घेतला व त्याचें आपल्यावर किती प्रम आहे हें परीक्षा घेऊन पाहण्याचें ठरविलें. एक तेलाची कढई तापवून त्यांत त्या माणसाला टाकलें. अगदीं थोड्या वेळांत ओरडत ओरडत तो मनुष्य बाहेर आला. नंतर दुसरा मनुष्य देवानें घेऊन त्याचीहि पहिल्याप्रमाणें परीक्षा पाहिली. परंतु बराच वेळ थांबून हा दुसरा मनुष्य सुद्धां बाहेर आला. शेवटच्या माणसाला कढईंत टाकून तो बाहेर येण्याची देव वाट पाहूं लागला. अखेरीस देव कंटाळला व त्यानें स्वतःच्या हातानें प्रेमानें तिसऱ्या माणसाला बाहेर

काढलें व म्हणाला, 'तूंच माझा खरा आवडता आहेस.' जास्त वेळ उकळत्या तेलांत राहिल्यामुळें त्याचें अंग करपून काळें झालें. तोच निग्रो. कढईंतून बाहेर पडलेले इतर आशियांतील लोक आणि युरोपियन होत."

खेडेगांवांतील भोळ्या लोकांच्या समजुतीवर आधारलेली ही गोष्ट आम्हां सर्वांनाच आवडली. रात्र फार झाल्यामुळें जो तो झोपेच्या तयारीला लागला. मला डायरी लिहावयाची होती; ती पूर्ण करून मीहि झोपी गेलों.

## आफ्रिकेच्या जंगलांत

सकाळीं ६ वाजतां बुकोबा गांव दिसूं लागलें. या गांवापासून घनदाट जंगलाला सुरुवात होणार आहे. ज्या जंगली प्राण्यांचीं वर्णनें कथा–कादंबऱ्यांतून वाचीत होतों व सिनेमांत पहात होतों ते जंगली प्राणी आम्हांला प्रत्यक्ष दिसणार होते. आमचे मॅनेजर बऱ्याच वर्षांपूर्वी बुकोवांत नोकरीवर होते. त्यामुळें त्यांचा मोठा मित्रपरिवार त्यांना भेटण्यास व आम्हाला उतरवून घेण्यास येणार होता. सर्व सामानाची बांधाबांध करून आम्ही किनाऱ्याला बोट लागण्याची वाट पहात होतों.

बुकोबाला कस्टम अधिकाऱ्यांनीं बरेच प्रश्न विचारले. किती दिवस राहणार ? कोणाकडे राहणार ? शिवाय अमचे पासपोर्ट व परमिटें पाहिलीं. धक्क्यावरून आम्ही बाहेर आलों तों आम्हाला नेण्याकरितां ७–८ मोटारी बाहेर उभ्या होत्या. मी एका डॉक्टरांच्या मोटारींत बसलों. प्रथम मी मागच्या सीटवर बसलों होतों. पण डॉक्टर स्वत:च मोटार चालविण्याला बसलेले पाहून मी त्यांच्या शेजारच्या सीटवर बसलों. त्यांच्या तोंडून चटकन शब्द निघाले, 'That's right.' माझ्या या वागण्याचा त्यांच्या मनावर बराच परिणाम झालेला दिसला. वाटेंत आम्ही जणू जुने मित्र आहोंत अशा पद्धतीनें गप्पा मारल्या. प्रथम मी सरळ क्लबांत जाणार होतों. तेथेंच आमची उतरण्याची सोय केली होती. परंतु डॉक्ट-

रांनीं मला अगोदर त्यांचे घरीं नेलें. चहापाणी व गप्पा झाल्यावर आम्ही क्लबांत गेलों. माझ्याकडून सहज घडलेल्या एका गोष्टीचा परिणाम डॉक्टरांच्या मनावर इतका होईल असें मला वाटलें नव्हतें.

बुकोवामधील आमचा पहिला कार्यक्रम होणार होता त्याच दिवशीं थिएटरचें विजेचें मशीन बंद पडलें. गांवांत पुरेशा गॅसच्या बत्त्या नसल्यामुळें कार्यक्रम रद्दीत करावा कीं काय यावर विचार चालू होता. पहिल्याच प्रयोगाचे वेळीं असा घोटाळा झाला तर प्रेक्षकांच्या मनावर विचित्र परिणाम होतो व कार्यक्रम कितीहि चांगला असला तरी गर्दी होत नाहीं. कार्यक्रम उशीरा सुरू झाला तरी हरकत नाहीं. पण मशीन चालू झालेंच पाहिजे, असा जेव्हां आग्रह धरला गेला, तेव्हां अर्ध्या तासांत मशीन सुरू झालें व लगेच मेकप करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. एवढें होईपर्यंत बरेच प्रेक्षक कंटाळून परत गेले होते. कार्यक्रम सुरू होत आहे याची गांवांत दवंडी पिटविली; परंतु कांहीं खुर्च्या रिकाम्या होत्या त्या तशाच राहिल्या. या कार्यक्रमाला नाहीं तर निदान दुसऱ्या कार्यक्रमाला तरी गर्दी होईल असा सोईस्कर विचार कार्यक्रमानंतर मनांत आला.

## दारुड्यांचा उपद्रव

आणि हा विचार खोटा ठरला नाहीं. एक तास अगोदर कार्यक्रमाचीं सर्व तिकिटें संपून गेलीं. थिएटरमध्यें इतकी भयंकर गर्दी होण्याचें कारण म्हणजे येथून १७।१८ मैलांवरील एका लांकडाच्या कारखान्यांतील ६०–६५ माणसें दोन लॉऱ्यांमधून आलीं होतीं. एक गोष्ट खरी कीं हे सर्व लोक खूप पिऊन आले होते. त्यामुळें आपसांत त्यांची बडबड चालली होती. मुलींच्या नाचाच्या वेळीं तोंडाला यतील ते घाणेरडे शब्द ओरडून ते इतरांनाहि उपद्रव देत होते. दोन-तीन वेळां त्यांना गोडीनें सांगून पाहिलें. पण व्यर्थ. थिएटरमधील स्त्रियांना अगदीं लाजल्यासारखें झालें. पोलीसांना सांगून त्यांना बाहेर हाकलून द्यावें तर थिएटरवर पोलीसच हजर नव्हते. शेवटीं

थिएटरमधील चार प्रतिष्ठित नागरिकांनीं विनंति केली तेव्हां ते गप्प बसले. त्यांची बडबड कमी करण्याकरितां आम्हीहि एक उपाय योजला. तो म्हणजे मुलींचा नाच मुळींच न दाखवितां निकमांचें शास्त्रीय नृत्य व माझे जादूचे प्रयोग यावरच बहुतेक कार्यक्रम पार पाडला. सौ. हिराबाईच्या गाण्याला व सुरेशबाबूंच्या जलतरंगाला लोकांच्या खूप टाळ्या पडल्या.

आतांपर्यंत झालेल्या कार्यक्रमांत आजचा कार्यक्रम अगदीं निराळ्या प्रकारचा झाला. नृत्य-गायनाचे शोकीन प्रेक्षक असतांना सुद्धां चार दारुड्यांमुळें कार्यक्रमाला निराळें वळण लागलें. कार्यक्रमानंतर लोकांनीं दारुड्यांना बराच दम दिला असें समजलें.

## मेणाच्या बाहुल्या

दुसरे दिवशीं दुपारीं महिलांकरितां खास कार्यक्रम झाला. त्या कार्यक्रमाला बहुतेक बुरखेवाल्या मुसलमान स्त्रिया होत्या. सबंध तीन तासाच्या कार्यक्रमांत एकहि टाळी पडली नाहीं अगर हास्याचा आवाज थिएटरमध्यें घुमला नाहीं. खुर्च्यांमध्यें मेणाच्या निर्जीव बाहुल्या बसविल्याप्रमाणें त्या सर्व स्त्रिया शेवटपर्यंत बसून होत्या.

## संस्थानिकाची भेट

एके दिवशीं सायंकाळीं कांहीं निग्रो फळांच्या करंड्या घेऊन आमच्याकडे आले. करंड्या तेथील संस्थानिकानें ( कबाका ) भेट पाठविल्या आहेत असें त्यांनीं सांगितलें. करंड्यांचा स्वीकार करावा कीं न करावा या विचारांत आम्ही होतों. कारण तो संस्थानिक आमच्यापैकीं कोणाच्याच ओळखीचा नव्हता व त्यानें आमचा कार्यक्रम पण पाहिला नव्हता. करंड्या आणणाऱ्या लोकांनीं पुन्हा सांगितलें कीं, 'तें सर्व आपल्याकरितांच आहे व आपण तें आंत नेऊन ठेवावें.' आम्हीं करंड्या आंत नेऊन ठेवल्यावर निग्रो निघून गेले. एक तासानें मॅनेजर आल्यानंतर सर्व गोष्टींचा खुलासा झाला. संस्थानिक महाशय आमच्या मॅनेजरसाहेबांचे जानी दोस्त होते व दोस्ताच्या कुटुंबियांना भेट म्हणून त्यांनीं अननस, पोपया, मोसंबीं व आंब्याच्या करंड्या

भरून पाठविल्या होत्या. मीं प्रथम एक अननस फोडला. आफ्रकेंतील अननसाइतका मोठा अननस कोठेंहि पाहाण्यास सांपडत नाहीं. याची चवहि अति मधुर असते.

## माणसें खाणाऱ्या वेली

सर्व महाराष्ट्रीय मंडळींनीं एकदां सहलीचा बेत आखला. गांवापलीकडे असलेल्या टेकडीवर सहल काढण्याचें ठरलें. या सहलींत २५-३० जणांनीं भाग घेतला होता. गांवाबाहेरच्या टेकडीवर झाडी अजिबात नव्हती. त्यामुळें जंगली जनावरें व इतर प्राण्यापासून भीति नव्हती. टेकडीवर चढून जात असतांना आम्हाला एक वनस्पती दिसली. त्या वनस्पतीस 'स्टिंकिग ट्री' किंवा विंचवाचें झाड म्हणतात. या झाडाचें पान शरीराला लागल्यास विंचू चावल्याप्रमाणें वेदना होतात. परंतु निसर्गानें यावर उपचार करण्याचीहि सोय करून ठेवलेली आढळली. या झाडाच्या आजूबाजूला दुसरी एक गोल आकाराच्या पानांची वनस्पती असते. तिचा रस आग होणाऱ्या जागीं लावल्यास आग ताबडतोब थांवते. वनस्पतीविषयीं आम्ही बोलत होतों. मीं एका गृहस्थांना विचारलें, "आफ्रिकेंत माणसें खाणारीं झाडें आहेत हें खरें आहे का ?" त्यावर ते म्हणाले, "अशा प्रकारचीं नुसतीं झाडेंच नाहींत, तर वेलीसुद्धां आहेत. गेल्या लढाईत कितीतरी सैनिक या भयंकर झाडांमुळें मारले गेले. सरकारनें बहुतेक झाडें तोडून काढलीं आहेत. कांहीं झाडें प्रवाशांना दाखविण्याकरितां मुद्दाम ठेवलीं आहेत. या झाडाच्या चारहि बाजूंना कुंपण असतें व निग्रो राखण करण्यास बसविलेला असतो. झाडाचे सभोंवती एकांत एक अशीं माणसांनीं काढलेली वर्तुळें असतात. बाहेरच्या वर्तुळांत मनुष्य गेला कीं झाडांचीं पानें हलू लागतात व जर का मनुष्य आंतल्या वर्तुळांत गेला तर फांद्या खालीं वाकून माणसाला वर उचलून घेतात. झाडाच्या अंगांत शक्ति आहे कीं नाहीं हें आपणाला सहज पाहतां येतें. आजूबाजूला निग्रो खेडूत पक्षी मारून आणून विकण्याला ठेवतात. एकादा पक्षी झाडावर फेकल्यास, मुलगा ज्याप्रमाणें क्रिकेटचा चेंडू

झेलतो, त्याप्रमाणें हें झाड पक्षी झेलतें. या झाडाखालून हत्ती जात नाहीं व वर पक्षी बसत नाहीं, असें निग्रो सांगतात. या भयंकर झाडां-प्रमाणेंच ज्या वेली आहेत त्या जमिनीवर असतात. जमिनीवर चालणारे किडामुंगी इत्यादि प्राणी या वेली टिपीत असतात. अशा प्रकारच्या वेली व कांहीं झाडें कांगोचें खोरें व विषुववृत्ताचे पठाराच्या भागांत पाहण्यास सांपडतात.

## रोज पाऊस पडणारा प्रदेश

बुकोबाचे टेकडीवर आम्ही तीन चार तास होतों; पण वेळ कसा गेला हें समजलें नाहीं. चार वाजतां आम्ही घरीं परत निघालों. कारण, विषुववृत्ताच्या प्रदेशांत रोज सायंकाळचे सुमारास तास अर्धा तास पाऊस पडतो. विषुववृत्तावरचा हा पाऊस मोठा मजेशीर असतो. सकाळी आकाशांत एकसुद्धां ढग नसतो. दुपारीं दोन तीनचे सुमारास ढग जमण्यास सुरुवात होते व चारचे पुढें थोडा वेळ पाऊस पडतो. हा पाऊस सुद्धां श्रावण–भाद्रपदांतल्या झिमझिमी-प्रमाणे पडतो. वादळ अगर सोसाट्याचा वारा कधींच सुटत नाहीं. पाऊस पडून गेल्यानंतरचें वातावरण फारच रमणीय असतें. शरीराला चटके बसविणाऱ्या उन्हाचा दाह पावसामुळें कमी होतो. न्हाऊन निघालेल्या झाडावर मावळत्या सूर्याचीं कोमल किरणें पडतात. त्या वेळची निसर्गशोभा अवर्णनीय असते. याच रमणीय वातावरणांत पावसापासून रक्षण करून घेण्याकरितां पानांआड बसलेले पक्षीसुद्धां किलविल करीत इकडून तिकडे हिंडत असतात.

## निलगिरीचीं झाडें व डांस

प्रथम मला वाटलें होतें, बुकोबाला पाऊस रोज पडतो, त्या अर्थी डांस खूप असतील. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे मच्छर-दाणीहि येथें लावावी लागत नव्हती. तेथें डास नसण्याचें मुख्य कारण म्हणजे या गांवांत निलगिरीचीं झाडें भरपूर आहेत हें होय. या झाडांचे वासामुळें डांस दूर जातात असें एका डॉक्टरांनीं सांगितलें.

## पाणघोड्यांची फुर्रर

बुकोबा गांवीं पाहुणा आला कीं तेथील लोक एकदां तरी त्याला किबोको (पाणघोडे) पाहण्यास घेऊन जातात. बुकोबानजीक भरपूर पाणघोडे आहेत. ते रात्रीच्या वेळीं बाहेर येतात. कांहीं वेळां ते अगदीं घराजवळ येतात. पाणघोडे पाहण्यास जावयाचें म्हणजे दूर अंतरावर मोटारींत बसून राहावयाचें; गडबड करावयाची नाहीं अगर बॅटरी लावावयाची नाहीं. पाणघोडे बाहेर आल्यावर आपसांत खूप खेळतात व तोंडानें फुर्रर ऽ फुर्रर ऽ असा आवाज करतात. आम्ही पाणघोडे पाहण्यास गेलों होतों तेव्हां ते बाहेर आले नाहींत; पाण्यांतल्या पाण्यांतच त्यांचीं भांडणें चाललीं होतीं. तासभर थांबून आम्ही परत आलों.

बुकोबा येथील शेवटचा कार्यक्रम अगदीं उत्तम पार पडला. या वेळीं गडबड—गोंधळ झाला नाहीं. इतकेंच नव्हे तर, मध्यंतराच्या वेळीं एका सरदारजीनें पार्टीस शंभर शिलिंग बक्षीस दिलें. सरदारजींचें म्हणणें असें कीं तो रहात असलेल्या खेडेगांवीं आम्ही एक कार्यक्रम करावा. पण तें अशक्य होतें. पुढील गांवीं थिएटरला तारखा देऊन ठेवल्या होत्या आणि सरदारजींच्या गांवीं चांगलें थिएटरहि नव्हतें. आमच्या नकारामुळें सरदारजी बरेच नाराज झाले. कारण कीं, 'कांहीं झालें तरी पार्टी घेऊन मी येतों' असें त्यांनीं आपल्या दोस्तांना सांगून ठवलें होतें.

## ससे पाळण्याचा छंद

बुकोबा सोडण्याच्या दिवशीं मॅसिडो नांवाच्या एका गोव्याच्या गृहस्थाकडे आम्हाला चहाचें आमंत्रण आलें. मॅसिडोंना ससे पाळण्याचा छंद होता. बऱ्याच प्रकारचे ससे त्यांच्या परसांत होते. सशांना राहण्याझोपण्याकरितां सर्व आधुनिक सोई होत्या. बहुतेक ससे मोकळे होते व ते उड्या मारीत इकडून तिकडे हिंडत होते. मॅसिडो मला म्हणाले, 'जादूकरितां हवा असेल तर एकादा ससा घेऊन जा.' मीं त्यांच्या औदार्याबद्दल आभार मानले व 'सध्या नको; पुन्हा केव्हां

तरी पाहूं ' असें म्हणून सशाच्या आवडीनिवडीविषयीं माहिती विचारली. मॅसिडोनीं या प्राण्यांच्या आवडीनिवडीचा बराच अभ्यास केलेला दिसला. ते म्हणाले, "ससा हा प्राणी अतिशय बुद्धिमान आहे. आपलें घर सोडून तो दुसऱ्याच्या घरांत जात नाहीं. मारामारी करणें तर त्याच्या स्वप्नांतहि येत नाहीं. पण असें असलें तरी, आपल्या पिलांना त्रास देणाऱ्या प्राण्यांना तो व्यवस्थित प्रतिकार करून हुसकावून लावतो. आफ्रिकेंत निग्रो लोकांमध्यें एक समजूत आहे कीं रागीट माणसानें सशाचे पाय जवळ बाळगल्यास त्याचा रागीटपणा जातो. सशाच्या शांत स्वभावावरूनच ही भोळी समजूत रूढ झाली असावी." आफ्रिकेंत सशांच्या बऱ्याच जाती आहेत. एका जातीचा रंग पिवळसर आहे. पण हे ससे दाट गवतांत राहतात. त्यामुळें क्वचित् वेळींच दिसतात. शिवाय त्यांचा रंग पिवळा असल्यामुळें ते गवतांत चटकन् अदृश्य होतात. गवताच्या व त्यांच्या रंगांत विलक्षण साम्य आहे. हे ससे उंचीला नेहमीच्या सशाचे दीडपट मोठे असतात.

श्री. मॅसिडो यांचा हा छंद खरोखरीच चांगला होता. येणाऱ्या जाणाऱ्या माणसांचे तासन्तास सशांच्या गंमती जमती पाहण्यांत जात. कांहीं ससे तर त्यांचे दुकानांत माणसांमधून हिंडतांना दिसत.

## मोटारीपुढें सिंह

बुकोबाहून मसाकाला जाण्याकरितां खास मोटारीची व्यवस्था करण्यांत आली होती. ही मोटार आपल्याकडील पूर्वींच्या खासगी मोटारीप्रमाणें होती. बसण्याकरितां बाकें मांडलीं होतीं. बुकोबा ते मसाका प्रवास कंटाळवाणा झाला. प्रवासांत सर्वत्र एकसारखेंच दृश्य दिसत होतें. जिकडे पहावें तिकडे उंच उंच गवत. ड्रायव्हर म्हणाला, "या भागांत सिंह फार आहेत. हे सिंह माणसांना अगर वाहनांना त्रास देत नाहींत." आफ्रिकेंतील सिंहाबद्दल मीं अनेक गोष्टी ऐकल्या होत्या. कांहीं वेळेस सात आठ सिंह रस्त्यावर मोटारीसमोर आरामांत बसलेले असतात. रस्त्यावर सिंह दिसले कीं प्रवाशांना

मोटारी थांबवाव्या लागतात. कारण प्रवासी पुढें जाऊं लागले तर सिंह मोटारीवर हल्ला करतात. पुढें जाणें तर राहोच, पण अशा वेळीं मोटारीचा लाईटहि लावावयाचा नसतो अगर हॉर्न वाजवावयाचा नसतो. सिंह उठून गेले कीं प्रवाशांनीं आपली मोटार चालू करावयाची. कांहीं कांहीं प्रसंगीं सिंहामुळें दोन दोन तास प्रवाशांना रस्त्यावर अडकून पडावें लागतें.

सिंह माणसांना स्वतः होऊन त्रास देत नाहींत. याचें मुख्य कारण म्हणजे सिंहाच्या आवडीचें मांस त्यांना भरपूर मिळतें. सिंहांना सर्वांत जास्त झेब्रयाचें मांस आवडतें. परंतु एक गोष्ट लक्षांत ठेवावयास हवी कीं, झेब्रा हा खराखुरा रानटी प्राणी आहे. झेब्रा माणसाळणें फार कठीण. त्याच्या टापांचा तडाखा फार जबर असतो. त्यांच्या कळपावर सिंह चालून गेल्यास तो कळप संघटित रीत्या सिंहावर हल्ला करून आपले व आपल्या बांधवांचे प्राण वांचवितो.

## झेब्र्याची शिकार

सिंह झेब्रयांना मोठ्या गनीमी पद्धतीनें मारतात. आफ्रिकेंत कांहीं खाऱ्या मातीची मैदानें आहेत. त्या मैदानांतील दगड चाटणें झेब्रयांना फार आवडतें. या मैदानाच्या आजूबाजूला युरोपियन लोकांनीं झाडावर घरें बांधून ठेवलीं आहेत. घरांत बसल्यावर पुढील-प्रमाणें दृश्य दिसतें. झेब्रयाचे कळपच्या कळप खारी माती चाटण्या-करितां येतात. कांहीं सिंह बाजूच्या जंगलांत दबा धरून बसलेले असतात. झेब्रयांनीं माती चाटण्यास सुरुवात केली कीं, सिंह मोठ-मोठ्यानें डरकाळ्या फोडण्याला आरंभ करतात. सर्व जंगल दणाणून निघतें. तें ऐकून झेब्रे घाबरतात व वाट सांपडेल तिकडे पळूं लागतात . कळपांतून एकादा झेब्रा बाजूला निघाला कीं त्यावर सर्व सिंह एकदम हल्ला करतात. गवताळ प्रदेशांत झेब्रे चरण्यांत दंग झाले असतांना सुद्धां सिंह त्यांवर अचानक हल्ले करून आपलें भक्ष्य पकडतात.

सिहांचें निवासस्थान म्हणजे हा गवताळ प्रदेश. तो ओलांडून गेल्यावर मसाका गांव लागतें. हें गांव छोटेसें असलें तरी लोहार व सुतारांचीं बरींच दुकानें तेथें दिसलीं. तीं कामें करणारे बहुतेक हिंदी लोक आहेत. या लोकांनीं आफ्रिकेमध्यें अगदीं खेडोपाडीं जाऊन सर्व धंदे सुरू केले आहेत. या लोकांत गुजराती, शीख, मुसलमान यांचा भरणा जास्त आहे. पण महाराष्ट्रीय मात्र बोटावर मोजण्याइतकेच आहेत. ज्या गांवांत एक हजार कुटुंबें गुजरात्यांचीं असतील तेथें दोनतीन महाराष्ट्रीय कुटुंबें असायचीं.

मसाकामध्यें आमचा फक्त एकच कार्यक्रम होता व लगेच दुसरे दिवशीं कंपाला नांवाचे गांवीं जावयाचें होतें. मसाका हें छोटें गांव असूनसुद्धां आमच्या कार्यक्रमाला बरीच गर्दी झाली. गर्दी होण्याचें मुख्य कारण म्हणजे गेल्या कित्येक वर्षांत त्या गांवांत हिंदुस्थानी पार्टी आली नव्हती. कार्यक्रम शांततेनें पार पडला. प्रेक्षकांपैकीं एक व्यापारी मध्यंतरांत स्टेजवर आले व म्हणाले, "गांवांत तुमच्या पार्टीची व्हावी तितकी जाहीरात झाली नाहीं. नाहींतर भयंकर गर्दी झाली असती." आमच्या दृष्टीनें आम्हीं जाहिरात केली होती. तेव्हां शेटजी म्हणतात म्हणून मॅनेजरला दोष देणें योग्य होणार नव्हतें.

## दरबानमध्यें दंगल

कार्यक्रम उरकून आम्ही घरीं आलों तों एक भयंकर बातमी ऐकण्यास मिळाली. दरबानमध्यें हिंदी लोकांविरुद्ध निग्रो लोकांनीं जोरांत दंगल सुरू केली होती. त्यांत शेंकडों हिंदींची कत्तल झाली. दंगा सुरू होण्यास अगदीं साधें कारण घडलें होतें. एका गुजरात्याच्या दुकानांत एक झुलु जमातीची बाई मिठाई विकत घेण्याकरितां गेली. तिनें मिठाई घेऊन खाल्ली. थोडया वेळानें तिला उलटया सुरू झाल्या. सर्व निग्रो लोकांनीं हूल उठविली कीं हिंदी लोकांनीं निग्रो लोकांना मिठाईतून विष देण्यास सुरुवात केली आहे. दंगलीचा वणवा हां हां म्हणतां सर्व दर्बान शहरांत भडकला. अनेक हिंदी लोकांचीं बायका-मुलें प्राणास मुकलीं व कित्येक घरें बेचिराख झालीं. साध्या पोलिसांना

दंगा आवरतां येईना म्हणून लष्कर बोलवावें लागलें. त्यानंतर दंगा शांत झाला. या दंग्यामुळें लोकांमध्यें इतकी घबराट निर्माण झाली कीं दंगा थांबल्यानंतर सुद्धां लोक घराच्या बाहेर पडेनात.

दर्बानच्या दंग्याविषयीं अनेक मतें ऐकावयास मिळालीं. कांहीं लोक म्हणत, हा दंगा ब्रिटिशांच्या चिथावणीमुळें झाला. ब्रिटिशांनीं सहाय्य केलें नसतें, तर नंगे पांगे (आफ्रिकेंतील मोठ्या पात्यांच्या तलवारी) हातांत घेऊन दिवसा ढवळ्या हिंदी लोकांची कत्तल करण्याचें धैर्य निग्रो लोकांना झालें नसतें. कांहीं लोक म्हणत, या दंग्याला हिंदी लोकच कारणीभूत होते. त्यांनीं लाखावारी पैसा मिळविला. पण त्यांतील कांहींहि भाग निग्रोंच्या प्रगतीकरितां खर्च केला नाहीं. हिंदी लोक पहिल्यापासून उदारतेनें वागले असते तर शस्त्र उचलण्याचें धैर्य आफ्रिकनांना झालें नसतें.

## प्रवाशानें मत सांगूं नये

परदेशांत प्रवास करीत असतांना प्रवाशानें कोणाजवळहि आपलें मत प्रदर्शित करावयाचें नसतें. लोक जें बोलतील तें ऐकावयाचें व पुढें काय होतें तें पहावयाचें. दंगा झाला आणि थांबला. आम्ही दक्षिण आफ्रिकेंत जाणार होतों तें जाऊं शकलों नाहीं. कारण दक्षिण आफ्रिकेंतून हजारों हिंदी लोक आश्रयाकरितां पूर्व आफ्रिकेला अथवा हिंदुस्थानला जाऊं लागले.

## भाग्यवान पक्षी

ठरल्याप्रमाणें आम्ही मात्र आमचा एक दिवसाचा मसाकाचा मुक्काम संपवून कंपाला गांवीं जाण्यास निघालों. त्यानंतर आम्ही विषुववृत्ताच्या घोर अरण्यांतून प्रवासाला सुरुवात करणार होतों. मोटारचा ड्रायव्हर निग्रो होता व तो स्वभावानें मनमिळाऊ होता. त्यामुळें त्याच्याशीं मोडक्या तोडक्या स्वाहिलींत गप्पा मारायला बरें वाटे. त्यानें निग्रोंच्या अनेक चालीरीति व भोळ्या समजुती सांगितल्या. त्यांतील कांहीं मोठ्या मजेशीर होत्या. निग्रो लोक एका तुरेवाल्या पक्ष्याला भाग्यवान म्हणून संबोधतात. हा पक्षी

ज्याच्या घरावर बसेल, त्याचें भाग्य लवकर उजळेल, अशी कल्पना. हा पक्षी गांवांतील एकाद्या झाडावर दिसला तर सर्व निग्रो त्याला पाहण्याला धांवतात. त्याचें दर्शन घेतल्यास आळ येत नाहीं अशीहि समजूत आहे. या पक्ष्याप्रमाणें सरडा व मुंगूस हे दोन प्राणी शुभ मानण्याची प्रथा आहे. शिकारीस निघालेल्या शिकाऱ्याला सरडा आडवा गेला तर, शिकार निश्चित मिळणार असें समजलें जातें. मुंगूस हा प्राणी शुभ असला तरी तो घरांत पाळण्याची प्रथा नाहीं. शुभ प्राण्याला घरांत ठेवल्यास घरांतील लोकांचें भाग्य बाहेर जातें असें मानतात.

## तरंगणाऱ्या वनस्पति

मसाका ते कंपालाच्या दरम्यान अनेक लहान मोठ्या नद्या आहेत. एका नदीवर पूल न बांधतां फेरी ( लहान तराफा ) ठेवली आहे. आम्ही मोटारीसकट सर्व लोक या फेरींत बसलों. नदीचें पाणी फारच जोरांत वाहात होतें. प्रवासांतून कमळासारख्या कसल्या तरी वेलींचीं पानें वहात येत होतीं. कांहीं पानांवर लहान हिरवे बेडूक बसलेले दिसले. पण आमचा ड्रायव्हर म्हणाला, ते बेडूक नाहींत. तीं त्या वनस्पतीचीं फळें आहेत. या वनस्पती नेहमींच पाण्यांत तरंगत असतात व तेथेंच त्यांची वाढ होत असते.

## रानटी सिनेमावाले

आम्ही फेरींतून पलीकडे गेल्यानंतर बाजूच्या टुमदार इमारतींत एक हॉटेल दिसलें. हॉटेल इतकें मोक्यावर आहे कीं बहुतेक कंटाळलेले प्रवासी आंत गेल्याशिवाय रहात नाहींत. हें हॉटेल एका सुशिक्षित निग्रोनें चालविलें आहे. तेथें स्वच्छता वाखाणण्यासारखी होती. चहा पिऊन बाहेर आल्यानंतर आम्हाला जंगली लोकांची टोळी दिसली. ते सर्व लोक वल्कलें नेसलेले होते व बहुतेकांच्या खालच्या ओठांत हस्तीदंती हूक अडकविला होता. या लोकांची भाषा स्वाहिली नव्हती. ते मंगाडी जातीचे लोक होते व त्यांच्या भाषेचेंहि नांव मंगाडीच असल्याचें समजलें. या लोकांचे दोन तीन प्रकारचे उद्योग असतात.

रानटी प्राण्यांची कातडी व रंगीबेरंगी पक्ष्यांचीं पिसें विकणें, नवीन प्रवाशांना जंगलांतल्या गमतीजमती दाखविणें हीं कामें मुख्यत्वें करतात. या जमातीच्या लोकांनीं आफ्रिकेंतील जीवनावर आधारलेल्या अनेक चित्रपटांतून कामें केलीं आहेत. यांचा अभिनय इतका नैसर्गिक असतो कीं तो पाहून अभिनयपटू देखील आश्चर्यचकित होऊन जाईल. आमच्या पार्टीतील आठ दहा लोकांना पाहून, आम्ही सिनेमावाले आहोंत, अशी त्यांची कल्पना झाली. एका माणसानें मोडक्या तोडक्या इंग्रजींतून तशी चौकशी सुद्धां केली. मोटारींत बसण्यापूर्वी आमच्यापैकीं कांहीं लोकांनीं त्यांना सिगारेट्स व सुटे पैसे बक्षीस म्हणून दिले. पैशापेक्षां सिगारेट् मिळाल्यामुळें त्यांना अधिक आनंद झाला. सिगारेट ओढतांना ती दोन बोटांच्या चिमटींत धरून नवशिक्या माणसाप्रमाणें हे लोक ओढीत होते. त्यांपैकीं कांहीं लोकांजवळ धनुष्यबाण होते. हेच लोक विषारी बाणांच्या सहाय्यानें शिकारी करण्यांत पटाईत असतात.

## विषारी बाणाची कथा

कुतुहल म्हणून मीं आमच्या ड्रायव्हरला विषारी बाणांविषयीं व ते तयार करण्याच्या पद्धतीविषयीं विचारलें. तो म्हणाला, "हे बाण तयार करण्याच्या अनेक तऱ्हा आहेत. सर्वांत प्रसिद्ध कृति म्हणजे सापाच्या झाडाच्या पानांतील विष देऊन बाण तयार करणें ही होय. आफ्रिकेंत कांहीं भयंकर विषारी साप आहेत. त्यांच्या मस्तकांत रोज इतकें वीप तयार होतें कीं त्यांना कशाला ना कशाला डसल्यावांचून भागत नाहीं. नाहींतर त्या विषाचा परिणाम खुद्द सापावरच होतो. रोज माणसें अगर जनावरें मिळणें कठीण असतें. म्हणून हे साप मऊ मुळ्या असलेल्या एका विशिष्ट वनस्पतीला डसतात. सांप डसल्यानंतर वीष झाडाच्या पानांत व मुळ्यात उतरतें. निग्रो वैदु उंच कांठ्यावरून चालत त्या झाडाजवळ जातो. असें उंच काठ्यावरून जाण्याचें कारण म्हणजे आपल्याकडे जसा केवड्याच्या आजूबाजूला साप असतो, तसा याहि झाडांचे आजूबाजूस

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................. वि: .. .. ....... ..
नों: दि: ..............

नेहमीं साप असतो. काठ्यावरून चालत गेल्यास सापापासून उपद्रव होत नाहीं. नंतर निग्रो वैदू हीं झाडें उपटून घरीं आणतात. डोळ्यांना गारा घोटून तयार केलेला चष्मा लावतात. मुळ्या व पानांचा रस काढतात. बाणाचें टोक गरम करून त्यावर या विषारी रसाचीं पुटें देतात. चष्मा लावण्याचें कारण म्हणजे या विषारी रसाची वाफ डोळ्यास लागूं नये हें होय. या विषारी बाणामुळें हत्तीसुद्धां ठार होऊं शकतो."

## हत्तींचा कळप

निग्रो ड्रायव्हर निरनिराळ्या गमती सांगत होता व आमची मोटार कंपाल्याच्या दिशेला धांवत होती. मध्यंतरीं इतकें घनदाट जंगल लागलें कीं आम्ही दिवसा प्रवास करीत असून सुद्धां एक प्रकारची भीति वाटत होती. याच जंगलांत हत्तींचे कळप असतात. हे कळप इतके मोठे असतात कीं एकेका कळपांतील हत्तींची संख्या दीडशेंपर्यंतहि असूं शकते. हत्तींचा कळप येत असल्याची चाहूल दोन तीन फर्लांगावरून लागते. झाडाच्या वाळलेल्या पानांवर पाय पडल्यामुळें व ते झाडांना खेटून चालत असल्यामुळें एक प्रकारचा कडकड असा आवाज येतो. हत्ती आपल्या दिशेनें येत आहेत असें समजलें कीं मोटार थांबवावी लागते. मोटार थांबविल्यानंतर आजूबाजूंनीं हत्तींचीं धुडेंच्या धुडें निघून जातात. एकाद्यानें मुद्दाम मोटार चालविली तर हत्ती तिचा पाठलाग करतात व मोटारीवर हल्ला करतात. अतिवेगानें मोटार चालविल्यास हत्ती पाठलाग न करतां विशिष्ट प्रकारचा आवाज काढतात. हा आवाज ऐकतांच पुढें दोन चार मैलांवर असलेल्या हत्तींचा दुसरा कळप रस्त्यावर येऊन पळणाऱ्या प्रवाशाचें स्वागत करण्यास उभा राहतो. अशा प्रसंगांत सापडणें म्हणजे मृत्यूच !

## गुहेंतील संपत्ति

सर्व जनावरांत हत्ती समजुतदार समजतात. त्याच्याइतका बुद्धि-

मान प्राणी दुसरा नाहीं. हत्तीविषयीं अनेक कथा ऐकण्यास मिळतात. हत्ती मरतांना वाटेल तेथें मरत नाहीं. अति घनदाट जंगलामध्यें एकादी गुहा पाहून त्या ठिकाणीं तो मरतो. मेल्यानंतर आपलीं हाडें व दांत कोणाचे हातीं पडूं नयेत हा त्याचा त्यांत कदाचित् हेतु असेल. अशा गुहेंतून अनेक हत्ती मेलेले असतात व युरोपीयन लोक या हस्ती-दंताच्या गुहांचा किंवा खाणींचा शोध करण्यासाठीं निबिड जंगलें पालथीं घालीत असतात. हस्तीदंत पडलेली एकादी गुहा सांपडली तरी तो मनुष्य जन्माचा श्रीमंत होऊं शकतो.

## हत्तींच्या डोळ्यांतील अश्रु

समजा एकादा हत्ती गुहा सोडून अपघातानें इतर ठिकाणीं मेला तर काय होते? त्या ठिकाणीं इतर हत्तींची खरी बुद्धिमत्ता दिसून येते. आपल्या प्रचंड दांतांनीं हे हत्ती खड्डा खणतात व मेलेल्या हत्तीला पुरून टाकतात. इतकेंच नाहीं तर, पुरलेल्या जागेवर पानें व झाडांच्या फांद्या टाकून इतरांस मागमूस लागूं नये याची खबरदारी घेतात. मेलेल्या हत्तीच्या भोंवती इतर हत्ती वर्तुळ करून अश्रू ढाळीत बसलेले कितीतरी शिकाऱ्यांनीं पाहिले आहेत. ते म्हणतात, अशा वेळीं हत्ती सोंडेनें करीत असलेला हृदयद्रावक हावभाव व त्याच्या डोळ्यांतील पाण्याचे ओघळ पाहून पाषाणहृदयी माणसाला सुद्धां वाईट वाटल्यावांचून रहात नाहीं. पूर्वी एक हत्ती मारण्यास ५० पौंड कर द्यावा लागत असे. हल्लीं तीच रक्कम १०० पौंडावर गेली आहे.

परदेशांतील प्रवास गमतीदार खरा. कान व डोळे कार्यक्षम ठेवले कीं शेंकडों गोष्टी ऐकण्यास व पाहण्यास मिळतात. अनेक प्रवाशांनीं व निग्रोंनीं सांगितलेली हत्तींच्या जीवनाविषयींची माहिती इतरत्र मिळणें कठीण. शिकाऱ्यांचे ते जिवंत अनुभव होते.

कंपाला शहराच्या अलीकडे दोन मैलांवर मोठमोठ्या बागा लागतात. या बागांतून लावलेल्या झाडांवर फळें इतकीं आलीं होतीं कीं त्यांच्या वजनानें झाडांच्या फांद्या जमीनीला लागल्या होत्या.

सर्वात जास्त बागा मोसंबीं व संत्र्यांच्या होत्या. चेरीसारखीं दिसणारी कांहीं रंगीत लहान लहान फळेंहि होतीं. फळें खरीदण्याकरतां आम्ही ड्रायव्हरला मोटार थांबविण्यास सांगणार होतों. परंतु तेथें वेळ मोडल्यास गांवांत पोंचण्याला रात्र होईल असें त्यानें सांगितलें. म्हणून मोटार न थांबवितां आम्ही तसेंच पुढें गेलों.

## सात टेकड्यांवरील शहर

कंपाला गांवांत आम्हीं प्रवेश केला ती वेळ सायंकाळीं सातची होती. रस्त्यावर लोकांची रहदारी अगदीं तुरळक होती. गांवांतील रस्ते स्वच्छ दिसले. सर्वांत गम्मत म्हणजे हें गांव निरनिराळ्या सात टेकड्यांवर वसलें असल्यामुळें एकाद्या झुंबराप्रमाणें रात्रीं दिसत होतें. आमची उतरण्याची सोय नवीनच बांधलेल्या एका घरांत केली होती.

सकाळीं खूप खरेदी करावयाची होती. कंपाल्याची मंडई (सकोनी) उत्तम आहे. एका मंडईंतच सर्व कांहीं मिळतें. दारेसलामपेक्षां येथें भाज्या स्वस्त मिळाल्या. मोठमोठालीं जनावरें मारून टांगून ठेवलेलीं तेथें होतीं. शेजारींच कोपऱ्यांत त्याचीं मुंडकीं दिसत होतीं. एकंदर संपूर्ण मंडईंत हा विभाग नसता तर बरें झालें असतें असें मला वाटलें.

दुपारीं एका निग्रोला घरकामासाठीं म्हणून नोकर ठेवलें. तो धर्मानें ख्रिश्चन होता. मोडकें तोडकें इंग्लिश बोले. आमच्या पार्टींत कांहीं लोकांना इंग्लिश येत नसल्यामुळें त्याला एकादी गोष्ट समजावून सांगणें फार कठीण जाई. तो फक्त नांवाला ख्रिश्चन होता. त्यानें बायबल वाचलें नव्हतें अगर तो रोज येशूचें नांवहि घेत नसे. उलट मनांतल्या मनांत अंगारे धुपारे देणाऱ्या देवांच्या भजनीं लागलेला दिसे. त्याच्या खिशांत कसल्या तरी मुळ्या होत्या. एकादें काम चुकलें अगर त्याला तें समजलें नाहीं म्हणजे तो आपल्या पांढऱ्या झग्याच्या खिशांत हात घाली व नंतर काम समजाऊन घेण्याचा प्रयत्न करी. प्रथम त्याची ही कृति अगदीं वेड्या माणसा-



माणसाळलेली मगर. पांच निग्रोंनीं उचलून धरलेल्या या मगरीची लांबी बारा फूट आहे. (पान ८७)



आफ्रिकेंतील व्हिक्टोरिया सरोवराच्या कांठीं मगरीचें पिल्लू अंडें फोडून बाहेर येत आहे

प्रमाणें वाटे. मागाहून समजलें कीं, त्याच्या खिशांत मंत्रून दिलेल्या मुळ्या आहेत. मुळ्यांवर हात ठेवल्यास समोरचा मनुष्य न रागावतां बोलतो, अशी समजूत! आफ्रिकेंतील निग्रोंचा धर्म मुसलमानी असो, अगर ख्रिश्चन असो, ते तो धर्म नांवालाच पाळतात. भुतेंखेतें, रानांतले दगडाचे, झाडांचे देव हेच त्यांचें आराध्यदैवत. युरोपियन लोकांच्या चालीरीतीबद्दल त्यांना आदर आहे. आपणसुद्धां तसें वागावें व सुटाबुटांत वावरावें असेंहि निग्रो लोकांना वाटतें. पण हें नुसतें वाटणें! प्रत्यक्ष कृतींत ही गोष्ट उतरणें बरेंच अशक्य.

## स्त्रियांची प्रचंड सभा

आफ्रिकन लोकांची राहणी किती मागासलेली आहे हें आतांपर्यंतच्या प्रवासांत अनेक वेळां दिसलें होतें. खेड्यापाड्यांतून अजूनसुद्धां शेतीची सुधारणा झालेली नाहीं. कदाचित् नैसर्गिक साधनांच्या विपुलतेमुळें त्यांनीं ती करून घेतली नसेल. बैलांच्या सहाय्यानें शेती करणें, लोखंडी नांगर वापरणें किंवा उत्तमपैकीं भांडीं अगर मातीच्या विटा तयार करणें, या साध्या गोष्टीसुद्धां निग्रो लोकांना या विसाव्या शतकांत तितक्याशा परिचयाच्या नाहींत. खेडेगांवांतील घरें म्हणजे गोल आकाराचीं व कळसासारखा भाग असलेलीं खोपटीं. या छोट्या झाडापानांच्या खोपटांत ते राहतात. शहरांतल्या सुधारणांनीं त्यांचे डोळे दिपतात. पण त्या सुधारणा अंगवळणीं पाडून घेण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत अजून आलेलें नाहीं. सभा-संमेलनें अगर आपलीं दुःखें सामुदायिक रीत्या राज्यकर्त्यांसमोर मांडण्याइतकें धैर्य त्यांच्यांत आलेलें नाहीं. १९४८ सालीं घरकाम करणाऱ्या गड्यांचा एक संप घडून आला. संपांत सामील होण्याविषयीं सर्वांकडून शपथा घेतल्या होत्या. आणि म्हणूनच संप शेवटपर्यंत टिकला. स्वयंस्फूर्तीनें अगर शपथा न घेतां तो करण्यांत आला असता तर किती दिवस टिकला असतां हें सांगतां येणें कठीण आहे. अद्याप शहरांत निग्रो स्त्रिया या एकत्र सभेच्या स्वरूपांत कधीं जमल्या नाहींत. गेल्या

चारसहा वर्षांपासून त्यांच्यांत थोडी जागृति होऊं लागली आहे. निग्रो स्त्रियांच्या पहिल्या सभेविषयींची माहिती जगांतील सर्व प्रमुख वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केली होती. या गाजलेल्या सभेस फक्त चारपांच स्त्रियाच हजर होत्या.

आफ्रिकेंत सभ्यांचें जीवन कसें आहे याची कल्पना पुढील उदाहरणावरून येईल. कंपाला एवढें नमुनदार शहर. पण रात्रीचे वेळीं घराबाहेर पडण्याची सोय नाहीं. अगदींच महत्त्वाच्या कामाकरितां जावयाचें असेल, तर मोटारींतून जावें लागतें. एकादा मनुष्य पायीं एकटाच गेला तर, तो आपलें सर्वस्व गमावून बसल्याशिवाय राहावयाचा नाहीं. खिशांतील पैशाअडक्याची गोष्ट सोडा; पण अंगावरचे कपडेसुद्धां वाटमारी करणारे लोक काढून घेतात. कांहीं ठिकाणीं स्त्रियासुद्धां निरनिराळ्या व्यवसायानिमित्त रात्रीचे वेळीं बाहेर पडलेल्या दिसतात. आमच्या रात्रीच्या कार्यक्रमास लोक येत ते समूहानें येत. एकट्या दुकट्याला कार्यक्रम पहावयाचा असेल तर, सायंकाळच्या कार्यक्रमास तो येऊन जाई.

## अत्तराचा भपकारा

कंपाला गांवीं आगाखानपंथीय लोकांची वस्ती बरीच दिसली. त्यांच्या प्रार्थना करण्याच्या मोठमोठ्या मशीदी आहेत. हे लोक फार हौशी. उंची कपडे घालून व अंगावर अत्तराच्या बाटल्या ओतून रस्त्यानें हिंडतांना दिसतात. त्यांतल्या त्यांत स्त्रियांना अत्तराचा शोक फार दिसला. अत्तरामुळें खोजा स्त्री येत असल्याची बातमी सुमारें एक फर्लांग अंतरावरून वारा लोकांस अगोदरच पोचवितो.

माझा एक कार्यक्रम खोजा लोकांच्या मुलींच्या शाळेंत झाला. कार्यक्रम पाहण्यास लहान लहान मुली समोर बसल्या होत्या; पण मोठ्या मुली व मास्तरणी पडद्याआड बसून कार्यक्रम पहात होत्या. प्रथम त्यांनीं पडदा संपूर्ण लावला होता. पण कार्यक्रम सुरू झाल्यावर हलकेंच पडदा बाजूला गेला.

# ४

## सौ. हिराबाईंचा खंबीरपणा

कंपाल्याच्या मुक्कामांत मला सौ. हिराबाईंच्या खंबीर मनाची सत्यता एका प्रसंगानें दिसून आली. हिंदी विद्यार्थ्यांच्या शाळेंत आमच्या पार्टीचा संपूर्ण कार्यक्रम होता. मोटारींतून सर्वजण कार्यक्रम-स्थळीं वेळेवर गेलों. कार्यक्रमाला सुरुवात झाली. इतक्यांत समजलें कीं सौ. हिराबाईंची मनीबॅग नाहींशी झाली. सर्वत्र शोधाशोध सुरू झाली. बॅगेंत १० हजार शिलिंग व ४०–५० तोळ्याचीं सोन्याचीं मेडल्स होतीं. या वेळीं स्टेजवर माझा कार्यक्रम चालू होता व नंतर हिराबाईंचें गाणें होतें. कार्यक्रम संपवून मी आंत आलों. घंटा वाजली व तंबोऱ्याच्या सुरांत गाणें सुरू झालें. आम्हाला वाटलें होतें, हिराबाईंचें लक्ष गाण्याकडे लागणार नाहीं. पण झालें मात्र उलट. गाण्याला सुरुवात होतांच हिराबाई सर्व विसरून गानसमाधींत रंगून गेल्या. त्यांचें गाणें अत्यंत सुंदर वठलें. टाळ्यांच्या कडकडाटांत त्या आंत आल्या. आंत आल्यावर मात्र परत बॅगच्या शोधास सुरुवात झाली. रात्रीं बारा एकपर्यंत बॅग सांपडली नाहीं. एक वाजतां निग्रो ड्रायव्हर मोटार घेऊन आमच्या घरीं आला व म्हणाला, "मोटार पुशीत असतां गादीखालीं आपली ही पर्स सांपडली." हिराबाईंनीं घाई-घाईनें पर्स उघडली. आंत सर्व पैसे व मेडल्स जशींच्या तशीं होतीं. आम्हां सर्वांना इतका आनंद झाला कीं त्यानिमित्त गाणीं म्हणत व गप्पा मारीत सारी रात्र आम्हीं जागून काढली. निग्रो ड्रायव्हरला हिराबाई बक्षीसी म्हणून २०० शिलिंग देऊं लागल्या; पण त्यानें ते घेतले नाहींत. त्यानें बक्षिसाचे पैसे घेतले नाहींत याबद्दल मात्र हिराबाईंना वाईट वाटलें.

कांहीं वेळा हंसावें कीं रागवावें असा प्रसंग माणसावर येतो व अशा प्रसंगीं मनुष्य कांहींहि न करतां गप्प बसतो. असाच एक प्रसंग कंपाला येथील ग्लोब टॉकीजमधील कार्यक्रमाचे वेळीं आला. आमच्या नोकराला स्टेजवरच्या विंगस् झटकन् साफ करून थिएटरवर घेऊन येण्यास सांगितलें. आम्ही सर्वजण थिएटरमध्यें त्याची वाट पहात बसलों. बराच वेळ झाला म्हणून मी त्याला पहाण्याकरतां घरीं गेलों. पाहतों तों गाण्याच्या तालांत नोकरसाहेब विंगस् धूत होते. कार्यक्रम सुरू होण्याला अगदीं थोडा अवकाश होता व स्टेजवर विंगस् लावणें अवश्य होतें. पण नोकराच्या धांदरटपणामुळें त्या दिवशीं विंग न लावतां कसातरी कार्यक्रम उरकून घ्यावा लागला. रात्रीं घरीं आल्यावर आम्ही त्याला खूप बोललों. तो म्हणाला, "आपण सांगितलें कीं साफ करून घेऊन ये. मग माझें काय चुकलें ?" आम्ही रागावलेलों पाहून तो गप्प बसला. पण आम्ही कां रागावलों हें मात्र त्यास समजलें नाहीं . या प्रसंगानंतर मात्र निग्रो नोकरास काम सांगतांना फार दक्षता घेत असू.

कंपाला गांवीं आम्हीं पंधरा दिवस होतों. या दिवसांत कार्यक्रम फारच थोडे झाले. सर्व वेळ खाणें, पिणें व पाटर्या झोडण्यांत गेला. बहुतेक महाराष्ट्रीय लोकांनीं आम्हाला आमंत्रणें दिलीं होतीं. विनाकारण थांबण्यामुळें बरेंच आर्थिक नुकसान झालें. कारण पार्टीतल्या लोकांचा अवाढव्य पगार चालूच होता. मी माझ्या शीख मित्राबरोबर खेड्यांत व शेतावर जाऊन आलों. निग्रो लोकांचें एक नृत्यहि पाहून आलों. शेतावर जाण्याचा जो प्रसंग आला त्याला मोठें मजेशीर कारण घडलें. मी मार्केटमध्यें टोमॅटो आणण्याकरितां गेलों होतों. दुकानांतील टोमॅटो चांगले नव्हते. चांगले कोठें मिळतील असें एका माणसाला मीं विचारलें. त्यानें मंगाडी भाषेंत माझेपुढें व्याख्यान देण्यास सुरुवात केली. तो जवळजवळ तीनचार मिनिटें बोलत होता. मी नुसतें हॉं हॉं म्हणत होतों. तो बोललेल्या वाक्यांतील एक शब्दहि मला समजला नाहीं. मी गप्प बसलेलों पाहून त्या गृहस्थानें मला बरोबर चलण्याची खूण केली. मी त्याचेबरोबर जाऊं लागलों.मला

वाटलें, जवळच असलेलें दुसरें एकादें दुकान तो दाखवील. ३ फर्लांग चालून गेल्यावर एक टोमॅटोचें शेत लागलें. शेत पाहिल्यावर निग्रोच्या व्याख्यानाचा हेतु लक्षांत आला. शेतावरचे चांगले टोमॅटो खरेदी करून मी घरीं आलों. पण नुसत्या टोमॅटो खरेदींत दीड तास गेला.

## पोलिसांना वर्दी

कंपाला येथील कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी आम्हांला पोलीस चौकींत जाऊन आगमनाची वर्दी द्यावी लागली. अशा प्रकारची वर्दी सर्व शहरांतील चौक्यावर द्यावी लागते. वर्दी दिली नाहीं तर, कां दिली नाहीं याची कारणें मागाहून हजर करावीं लागतात व त्यासाठीं हेलपाटे घालण्यांत प्रवाशाचे बरेच दिवस खर्च होतात.

## सेन्सॉर बोर्डावर जादू

कंपाला येथें युगांडा सरकारचें एक सेन्सॉर बोर्ड आहे. हें बोर्ड सिनेमा, नाटकें, नृत्यें इत्यादींची चांचणी घेतें. वास्तविक आमच्या कार्यक्रमाची चांचणी घेण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण नियमाप्रमाणें बोर्डाच्या सभासदांपुढें आमचा एक छोटासा कार्यक्रम झाला. सौ. हिराबाईंचें गाणें, निकमांचें व मीनाचें नृत्य आणि जोगबाबूंचें व्हायोलिन वादन झालें. वरील सर्व लोक हिराबाईंचे पार्टींत होते. माझ्या जादूच्या प्रयोगाची त्यांना ट्रायल घ्यावयाची होती. या महाभागांना काय दाखवावें हेंच समजेना. कारण वेळ फक्त तीन चार मिनिटें होता. शेवटीं बोर्डातल्या एका सभासदाला स्टेजवर बोलाविलें व त्याच्या डोक्यावर कच्चे तांदूळ घातलेलें भांडें ठेवलें. थोडच्या वेळांत भांडें गरम होऊन भात शिजूं लागल्याबरोबर साहेब घाबरले व जागेवर जाऊन बसले. पुढचे प्रयोग न पाहतांच त्यांनीं 'ओ. के.' शेरा मारला. प्रयोगांतील गुपित शोधून काढण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. शेवटीं प्रयोग कसा झाला असा प्रश्न मला विचारला. पण जादूगारांच्या नियमाप्रमाणें मला तें सांगतां येणार नाहीं असें उत्तर द्यावें लागलें. या सेन्सॉर बोर्डांत दोन महाराष्ट्रीय गृहस्थ होते.

कंपालाला असतांना मला मोटार ड्रायव्हिंग शिकावयास मिळालें. येथें हरदयाळसिंग नांवाच्या गृहस्थांचें वर्कशॉप आहे. माझें धनुष्य दुरुस्त करण्याकरितां मी त्यांचेकडे गेलों होतों. त्यांनीं थिएटरमधील कार्यक्रम पाहिला होता. त्यामुळें दोस्ती ताबडतोब जमली. धनुष्य नीट करण्याचें व रंग देण्याचें काम त्यांनीं स्वत: केलें. त्या दिवसापासून फावल्या वेळीं मी त्यांचेकडे जात असें व ते मला मोटार ड्रायव्हिंग शिकवीत असत. पांचसहा दिवसांत मोटर चालविण्याची चांगलीच संवय झाली.

कंपाला गांवीं राहून आम्हीं एंटेबी येथेंहि दोन कार्यक्रम केले. कंपाला व एंटेबी या गांवांत २१ मैलाचें अंतर आहे. पण या दोन गांवांना सांधणारा रस्ता अगदीं सरळ व उत्तम स्थितींत आहे. ताशीं ६० मैल वेगानें मनुष्य सहज मोटार चालवूं शकतो. मी एकटाच एक आठवडा एंटेबी येथील गुरुदेवसिंग नांवाच्या एका सरकारी इंजिनिअरकडे रहाण्यास गेलों होतों. गुरुदेवसिंग गेलीं १४–१५ वर्षें त्या गांवीं रहात आहेत. सरकारी नोकरी व फावल्या वेळीं करमणुकीचे कार्यक्रम घडवून आणणें हा त्यांचा छंद. माझा एक कार्यक्रम त्यांनीं त्यांच्या मित्राकरितां केला. कार्यक्रमाला बरेच निग्रो स्त्री-पुरुष व हिंदी लोक आले होते.

एकदां एंटेबीजवळचें 'त्सेत्से' संशोधन केंद्र पाहाण्याला गेलों. केंद्र गांवापासून बरेंच दूर आहे सर्व डॉक्टर्स युरोपियन आहेत व हाताखालीं काम करणारीं माणसें निग्रो आहेत. येथें त्सेत्से माशाबद्दल बरीच माहिती मिळाली.

## निद्रारोग जडविणाऱ्या माशा

त्से–त्से माशा आफ्रिकेच्या बऱ्याच भागांत आढळतात. या माशा नेहमींच्या माशांच्या मानानें जरा मोठ्या दिसतात. रंग जरा पिवळसर. या माशांमुळें जनावरें जगत नाहींत. आफ्रिकेंत कोठेंहि घोडे अगर म्हशी दिसत नाहींत, याचें हेंच कारण आहे. ही माशी झाडाच्या बुंध्यावर बसून राहाते. दूर अंतरावरून ती आपलें भक्ष्य हेरते, हळूच

जाऊन अंगावर बसते व कडकडून डसते. तिची सोंड फारच तीक्ष्ण असते. पाणघोड्याप्रमाणें जाड कातड्याच्या प्राण्याच्या अंगांतील रक्त ती सहज शोषून घेऊं शकते. माणसाच्या अंगांत वुलनचा कोट असला तरी त्यावर बसून ती कार्यभाग साधते. माशी चावल्यानंतर माणसाला निद्रारोग होतो. मनुष्य सारखा झोपून राहतो व नंतर मरतो. हा रोग ताबडतोब उघडकीस आल्यास मनुष्य जगूं शकतो. पण रोग ओळखण्यास उशीर झाला तर मनुष्य मरतो. या माशा एकाच प्रांतांत कायम वास्तव्य करीत नाहींत. ठराविक वर्षांनीं त्या आपली जागा बदलतात. ज्या ठिकाणीं या माशांपासून होणाऱ्या रोगावर संशोधन चालतें त्या ठिकाणीं प्रयोग करण्याकरितां माकडें व इतर प्राणी पिंजऱ्यांत ठेवले आहेत.

## पोलीश लोकांचा कॅम्प

या संशोधन केंद्राचे पलीकडे एक लष्करी कँप होता. मी इंजिनियर-बरोबर तेथें गेलों. कँपमधील बहुतेक घरें पडून गेलीं होतीं. त्या घरांत युद्धानंतर पोलीश लोक रहात होते. पोलीश लोक कँपांत जेव्हां प्रथम आले तेव्हां त्यांचे फारच हाल झाले होते. खाण्यापिण्यावाचून त्यांनीं कांहीं आठवडे काढले. कित्येक तरुणींना अन्नाकरितां सर्वस्वाची होळी करावी लागली होती असें मला समजलें.

## माणसाळलेली मगर

एंटेबीपासून सहा मैलांवर व्हिक्टोरिया तलावांत एक माणसाळ-लेली मगर आहे. पूर्वी मगर लहान असतांना एक निग्रो मुलगा तळ्याकांठीं मासे मारण्यास जात असे. मासे मारतांना ‘लुटेंगे लुटेंगे’ या शब्दानें सुरुवात होणारें गाणें तो गुणगुणत असे. मासे मारून झाले कीं एक दोन मासे देवाला म्हणून तळ्यांत टाकी. तळ्यां-तली मगर ते मासे खात असे. कांहीं दिवसांनीं त्या मुलाची व मग-रीची इतकी दोस्ती झाली कीं मुलगा हातानें मगरीच्या तोंडांत मासे देऊं लागला. पुढें पुढें ती मगर मुलाजवळ दगडावर येऊन बसत असे. सध्यां सुद्धां हें दृश्य पहावयास सांपडतें. निग्रो मुलाला थोडे

पैसे दिले कीं तो मांसाचे तुकडे अगर मासे हातांत घेऊन दगडावर उभे राहून 'लुटेंगे लुटेंगे' म्हणून मगरीला हाक मारतो. थोड्याच वेळांत मगर येते व मुलगा आपल्या हातानें मगरीच्या तोंडांत मांसाचे तुकडे देतो. या मगरीला सरकारी संरक्षण आहे. जो कोणी या मगरीला मारील त्याला जबर शिक्षा ठेवली आहे.

## निग्रो नृत्य

गुरुदेवसिंगाबरोबर मला एक निग्रो नृत्यहि पहावयास मिळालें. गुरुदेवसिंगाच्या मित्राचें खेडेगांव एंटेबीजवळच आहे. आम्ही खास आमंत्रणावरून एका शनिवारीं त्यांचेकडे नृत्य पाहण्यासाठीं गेलों. नृत्य रात्रीं होतें. पण गांव जवळ असल्यामुळें विशेष धोका नव्हता. इतकें असूनसुद्धां गुरुदेव पिस्तुल बरोबर घेण्यास विसरला नव्हता. ज्या वेळीं आम्ही मोटारनें खेडेगांवीं गेलों त्या वेळीं रात्रीचे साडेआठ वाजले होते. बहुतेक झोंपड्यांतून अंधार होता व घरांचे मध्यभागीं होळीप्रमाणें विस्तव पेटविला होता.

आम्ही गेल्यावर एकेकजण खोपटें सोडून बाहेर आला. नेहमीं-प्रमाणें आमच्यापुढें केळीचे घड ठेवण्यांत आले. टोळींतील लोकांना आज रानजनावरांची विशेष शिकार मिळाली होती व तिचे तुकडे करण्याचें काम कांहीं तरुण शेकोटीच्या उजेडांत एका झाडाखालीं करीत होते. गुरुदेवचा मित्रहि त्याच कामांत गुंतला होता. थोड्या वेळानें सर्व तरुण शेकोटीभोंवती जमले. शेकोटींत लाकडें घातलीं व नंतर मांसाचे तुकडे भाजण्याकरितां घातले. शेकोटीभोंवतीं आतां बरेच लोक जमा झाले होते. कांहीं लोक भोपळ्यापासून केलेलीं वाद्यें वाजवीत होते. त्यांचा आवाज 'दूंबा दुंबा' असा येत होता. याच वाद्यांच्या जोडीला तारांपासून केलेलें टिंग टॉंग आवाज येणारें वाद्यहि वाजत होतें. मांसाचे तुकडे भाजून होण्यापूर्वीं दारूनें भरलेले तीन भोपळे आणले. एकेका भोपळ्यांत १०–१२ पोकळ काड्या होत्या. मांस भाजून झाल्यावर प्रमुखास मांसाचा तुकडा दिला. त्यानें मांस खाण्याला सुरुवात केल्यावर इतरांनीं त्याचें अनु-

करण केलें. मांसाबरोबर भोपळ्यांतली दारू काडीच्या सहाय्यानें ओढून सर्वजण पीत होते. जेवणाच्या कार्यक्रमांत स्त्री पुरुष असा भेदभाव नव्हता.

जेवण झाल्यावर वाद्यें ठीक करण्याच्या कामाला सुरुवात झाली. कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर नाचाला सुरुवात झाली. त्या लोकांच्या नाचांत व आपल्याकडील वारली–कोळ्यांच्या नाचांत बराच फरक आहे. नृत्य करणाऱ्या निग्रो लोकांनीं कापडी पिशवींत खडे घातले होते व त्या पिशव्या कंबरेला बांधल्या होत्या. या खड्यांचा आवाज अगदीं लयबद्ध निघत होता. कांहीं नाचांत तोंडानें गाणीं म्हटलीं जात होतीं. पण गाण्यांचा अर्थ समजणें कठीण होतें. कांहीं नृत्यें जरा शास्त्रीय (!) वाटलीं; कारण अभिनयावरून प्रतीत होणारा अर्थ मलाच काय, पण गुरुदेवलासुद्धां समजला नाहीं.

## डोक्यावर पाण्याची बादली घेऊन नाच

मला आवडलेलें नृत्य म्हणजे बादली नृत्य होय. या नृत्यांत निग्रो स्त्रीचें खरें कौशल्य दिसून येतें. वाद्यांच्या तालावर एक बाई डोक्यावर बादली घेऊन येते. बादली पाण्यानें भरलेली असते. ती तशीच ठेवून अनेक अंगविक्षेप करून दाखविते. परंतु पाण्याचा एकहि थेंब सांडत नाहीं. शेवटीं वाद्याची लय वाढते व बाई जागच्या जागीं गरगर फिरूं लागते. फिरण्याच्या वेगामुळें बादलींतील पाणी चारी बाजूस फेकलें जातें व शेवटीं वाद्यावरोबरच नृत्य थांबतें. बाई गरगर फिरत असतांना मला वाटलें कीं हिचें फिरणें थांबेल त्या वेळीं तिला घेरी येईल. परंतु तसें कांहींच झालें नाहीं. अगदीं शांतपणानें ती पुढच्या बाजूस वाकली व निघून गेली. या नृत्याला मी व गुरुदेवनें मिळून चाळीस शिलिंग उत्तेजनार्थ दिले. नंतर मला समजलें कीं अशीं नृत्यें फक्त म्हाताऱ्या स्त्रियाच करूं शकतात. हल्लींच्या स्त्रियांना अशीं कठीण नृत्यें करणें जमत नाहीं.

पैसे दिले कीं तो मांसाचे तुकडे अगर मासे हातांत घेऊन दगडावर उभे राहून ' लुटेंगे लुटेंगे ' म्हणून मगरीला हाक मारतो. थोड्याच वेळांत मगर येते व मुलगा आपल्या हातानें मगरीच्या तोंडांत मांसाचे तुकडे देतो. या मगरीला सरकारी संरक्षण आहे. जो कोणी या मगरीला मारील त्याला जबर शिक्षा ठेवली आहे.

## निग्रो नृत्य

गुरुदेवसिंगाबरोबर मला एक निग्रो नृत्यहि पहावयास मिळालें. गुरुदेवसिंगाच्या मित्राचें खेडेगांव एंटेबीजवळच आहे. आम्ही खास आमंत्रणावरून एका शनिवारीं त्यांचेकडे नृत्य पाहण्यासाठीं गेलों. नृत्य रात्रीं होतें. पण गांव जवळ असल्यामुळें विशेष धोका नव्हता. इतकें असूनसुद्धां गुरुदेव पिस्तुल बरोबर घेण्यास विसरला नव्हता. ज्या वेळीं आम्ही मोटारनें खेडेगांवीं गेलों त्या वेळीं रात्रीचे साडेआठ वाजले होते. बहुतेक झोंपड्यांतून अंधार होता व घरांचे मध्यभागीं होळीप्रमाणें विस्तव पेटविला होता.

आम्ही गेल्यावर एकेकजण खोपटें सोडून बाहेर आला. नेहमीं-प्रमाणें आमच्यापुढें केळीचे घड ठेवण्यांत आले. टोळींतील लोकांना आज रानजनावरांची विशेष शिकार मिळाली होती व तिचे तुकडे करण्याचें काम कांहीं तरुण शेकोटीच्या उजेडांत एका झाडाखालीं करीत होते. गुरुदेवचा मित्रहि त्याच कामांत गुंतला होता. थोड्या वेळानें सर्व तरुण शेकोटीभोंवती जमले. शेकोटींत लाकडें घातलीं व नंतर मांसाचे तुकडे भाजण्याकरितां घातले. शेकोटीभोंवतीं आतां बरेच लोक जमा झाले होते. कांहीं लोक भोपळ्यापासून केलेलीं वाद्यें वाजवीत होते. त्यांचा आवाज ' दूंबा दुंबा ' असा येत होता. याच वाद्यांच्या जोडीला तारांपासून केलेलें टिंग टाँग आवाज येणारें वाद्यहि वाजत होतें. मांसाचे तुकडे भाजून होण्यापूर्वीं दारूनें भरलेले तीन भोपळे आणले. एकेका भोपळ्यांत १०–१२ पोकळ काड्या होत्या. मांस भाजून झाल्यावर प्रमुखास मांसाचा तुकडा दिला. त्यानें मांस खाण्याला सुरुवात केल्यावर इतरांनीं त्याचें अनु-

करण केलें. मांसाबरोबर भोपळ्यांतली दारू काडीच्या सहाय्यानें ओढून सर्वजण पीत होते. जेवणाच्या कार्यक्रमांत स्त्री पुरुष असा भेदभाव नव्हता.

जेवण झाल्यावर वाद्यें ठीक करण्याच्या कामाला सुरुवात झाली. कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर नाचाला सुरुवात झाली. त्या लोकांच्या नाचांत व आपल्याकडील वारली–कोळ्यांच्या नाचांत बराच फरक आहे. नृत्य करणाऱ्या निग्रो लोकांनीं कापडी पिशवींत खडे घातले होते व त्या पिशव्या कंबरेला बांधल्या होत्या. या खड्यांचा आवाज अगदीं लयबद्ध निघत होता. कांहीं नाचांत तोंडानें गाणीं म्हटलीं जात होतीं. पण गाण्यांचा अर्थ समजणें कठीण होतें. कांहीं नृत्यें जरा शास्त्रीय (!) वाटलीं; कारण अभिनया-वरून प्रतीत होणारा अर्थ मलाच काय, पण गुरुदेवलासुद्धां समजला नाही.

## डोक्यावर पाण्याची बादली घेऊन नाच

मला आवडलेलें नृत्य म्हणजे बादली नृत्य होय. या नृत्यांत निग्रो स्त्रीचें खरें कौशल्य दिसून येतें. वाद्यांच्या तालावर एक बाई डोक्या-वर बादली घेऊन येते. बादली पाण्यानें भरलेली असते. ती तशीच ठेवून अनेक अंगविक्षेप करून दाखविते. परंतु पाण्याचा एकहि थेंब सांडत नाहीं. शेवटीं वाद्याची लय वाढते व बाई जागच्या जागीं गरगर फिरूं लागते. फिरण्याच्या वेगामुळें बादलींतील पाणी चारी बाजूस फेकलें जातें व शेवटीं वाद्यावरोबरच नृत्य थांबतें. बाई गरगर फिरत असतांना मला वाटलें कीं हिचें फिरणें थांबेल त्या वेळीं तिला घेरी येईल. परंतु तसें कांहींच झालें नाहीं. अगदीं शांतपणानें ती पुढच्या बाजूस वाकली व निघून गेली. या नृत्याला मी व गुरुदेवनें मिळून चाळीस शिलिंग उत्तेजनार्थ दिले. नंतर मला समजलें कीं अशीं नृत्यें फक्त म्हाताऱ्या स्त्रियाच करूं शकतात. हल्लींच्या स्त्रियांना अशीं कठीण नृत्यें करणें जमत नाहीं.

शेवटीं एका निग्रोनें आम्हाला एक हिंदी गाणें म्हणून दाखविलें. तें गाणें सिनेमांतील होतें. आपले हिंदी सिनेमा निग्रो लोकांना बरेच आवडतात. कांहीं ठेकेबाज गाणीं निग्रोंचीं मुलें म्हणतांना शहरांत तरी ऐकूं येतें.

नृत्याच्या कार्यक्रमानंतर गुरुदेवाच्या मित्रानें विचारलें, "आवडला का गोमा?" आम्ही होकारार्थी उत्तर देऊन सर्वांना 'क्वाहिरी' म्हणून गांव सोडलें. गुरुदेव म्हणाला, "अशा तऱ्हेचीं नृत्यें (गोमा) साधारणपणें दर शनिवारीं होत असतात व सर्व स्त्रीपुरुष त्यांत आवडीनें भाग घेतात. वार्षिक उत्सवाचे वेळीं अगर लग्नसमारंभाचे वेळीं होणारीं नृत्यें वेगळीं असतात. तोंडाला तांबडे पांढरे रंग लावून व डोक्याला जंगली जनावरांचे केस लावून हीं नृत्यें केलीं जातात."

## भयंकर अजगर

एंटेबीहून कंपालाला येण्यापूर्वी मी गव्हर्नरचा बंगला व बोटॅनिकल गार्डन हीं दोन स्थळें पाहून घेतलीं. गव्हर्नरच्या बंगल्यांत जाण्यास परवानगी नव्हती. पण बंगल्याची शान बाहेरूनहि दिसत होती. बंगल्याचे कौलावर एक प्रकारचें शेवाळें उगवलेलें दिसलें. गुरुदेवसिंग म्हणाला, तें मुद्दाम लावलें आहे. त्यामुळें घरांत गारवा राहतो. या बंगल्यापासून अगदीं थोडच्या अंतरावर बोटॅनिकल गार्डन आहे. जगांतल्या इतर गार्डनप्रमाणें या बागेंतहि हरतऱ्हेचीं झाडें आहेत. आफ्रिकेसारख्या उष्ण प्रदेशांत न जगणारे सूचीपर्णी वृक्षसुद्धां येथें दिसतात. एका मोठ्या बांबूंच्या बेटांत बऱ्याच जातीचे बांबू एकत्र लावलेले आहेत. बांबूचे बेटाजवळ एक पाटी होती. बेटापासून दूर राहण्याची सूचना त्या पाटीवर लिहिली होती. कारण एक भयंकर अजगर बेटांत वास्तव्य करून होता व त्यानें माळचाचा एक कुत्रा गिळला होता. अजगराचा केवळ फुत्कारहि किती विषारी असतो हें तेथील माळचानें आम्हाला सांगितलें. अशा फुत्काराच्या तडाख्यांत सापडलेला प्राणी अर्धमेला होऊन पडतो. त्याच्या सगळ्या शक्तीच नष्ट होऊन जातात. तशी स्थिति झाली कीं अजगर त्याला आपल्या

विळख्यांत घट्ट पकडून त्या प्राण्याच्या बरगडयासुद्धां सर्व शरीर कडकडा मोडून काढतो. हरिणाचा तर तो काळच असतो. एकदां हरिण अजगराच्या वेढयांत अडकलें कीं संपलेंच त्याचें आयुष्य. आफ्रिकेच्या जंगलांत अशीं कितीतरी उदाहरणें घडतात. म्हणूनच त्या बांबूच्या बेटापासून दूर रहाण्याची सूचना लिहून ठेवलेली होती. बांबूचे बेटा-जवळच एक "ऑलस्पायसेस" नांवाचें झाड होतें. या झाडाचें वैशिष्टय म्हणजे त्याचें एक पान तोंडांत घातलें असतां दालचिनी, वेलदोडा, लवंग इत्यादि चवी एकामागून एक लागत.

## निग्रो संस्थानिक

आम्ही धक्क्यावर गेलों तेव्हां बोट नुकतीच आली होती. बोटींत पुरुषांपेक्षां स्त्रियांचा भरणा जास्त होता. या सर्व स्त्रिया वेश्या-व्यवसाय करण्याकरितां समुद्रकिनाऱ्याच्या गांवीं गेल्या होत्या. नजिक आलेल्या एका सणाकरितां म्हणून त्या आपापल्या गांवीं जात होत्या. याच बोटींत एक निग्रो संस्थानिक होता. तो किनाऱ्यावर आला तेव्हां अनेक लोकांनीं त्याच्या उजव्या पायावर डोकें ठेवून साष्टांग नमस्कार केला. संस्थानिक महाशयजींबरोबर बऱ्याच स्त्रिया होत्या व त्या सर्व त्याच्या लग्नाच्या बायका होत्या. आफ्रिकेंतील संस्थानिकांना वाटेल तितक्या बायका करतां येतात. पन्नास साठ बायका असलेले कितीतरी संस्थानिक सध्यां आफ्रिकेंत हयात आहेत. वारंवार लग्नें करीत राहणें हाच त्यांचा आवडीचा छंद ! आपल्या पूर्वजांइतक्या बायका करणें आपल्याला शक्य नाहीं याबद्दल त्यांना खेद वाटतो, असें गुरुदेव म्हणाला.

कंपाल्याहून फोन आला म्हणून मीं गुरुदेवचा व घरच्या मंडळीचा निरोप घेऊन एंटेबी सोडलें. एंटेबीमधील आठ दिवस अगदीं मजेंत गेले. कंपाल्याला आल्यावर समजलें कीं तेथील महाराष्ट्रीय मंडळींनीं एक छोटासा कार्यक्रम आंखला आहे व त्यांत मी जादूचे प्रयोग करावेत अशी त्यांची इच्छा आहे. मला होय म्हणण्यावांचून गत्यंतर नव्हतें. कारण मीं कार्यक्रम करावेत ही इच्छा आमच्या पार्टीसील लोकांची सुद्धां होती.

## महाष्ट्रीयांचें स्नेहसंमेलन

रात्रीं श्री. गोंधळेकरांकडे आम्ही जमलों. हेच गोंधळेकर आमच्या बोटीनें हिंदुस्थानमधून आफ्रिकेला आले होते. आम्ही जवळजवळ ३०–३५ मंडळी होतों. कार्यक्रमास सुरुवात झाली ती एका १६ वर्षांच्या मुलीच्या गाण्यानें. आफ्रिकेंत राहणाऱ्या कांहीं महाराष्ट्रीयांना मराठी शुद्ध बोलतां येत नाहीं. बोलतांना गुजराती व स्वाहिली शब्द मधूनच वापरले जातात. महाराष्ट्रीय मुलींचें गाणें सुद्धां असेंच होतें. गाणें संपल्यावर सर्वांनीं टाळ्या वाजविल्या. आम्ही टाळ्या वाजविल्याबरोबर तिनें परत गाणें म्हणण्यास सुरुवात केली. कदाचित् तिनें टाळ्यांचा अर्थ 'वन्स मोअर' असा घेतला असावा.

गाण्याच्या कार्यक्रमानंतर कांहीं मुलांनीं गोष्टी सांगितल्या व नकला करून दाखविल्या. गोष्टीपेक्षां नकला सर्वांना आवडल्या. स्थानिक लोकांचे कार्यक्रम संपले व मीं पांच सहा जादूचे प्रयोग करून दाखविले. हा समारंभ म्हणजे आम्हाला एक स्नेहसंमेलनच वाटलें. सर्वजण मनमोकळेपणानें गप्पा मारीत होतों. घरीं येण्यास मला रात्रीचे दोन वाजले. घरीं आल्यावर सामान बांधून झोपलों. दुसरे दिवशीं जिजा गांवीं जावयाचें होतें.

## जिजाकडे प्रयाण

बरोबर दुपारीं दोन वाजतां आम्ही स्टेशनवर गेलों. नेहमींप्रमाणें माझ्याकडे लॉरींतून सामान नेणाऱ्या माणसांवर देखरेख करण्याचें काम आलें. आम्ही प्रवास करीत असलेली गाडी मालगाडी होती व तिला दोन पॅसेंजरचे डबे जोडले होते. वीस माणसांच्या सबंध डब्यांत आम्ही फक्त दहा बारा लोक होतों. त्यामुळें पत्ते खेळण्याला व झोपण्याला आरामशीर जागा मिळाली. शेजारच्या थर्ड क्लासच्या डब्यांत कांहीं निग्रो व हिंदी कुटुंबें होतीं. निग्रोंची आपल्या लोकांशीं वागणूक चांगली दिसली. एका म्हातारीला डब्यांतून उतरतां येत नव्हतें. जवळ उभ्या असलेल्या निग्रो तरुणानें तिला आधार देऊन खालीं उतरण्याला मदत केली. हिंदी लोकांशीं इतके प्रेमाचे संबंध असतांना दक्षिण आफ्रिकेंत त्यांनीं हिंदी लोकांवर कां बरें शस्त्र

उपसलें असेल ? कोणीतरी निग्रोंना चिथावणी दिली असली पाहिजे असें वाटतें.

## उसाचें अमाप पीक

कंपाला ते जिजा यांतील अंतर मोटारनें फक्त ७५ मैलाचें आहे. पण रेल्वेनें तेथें पोचण्यास आम्हाला तेरा तास लागले. मार्गांतील प्रदेश फार सुपीक आहे. जिकडे तिकडे हजारों एकर उसाची शेती आहे. आपल्याकडे उसाची शेती फक्त सपाट मैदानाचे जागीं होऊं शकते. पण आफ्रिकेंत टेकड्यावरून सुद्धां ऊस लावलेला आढळतो. उसाला पाणी घालावें लागत नाहीं. कारण आठवड्यांतून दोन तीन वेळां पाऊस निश्चितपणें पडतोच. आपल्याकडे साखरेच्या गिरण्या फक्त पांच सहा महिने चालतात. आफ्रिकेंत त्या बारा महिने चालू असतात.

जिजा येथें आम्हाला बिऱ्हाडासाठीं एक स्वतंत्र घर दिलें होतें. या घरांत पूर्वीं एक ख्रिश्चन कुटुंब राहत असे. त्यांनीं घर सोडल्यापासून तें रिकामेंच होतें. घर रिकामें राहण्याचें कारण त्या घरांत साप होता व मधूनअधून तो इकडे तिकडे हिंडतांना दिसे. आम्हाला दुसरी जागा न मिळाल्यामुळें त्याच घरांत राहण्याचें आम्हीं ठरविलें. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं आमच्या बारा दिवसांच्या वास्तव्यांत एकदांहि तो साप दिसला नाहीं.

## प्राणावर आलेलें संकट

जिजा गांवीं रिपन फॉल्स नांवाचा धबधबा आहे. याच धबधब्यांतून उगम पावणारी नदी म्हणजे नाईल नदी होय. आम्ही राहत असलेल्या ठिकाणीं धबधब्याचा आवाज ऐकूं येत असे. एके दिवशीं सकाळीं मी एकटाच धबधबा पाहण्याला गेलों. धबधबा गांवापासून दीड मैल लांब आहे. वेळ सकाळची असल्यामुळें या प्रचंड धबधब्याची शोभा अवर्णनीय दिसत होती. मी बराच वेळ ही शोभा पहात होतों. खालचे बाजूला तीन निग्रो कोळी मासे पकडीत होते. एकाएकीं एक कोळी तेथून निघाला व माझ्या दिशेनें चालू लागला. मीं

आजूबाजूला पाहिलें; एकसुद्धां माणूस नव्हता. निग्रो जसजसा जवळ येऊं लागला तसतशी माझी छाती धडधडूं लागली. पळून जाणं शक्य नव्हतें. कारण रस्त्याला गवत खूप वाढलेलें होतें. मी जागेवर स्तब्ध उभा राहिलों. निग्रो जवळ जाला. त्याचे ते लाल डोळे मला भयंकर वाटले. माझ्या सर्वांगाला मुंग्या आल्यासारखें झालें होतें. एकाएकीं मला एक युक्ति आठवली. मी जमिनीवरचा खडा उचलून व व्हेंट्रिलोकेझमनें चिमणीसारखा आवाज काढून खालीं टाकला आणि तोंडानें 'मचावी मचावी' (जादूगार जादूगार) म्हणालों. निग्रो थांबला व थोडया वेळानें परत निघून गेला. निग्रोची पाठ वळलेली पाहतांच मीं जोरानें धावण्याला सुरुवात केली. एक मैल आल्यावर झाडाखालीं थांबलों. किती वेळ तरी मला गुदमरल्यासारखें झालें होतें व घशाला कोरड पडली होती. विश्रांति घेऊन मी घरीं गेलों. तीन तास झोपून होतों. माझे मित्र निकम व देशपांडे यांना जेव्हां तो प्रसंग सांगितला, तेव्हां त्यांनीं मला बराच धीर दिला. माझी या प्रसंगांतून सुटका झाल्याबद्दल त्यांना सुद्धां आनंद झाला.

माझ्यावर आलेल्या प्रसंगाची गांवांत बरीच चर्चा झाली. अशा तऱ्हेनें एकटया दुकटया माणसावर त्या प्रांतांत बरेच हल्ले झाले होते. निग्रो लोक प्रवाशांवर हल्ला करून त्यांचे कपडेसुद्धां काढून घेतात. ही माहिती नंतर मला समजली.

जिजा गांवांतील थिएटर कार्यक्रम चांगले पार पडले. डॉ. काटे यांची खूप मदत झाली. डॉ. काटे हे कारवारकडचे रहाणारे. आज बरींच वर्षें ते आफ्रिकेंत वैद्यकीय व्यवसाय करीत आहेत. डॉ. काटे यांनीं माझा एक स्वतंत्र कार्यक्रम घडवून आणला होता.

## भयंकर संकटांतून बचावलों

आमच्या प्रवासांत जिजा गांव हें संकटाचें गांव ठरलें. दुसऱ्या एका मोठ्या संकटांतून पार्टीतील आम्ही चारपांच लोक वाचलों. तेथून वीस पंचवीस मैलाचे अंतरावर लुगाझी गांवीं नानजी कालीदास नांवाच्या पोरबंदरच्या व्यापाऱ्याचा साखरेचा कारखाना आहे.

त्या गांवीं आमचा एक कार्यक्रम ठरला होता. दोन टुरिंग मोटारींतून आम्ही सर्वजण कार्यक्रम करण्याला गेलों. कार्यक्रमाला बरीच गर्दी होती. कार्यक्रमानंतर कारखाना पाहावयास जाण्याचें ठरलें. परंतु कांहीं लोक कारखाना पाहण्याला न थांबतां पुढें गेले. मी, सौ. हिराबाई, त्यांच्या भावजय व गोविंद निकम इतकेजण कारखाना पाहाण्यास गेलों. कारखाना पाहण्यास एक तास लागला. कारखाना पाहून झाल्यावर चहा घेऊन आम्ही जिंजाला येण्याकरतां निघालों. सात आठ मैल येतों न येतों तों एकाएकीं मोटारचीं चाकें पंक्चर झालीं. काय करावें हें कोणासच समजेना. कारण अशा तऱ्हेनें मोटारी पंक्चर करून वाटमारी करण्याचा एक प्रकार आफ्रिकेंत आढळतो. वाटमारी करणारे लोक तारांच्या पुंजक्यांत तीक्ष्ण चुका अडकवून रस्त्यांतील धुळींत ठेवतात व मोटार पंक्चर झाल्यावर हल्ला करतात. माझ्याजवळ एक बंदूक होती. ती बाहेर काढून आम्ही मोटारींत बसून राहिलों. निग्रो ड्रायव्हर म्हणाला, "मी जवळच असलेल्या गांवांत जाऊन पंक्चर काढण्याचें साहित्य घेऊन येतों." पण हिराबाईनीं त्याला दरडावून सांगितलें कीं 'तूं गाडी सोडून कोठेंहि जाऊं नकोस.' कारण एकादे वेळीं हाच ड्रायव्हर गांवांत जाऊन हल्लेखोरांना सूचना देऊन यायचा. आम्ही जवळ जवळ तीन चार तास मोटारींत बसून होतों. टेकड्यावर निग्रोंच्या आरोळ्या ऐकूं येत होत्या. पण आमच्याजवळ बंदूक असल्यामुळें कोणीहि जवळ येऊं शकलें नाहीं. पहांटेच्या वेळीं आम्हांस येण्याला उशीर झालेला पाहून मॅनेजर मोटार घेऊन आले. त्यांच्या मोटारींतून आम्ही ६।७ माणसें जिंजाला आलों. अशा प्रकारें एका भयंकर प्रसंगांतून आमची सुटका झाली. दुसऱ्या दिवशीं बरेच लोक आमची चौकशी करून गेले.


जिंजाला असतांना संकटें आलीं त्याचप्रमाणें बरींच नाविन्यपूर्ण स्थळें पाहण्याला मिळालीं. येथून जवळ असलेला ककेरा साखर कारखाना पाहण्यास आम्ही गेलों होतों. या कारखान्यांत श्री. माणके

नांवाचे गृहस्थ कामाला होते. ते स्वतः जिजाला आले व आम्हाला घेऊन गेले. लुगाझीप्रमाणें हा कारखाना सुद्धां बराच मोठा आहे. दर मिनिटास एक पोतें साखर तयार होते. कारखान्याचे मालक एक गुजराथी गृहस्थ आहेत. त्यांनीं आमची बरीच बडदास्त ठेवली. कारखान्यांत यंत्रामध्यें ऊस घालण्यापासून ते साखर तयार होण्या-पर्यंतच्या सर्व क्रिया पाहण्याला मिळाल्या. शेवटीं रेफ्रिजेटरमध्यें ठेवलेला थंडगार रस पिण्यास मिळाला. श्री. माणके यांचेबरोबर ऊसाची लागवड पाहण्याला गेलों असतांना एका शेतांत प्रत्यक्ष मालक काम करतांना दिसले. इतका श्रीमंत गृहस्थ; पण मजुरांप्रमाणें काम करतांना पाहून आश्चर्य वाटलें.

## स्नानाची आफ्रिकन पद्धत

कारखान्याच्या शेजारीं नदी वाहते. आजूबाजूची निसर्गशोभा रमणीय आहे. नदीकाठीं मोटारींतून गेलों. नदीवर बरेच निग्रो परीट कपडे धूत होते व कांहीं निग्रो स्नान करीत होते. कपडे धुणारे व स्नान करणारे यांपैकीं कोणाच्याहि अंगावर कोठलेंहि वस्त्र नव्हतें. सर्व आफ्रिकेंत अशीच पद्धत आहे हें मागाहून समजलें. नदीकाठची शोभा थोडक्यांत पाहून त्याच मोटारींतून घरीं जिजाला आलों.

जिजा गांवाजवळ थिका नांवाचें खेडें आहे. या खेड्यावजळ थिका नांवाचा धबधबा आहे. धबधबा पाहाण्याकरितां आम्ही स्पेशल मोटारींतून गेलों. ज्या दिवशीं धबधबा पाहण्याला गेलों होतों त्या दिवशीं थिका गांवचा बाजार होता. बाजारांत आम्ही मुद्दाम जाऊन आलों. आपल्याकडचे बाजार व येथील बाजार यांत बरेंच साम्य दिसलें. आजूबाजूचे खेडूत भाजीपाला व मोहोगो ( कंदमुळें ) विकण्याकरितां घेऊन आले होते. बाजारांत जनावरें मात्र नव्हती. वाळलेल्या गोल भोपळ्यांचे ढीगच्या ढीग सर्वत्र दिसत होते. त्यांचा उपयोग पाणी व दारू सांठविण्याकडे होतो. त्याचप्रमाणें भोपळे मध्यभागीं कापून त्यांचीं पातेल्याप्रमाणें भांडीं बनविलेलीं होतीं. सुरेशबाबूंना तंबोऱ्याकरितां कांहीं भोपळे घ्यावयाचे होते. पण आमच्या



वाऱ्याच्या झुळकीबरोबर  हलणारा दगड (पान ५५)



गेटवे ऑफ माँझा. डोंगराचे दोन प्रचंड कडे कोसळून त्यांची रेल्वेवर झालेली नैसर्गिक कमान, कमानीखालून गाडी जातांना वरचे दगड हादरले तरी पडत नाहींत. (पान ५०)

बरोबरच्या गृहस्थांनीं, यापेक्षां चांगले भोपळे गांवांतल्या दुकानांत मिळतील, असें सांगितल्यावरून तें खरीदण्याचा बेत रहित केला.

बाजार पाहण्यांत एक तास खर्च झाला. तेथून आम्ही गांवांत गेलों. तेथें एक उत्तर हिंदुस्थानी गृहस्थ रहात होते. त्यांनीं एका निग्रो बाईशीं लग्न केलें. या गृहस्थांचीं १६ व १८ वर्षें वयाचीं दोन मुलें होतीं. तीं रंगानें अत्यंत काळीं, पण नाकाडोळ्यांची ठेवण मात्र हिंदी माणसाप्रमाणें. मुलें उत्तम प्रकारें हिंदी बोलत. त्यांच्यापैकीं एक मोटारसायकलच्या रेसमध्यें पहिला आला होता व दुसरा मोटार चालविण्यांत कुशल होता.

## इंद्रधनुष्यांची शोभा

जेवण उरकून सायंकाळीं थिका धबधबा पाहण्याला गेलों. उंच कड्यावरून उडी घेणारा हा प्रचंड धबधबा मनोवेधक आहे. धबधब्याजवळ बोललेलें ऐकूं येत नाहीं इतका मोठा घनगंभीर आवाज तेथें निघतो. फेसाळलेल्या पाण्याच्या तुषारांत अनेक इंद्रधनुष्यें शोभा निर्माण करतात. धबधब्याचे बाजूचा निसर्ग इतका रमणीय आहे कीं तासन्तास तेथेंच बसून रहावेंसें वाटतें. धबधब्याची शोभा रात्रीं पाहण्यास मिळावी म्हणून विजेच्या प्रकाशझोतांची सोय केली आहे. आम्हाला जिजाला लवकर परत जावयाचें होतें; त्यामुळें रात्रीची शोभा पाहायला थांबतां आलें नाहीं. धबधब्याशेजारीं युरोपियन लोकांनीं बंगले बांधले आहेत व धबधब्याची शोभा बागेंत बसून पाहतां येईल अशा तऱ्हेची बाकांची रचना केली आहे. धबधब्यापासून वीज उत्पन्न केली जाते.

## रक्त शोषून घेणारी वनस्पती

तेथेंच जवळ आम्हाला एक वनस्पती सांपडली. तिचीं पानें तोडून हातावर ठेवलीं असतां पानांवर केसांप्रमाणें बारीक असलेल्या काट्यांतून आपल्या हातांतील रक्त पानांत शोषलें जातें. पानें रक्त शोषीत असतांना हाताला कोणत्याहि प्रकारचा त्रास झाल्याचें जाणवत नव्हतें.

## झाडांची पाणपोई

या वनस्पतीवरून विषय निघाला व त्या दोन काळ्या मुलांनीं आम्हाला झाडांविषयीं बऱ्याच गमतीजमती सांगितल्या. आफ्रिकेच्या जंगलांत प्रवाशांचीं झाडें आहेत. आपण जंगलांत प्रवास करतों तेव्हां पाण्याकरितां इकडे तिकडे जाण्याची आवश्यकता नाहीं. या प्रवाशांच्या झाडाची फांदी तोडली कीं तोडलेल्या जागेवरून पाण्याची बारीक धार लागते. धारेखालीं थोडा वेळ ओंजळ धरतांच ती पाण्यानें भरते. निसर्गनिर्मित पाणी पिऊन झालें कीं पुढच्या प्रवासाला सुरुवात करायची.

## प्रकाश देणारीं झाडें

जंगलांत प्रवास, तेव्हां एकादे ठिकाणीं रात्र होणारच. पण रात्र झाली तरी घाबरण्याचें कारण नाहीं. प्रकाशाचीं झाडें आपणाला मार्गदर्शन करतील. तीं झाडें मर्चिसन फॉल्सचे बाजूला भरपूर आहेत. या झाडांच्या पानाच्या पृष्ठभागावर एक विशिष्ट प्रकारचा थर असतो. दिवसां या थरांत प्रकाशकिरणें शोषून घेतलीं जातात व रात्रीचे वेळीं तीं बाहेर फेंकलीं जातात. महासागरांत दीपस्तंभ खलाशांना मार्ग शोधण्याला जशी मदत करतो तशीं हीं झाडें जंगलांतल्या प्रवाशाला मदत करतात.

## हंसणारीं झाडें

प्रकाशाच्या झाडांच्या अनुरोधानें आपण रात्रीं जंगलांतून चाललों आहोंत; रात-किड्यांचा किर्रऽऽ आवाज चालू आहे; इतक्यांत कोणी तरी मोठ्यांदा हंसल्याचा आवाज येईल. आपण दचकून इकडे तिकडे पाहूं. पण पावलांची चाहूल मात्र ऐकूं येणार नाहीं. कसलातरी भास असेल असें मनाशीं म्हणून आपण तसेंच पुढें चालूं लागूं; पण लगेच तोच आवाज पुन्हा ऐकूं येईल. थोडा विचार करतां चटकन् लक्षांत येईल कीं आफ्रिकेच्या जंगलांत कांहीं हंसणारीं झाडें आहेत. त्यांपैकीं एकादें झाड आजूबाजूस असेल आणि आपला हा तर्क बरोबर ठरेल. या हंसणाऱ्या झाडाजवळ पूर्वीं निग्रो लोक जात नसत. त्यांची समजूत

अनुक्रम वि: ....
क्रमांक .................. नों. दि: ..........

अशी कीं या झाडावर भुतें बसलेलीं असून तीं हंसत असतात. कारण हंसण्याचा आवाज येतो; पण हंसणारी व्यक्ति तर दिसत नाहीं. युरोपियन लोकांनीं या गोष्टीचा शहानिशा केला तेव्हां त्यांच्या लक्षांत आलें कीं या झाडाच्या पानांवर विशिष्ट प्रकारचा खडबडीतपणा आहे व त्यामुळें या झाडावरून वाऱ्याची झुळूक जातांच पानें एकमेकांवर घासतात व हंसल्यासारखा आवाज येतो.

## सिंहाला मारलें तरच लग्न

या झाडांप्रमाणेंच आफ्रिकेंतील लग्नसमारंभाची एक नाविन्यपूर्ण माहिती मिळाली. आफ्रिकेंत निरनिराळ्या टोळ्यांत निरनिराळ्या लग्नपद्धति आहेत. एका टोळींतील लग्नपद्धति पुढीलप्रमाणें आहे—

या टोळींत मुलाकडून मुलीला हुंडा द्यावा लागतो. हा हुंडा म्हणजे एक दोन गाई, एकदोन बैल, एकादें कुत्रें व थोडेंसें धान्य इतका असतो. मुलाकडून मुलीला हुंडा द्यावा लागत असल्यामुळें वधू-संशोधन करावें लागतें. प्रथम मुलाच्या टोळींतला नायक वधू-संशोधनाला जातो. एकाद्या टोळींत वधू असेल तर त्या टोळीच्या नायकाला भेटतो व वधूला मागणी घालतो. वधू पक्षाचे लोक 'तुमचा मुलगा किती शूर आहे,' असें विचारतात. शूर किती आहे याचा अर्थ मुलानें सिंह किती मारले आहेत असा होतो. या टोळींत एका माणसाला वाटेल तेवढीं लग्नें करतां येतात; पण पहिलें लग्न एकादा सिंह मारल्याशिवाय होत नाहीं. सिंह मारण्याची सुद्धां विशिष्ट पद्धत आहे. मुलगा हातामध्यें पांगा नांवाचें हत्यार घेऊन जंगलांत जातो. एकादा सिंह मांस खाऊन विश्रांति घेत बसला असेल तर त्याला मुलगा खडा मारून सावध करतो. सिंह सावध झाल्यावर चवताळून मुलाच्या अंगावर येतो. मुलगा हातांतील पांग्यानें त्याच्यावर वार करतो व त्याला ठार करतो. एकादे वेळीं सिंह ताकतवान असेल तर मुलाचीच शिकार होण्याचा संभव! सिंहाला मारल्यानंतर मुलगा त्याचे कान व शेंपूट कापून टोळींत घेऊन येतो. टोळीचा नायक त्या रात्रीं नाचगाणें करण्याचा हुकूम देतो व शेवटीं आपल्या-

जवळ असलेल्या लांब आकाराच्या लहान दगडांपैकीं एक दगड घेऊन तो तापवून सिंह मारणाऱ्या मुलाच्या दंडावर वर्तुलाकार डाग देतो. अशा तऱ्हेचा डाग हातावर असणें हें शूरत्वाचें लक्षण समजलें जातें. टोळीच्या नायकांचे हात अशा खुणांनीं भरलेले आढळतात.

## वधूच्या कंबरेंत लाथ

अशा प्रकारें मुलानें किती सिंह मारले आहेत हें वधूपक्षाला सांगितलें जातें. मुलाच्या पराक्रमाची खात्री झाल्यावर हुंडा ठरतो. प्रथम मुलीच्या घरीं हुंडा पाठवावा लागतो. मुलीचे लोक हुंडा तपासून पाहातात. गाई, बैल म्हातारे नाहींत याची खात्री झाल्यावर हुंडा पटल्याचा निरोप येतो व त्याच दिवशीं मुलीच्या टोळींत येण्याविषयीं मुलाच्या टोळीला आमंत्रण दिलें जातें. मुलाच्या टोळींतले लोक मुलीच्या टोळींत येतात. त्यांची बसण्याची सोय एका वर्तुळाकार शांव्यांत (बागेंत) केली जाते. सर्व लोक बसल्यावर हातांतल्या काठ्या जमिनीवर आपटून गाणीं गाण्याला सुरवात करतात. काठ्यांच्या वरच्या बाजूला दोन लहान लहान दगड बांधलेले असतात. या दगडांचा विशिष्ट प्रकारचा आवाज काठ्यांच्या आपटण्यामुळें निघत असतो. गाणीं थांबल्यानंतर मुलाच्या टोळीचा नायक आपल्या मुलाच्या पराक्रमाच्या खुणा दाखवतो व त्यानें कसकशा शिकारी केल्या याचें रसभरित वर्णन करतो. मुलाच्या नायकाचें भाषण संपतांच मुलीच्या टोळीच्या नायकाचें भाषण सुरू होतें व तो मुलीच्या धाडसी स्वभावाविषयीं माहिती सांगतो. हें सर्व होईपर्यंत मुलगी घरांत असते. नंतर तिला बागेंत आणलें जातें व ती एका दगडावर बसते. मुलाच्या टोळीचा नायक उठून मुलाला उठण्याची खूण करतो. मुलगा उठून मुलीच्या पाठीमागें जातो व एक लाथ जोरानें तिच्या कमरेंत मारतो. मुलानें लाथ मारल्यानंतर मुलीनें रडावयाचें नसतें. कारण ती रडली तर हुंडा कमी होतो. मुलगी आयत्या

वेळीं रडूं नये म्हणून तिला तिचे आई, भाऊ वगैरे नातेवाईक रोज लाथा मारून संवय करून ठेवतात. आपल्याकडील साखर-पुड्याप्रमाणें या लत्ता–पुड्याच्या कार्यक्रमानंतर सर्व लोकांना जेवण व दारू दिली जाते व लग्नाचा दिवस मुक्रर केला जातो.

## वधूवरांची रस्सीखेच

लग्न मुलाच्या अगर मुलीच्या टोळींत होत नाहीं. तें दोन्हींच्या सरहद्दीवर होतें. त्या ठिकाणीं दोन्हीकडच्या टोळ्या नगारे बडवीत व आरोळ्या मारीत ओरडत येतात. सरहद्दीवर आल्यावर मुलगा आपला एक हात पुढें करून उभा राहतो व मुलगी दोन्ही हातांनीं त्याचा हात पकडते. धर्मगुरू कांहीं तरी पुटपुटतो व ओरडून इषारा देतो. इषारा मिळतांच मुलगा मुलीला आपल्या बाजूला ओढायला सुरुवात करतो व मुलगी मुलाला आपल्या बाजूला ओढते. समजा, मुलानें मुलीला आपल्या बाजूला ओढून नेलें, तर ती मुलाच्या टोळीची कायमची गुलाम होते. तिला आपल्या घरीं कधींहि परत जातां येत नाहीं. त्याचप्रमाणें मुलीनें मुलाला ओढून नेल्यास त्यालासुद्धां आपल्या आईवडिलांकडे जातां येत नाहीं. या समारंभानंतर परत एकदां जेवण व दारू पिण्याचा कार्यक्रम होतो व नंतर दोन्ही टोळ्या परत जातात.

अशाच प्रकारची पण जरा निराळी लग्नपद्धति मोंबासा येथें समजली. या टोळींत पत्नीला चार वर्षांत मूल झालें नाहीं तर तिला परत पोंचविलें जातें व मुलगा आपला हुंडा घेऊन येतो.

## जादूटोण्यावर विश्वास

निग्रोंच्या लग्नपद्धतीप्रमाणें त्यांच्या अनेक भोळ्या समजुतीहि आम्हाला ऐकायला मिळाल्या. निग्रोंचा भुतांखेतांवर व जादूटोण्यावर फार विश्वास. एकादा मनुष्य आजारी पडला कीं लगेच त्याला आपल्या देवासमोर नेऊन टाकतील. त्यांचे देव म्हणजे मोठें थोरलें झाड किंवा अगडबंब दगड. या दगडांच्या प्रसादानें तो वांचला, तर तो देवानें वांचविला म्हणून समजतात. पण मनुष्य मेला तर मात्र तो

पापी होता म्हणून मेला, अशी सोईस्कर समजूत करून घेतली जाते; पण देवावरील विश्वासाला बाध येऊं देत नाहींत आणि म्हणूनच मिशनरी डॉक्टरांना हे लोक देव मानतात. कारण ते त्यांना मृत्यु- पासून वांचवूं शकतात. अशाच प्रकारची एक आणखी समजूत आहे. एकादा सिंह जंगलांतून येऊन गांवांतील माणसें मारीत असेल, तर निग्रो लोक आपल्या घराभोंवतीं मंतरलेली राख टाकून, आरामशीर झोपतात. त्यांना सिंहाची भीति वाटत नाहीं. बरें, त्यांतून एकादा माणूस सिंहानें उचलून नेला तर राख टाकतांना घरमालकानें योग्य ती काळजी घेतली नसेल, अशी ते मनाची समजूत करून घेतात.

जिजा गांवीं मुक्काम असतांना मला समजलें कीं जवळच्या खेड्यांत एक निग्रो जादूगार आहे व तो वाटेल तें रूप घेऊं शकतो. त्याच्या- जवळ अशा कांहीं वनस्पति आहेत कीं त्या जवळ ठेवतांच लोकांना तो जादूगार सिंहाच्या रूपानें दिसतो. मला त्याला भेटावयाचें होतें. पण एका युरोपियन माणसाबरोबर चर्चा करतां, तें सर्व थोतांड असल्याचें समजलें. म्हणून त्या गांवीं जाण्याचा बेत मीं रहीत केला.

निग्रो लोकांविषयीं बरीच नाविन्यपूर्ण माहिती दिल्याबद्दल आम्हीं त्या इंडो-आफ्रिकन मुलांचे आभार मानले व सर्वांचा निरोप घेऊन जिजा गांवीं परत आलों. त्यानंतर आमचा मुक्काम ईस्ट आफ्रिकेंतील सर्वांत रमणीय शहर जें नैरोबी येथें होणार होता. या गांवीं प्रयत्नांची जेवढी शिकस्त करतां येईल तेवढी आम्ही करणार होतों. कारण या शहरांत कलेचे शोकीन लोक बरेच आहेत असें समजलें. शिवाय गांव राजधानीचें असल्यामुळें व्यापारी वर्ग बराच मोठा आहे.

✦ ✦ ✦

# ५

## आफ्रिकेच्या घोर अरण्यांत

जिंजाहून रेल्वेनें नैरोबीस यावें लागलें. प्रवास दीड ते दोन दिवसांचा. वाटेंत विषुववृत्ताचें पठार लागतें व तेथें भरपूर झाडी आहे. आपल्याकडे डोंगरांतील बोगद्यांतून गाडी जातांना जसा अंधार होतो, जवळजवळ तितका अंधार या घनदाट अरण्यांतून जातांना असतो. कांहीं कांहीं मोहागनी वगैरे वृक्ष प्रचंड आहेत. दहा बारा माणसांनीं हातास हात लावून वर्तुळ केलें तरी सुद्धां त्याचा बुंधा हातांत सामावेल कीं नाहीं कोण जाणे. हे वृक्ष नुसतेच जाड नाहींत; तर भरपूर उंच सुद्धां आहेत. वृक्षांचे शेंड्याकडे पाहावयाचें झाल्यास डोक्यावर टोपी असेल तर ती खालीं पडल्याशिवाय राहणार नाहीं. या वृक्षांवर रंगीबेरंगी पानें व फुलें असलेल्या वेली लपेटलेल्या असतात. पक्षी हिंडत असतात व माकडें उड्या मारीत असतात. एकंदरींत वातावरण इतकें आल्हाददायक असतें कीं, प्रवासांत हा प्रदेश कधींहि संपू नये असें वाटतें. या प्रदेशांत अनेक जंगली प्राणी आहेत असें समजलें. गोरीलासारखीं क्रूर माकडें याच भागांत राहतात. हीं माकडें माणसांना जंगलांत पळवून नेतात असें आमच्या बरोबर प्रवास करणाऱ्या एका व्यापाऱ्यानें सांगितलें.

## काळा पोपट

नैरोबीला जात असतांना वाटेंत एके ठिकाणीं चित्त्याची कातडी विकायला आली होती. किमत फारच स्वस्त होती. दीड रुपयाला संपूर्ण कातडें मिळत होतें. परंतु ती कातडी कमावलेली नव्हती. नुसतीच वाळलेली होती. त्यामुळें त्यांना एक प्रकारची घाण येत

होती. या कातड्यांप्रमाणें रंगीबेरंगी पक्षीसुद्धां विकायला आलेले दिसले. त्यांत एक काळसर रंगाचा कसूकू नांवाचा पक्षी होता. पक्षी दिसायला काळा सावळा असला तरी त्याची किंमत १०० ते १२५ शिलिंगांपर्यंत असते. कारण आपल्याकडील पोपटाप्रमाणें हे पक्षी बोलतात. पोपटाला शिकवावें लागतें; पण याला त्याचीसुद्धां आवश्यकता नसते. निरनिराळ्या माणसांचे अगदीं हुबेहूब आवाज हा पक्षी काढतो. आफ्रिकेंतून या पक्ष्याला परदेशीं न्यावयाचें असेल तर सरकारी परवाना काढावा लागतो.

एका स्टेशनवर डॉ. देवभक्त नांवाचे महाराष्ट्रीय गृहस्थ आरूशा गांवाहून खास भेटण्याकरितां आले होते. त्यांनीं आम्हाला तेथें उतरण्याचा आग्रह केला. त्यांना सौ. हिराबाईंचें गाणें ऐकावयाचें होतें. पण पुढील सर्व कार्यक्रम आंखला होता. त्यामुळें वाटेंत उतरणें शक्य झालें नाहीं. डॉ. देवभक्तांनीं आमच्याकरितां कांहीं फराळाचे पदार्थ करून आणले होते. ते पदार्थ व डॉक्टरांचा निरोप घेऊन आम्हीं पुढच्या प्रवासाला सुरुवात केली.

## हत्तीच्या पिलांचें कुतुहल

एका छोटया स्टेशनांत आम्हाला माणसांचा घोळका दिसला. जेव्हां गाडी थांबली तेव्हां गर्दीचें कारण समजलें. स्टेशनांत हत्तीचें एक छोटें पिलू होतें. या पिलाला नैरोबीला नेण्याकरतां खास डबा रिझर्व केला होता. पिलाबरोबर एक युरोपिन स्त्री होती. त्या स्त्रीच्या शेतावर हत्तींचा कळप आला होता. कळपाला घालवून लावण्याकरितां बंदुकीचे वायबार काढले त्या वेळीं हें पिलू पळत असतांना शेतांतल्या विहीरींत पडलें. कळप निघून गेल्यावर शेताच्या मालकानें पिलाला वर काढलें, त्याची उत्तम प्रकारें काळजी घेतली व नंतर त्यांनीं तें इंग्लंडमधील प्राणीसंग्रहालयाला देणगी म्हणून दिलें होतें. त्या बाबतींत आम्हाला आणखी एक गंमत अशी समजली कीं पिलाला सोडविण्याकरितां हत्तीच्या कळपानें दोनदां प्रयत्न केला होता. हत्तीच्या पिलाला गाडींतील प्रवासी केळीं खायला देत होते.

प्रत्येक स्टेशनवर हत्तीच्या पिलाला पहाण्यास डब्यासमोर प्रवाशांचा घोळका जमत होता. आफ्रिकेंत इतके हत्ती असतांना सुद्धां लोकांची पिलू पाहण्याकरितां चाललेली धडपड पाहून गंमत वाटली.

नैरोबी स्टेशनांत गाडी पोंचली तेव्हां सायंकाळचे पांच वाजले होते. हवेंत बराच गारठा होता. आतांपर्यंत बॅगेंत असलेले उलनचे कोट अंगावर चढविले गेले. आम्हांला उतरवून घेण्याकरितां डॉ. बेलसरे नांवाचे गृहस्थ आले होते. ते नैरोबींत सरकारी डॉक्टर आहेत. त्यांनीं महाराष्ट्रीय मंडळाची बरीच उन्नति केली आहे. वाटेंत चढविलेल्या हत्तीच्या पिलाला उतरवून घेण्याकरितां बरेच युरोपियन लोक आले होते. स्टेशनवर जिकडे तिकडे हत्तीच्या पिलाविषयींच चर्चा ऐकूं येत होती.

आमच्या पार्टीची उतरण्याची सोय एका पंजाबी गहस्थांच्या घरीं केली होती. ते गृहस्थ नैरोबींत पोस्टमास्तर होते व दुय्यम धंदा म्हणून घरांची खरेदी-विक्री ते करीत असत. आम्ही उतरलों होतों तें नवीन घर कंपाल्याच्या घराप्रमाणें असल्यामुळें जमीन व भिंती गार होत्या. जागा मात्र ऐसपैस होती.

नैरोबींत वीस पंचवीस महाराष्ट्रीय कुटुंबें आहेत. त्यांची संख्या जवळजवळ शंभराचे वर असावी. त्यांची आम्हांला बरीच मदत झाली.

येथील कॅपिटल थिएटरमध्यें आमच्या पार्टीचे कार्यक्रम झाले. हें थिएटर शहराचे भर वस्तींत आहे व मुबईच्या लिबर्टीप्रमाणें शानदार आहे. सर्व व्यवस्था युरोपियन लोकांकडे आहे. थिएटरचें भाडें मात्र जबर द्यावें लागलें. या शहरांतील कार्यक्रमाला प्रथम म्हणावी तशी गर्दी झाली नाहीं. कारण आमच्या अगोदरच शामलाबाई माजगांवकर व अन्वरी बेगम यांच्या पार्ट्या येऊन गेल्या होत्या. शिवाय आमच्या पार्टींत शृंगारिक गाणीं म्हणत नसल्यामुळें खालच्या वर्गांतील लोकांना ज्याची आवश्यकता वाटत होती ती पुरी होऊं शकत नसे. थिएटर कार्यक्रमापेक्षां खाजगी कार्यक्रमाला मात्र भरपूर गर्दी होत असे.

## कोण कोणास खातो ?

नैरोबी व आजूबाजूच्या कार्यक्रमाकरितां मला एक निग्रो मुलगा सहकारी म्हणून मिळाला होता. त्याचें नांव माँगी होतें. कोणत्याहि प्रकारचें काम करण्याला त्याची सदैव तयारी असे. बंदुकीची गोळी तोंडांत झेलण्याच्या प्रयोगाला ताबडतोब संमति देणारा हा पहिलाच सहकारी होय. त्याच्या उत्तम सहकार्यामुळें नैरोबींत माझे बरेच प्रयोग झाले व प्रत्येक प्रयोगाला भरपूर गर्दी होत असे. माँगी मोठ्या विचित्र स्वभावाचा होता. आम्ही कार्यक्रमाहून रात्रींचे वेळीं घरीं आलों तरी सुद्धां तो झोपण्याकरितां आमच्याकडे थांबत नसे. अंधारांत ठेचा खात स्वतःच्या घरीं अगर मित्राच्या घरीं जाऊन झोंपत असे. त्याच्या या वागण्याचें मला नेहमीं आश्चर्य वाटे. एकदां मी त्याला विचारलें, "काय रे माँगी, तूं येथें कां झोपत नाहींस ?" त्यावर तो म्हणाला, "माझ्या आईची त्याला परवानगी नाहीं." मीं जेव्हां कारण विचारलें, तेव्हां त्यानें तें सांगण्याला बरेच आढेवेढे घेतले. शेवटीं तो म्हणाला, "तुम्ही गोवा लोक माणसें खातां अशी आमच्यांत समजूत आहे. तेव्हां तसा कांहीं प्रसंग माझ्यावर येऊं नये म्हणून मला दररोज झोंपण्याकरितां घरीं जावें लागतें." माँगीच्या या उत्तरानें मी किती तरी वेळ हंसत होतों. कारण आम्हा प्रवाशांमध्यें अशी समजूत आहे कीं निग्रो लोक माणसें खातात. परंतु माँगीनें दिलेलें उत्तर ऐकून माझ्या कल्पनेला एक जोराचा धक्का बसला.

## नरभक्षक टोळ्या

'आफ्रिकेंतील रानटी लोक खरोखरीच माणसें खातात का ?' या प्रश्नाचें उत्तर 'होय' असेंच द्यावें लागेल. हे नरभक्षक लोक घनदाट जंगलांत झाडावर व डोंगराच्या कपारींत राहतात. परदेशी मनुष्य दिसतांच त्याला ते पळवून नेतात व आपल्या देवीसमोर बळी देतात. बळी देण्याकरितां परदेशीच मनुष्य लागतो अशांतला भाग नाहीं. दुसऱ्या टोळींतला निग्रो असला तरी त्यांना चालतो. हे

लोक इतक्या घनदाट जंगलांत रहात असतात कीं शहरांतील लोकांशीं त्यांचा कांहींसुद्धां संबंध येत नाहीं. ते आपण होऊन दुसऱ्याच्या हद्दींत जाऊन माणसें पळवीत नाहींत. एकादा मनुष्य त्यांच्या हद्दींत गेला व त्यांना त्रास देऊं लागला तर मात्र ते त्याचा बदला घेतल्याशिवाय रहात नाहींत.

## निग्रो जादूगार

नैरोबीच्या मुक्कामांत मला एक मुसलमान जादूगार भेटला. तो आज अनेक वर्षें त्या शहरांत राहतो. लोकांना अंगारे व ताईत देणें हा त्याचा मुख्य व्यवसाय आहे. त्या व्यवसायावर त्याचें अगदीं उत्तम चाललें आहे. तो म्हणाला, "निग्रो लोक जादूगारांवर फार विश्वास ठेवतात. एक ताईत दिला कीं वीसपंचवीस रुपये ते देतात. ताईत मुख्यत्वें स्त्रीचें प्रेम जिकण्याकरितां अगर दुसऱ्यावर छाप पाडण्याकरितां विकत घेतले जातात." त्या मुसलमान जादूगारामुळें कांहीं निग्रो जादूगारांची ओळख झाली. निग्रो जादूगारांत सैदी नांवाचा एक मुसलमानधर्मीय निग्रो जादूगार मला अभ्यासू दिसला. त्यानें वनस्पतीशास्त्राचा बराच अभ्यास केला होता. त्याच्या घरांत बाटल्यांत ठेवलेल्या अनेक वनस्पती होत्या. कांहीं जिवंत होत्या, कांहीं वाळलेल्या होत्या. एका बरणींत कांहीं फुलें होतीं. या फुलांचा वास घेतल्यास मनुष्य बेशुद्ध पडतो असें तो जादूगार म्हणाला. अशाच प्रकारच्या वनस्पती चोर वापरीत असतात. दुसरी एक वनस्पती होती. नवीन कापलेल्या जागीं ही वनस्पती लावल्यास जखम तावडतोब भरून येते. हा प्रयोग जादूगारानें मला स्वतः करून दाखविला. मीं वनस्पतींचें नांव विचारलें. पण त्यानें तें सांगण्याचें अगर वनस्पतीचा नमुना देण्याचें नाकारलें. या दोन वनस्पतींखेरीज इतर वनस्पती हिंवताप व इतर दुखण्यावर गुण देणाऱ्या होत्या.

## आडमुठा हिंदी व्यापारी

कांहीं प्रसंगीं आपले हिंदी लोक निग्रो लोकांशीं कसें वागतात हें

पुढील प्रसंगावरून आपल्या ध्यानांत येईल. एका व्हरायटी स्टोअर-मध्यें मी सामान आणण्याकरितां गेलों होतों. दुकानाचे समोर खूप गर्दी जमलेली दिसली. हिंदी दुकानदार आपल्या निग्रो नोकराला लाथा मारीत होता व तोंडानें शिव्या देत होता. नोकराचा गुन्हा म्हणजे त्यानें दुकानांतील शेंगदाणें चोरून खाल्ले होते. परंतु इतक्या साध्या गुन्ह्याकरितां लाथेनें मारण्याचें कांहींच कारण नव्हतें. आम्हा हिंदी लोकांच्या अशा बेताल वागण्यानें निग्रोंचीं मनें कलुषित होणें स्वाभाविक आहे. एक मनुष्य कृत्य करतो व अनेकांना त्याचा परिणाम भोगावा लागतो. वास्तविक निग्रो नोकरानें चोरी केली होती, तर त्याला पोलिसाच्या ताब्यांत देण्यास हवें अगर नोकरीवरून काढून टाकावयाचें होतें. पण अशा प्रकारें जनतेला तमाशा दाखविण्याची कांहींच जरूरी नव्हती.

## छोटें लंडन

नैरोबी शहरांत असे नानाविध प्रकार पहायला मिळत होते. तें नैरोबी शहर आहे तरी कसें? नैरोबीला छोटें लंडन म्हणतात. हवामान, आजूबाजूचा निसर्ग व सर्वसाधारण सुखसोई लंडनप्रमाणें आहेत. मुख्य रस्त्यावरचीं दुकानें मोठमोठीं आहेत व प्रत्येक दुकानाला पुढील बाजूला काचेचीं तावदानें आहेत. रस्त्यावरून धावणाऱ्या शेंकडों वाहनांचें नियंत्रण करणारे पोलीस खूप उंच व धडधाकट आहेत. रस्ते रुंद असून त्यांना प्रशस्त फूटपाथ आहेत. वाहनांची रहदारी सारखी चालू असल्यामुळें माणसांना फूटपाथवरून चालण्याची संवय नकळत लागली आहे. शहराच्या इतर थाटाला शोभेल अशीच भाजीमंडई आहे. या एकाच मंडईंत सर्व प्रकारच्या वस्तू मिळतात. मंडई म्हटली कीं गोंगाट आलाच. पण या मंडईंत संपूर्ण शांतता दिसली. माल देणारा दुकानदार व घेणारें गिऱ्हाईक दोघेहि हळू-हळू बोलतांना दिसतील. या ठिकाणीं एक गोष्ट मुद्दाम नमूद करा-वीशी वाटते. ती म्हणजे स्वच्छता. कोठेंहि केरकचरा पडलेला दिसणार नाहीं. बहुतेक कामें छोट्या मोठ्या यंत्रानें चालतात.

दुकानांत काम करणाऱ्या निग्रो नोकरांचा पोषाख ठराविक पद्धतीचा दिसला व तो सुद्धां स्वच्छ होता.

## सुंदर म्युझीयम

मंडईप्रमाणें नैरोबीच्या आसपास व खुद्द नैरोबींत अनेक गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. नैरोबींतील म्युझियम आफ्रिकेंतील पहिल्या प्रतीचें गणलें जातें. या म्युझियममध्यें सर्व प्रकारचे प्राणी भुस्सा भरून ठेवलेले आहेत. मुंबईच्या म्युझियमइतकें तें आकर्षक नसलें तरी तेथील नानाविध प्राणी पाहून कोणाचेंहि मन रमून गेल्याशिवाय राहणार नाहीं. आफ्रिकेंत खनिज संपत्ति किती आहे व सध्यां किती प्रमाणांत ती उपयोगांत आणली जाते याचे तुलनात्मक तक्ते म्युझियममध्यें पाहिले की आफ्रिका किती संपन्न खंड आहे, याची कल्पना येते. म्युझियममध्यें सोन्याची खनिज माती, हिरे, गंधक, कच्चें अभ्रक, इत्यादींचे नमुने ठेवलेले आहेत. तेथें प्रचंड हस्तीदंत देखील पहायला मिळतात. म्युझियममध्यें जाण्याकरितां निग्रो लोकांना जो आकार पडतो त्याच्या दुप्पट पैसे परदेशी माणसाला द्यावे लागतात.

आफ्रिकेंतील मोठ्या शहरांत म्युझियम्स असलीं तरी, प्राणी-संग्रहालयें मात्र कोठेंहि नाहींत. आफ्रिका हा खंडच एक प्रचंड प्राणीसंग्रहालय आहे हें त्याचें कदाचित कारण असावें. प्रवाशांना हे प्राणी पाहतां यावेत म्हणुन नैरोबीपासून कांहीं मैलाचे अंतरावर नॅशनल पार्क नांवाचें एक प्रचंड राखीव मैदान आहे. या मैदानाला कुंपण नाहीं. नानाविध प्राणी येथें आहेत. प्राण्यांना लागणाऱ्या पाण्याची सोय तलाव बांधून केली आहे. क्रूर प्राण्याकरितां कपाऱ्या व घळया आहेत. येथील प्राण्यांची शिकार करण्याची सक्त मनाई आहे. प्रवाशांना हिंडण्याकरितां पार्कमध्यें उत्तम प्रकारचे रस्ते बांधले आहेत. येथें फक्त मोटारींतूनच जातां येतें. आंत जाणारांनीं मोटारींतून खालीं उतरावयाचें नसतें किंवा मोटारीचा हॉर्न वाजवावयाचा नसतो.

## मोटारींत बसून सिंहाचें दर्शन

आम्ही या नॅशनल पार्कमध्यें गेलों. आम्हाला हरणांचे व वनगाईंचे कळप दिसले. कितीतरी जिराफ आमच्या मोटारीसमोरून सावकाश चालत गेले. कांहीं ठिकाणीं झेब्रयांचे कळप होते व या कळपांतच भेकरासारखे प्राणी चरत होते. पार्कमध्यें प्राण्यांच्या जीवनाचा अभ्यास करणारे अनेक विद्यार्थी येतात व तासन्तास थांबून टिपणें काढतात. एकाद्या माणसाला सिंहाच्या जीवनाचा अभ्यास करावयाचा असेल तर त्यानें एका झाडाला मारलेलें हरीण बांधून ठेवलें कीं काम झालें. या झाडाच्या जवळच मोटारींत बसून राहिलें असतां थोड्या वेळानें सिंहीण आपल्या पिलांसह येते व हरिणाच्या मांसाचे तुकडे तोडून आपल्या पिल्लांना ते खायला देते. पिलांचें खाऊन झालें कीं उरलेलें सर्व मांस स्वतः खाते व नंतर निघून जाते. कधीं कधीं सिंहिणी-ऐवजीं एकटाच सिंह येतो व सबंध हरीण तोडून निवासस्थानीं घेऊन जातो. प्राण्यांच्या जीवनाचा खराखुरा अभ्यास करावयाचा असेल तर आफ्रिकेंतील अशा पार्कमध्येंच जावयाला हवें.

## जिराफाला ओरडतां येत नाहीं

आफ्रिकेंत सर्वत्र आढळणारा प्राणी म्हणजे जिराफ. जिराफा-विषयीं एक गोष्ट सांगतात. त्याला स्वरयंत्र नाहीं. बंदुकींच्या गोळ्यांचा वर्षाव केला तरी कोणत्याहि प्रकारें आवाज न करतां हा प्राणी मरून पडतो. आमच्या मोटारीसमोरून इतके जिराफ गेले तरी त्यांनीं कोणताहि आवाज केला नाहीं. जिराफाच्या कानाजवळ फुलपाखरांसारखे कांहीं प्राणी होते. ते प्राणी जिराफाच्या काना-जवळ जो विशिष्ट प्रकारचा रस वाहतो तो खाण्याकरितां येत असतात, असें पार्कमधील प्राण्यांची माहिती सांगणाऱ्या गाईडनें सांगितलें.

## पराक्रमी गाई

येथील लांब केसांच्या वनगाई दिसायला गरीब दिसल्या तरी त्यांच्या कळपांत एकी जबरदस्त असते. आपण होऊन त्या कोणाच्या वाटेला जात नाहींत. मात्र त्यांच्या वाटेला एकादा प्राणी गेला, तर

मात्र त्या प्राण्यावर सर्व गाई तुटून पडतात व आपल्या तीक्ष्ण शिंगांनीं व लाथांच्या तडाख्यांनीं शत्रूची दाणादाण उडवून देतात. रात्रीच्या वेळीं त्या ठराविक ठिकाणीं कधींहि वस्तीला जात नाहींत. चरत असतांना जेथें रात्र होईल तेंच त्यांचें त्या दिवसाचें वसतीस्थान. एकादा खडक पाहून गाई वर्तुळाकार बसतात. मध्यभागीं वासरें असतात. अशा तऱ्हेनें बसण्याचें कारण म्हणजे कोणत्याहि दिशेनें शत्रु आला तरी त्याची चाहूल कळपाला चटकन् लागावी. निग्रो या गाईंचें मांस खातात व कातडीचा पांघरण्याकरितां उपयोग करतात. शेपटाच्या केसाच्या चौऱ्या बनविल्या जातात.

## माशा मारण्याचें पाप

जंगलामध्यें हिंडतांना वनगाईंच्या केसांच्या अगर इतर कांहीं प्राण्यांच्या केसांच्या चौऱ्या बरोबर घ्याव्या लागतात. कारण जंगलांत माशा व चिलटें भयंकर! ती अंगाला चावली असतांना आग होते किंवा डोळ्यांत गेलीं असतांना डोळे लाल होतात व दुखतात. परंतु चौऱ्या जवळ असल्या कीं माशा हुसकून लावण्याच्या कामीं त्यांचा चांगला उपयोग होतो. या चौऱ्यांचा जो दांडा असतो त्यावर देवाची मूर्ति कोरलेली असते. माशा मारल्यामुळें झालेलें पाप या देवाच्या दर्शनानें नाहीसें होतें अशी तिकडे समजूत आहे.

## झाकलेला तलाव

नॅशनल पार्कप्रमाणेंच पहाण्यासारखें दुसरें ठिकाण म्हणजे किकोयू तलाव होय. हा तलाव नैरोबीपासून सुमारें सहा सात मैलावर आहे. सर्वसाधारणपणें तलावाचा अर्थ, खालीं जमीन, मध्यें पाणी व वर आकाश असा होतो. पण हा किकोयू तलाव जरा निराळा आहे. खालीं जमीन, मध्यें पाणी व पाण्यावर परत जमीन आहे. तलाव लांबीरुंदीला क्रिकेटच्या मैदानाएवढा येईल. वरच्या जमिनीवर माणसांना चालतां येतें. जमीन हलते, पण पडत नाहीं. तलावा-विषयीं मोठी मनोरंजक माहिती समजली. पूर्वीं हा भुतांचा तलाव होता म्हणे. कोणीहि मनुष्य तलावाच्या पाण्याला स्पर्श करीत नसे.

कालांतरानें पाण्यावर विशिष्ट प्रकारचें घट्ट शेवाळें सांठलें. शेवाळ्यावर माती सांचून जमीन तयार झाली व गवत उगवलें. त्यानंतर जनावरें गवत खाण्याकरितां जाऊं लागलीं. जनावरें वर गेलीं तरी जमीन खालीं जात नाहीं हें पाहून लोकांना आश्चर्य वाटलें. नंतर कांहीं माणसें तलावावरील जमिनीवरून फेरफटका मारून आलीं. पहिल्यांदा माणसें तेथें गेलीं तेव्हां त्यांना पाहण्याकरितां अनेक लोक तलावाच्या कांठाशीं जमले होते. जमिनीवरून चालले तरी ती पडत नाहीं असें पाहिल्यावर माणसांना वाटलें, तलावावरील जमीनीला भोंक नाहीं म्हणून ती खालीं जात नसावी. कांहीं दिवसानंतर गुराखी मुलांनीं काठ्यांनीं जमीनीला भोंक पाडलें तरीसुद्धां जमीन खालीं गेली नाहीं. त्या दिवसानंतर लहानमोठीं बरीच भोंकें पाडलीं गेलीं. आपण निग्रोच्या मुलाला एकादा आणा दिला तर तो भोकांतून तलावांत उडी मारून तळांतला दगड आणून दाखवितो अगर एका भोंकांतून उडी मारून जमिनीखालून पोहत जाऊन दुसऱ्या भोंकांतून बाहेर येतो. अशा प्रकारें एके काळीं भुताचा म्हणून गणला गेलेला हा तलाव सध्यां परदेशी प्रवाशांचें एक आकर्षण होऊन बसला आहे. नैरोबीस येणारा प्रत्येक प्रवासी या तलावाला भेट दिल्याशिवाय जात नाहीं.

प्रवाशाला हिंडण्यास वेळ असेल तर नैरोबीबाहेर फेरफटका मारायला हरकत नाहीं. नैरोबी ते नाकूरू ही शंभर मैलांची पक्की सडक गेल्या युद्धांत इटालियन कैद्यांनीं बांधून काढली आहे. सडकेच्या आजूबाजूला युरोपियन शेतकऱ्यांचीं घरें आहेत. घरांच्या परसाची व आंत रचलेल्या गवताधान्याच्या उडव्यांची मांडणी मोठी आकर्षक दिसते. कांहीं ठिकाणीं विलायती गाई चरतांना दिसतात. शेतकऱ्याकडे नोकरीकरितां बहुतेक निग्रो लोकच आहेत.

## गोऱ्यांचा क्रूरपणा

युरोपियन शेतकऱ्यांची नुसती धान्यशेतीच नाहीं. तंबाखू व चायपाताच्या लागवडी अनेक मैल पसरलेल्या आहेत. या लागवडी-

शेजारींच छोटेसें आवार असतें व तेथें घायपातापासून वाख काढण्याची सोय केलेली असते. कांहीं शेतांतून लहान रेल्वे गेलेली दिसली. तोडलेलें घायपात या रूळावरून मुख्य फॅक्टरीकडे वाहून नेलें जातें. युरोपियनांच्या शेतावर काम करणाऱ्या मजुरांची स्थिति मात्र समाधानकारक नाहीं. थोड्या पगारावर त्यांना राबावें लागतें. उन्हातान्हांत पाठीशीं मुलें बांधून निग्रो स्त्रिया शेतांत काम करतात. स्त्रिया पुरुषांइतकें काम करीत असल्या तरी त्यांना मजुरी पुरुषांपेक्षां फार कमी दिली जाते.

## निग्रोंना गुरांप्रमाणें हाकून नेतात

आफ्रिकेंतील मजुरांच्या जीवनमानाबद्दल मीं नैरोबींतील एका व्यापाऱ्याशीं चर्चा केली. तो म्हणाला, " येथील मजुरांचें जीवन जनावरांच्या जीवनापेक्षां खडतर आहे. मनुष्यप्राणी म्हणून त्यांच्याकडे पाहिलें जात नाहीं. त्यांतल्या त्यांत अबरडर पर्वताच्या दरींत जे युरोपियन शेतकरी आहेत ते फारच क्रूर आहेत असें म्हटलें पाहिजे. त्यांनीं स्वत:चें पोलीस दल तयार केलें आहे. शेतावर काम करण्याला मजूर मिळाले नाहींत तर रिकाम्या लॉऱ्या व पोलीसदल घेऊन हे शेतकरी निग्रो वस्तीवर जातात. वस्तीला पोलीस वेढा देतात व सर्व धडधाकट माणसांना मोटारींत भरतात. एकाद्यानें ऐकलें नाहीं तर त्याला भयंकर मार दिला जातो. लॉरींत भरलेल्या निग्रोंना शेतावर आणून कामावर लावतात. शेताचें काम पूर्ण होईपर्यंत त्यांना तारेच्या कुंपणांत कोंडून ठेवलें जातें व बाहेर पोलीस पहारा असतो. निग्रो लोकांना सर्व विधि या कुंपणांतच उरकावे लागतात. त्यांना मोहोगाच्या पिठाचे गोळे खाण्याकरितां कुंपणांत फेकले जातात. शेतांतील काम पूर्ण झालें कीं सर्व मजुरांना थोडे पैसे देऊन सोडून दिलें जातें. मजुरांना शेतापासून ते आपल्या वस्तीपर्यंत चालत जावें लागतें. इतकें करून त्यांचा त्रास संपला असें म्हणतां येणार नाहीं. कारण दुसरे दिवशीं दुसरा एकादा युरोपियन शेतकरी वस्तीवर धाड घालून केव्हां लॉरींत घालून नेईल त्याचा नेम नसतो.

आज बरोबर पांच वर्षांनीं त्याच भागांत माऊ माऊ चळवळ सुरू झाली आहे. ठोक्याला ठोक्यानें उत्तर देण्याचा उपक्रम कांहीं धाडशी निग्रो तरुणांनीं असह्य जाचाला कंटाळून अवलंबिला आहे. या चळवळीचा बीमोड करणें अत्याचारी गोऱ्यांनाहि अशक्य होऊन बसलें आहे.

## निग्रो वस्तींत प्रयोग

नैरोबीच्या आसपास काय दिसलें हें आपण पाहिल्यावर एका खेड्यांतील वस्तीवर फेरफटका मारून येऊं. नैरोबीच्या जवळच्या निग्रो वसाहती मला बऱ्या वाटल्या. माझा सहकारी मॉंगीबरोबर प्रयोगाकरितां म्हणून मी एका खेड्यावर गेलों होतों. सहा सात घरांच्या या खेड्याची लोकसंख्या जेमतेम ४५–५० असेल. वस्तीच्या नायकाशीं माझ्या सहकाऱ्यानें ओळख करून दिली. मी जादूगार आहें व कांहीं प्रयोग निग्रो लोकांना दाखविण्याची माझी इच्छा आहे, हें जेव्हां त्याला समजलें तेव्हां त्याला बराच आनंद झालेला दिसला. त्यानें लगेच कार्यक्रमाची तयारी करायला लोकांना सांगितलें. आयत्या वेळीं करण्यांत आलेलें स्टेज धान्यांनीं भरलेल्या पोत्यांचें होतें. चारपांच पोतीं आडवीं ठेऊन त्यावर फळ्या टाकल्या होत्या व खुर्चीप्रमाणें एक भरलेलें पोतें आडवें टाकून ठेवलें होतें. गांवकऱ्यांना एकत्र जमविण्याची पद्धत फार चांगली आहे. एक मोठा नगारा घेऊन तो विशिष्ट प्रकारें वाजविला कीं लोक एकत्र जमतात. जंगलांतल्या कांहीं खेड्यांत नगाऱ्यावर बसविलेली एक स्वतंत्र भाषा आहे. चोरांचा हल्ला, शिकार जवळ आल्याबद्दलची सूचना अगर समारंभाचें आमंत्रण हा नगारा वाजवून सर्वत्र कळविलें जातें.

## या कसल्या विचित्र टाळ्या ?

निग्रो वस्तींतला माझा एकट्याचा हा पहिलाच कार्यक्रम होता. त्यामुळें एक प्रकारची भीति वाटत होती. माझ्या एका हिंदी मित्रानें अगोदरच सूचना देऊन ठेवली होती कीं, निग्रोंशीं वागतांना जरा

जपून वागलें पाहिजे. कारण एकदां का ते बिथरले म्हणजे त्यांना आवरणें फार कठीण असतें. नेहमींप्रमाणें प्रयोगांना सुरुवात धनुर्विद्येच्या प्रयोगांनीं करण्याचें ठरवून माँगीच्या हातांत धाग्याला गोळा बांधून दिला. मनांत गुरुजींचें नांव घेतलें व बाण सोडला. बाणानें धागा तुटला व मी प्रेक्षकांकडे पाहिलें. त्याबरोबर सर्वजण एकदम ओरडायला लागले. ते असें कांहीं विचित्र ओरडत होते कीं माझ्या अंगाला दरदरून घाम सुटला. क्षणभर काय घडत आहे याचा पत्ताच लागेना. मी माझ्या सहकाऱ्याकडे पाहून विचारलें, "माँगी, ही निनी?" तो म्हणाला. "बाना, हें लोक काय करीत आहेत तें तुम्हाला माहीत नाहीं का?" मी म्हणालों, "छे, छे! अजीबात नाहीं." त्यावर शांतपणानें तो उद्गारला, "अहो, हे सर्व लोक टाळ्या वाजवीत आहेत." माँगीचें हें वाक्य ऐकून मी सर्दच झालों. कारण असल्या भयंकर टाळ्या मी कोठेंच ऐकल्या नव्हत्या. शिवाय यांची टाळ्या वाजविण्याची पद्धत मोठी विचित्र होती. प्रत्येकानें आपला उजवा तळहात तोंडावर ठेवला होता व मोठमोठ्यानें किंचाळत तोंडावरचा हात डमरू वाजविल्याप्रमाणें हलवीत होता. माँगीनें सांगितलें म्हणूनच; नाहीतर माझी निराळीच सममजूत झाली होती. मला वाटलें या लोकांना माझा कार्यक्रम आवडला नसून ते सर्वजण माझ्या अंगावर हल्ला करण्याच्या विचारांत असावेत व हल्ल्याच्या अगोदरचा तो संकेत असावा. या घोटाळ्याचा उलगडा झाल्यानंतर माझे पुढील प्रयोग यशस्वीपणें पार पडले. कार्यक्रमाच्या शेवटीं मला केळीं व मोसंबीं मिळालीं. कांहीं निग्रो जादूगारांचे प्रयोग मला पहावयाचे होते; पण तसे प्रयोग करणारे लोक येथें कोणी नाहींत, असें चौकशी केल्यावर समजलें. निग्रो वस्तींतला हा प्रयोग म्हणजे माझ्या आयुष्यांतील कधींहि न विसरली जाणारी घटना होऊन बसली.

निरनिराळ्या निग्रो लोकांशीं संबंध आल्यामुळें त्यांच्या खेळांविषयीं मला माहिती मिळवावीशी वाटली. कंपाला व नैरोबी येथें युरोपियन पद्धतीचे खेळ खेळतांना मीं कांहीं निग्रो लोकांना पाहिलें होतें. पण निग्रो लोकांच्या देशी खेळांशीं माझा तितकासा परिचय झाला नव्हता.

विलायती खेळांत निग्रो नेहमींच गोऱ्यावर मात करीत असत. फुटबॉल खेळतांना युरोपियन लोकांच्या पायांत बूट असत, तर निग्रो उघड्या पायानेंच खेळत. पण निग्रोनें मारलेली किक अडविण्याची ताकद गोऱ्यांच्या अंगांत नसे. क्रिकेटमध्यें मात्र गोरे लोक सहसा हार खात नव्हते. हे झाले निग्रो—युरोपियन लोकांत खेळले जाणारे खेळ. पण निग्रो लोक आपसांत जे त्यांचे देशी खेळ खेळतात ते निराळे आहेत. आपल्याकडील बुद्धिबळाप्रमाणें दगडा—लाकडांचा एक खेळ आहे. पंचपाळ्याप्रमाणें असलेल्या लाकडाच्या चौकोनांवर हा खेळ खेळला जातो. हातांत खडे घेऊन ते फळीवरील निरनिराळ्या भोकांत विशिष्ट प्रकारांनीं ठेवावयाचे असतात. खेळ खेळणाऱ्यां-प्रमाणें बघणारे लोक सुद्धां या खेळांत तासन् तास रमून जातात. तरुणांपेक्षां हा खेळ म्हातारे लोक अधिक प्रमाणांत खेळतात.

## बाणांचा खेळ

कोणत्याहि देशांतला खेळ आजूबाजूंच्या साधनांतून निर्माण झालेला असतो. त्याप्रमाणें येथील तरुणांमध्यें धनुष्यबाणांचा एक खेळ फार प्रचलित आहे. खेळायला आलेल्या तरुणांचे दोन गट ( पार्ट्या ) पाडले जातात. नंतर झाडांवर एक फळ टांगलें जातें. प्रथम एका पार्टीतले लोक प्रत्येकीं तीन तीन बाण या फळाला मार-तात. जितके बाण फळाला लागतील त्यांची नोंद विरुद्ध पार्टी करते. नंतर दुसरी पार्टी बाण मारण्यास सुरुवात करते. ज्या पार्टीचे जास्त बाण फळाला लागतील अगर चाटून जातील ती विजयी समजली जाते. नंतर विजयी पार्टीतील लोक एका ओळींत उभे राहतात व दूर अंतरावर बाण मारतात. हरलेल्या पार्टीतील लोक रांगत जाऊन ते बाण तोंडांत धरून घेऊन येतात. तोंडांतला बाण पडला तर ज्या ठिकाणीं बाण पडला असेल तेथून लंगडी घालीत, ज्या ठिकाणाहून बाण मारले असतील तेथें येतात. या खेळामुळें नेमबाजीचें शिक्षण उत्तम प्रकारें मिळतें. धनुष्यबाणाप्रमाणें इतर कांहीं खेळ आहेत. आपली कुस्ती व आफिरकन कुस्ती यांत अंतर फार आहे. आफ्रिकें-

तील कुस्तीला कुस्ती हें नांव योग्य होणार नाहीं. कारण त्या खेळांत प्रतिपक्षावर सर्व प्रकारें हल्ला चढविला जातो. बुक्क्या मारणें, लाथा मारणें, कान ओढणें इत्यादि प्रकार सर्रास चालू असतात. मात्र कानाच्या खालीं बुक्की मारण्याला परवानगी नाहीं. निग्रोंचा हा भाग फार नाजूक असतो व वेळीं प्रसंगीं त्या ठिकाणीं जोरांत मार लागल्यास मृत्यू येण्याचा संभव असतो. लठ्ठालठ्ठी चालू असतांना जो मनुष्य दमेल व हरेल तो आपले दोन्ही हात वर करतो. पण या संकेताशिवाय शत्रू हरल्याचें समजलें जात नाहीं.

## मारामाऱ्यांचे कार्यक्रम

कुस्तीवरून आठवण झाली म्हणून सांगतों. येथें एक गमतीदार प्रथा चालू आहे. एकाद्या ठिकाणीं दोन निग्रोंची कांहीं कारणांवरून मारामारी चालली असेल तर तिसरा कोणीही मध्यें पडत नाहीं. सर्वजण बाजूला उभे राहून गंमत पहात असतात. एकादा मनुष्य मध्यें पडल्यास भांडणारे दोघे एक होतात व मध्यस्थी करणाराचा समाचार घेतात व नंतर परत मारामारीला सुरुवात करतात. अशा प्रकारच्या मारामाऱ्या अगर द्वंद्व–युद्धें टोळ्याटोळ्यांतून अजूनहि चालू आहेत. हीं युद्धें पांगे, भाले व काठ्यांच्या सहाय्यानें केली जातात. मारामारींत पंचाचें काम टोळीचा प्रमुख करतो व तो कोणालाहि मध्यें पडूं देत नाहीं. अशा तऱ्हेच्या कांहीं मारामाऱ्या आपल्या– कडील कुस्तीप्रमाणें ठरवून केल्या जातात.

मला पुरुषांप्रमाणें येथील स्त्रियांच्या खेळांविषयीं माहिती मिळवावयाची होती. पण ती मिळूं शकली नाहीं. सार्वजनिक नृत्याशिवाय कोणत्याहि खेळांत स्त्रिया भाग घेत नाहींत असें समजलें.

## दर्शन देण्याचा प्रसंग

नैरोबीच्या मुक्कामांत माझा एक मोठा कार्यक्रम 'काठीयावाड स्पोर्टस् क्लब' च्या मदतीकरितां झाला. कार्यक्रमाची व्यवस्था गुजराती लोकांनीं केली होती. रेडिओपासून ते साध्या हँडबिलापर्यंत सर्व जाहिरातीचे प्रकार उपयोगांत आणल्यामुळें

राजधानींतील चारपांच हजार लोक कार्यक्रम पहायला आले होते. त्या कार्यक्रमाला स्त्रिया मोठ्या संख्येनें हजर होत्या. नेहमींप्रमाणें जमिनींत पुरून घेण्याचा प्रयोग झाला. मला खड्ड्यांतून वर काढलें तेव्हां किती तरी हिंदी स्त्रिया माझ्या पायाचें दर्शन घेण्याकरितां पुढें आल्या. त्यामुळें मला कसेसेंच वाटलें. कारण असला प्रकार इतरत्र कोठेंच घडला नव्हता व तो येथें घडेल अशी कल्पनाहि नव्हती. या दर्शनाच्या प्रकारामुळें प्रेक्षकांत बराच गोंधळ उडाला. मी स्टेजवरून रंगपटांत गेलों व गोंधळ थांबल्यानंतर पुढील प्रयोग करायला बाहेर आलों. या प्रयोगांतील दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे माझ्या साथीदाराच्या कपाळावर एक नाणें लावून त्यावर एअरगननें नेम मारण्याचा मीं प्रयोग केला. हा प्रयोग झाल्यावर गोळीच्या तडाख्यानें वाकडें झालेलें नाणें मी प्रेक्षकांना दाखवीत होतों. एका इटालियन तरुणीनें तें नाणें माझ्या हातांतून हिसकावून घेतलें व तें परत देण्यास नकार दिला. नाणें ५० सेंटचें होतें. त्या नाण्याऐवजीं ती पांच शिलिंग देऊं लागली. वाकडें झालेलें नाणें प्रेक्षकांतील एका गृहस्थाचें असल्यामुळें त्यानें पांच शिलिंग न घेतां नाणें तिला बक्षीस देऊन टाकलें.

## इटालियन मुलीकडून अभिनंदन

कार्यक्रम झाल्यावर पैशाचा हिशेब होऊन सुमारें दोन तासांनीं मी घरीं जायला निघालों. क्लबाच्या बाहेर मोटार पडतांच ती इटालियन मुलगी दाराशीं उभी असलेली दिसली. तिनें हात वर करून मोटार थांबविली. 'आजचे प्रयोग फार छान झाले व मी असले प्रयोग प्रथमच पहात आहें. उत्तम करमणूक केलीत याबद्दल धन्यवाद ! ' अशा अर्थाचीं चार वाक्यें मोडक्या तोडक्या इंग्रजींत ती बोलली. तिनें माझ्या प्रयोगाची स्तुति केली त्याबद्दल तिचे आभार मानून मीं गाडी चालू करायला ड्रायव्हरला सांगितलें.

कंपाला येथील महाराष्ट्रीय मंडळीप्रमाणें येथील महाराष्ट्र समाजांत आमच्या पार्टीतील लोकांचा एक छोटासा कार्यक्रम झाला. अनेक

लोकांच्या ओळखी झाल्या. परदेशीं राहाणाऱ्या माणसांना स्वदेशाहून आलेल्या माणसांबद्दल काय वाटतें याची पुरेपूर कल्पना त्या छोट्या कार्यक्रमामुळें आली. श्री. चिटणीस, श्री. पटवर्धन, डॉ. नेऊरगांवकर इत्यादि बड्याबड्या लोकांशीं मनमोकळेपणानें गप्पा मारायला मिळाल्या. समाजाची प्रेमाची आठवण म्हणून पार्टीतील लोकांना निरनिराळ्या प्राण्यांच्या हस्तीदंती प्रतिमा भेट देण्यांत आल्या. श्री. चिटणीस येथील एका बँकेचे व्यवस्थापक आहेत. फोटोग्राफी, शिकार करणें हे त्यांचे आवडते छंद. त्यांनीं आम्हांला एकदां शिकारीला नेण्याचें आश्वासन दिलें.

## अपघातांतून वाचले

महाराष्ट्र समाजाच्या कार्यक्रमानंतर दोन दिवसांनीं श्री. चिटणीस व एक पंजाबी गृहस्थ यांच्याबरोबर आम्ही दुपारीं शिकारीला गेलों. नैरोबीच्या आसपास मिळणारी शिकार म्हणजे हरणांची होय. मोठे प्राणी शहराजवळच्या भागांत नाहींत म्हटलें तरी चालेल. श्री. चिटणीसांनीं स्वतःची रायफल बरोबर घेतली होती. गांवाबाहेर गेल्यावर मोकळ्या मैदानांत हरणांचे कळप चरतांना दिसत होते. आमच्या मोटारचा आवाज ऐकतांच हे कळप पाहतांपाहतां अदृश्य होत. जवळ जवळ तीनचार तासांत एकसुद्धां शिकार मिळाली नाहीं. शिकारीच्या वेळीं हिराबाईंचे बंधू श्री. पापासाहेब एका मोठ्या प्रसंगांतून वांचले. चिटणिसांची रायफल भरलेली होती. श्री. पापांना त्याची कल्पना नव्हती. बोलत असतांना त्यांनीं रायफल घेतली व सहज चाप दाबला. रायफलींतील गोळी सूंसूं करीत त्यांच्याच कानाजवळून आकाशांत गेली. बंदुकीची नळी वर होती म्हणून ठीक, नाहीं तर ?

## खरी खेळाडू वृत्ति

या प्रसंगानंतर लोकांचा उत्साह जरा मावळला. त्यांतून अंधारांत हरणें अगदीं जवळून गेलीं तरी कोणाचा नेमच लागेना. चिटणिसांनीं

आपली रायफल मोटारींत ठेवली होती. मोटार एका शेतांतून चालली होती. इतक्यांत एक प्राणी मोटारच्या समोर आला. शॉटगन-मधून गोळ्या सुटल्या व प्राणी धाडकन् खालीं पडला. मोटार थांबली व सर्व लोक प्राण्याच्या दिशेनें धावले. पाहतात तों मुंगसाच्या आकाराचा एक रानटी प्राणी मरून पडला होता. आम्हाला वाटलें, हरीण असावें. पण तो होता निरुपयोगी प्राणी. सर्वजण मोटारींत परत आलों. पाहतात तों चिटणिसांच्या रायफलचा दस्ता मोडून पडला होता. प्राण्याला धरण्याकरितां लोक धावले त्या वेळीं कोणाचा तरी पाय दस्त्यावर पडला असावा. भारी रायफलचें झालेलें नुकसान हंसतखेळत चिटणिसांनीं सहन केलें. कोणासहि त्यांनी दोष दिला नाहीं अगर रागाची एक छटाहि त्यांच्या चेहऱ्यावर दिसली नाहीं. शिकाऱ्याच्या अंगीं लागणारी खेळाडू वृत्ति श्री. चिटणिसांच्या अंगीं पुरेपूर बाणली होती. एकाच वेळीं घडलेल्या या दोन घटनांनंतर शिकारीच्या नादीं न लागतां आम्ही परत आलों.

आम्ही आफ्रिकेंत असतांना अप्पासाहेब पंत नुकतेच हिंदचे वकील म्हणून आले होते. त्यांच्याबद्दल सर्व समाजाचे लोक आदरानें बोलतांना दिसले. ते आमचा कार्यक्रम पाहण्यासाठीं आले होते.

## घराकडे डोळे लागले

नैरोबींत आमचा मुक्काम बरेच दिवस होता. त्यानंतर आम्ही परत मोंबासाला जाणार होतों. मोंबासा हें आमच्या दौऱ्याचें शेवटचें ठिकाण. शेवटचें म्हणण्याचें कारण तेथें गेल्यावर झांजीबारला जायचें कीं नाहीं तें ठरणार होतें. मोंबासा येथें थिएटर मिळतांच आम्हीं नैरोबी सोडलें.

नैरोबी ते मोंबासा हा प्रवास जरा निराळा वाटला. या वेळीं वासी थंड प्रदेशांतून उष्ण प्रदेशांत जात असतो. या भागांत डोंगर गैरे विशेष नाहींत. सर्वत्र सपाट मैदानें व मैदानांत जिराफ, रिणें, शहामृग, वनगाई इत्यादि प्राण्यांचे कळप दिसतात. परंतु

यापूर्वीच जंगली प्राण्यांचे कळप पाहून डोळे व मन तृप्त झालेलें होतें. मनांत विचार येत होते ते शेवटच्या मुक्कामाचे व नंतर स्वदेशीं परतण्याचे. पार्टीतील प्रत्येकजण आपलें सामान व नवीन घेतलेल्या वस्तू यांची यादी करण्यांत गुंग झाला होता.

## हिंदी आणि गोरे

मोंबासाला आल्यावर आमचे दोन कार्यक्रम झाले. पैसे भरपूर मिळाले. पण कधीं एकदां परत भारताला जाऊं असें झालें होतें. पांच साडेपांच महिने आप्तस्वकीय व स्वदेश सोडून जाण्याचा माझा तो पहिलाच प्रसंग होता. त्यामुळें शेवटीं शेवटीं नातेवाईकांची आठवण फारच तीव्रतेनें होऊं लागली. मोंबासांतील कार्यक्रम संपले होते. परंतु बोट सुटण्याला चार दिवस अवकाश होता. त्या दिवसांत मी एका बागेंत जाऊन बसत असें. कितीतरी मजेशीर विचार मनांत येत. आज पांच महिने मी या देशांत हिंडलों. काय पाहिलें व काय शिकलों मी ? तसें पाहिलें तर मला भरपूर पहावयास व शिकावयास मिळालें होतें. चांगल्या गोष्टीबरोबर शेंकडों नको असलेल्या गोष्टीहि माझ्या पोतडींत जमा झाल्या होत्या. स्वार्थासाठीं वाटेल तें करण्यास मागेंपुढें न पाहणारे व्यापारी आणि परदेशांत सुद्धां हिंदुस्थानी-पाकीस्तानी भेदभाव, यांसारख्या गोष्टी पाहून मन खिन्न होई. तसें पाहिलें तर निग्रो लोक दिसण्यांत आपणांपेक्षां काळे असले तरी काळीं कृत्यें करण्यांत ते तितकेसे सराईत नाहींत. धूर्तपणाच्या डाव-पेचापेक्षां सरळपणानें जगणें त्यांना माहीत. त्यांच्या वाटेला कोणी गेला नाहीं तर ते चुकूनसुद्धां कोणाच्या वाटेला जाणार नाहींत. आमचे हिंदी लोक नुसतेच आफ्रिकेंत राहिले. आफ्रिकेंतील लोकांशीं जिव्हाळ्याचे संबंध जोडणें त्यांना अद्यापि जमलें नाहीं. तसें पाहिलें तर व्यापाराच्या निमित्तानें गोऱ्या लोकांच्या अगोदर हिंदी लोक तेथें गेले आहेत. आपल्या भाषेची छाप देशी भाषेवर पडलेली स्पष्टपणें दिसते. पैशाच्या आशेनें हस्तीदंत व हिरे मिळविण्याकरितां अनेक प्रकारचीं धाडसें हिंदी व्यापाऱ्यांनीं केलीं; पण हीं धाडसें

केवळ स्वार्थाकरितां केल्यामुळें ते अनेक ठिकाणीं तिरस्काराचा विषय बनले. मिशनरीहि त्या देशांत गेले. खेड्यापाड्यांतून देखील गेले. निग्रो लोकांची त्यांनीं मनोभावें सेवा केली. त्यांना कपडे दिले, अन्न दिलें आणि ख्रिस्ती धर्माची दीक्षाहि दिली. हें काय होत आहे हें त्यांना समजलें नाहीं तरी हिंदी लोकांपेक्षां गोरे लोक चांगले आहेत अशी निग्रोंची खात्री झाली. त्यांचा शुभ्र रंग, व्यवस्थित वागणूक, नानाविध शास्त्रीय शोध, यामुळें युरोपियन लोक म्हणजे देवाचा अवतार आहेत, अशी कल्पना होणें साहजिकच होतें. त्यामुळें त्यांचा प्रभाव व वर्चस्व सर्व क्षेत्रांवर पडलेलें दिसून येतें..

## महाराष्ट्रीयांची वृत्ति

मोंबासा येथील एका डॉक्टरांच्या बरोबर मीं " महाराष्ट्रीय लोक परदेशांत कमी कां ? " या विषयावर चर्चा केली. ते म्हणाले, "आमच्या हॉस्पिटलकरतां नर्सेसची जरूरी असते. आम्ही नेहमीं हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांत जाहिराती देतों. पण इकडे येण्यास कोणीच तयार होत नाहीं. एकादी नर्स तयार झाली तर आजूबाजूचे लोक भीति घालतात व 'येथें अर्धी भाकरी खाऊन रहा; पण परदेशांतील तूप रोटीची हाव धरूं नको' असा पोक्त सल्ला देतात. वास्तविक येथील पगार व सुखयोयी खरोखरीच चांगल्या आहेत. पण लोकांना त्याची कल्पना नाहीं व किंमतहि नाहीं. जी गोष्ट नर्सेसची तीच शिक्षक, डॉक्टर्स व इंजिनियर लोकांची. या लोकांची आफ्रिकेंत नेहमींच चणचण असते. हिंदुस्थानांतून लोक येतात; पण ते गुजराती, मद्रासी, शीख व गोवानीज असतात. महाराष्ट्रीय घर सोडायला तयार नसतात. "

डॉक्टरांनीं सांगितलेली माहिती अगदीं खरी आहे. त्यांना कांहीं शिक्षकांचीं पत्रें आलीं होतीं. त्यांत शिक्षकांनीं विचारलें होतें, ' आफ्रिकेंतील शहरांत सिंह, साप वगैरे प्राणी हिंडतात का ? माणसें खाणारे निग्रो लोक शहरापासून किती दूर राहातात ? ' अशा प्रकारचे प्रश्न विचारणारांची कींव करावीशी वाटते. पत्रव्यवहार न करतां

झटकन स्वदेश सोडणारा गुजराती कोणीकडे व अनेक वेळां पत्रव्यवहार करूनहि शेवटीं घर न सोडण्याचा निर्णय घेणारा महाराष्ट्रीय कोणीकडे !

## निरोप !

हिंदुस्थानला जाणारी एस्. एस्. कंपाला बोट मोंबासाच्या धक्क्यावर उभी होती. आम्हाला निरोप देण्याकरितां निग्रो व हिंदी लोक आले होते. दोन दिवसापूर्वी कधीं एकदां बोटींत बसेन असें झालें होतें. पण आज प्रत्यक्ष बोटींत चढतांना मात्र खूप वाईट वाटत होतें. बोटीच्या कठड्याला टेकून कितीतरी वेळ मी किनाऱ्याकडे पहात होतों. बोट दूर दूर जात होती व मन आफ्रिकेंत पाहिलेल्या निरनिराळ्या स्थळांचा पुन्हा प्रवास करीत होतें. त्यामुळें पुनःप्रत्ययाचा आनंद होत होता कीं वियोगामुळें दुःख होत होतें हें मात्र मला समजत नव्हतें.

# गोऱ्या लोकांच्या देशांत

# १

## युरोपास जाण्याचा बेत

आफ्रिकेचा माझा दौरा यशस्वी झाला. पुण्याला आल्यावर 'स्वराज्य' साप्ताहिकांत आफ्रिकेसंबंधीं माझे लेख प्रसिद्ध झाले. वाचकांना ते बरेच आवडले. त्या लेखासंबंधीं जवळ जवळ दीडशें पत्रें त्या वेळीं मला आलीं. कांहीं संस्थांतून व्याख्यानांचीं आमंत्रणें येऊं लागलीं. ज्या शाळेंत माझे प्रयोग ठरत तेथें अगोदर मी प्रवासाची माहिती सांगे. मुलांना निग्रोंचीं वाद्यें, हत्यारें दाखवी. वल्कलें दाखवून तीं कशीं वापरतात त्याची कल्पना देई. या सर्व गोष्टी मुलांना खूपच आवडत. प्रयोगापेक्षां व्याख्यानावर जास्त भर दिल्यास विद्यार्थ्यांच्या ज्ञानांत भर पडेल व आपल्यालाहि त्याचा अल्प मोबदला घेतां येईल असा एक विचार मनांत आला. पण व्याख्यानाकडे सर्व लक्ष दिल्यास प्रयोग मागें पडतील या कल्पनेनें तो विचार मध्येंच सोडून द्यावा लागला.

१९४९ च्या डिसेंबरमध्यें मी प्रयोगाकरितां पंढरपूरला गेलों होतों. त्या वेळीं प्रवासी नाथ ऊर्फ नाथ गोडबोले हे जगप्रवासी तेथेंच होते. त्यांचीं कांहीं व्याख्यानें मीं शाळांतून ऐकलीं. त्यांना नुसत्या व्याख्यानाचे बरेच पसे मिळत आणि विद्यार्थीवर्गसुद्धां खूष असे. मी लगेच नाथ गोडबोल्यांची पद्धत उचलली व प्रयोगापेक्षां व्याख्यानावर भर देण्याचें ठरविलें. व्याख्यानावर जे पैसे मिळतील ते सांठवून दुसऱ्या कोणत्या तरी देशाला जाण्याचा बेत केला.

एकदां माझा एक सहकारी व मी पंढरपुरांत चंद्रभागेच्या कांठीं फिरायला गेलों होतों. दुसऱ्या कोणत्या देशाला जाणें योग्य ठरेल यावर आमच्या गप्पा सुरू झाल्या व त्याच वेळीं पुढची इंग्लंड देशाची

सफर नक्की केली. घरीं आल्यावर लगेच पत्नीला पत्र लिहिलें व मीं मे महिन्यांत इंग्लंडला जाण्याचा बेत नक्की केला आहे असें कळविलें. ती बातमी दुसरे दिवशीं नाथ गोडबोले व इतर मित्रांना सांगितली.

इंग्लंडला जायला फक्त पांच महिने अवकाश होता व तयारी कांहींच नव्हती. आफ्रिकेंत मिळविलेला पैसा घरखर्चांत बराचसा खर्च झाला होता. अशा स्थितींत मी इंग्लंडला जाण्याची प्रतिज्ञा तर करून बसलों होतों. पत्नीशीं विचारविनिमय केला. तिनें जाण्याची परवानगी दिली. पण पैशाचें काय ?

## मला मिळालेली मदत

एके दिवशीं मनांत सहज विचार आला. आपण कांहीं श्रीमंत लोकांकडे गेलों तर ते आपल्या या धाडसाला निश्चित मदत करतील. पण त्यांना सांगायचें काय ? मीं ताबडतोब ब्रिटिश हिप्नॉटिकल सोसायटीला पत्र लिहिलें व 'मी हिप्नॉटिझम शिकायला तिकडे येत आहें' असें कळविलें. त्यांचें अनुकूल उत्तर येतांच १२७ श्रीमंत माणसांची यादी तयार केली. माझें धनुष्यबाण घेऊन मी एकेकाच्या घरीं जाऊं लागलों. सुमारें तासभर त्यांची करमणूक करावयाची व नंतर युरोपच्या प्रवासाकरितां मदत मागावयाची. १२७ लोकांपैकीं ३६ लोकांनीं कार्यक्रम करायची परवानगी दिली. शेवटीं, जेव्हां मी मदत मागायला गेलों तेव्हां बऱ्याचजणांनीं निरनिराळ्या अडचणी सांगून नकार दिला. कांहींजणांनीं तर माझ्यापुढें जमा-खर्चाच्या वह्या टाकल्या. कांहींजणांनीं २५ रुपये दिले. प्रेसिडेन्सी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. सी. टी. चितळे व श्री. व्ही. के. ऊर्फ नाना आगाशे यांनीं प्रत्येकीं १०० रु. दिले. सरदार बाबासाहेब बिवलकर व चितळेनगरचे श्री. दादासाहेब चितळे यांनीं प्रत्येकीं ३०० रुपये दिले. या देणग्यांनीं मला बराच हुरूप आला.

मदत मिळविण्याच्या कामाबरोबरच पासपोर्टवर शिक्के मारून घेण्याचें काम उरकत आलें होतें. युरोपला जायचें म्हणजे चांगले

उलनचे कपडे हवेत, जादूचीं व धनुष्यबाणाचीं उपकरणी न्यावयाचीं तीं वरच्या दर्जाचीं हवींत. मुंबईच्या टेलर आणि कंपनीनें उधारीनें सूट शिवून दिले. भारत आर्ट पुणें यांनीं धनुष्यें रंगवून दिलीं आणि अशा तऱ्हेनें माझी युरोपला जाण्याची सर्व तयारी झाली.

## मिळालेली संधि सोडूं नये

युरोपच्या प्रवासापासून मला परावृत्त करण्याचा पत्नीच्या नातेवाईकांनीं प्रयत्न केला. माझ्या कांहीं मित्रांनासुद्धां माझें धाडस मूर्खपणाचें वाटत होतें व त्यांनीं तसें बोलूनसुद्धां दाखविलें. पण माझी मनोदेवता मला सांगत होती कीं माणसाला संधि क्वचितच मिळते. त्या संधीचा जो मनुष्य फायदा घेतो तो पुढें जातो व ती गमावितो तो जन्मभर त्या संधीची आठवण काढून रडत बसतो. माझ्या या विचारांशी माझी पत्नी सहमत असल्यामुळें इतरांच्या बोलण्याचा माझ्या मनावर कांहींच परिणाम होत नव्हता. उलट त्यांचें तें गंभीर चेहरा करून उपदेशाचें पुराण सुरू झालें कीं आम्हां दोघांना मोठी गंमत वाटे. कांहीं वेळां मी सुद्धां गंभीर चेहरा करून त्यांच्या हो ला हो मिळवीत असे.

## ‘ पण मी चूक तर करीत नाहीं ना ? ’

मुंबईहून बोट सुटण्याच्या अगोदर ४ दिवस एजंटाचें पत्र आलें. त्या पत्रानंतर मात्र माझ्या मनांत खूप कालवाकालव होऊं लागली. पत्नीला बाळंतपणीं त्रास झाल्यामुळें खूप अशक्तपणा आला होता. पावणेदोन महिन्यांचा लहानगा विजय नुकताच माणसें न्याहळूं लागला होता. हंसणें, खिदळणें हें त्याच्या गांवींसुद्धां नव्हतें. तो दिवसा झोपे व सारी रात्र जागून काढी. अशा परिस्थितींत आपण यूरोपला जातों आहोंत, ही इतरांच्या म्हणण्याप्रमाणें खरोखर चूक तर ठरणार नाहीं ना ?

## पत्नीच्या प्रोत्साहनामुळें धीर आला

१ जून १९५० ला मी सकाळींच उठलों. दुपारच्या गाडीनें मुंबईला जावयाचें होतें. घरांतील सर्व कामें केलीं. जेवणानंतर अगदीं

मनमुराद गप्पा मारून घेतल्या. दुपारीं दोन वाजतां टांगा आला. शकूनें विजयला हातानें छातीशीं धरलें होतें. वाड्यांतील सर्व लोक जमले होते. मला वाटलें, इतर वेळीं शकू रडली नसली तरी निघतांना ती निश्चित रडेल. पण मलाच काय, सर्वांनाच आश्चर्य वाटेल असा प्रकार घडला. शकूच्या डोळ्यांत अश्रू तर नव्हतेच; उलट तिनें हंसतमुखानें मला निरोप दिला व विजयचा चिमुकला हात वर करून 'बायबाय' केलें.

पुणें ते मुंबई हा गाडींतील साडेतीन तासांचा प्रवास कसा झाला हें सांगणें कठीण. कारण कोणताच विचार मनांत स्थिर रहात नव्हता. अनेक विचारांचें नुसतें काहूर माजलें होतें. एका विषयावर विचार करायला लागावें तर दुसराच मध्यें घुसून पहिल्या विचाराचें जाळें तोडून टाकी आणि जी गोष्ट पहिल्याची तीच दुसऱ्याची होई. बोरी-बंदरला उतरून मुंबईतील माझ्या मित्राच्या घरीं गेलों.

बोट सुटण्याला फक्त एकच दिवस बाकी होता. कामाच्या गड-बडींत पुण्यांतील लोकांविषयी विचार करण्याला सवड मिळाली नाहीं. रात्रीं आफ्रिकेच्या प्रयाणाच्या वेळी केली त्याप्रमाणें सर्व सामानाची यादी केली. बॅगांना लेबलें लावलीं. गप्पा मारीत मारीत रात्रीं दोन वाजतां केव्हां झोप लागली तें समजलें सुद्धां नाहीं.

सकाळीं उठून सामानासह मी व माझे तीन चार मित्र बोटीच्या धक्क्यावर गेलों. आमच्या बोटीचें नांव जलआझाद होतें. मी पूर्वी वारावर ज्यांच्याकडे जेवत होतों ते श्री. अण्णासाहेब चितळे त्याच बोटींतून युरोपला निघणार होते. मी प्रयोग दाखविण्याकरितां व शिकण्याकरितां युरोपला जात आहें हें ऐकून त्यांना मनापासून आनंद झाला.

मित्रमंडळींचा निरोप घेऊन आम्ही बोटीवर गेलों. माझ्या नंबरा-वर मीं सामान ठेवलें. मी टूरिस्ट क्लासनें प्रवास करीत होतों. त्यामुळें एका हॉलसारख्या वाटणाऱ्या खोलींत ४६ माणसांची राह-ण्याची सोय होती. सामान ठेऊन मी डेकवर आलों. बोट सुट-

ण्याचा भोंगा वाजला व बॅंडवादन सुरू झालें. आफ्रिकेंत गेलों तेव्हां बॅंडवर वंदेमातरम् वाजविलें होतें. या वेळीं जनगणमन हें गीत वाजविलें गेलें.

## शिखांच्या सहवासांत

किनारा दिसेनासा झाल्यावर मी माझ्या जागेकडे वळलों. बोटींतील प्रवासी कोणी कोणाशीं बोलत नव्हते. अजून त्यांचीं भारावलेलीं मनें हलकीं झालीं नव्हतीं. जेवणाची घंटा होतांच प्रत्येकजण जेवणघराकडे जाऊं लागला व येथूनच बोलाचालीला सुरुवात झाली. टूरीस्ट क्लासच्या हॉलमध्यें ४६ लोक होते. पैकीं ३६ शीख, २ मुसलमान, १ बंगाली, ६ ख्रिश्चन ( अँग्लो इंडियन ) होते. महाराष्ट्रीय असा मी एकटाच होतों. माझी १६ नंबरची कॉट शिखांच्या अगदीं मधोमध होती. जेवणाच्या वेळीं मोठा मजेदार प्रसंग घडला. मुसलमान व अँग्लो इंडियन लोकांच्या बरोबर जेवायला शिखांनीं नकार दिला. कारण हे लोक गोमांसभक्षक, तर शीख अगदीं त्याच्या विरुद्ध. शिखांची संख्या जास्त असल्यामुळें जेवणाची व्यवस्था ठेवणाऱ्या अधिकाऱ्यानें मुसलमान व अँग्लो इंडियन लोकांकरितां एक निराळें टेबल दिलें. शिखांच्या मनाप्रमाणें गोष्ट झाली; पण त्यामुळें प्रवाशांमध्यें एक प्रकारें तेढीचें वातावरण निर्माण झालें. जेवण करून सर्वजण आपल्या झोपण्याच्या जागेकडे गेले. बोट एकाएकीं हलू लागली. बोटीचें हलणें इतकें जोरांत सुरू झालें, कीं नुकतेंच पोटांत गेलेलें अन्न उलटचा होऊन बाहेर आलें.

बोट सतत तीन दिवस हलत होती. बोटींतले नोकर म्हणत, ‘ इतकी वाईट हवा फार क्वचितच असते. नेहमीं एकादा दिवस बोट हलली कीं ताबडतोब समुद्र शांत होतो. ’ तें कांहीं असलें तरी या तीन दिवसांत प्रवाशांचे मात्र चांगलेच हाल झाले. पोटांत अन्न नसल्यामुळें चेहरे सुकून गेले होते. कॉटवर पडल्या पडल्या गप्पा मारीत आम्हा सर्वांच्या ओळखी झाल्या होत्या. शिखांची पंजाबी भाषा सरावानें थोडी थोडी समजूं लागली. कांहीं शिखांना हिंदी येत होतें, तर कांहीं लोक फक्त पंजाबींतूनच बोलत असत.

तीन दिवसानंतर समुद्र शांत झाला. सर्वजण इकडून तिकडे हिंडूं लागले. स्नान करणें, कॅरम खेळणें, वाद्य वाजविणें व गटागटानें गप्पा मारणें सुरू झालें. माझें मित्रमंडळ म्हणजे शीख लोक. मधून अधून सेकंड क्लासमध्यें जाऊन मी श्री. चितळे यांना भेटून येत असें. त्यांच्याकडून समजलें, पुण्याचे प्रसिद्ध आर्टिस्ट श्री. जी. डी. गोंधळेकर पॅरीसला जात आहेत. मी लगेच श्री. गोंधळेकरांना भेटलों. त्यांची व माझी पूर्वीची ओळख होती. त्यामुळें त्यांच्याशीं गप्पा मारण्यांत बराच वेळ जाऊं लागला.

आमची जलआझाद बोट अगदीं छोटी (८००० टन) असल्यामुळें युरोपला पोचायला तिला २१ दिवस लागणार होते वाटेंत बोट फक्त सुवेझ व पोर्टसय्यद येथें थांबणार होती. इतक्या लांब मुदतीचा प्रवास म्हणजे कंटाळवाणा होता. पण बोटीवर असे कांहीं प्रसंग घडत गेले कीं त्यामुळें प्रवास कसा झाला हें समजलें सुद्धां नाहीं.

## सगळेच निरक्षर

आठ दिवसांचा प्रवास झाल्यानंतर प्रवाशांना डिक्लरेशन फॉर्म देण्यांत आले. मी माझा फॉर्म भरीत होतों इतक्यांत समोरच्या कॉटवरचा साधुसिंग म्हणाला, "बाबूजी, माझा फॉर्म भरून देतां का ?" मीं त्याला होकारार्थी उत्तर देतांच त्यानें माझ्या हातांत फॉर्म दिला. त्यानें माझ्या हातांत दिलेला फॉर्म एक नव्हता, तर दहाबारा फॉर्मचें तें एक पुडकें होतें. मी म्हणालों, "इतके फॉर्म्स भरावे लागत नाहींत. फक्त एकच भरावा लागतो."

"बाबूजी, हे फॉर्म माझ्या एकटयाचे नाहींत. माझ्या दुसऱ्या मित्रांचे आहेत." त्याचें हें उत्तर ऐकून मला मोठी गम्मत वाटली. याचा अर्थ असा होता कीं इंग्लंडच्या प्रवासाला निघालेल्या या शिखांना अजिबात इंग्लीश येत नव्हतें. सकाळपासून सायंकाळ-पर्यंत मी सर्व शिखांचे फॉर्म्स भरून दिले आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे बऱ्याच लोकांना इंग्रजींतून नव्हे तर त्यांच्या मातृभाषेंत सुद्धां सह्या करतां येत नव्हत्या. त्या अंगठेबहाद्दरांकडे पाहून मला विचार

मराठा ग्रंथ संग्रहालय, वि:
अनुक्रम ना: दि: ……
क्रमांक……



पडला कीं हे लोक इंग्लंडला जाऊन करणार तरी काय ? ना धड बोलतां येतें, ना लिहितां येतें. मीं माझी शंका स्वरनसिंगाला विचारली. तो म्हणाला, " माझा मित्र वेल्समध्यें राहतो. त्याचा कापडाचा धंदा आहे. त्यानें नोकरी लावून देण्याचें कबूल केलें आहे, म्हणून मी तिकडे चाललों. " स्वरनसिंगाप्रमाणेंच बहुतेकांचे मित्र, नातेवाईक निरनिराळ्या क्षेत्रांत काम करीत होते. त्यांतील बहुतेकांचा धंदा कापडाचा होता.

आमच्यासारख्या सुशिक्षित लोकांना लांबच्या प्रवासाला जायचें म्हणजे माझें कसें होईल, हा प्रश्न समोर उभा राहतो; पण फक्त मित्रांच्या आधारावर घरदार सोडून व कोणत्याही प्रकारची अक्षर-ओळख नसतांना या शिखांना परदेशच्या प्रवासाला निघालेले पाहिलें कीं आम्हा महाराष्ट्रीयांच्या घरकोंबडेपणाचें हंसूच येतें.

बोटींत वेळ होता म्हणून मी त्या शिखांना इंग्रजी शिकविण्याचें ठरविलें. माझा बेत मीं त्यांना बोलून दाखविला, तेव्हां त्यांना आनंद झाला नाहीं. एकजण म्हणाला, " आम्हाला काय करावयाचें आहे इंग्रजी शिकून ? तेथें गेलों कीं आपोआप सर्व कांहीं येईल. आतांपासून डोक्याला त्रास कशाला द्या ? "

शिखांनीं इंग्रजी शिकायला नकार दिला होता, तरी फॉर्म्स भरून दिल्यापासून ते सर्वजण माझ्याशीं फारच आदरानें वागूं लागले. ' बाबूजी, खाना खानेके लिये चलीये, बाबूजी, सिनेमा शुरू होने की घंटी बज गयी, जल्दी चलीये ' अशा प्रकारें आपुलकीनें प्रत्येकजण मला संबोधूं लागला.

## बोटींचीं अवाढव्य यंत्रें

बोटीच्या ऑफिसरच्या ओळखीमुळें संपूर्ण बोट पाहण्याला मिळाली. बोटींतील प्रचंड यंत्रसामुग्री प्रवाश्यांनीं अवश्य पहावी. बोटीची खरी कल्पना वरून कधींच येत नाहीं. इंजीनरूममधील मोठमोठीं चाकें व

वर खालीं फिरणारे पंखे पहात असतांना कांहीं वेळा घेरी आल्या-सारखें होतें. यंत्राच्या कानठळ्या बसविणाऱ्या धडधड आवाजांतून कधीं एकदां वर येतों असें होऊन जातें. इतकें असलें तरी यंत्रागारांतील उष्णता पोटाच्या उष्णतेपेक्षां कमी असावी असें वाटतें. कारण पोटाकरितां हंसत काम करणारे कितीतरी लोक तेथें होते.

ज्या दिवशी बोट एडनजवळून गेली त्या दिवशीं माझा एक कार्य-क्रम बोटीवर झाला. प्रवासाला निघतांना माझ्याजवळ जेमतेम महिनाभर पुरतील इतके पैसे होते. या तुटपुंज्या रकमेंत भर घाल-ण्याच्या दृष्टीनें बोटीवरचा कार्यक्रम चांगला झाला. नेहमींप्रमाणें पैशाबरोबर बरेच मित्र मिळाले. कांहीं मित्रांनी युरोपमध्यें गेल्यावर त्यांच्या घरीं उतरण्याचें आमंत्रण देऊन ठेवलें.

## सुवेझचा कालवा

सुवेझला बोट थांबली. पण गांवांत जायला परवानगी नव्हती या बंदरानंतर तांबडा समुद्र व भूमध्य-समुद्र यांना जोडणारा जो सुवेझ कालवा आहे त्या कालव्यांतून आमची बोट जाणार होती. ११२ मैल लांबीचा हा कालवा सरळ नाहीं. मापाप्रमाणें नागमोडी आहे. त्यांतून एका वेळेस एकाच दिशेनें बोटी जातात, इतका तो अरुंद आहे. जाणाऱ्या व येणाऱ्या बोटींना मार्ग मिळावा म्हणून कालव्यांत निरनिराळ्या ठिकाणीं तीन सरोवरें तयार केलीं आहेत. कालव्यांतून जातांना बोटीचा वेग ताशीं फक्त ६ ते ८ मैल असतो. कालव्यांत शिरल्यावर बोटीवरून बिनतारी संदेश पाठविण्याची परवानगी नाहीं. कालव्याच्या एका बाजूला हिरवी गार झाडी आहे व दुसऱ्या बाजूला ओसाड मैदान आहे. झाडी असलेल्या बाजूनें एक पक्की सडक आणि एक रेल्वे रस्ता जातो. मधून अधून या रुळावरून एक छोटी गाडी धावतांना दिसते. कालव्याचें रक्षण करण्याकरितां उंटावरून पहारा करणारे लोक आहेत. रात्रीच्या वेळी ब्रिटिश सोल्जर्ससुद्धां पहारा करतांना दिसतात.

सुवेझ कालव्याच्या दुसऱ्या टोकावरचें बंदर म्हणजे पोर्टसय्यद हें होय. कांहीं वर्षांपूर्वी या शहराच्या जागीं चार घरांचें खेडें होतें. लेसेप्स या फ्रेंच इंजीनियरनें हा कालवा खणून जगावर उपकार केले आहेत. त्यामुळें जगाचा एक महत्त्वाचा मार्ग खुला झाला. शिवाय कालव्याच्या काठच्या गांवचा व्यापार वाढला व खेडयांचें रूपांतर शहरांत झालें.

## प्रवाशांची फसवणूक

पोर्टसय्यद शहर स्वच्छ व चांगलें असलें तरी लोक जरा धोके-बाजच वाटतात. येणाऱ्या प्रवाशाला लुटतां येईल तितकें लुटण्याचा ते प्रयत्न करतात. रस्तोरस्ती हिंडणारा जादूगार वेळप्रसंगीं प्रवाशाला दोन ठोके देऊन त्याच्याकडून पैसे उकळतो व्यापारी वस्तूंच्या किंमती कधींहि योग्य सांगत नाहींत. नग्न स्त्रियांचे फोटो विकणारे अनेक लोक दिसले. त्याचप्रमाणें नृत्य पहायला चलण्याविषयीं कांहीं लोकांनीं आम्हाला आग्रह केला. सर्व प्रवाशांना बोटीवर अगोदरच सूचना देण्यांत आल्या होत्या. गांवांत एकटे दुकटे न फिरण्याबद्दल व लवकर परत येण्याबद्दल त्या सूचना होत्या. बोटीवर इतके शीख होते, पण एकजणसुद्धां गांवांत गेला नाहीं. गांवांत दंगा होईल अशी त्यांना भीति वाटत होती. सुवेझहून बोट सुटली त्या दिवशीं ३–४ लोकांच्या चोऱ्या झाल्याचें समजलें.

बोट सुटण्याअगोदर एक तास अनेक लहान लहान होडयांतून इजिप्तमध्यें तयार झालेल्या कातडी, लाकडी व कापडी वस्तू विकायला आल्या होत्या. होडींतील व्यापारी एक दोरी वर फेंकीत व वरचे लोक ती झेलीत. या दोरीच्या सहाय्यानें माल वर पाठविला जाई व छोटया टोपलींतून पैसे खाली सोडले जात.

## प्रतिज्ञा खरी केली

२१ दिवसांच्या प्रवासानंतर आमची बोट लिव्हरपूलच्या खाडींत

उभी राहिली. ती वेळ रात्रीची होती. समुद्राला ओहटी असल्यामुळें बोट किनाऱ्याला जाऊ शकत नव्हती. दिव्यांच्या झगझगाटांत दिसणारें लिव्हरपूल शहर मोठें नयनमनोहर वाटलें. उद्यां सकाळीं आमचे पाय युरोपच्या भूमीला लागणार होते. पांच महिन्यांपूर्वी पंढरपूरला चंद्रभागेच्या कांठीं सहज केलेली प्रतिज्ञा अशा तऱ्हेनें पुरी होणार होती. रात्रीं झोप कोणालाच आली नाहीं. प्रत्येकजण आपल्या भावी कार्यक्रमाचें चित्र रंगवीत होता व आपण पुढें काय काय करणार हें दुसऱ्याला रसभरित वर्णन करून सांगत होता.

पहाटे चारनंतर जोराची थंडी पडण्यास सुरुवात झाली. मीं माझ्या बॅगेंतला ओव्हरकोट अंगांत घातला. तरी सुद्धां थंडी कमी होत नव्हती. शेवटी थोडा व्यायाम केल्यावर अंगांत जरा उष्णता आली. सकाळच्या भरतीच्या वेळीं आमची बोट किनाऱ्याला लागणार होती. पण कांहीं कारणामुळें ती दुपारीं किनाऱ्याला लागेल अशी नोटीस बोटीवरील फलकावर लागली. आतां मात्र बोटींतला क्षण न् क्षण कंटाळवाणा वाटत होता. सकाळीं ९ वाजेपर्यंत सर्व लिव्हरपूल शहर शांत होतें. त्यानंतर माणसांची रहदारी सुरू झाली. लिव्हर-पूलचें प्राणीसंग्रहालय किनाऱ्याला लागूनच आहे. संग्रहालयांतील वाघ-सिंहांच्या डरकाळ्या तेवढ्या ऐकूं येत होत्या.

## गोरे हमाल

दुपारीं साडेबारा वाजतां बोट किनाऱ्याला लागली. मला वाटलें होतें, येथें काळे लोक हमालीचा धंदा करीत असतील; पण ती निव्वळ कल्पनाच ठरली. सर्व कामें गोरीं माणसेंच करीत होतीं. इतकेंच नव्हे तर, एवढें मोठें बंदर; पण सर्व कामें अगदीं शांततेनें चाललीं होतीं. कोणत्याही प्रकारचा गोंधळ दिसत नव्हता. आपल्याकडच्या हमालावर देखरेख ठेवण्याला मुकादम लागतो. पण हे हमाल सर्व कामें स्वतः होऊनच करीत होते. जें सामान चढविण्याला मुंबईला सहा तास लागले, तें सर्व एका तासांत तेथें उतरविलें गेलें. हमालांची ही गम्मत पहात असतांनाच एक हमाल माझ्या जवळ आला व म्हणाला,

"सर, तुमचें सर्व सामान मीं व्यवस्थित खालीं पोंचविलें आहे." एका गोऱ्या माणसानें मला 'सर' म्हणून संबोधलें होतें. आपणहि कोणीतरी आहोंत याची जाणीव मला त्या वेळीं झाली. पण नंतर जेव्हां समजलें कीं येथील प्रत्येक सरकारी नोकर नागरिकांना 'सर' म्हणूनच संबोधितो, तेव्हां त्यांतील नाविन्य कमी झालें.

## परत जातांनाचें निमंत्रण

रेल्वेचा एजंट बोटींत आला होता. त्याच्याजवळून लंडनचें तिकिट खरेदी केलें. येथील कस्टम ऑफीसमध्यें कांहींच त्रास झाला नाहीं. फक्त धनुष्यबाणाची बॅग मला उघडावी लागली. माझ्या जवळचीं रंगीत व चांगलीं धनुष्यें पाहून कस्टम अधिकाऱ्यानें माझ्याविषयीं बरीच विचारपूस केली, व परत जेव्हां लिव्हरपूलला येशील तेव्हां मला जरूर भेट, असें सांगितलें. हमालानें सर्व सामान डब्यांत नेऊन ठेवलें होतें. त्यानें हमाली मागितली नाहीं. तो हमालीचें कांहीं बोलेना. तेव्हां मी एका इंग्लिश माणसाला विचारून २ शिलिंग त्याच्या हातावर ठेवले. त्यानें ऐटींत आभार मानले व तो निघून गेला. इंजीनसमोरचा सिग्नल वर झाला व गाडी लंडनच्या दिशेनें धांवूं लागली. आपल्याकडे गाडी सुटण्याअगोदर सिग्नल खालीं वाकतो, पण येथें वर होतो.

## बिनतिकिटानें प्रवास

लिव्हरपूल ते लंडन सुमारें तीन तासांचा प्रवास आहे. गाडींत गर्दी खूपच होती. मध्येंच एकदां तिकिट चेकर आला. चेकर डब्यांत येतांच सर्वांनीं आपापलीं तिकिटें तपासण्याकरितां तयार ठेवलीं. ज्यांच्याजवळ तिकीटें नव्हतीं त्यांचे चेकरनें पैसे घेतले. तेथें डबल चार्ज व दंड घेण्याची प्रथा दिसली नाहीं. गाडींत विनातिकिट बसणारे लोक तिकिट काढायला वेळ मिळाला नव्हता म्हणून बसले होते. कंपनीला फसविण्याचा त्यांत हेतु नव्हता.

## घोड्यावरून मेंढ्यांची राखण

गाडींतून जातांना आजूबाजूची शोभा मोठी आकर्षक दिसत होती. नुकतींच तयार झालेलीं गव्हाचीं शेतें पिवळींधमक दिसत होतीं. कांहीं शेतांतून अशा तऱ्हेनें धान्य पेरलें होतें कीं दुरून पाहणाराला एकाद्या जनावराचा आकार त्यांत दिसावा. आम्हांला सिंह व गाईचे दोन आकार दिसले. शेताच्या बाजूच्या माळावर गुराखी मुलें जनावरें चारीत होतीं. बहुतेक गुराख्यांच्या बरोबर कुत्रा होता. एका मैदानांत एक धनगर आपल्या मेंढ्या घोड्यावरून सांभाळतांना दिसला. शेतांच्यामधून जाणाऱ्या कालव्यांतून छोट्या बोटींची वाहतूक चालू होती.

## ब्रिटिशांची वागणूक

आमची स्पेशल गाडी लंडनच्या दिशेनें धांवत होती. जसजसें लंडन जवळ येत होतें तसतसें विचारांच्या वादळानें मन अस्थिर बनत होतें. ब्रिटिश लोक आतांपर्यंतचे आपले राज्यकर्ते. त्यांच्या वागणुकीचे निरनिराळे मासले मी हिंदुस्थानांत अनुभवले होते. मानवतेला खालीं मान घालायला लावणारीं त्यांचीं कांहीं कृत्यें मला आफ्रिकेंत पहायला मिळालीं होतीं. वर्णभेदानें बेभान झालेल्या या लोकांच्या देशांत मी आलों होतों. वरील वाक्याची कल्पना ज्यांनी आफ्रिकेंत प्रवास केला आहे, त्यांनाच येईल; इतरांना येणें कठीण. दुसरी गोष्ट म्हणजे बोटीवरून उतरलेल्या बहुतेक प्रवाशांना कोणा ना कोणाचा आधार होता. पण मला नेथें ना आप्त, ना मित्र. खिशांत फक्त पंधरा वीस पौंड ! अशी कांहीशी विचित्र स्थिति माझी होती. परंतु होणार असेल तें होवो. आपण आपलें हंसतमुखानें सर्व प्रसंगांना तोंड द्यावयाचें व नेहमीं मन आनंदी ठेवावयाचें हें माझें पहिल्यापासूनचें तत्त्व अंमलांत आणावयाचें ठरविलें. मी या विचारतंद्रींत असतांनाच गाडी लंडनच्या युस्टन भागांतील युस्टन स्टेशनवर थांबली. हमालानें सर्व सामान काढून टॅक्सीकडे नेलें. टॅक्सीवाल्याला मीं

लंडन येथील महाराष्ट्रीय खानावळवाले श्री. कानिटकर यांचा पत्ता दिला व गाडींत बसलों. लंडनला येणाऱ्या नवख्या महाराष्ट्रीयांस श्री. कानिटकरांचा मोठा आधार वाटतो व तेहि सर्व प्रकारची मदत मनापासून करतात.

## प्रथमदर्शनीं लंडन आवडलें नाहीं

युस्टन स्टेशनमध्यें उतरलों ती वेळ सायंकाळीं साडेसातची होती. लंडन येथील दुकानें ५ वाजतांच बंद होत असल्यामुळें सर्वत्र सामसूम होती. उंच काळ्या काळ्या इमारती व फिरायला निघालेलीं कांहीं जोडपीं दिसलीं. काळ्या इमारती पाहून प्रथमदर्शनीं लंडनविषयीं माझें मत चांगलें झालें नाहीं. लंडन हें जगांतील सर्वांत मोठें शहर आहे असें कागदोपत्रीं वाचीत होतों. पण आज प्रत्यक्ष त्या शहरांत आल्यावर मात्र मन प्रसन्न झालें नाहीं. साडेआठच्या सुमाराला मी कानिटकरांच्या घरीं गेलों. बोर्डिंगमधील इतर लोक जेवून बाहेर गेले होते. नंतर मी एकटाच जेवलों. जेवण महाराष्ट्रीय पद्धतीचें होतें. दिवस उन्हाळ्याचे असले तरी थंडी खूप होती. सर्व भिंती अगदीं गारगार लागत होत्या. उन्हाळ्यांत सूर्य साडेनऊ ते दहाच्या दरम्यान मावळतो. म्हणून मी जरा फिरून येण्याचें ठरविलें. फिरून आल्यावर महाराष्ट्रीय लोकांची ओळख करून घेतली.

पहिले आठ दिवस मीं सर्व शहर पाहून घ्यायचें ठरविलें. शहरांतील प्रेक्षणीय स्थळांची यादी व रस्त्यांचा नकाशा असलेलें एक गाईड खरेदी केलें व लंडन पाहण्याला सुरुवात केली.

## जमिनीखालची रेल्वे

श्री. कानिटकरांच्या घरापासून तीन मिनिटांच्या अंतरावर एक बेलसाईज पार्क नांवाचें जमिनीखालून जाणाऱ्या रेल्वेचें स्टेशन आहे. या रेल्वेची वरून कांहीच कल्पना येत नाहीं. स्टेशनांत तिकीट देणारीं

माणसें व यंत्रें आहेत. यंत्रांत नाणें टाकलें असतां तिकीट व मोड मिळते. तिकीट घेऊन जवळच असलेल्या लिफ्टमध्यें बसलों. जवळ जवळ दीड मिनिट लिफ्ट खालीं जात होतें. फार खोल आहे ही रेल्वे. मीं लिफ्ट चालविणाऱ्या माणसाला 'रेल्वे किती खोल आहे' असें विचारलें. तो म्हणाला, " हें अंतर जवळ जवळ २०० ते २२५ फूट आहे." लिफ्ट थांबल्यावर मी प्लॅटफॉर्मवर गेलों. आपण इतक्या खालीं आहोंत याची जाणीवहि होत नाहीं. सूर्यप्रकाशासारखे दिवे, ताज्या हवेचा पुरवठा यामुळें प्रवाशांना आंत गुदमरल्यासारखें होत नाहीं. गाड्यांची जा-ये दर तीन चार मिनिटांनीं चालू असते. गाडी कोठून येत आहे व कोठें जात आहे हें प्रकाशित होणाऱ्या दिव्यावरून समजतें. थोडा वेळ मी गाड्यांची गम्मत पहात उभा होतों, इतक्यांत एका पाटीनें माझें लक्ष वेधून घेतलें. पाटीवर लिहिलें होतें–" स्टेशनवर जास्त वेळ विनाकारण थांबणाराला ५ पौंड दंड."

## धांवते जिने

या जमिनीखालून जाणाऱ्या रेल्वेच्या कांहीं स्टेशनवर धावते जिने आहेत. रहाटगाडग्याप्रमाणें हे जिने सारखे मंद गतीनें चालू असतात. चालणाऱ्या पायरीवर मनुष्य उभा राहिला कीं तो आपोआप वर येतो. वर येणाऱ्या जिन्याप्रमाणेंच खालीं जाणारेहि जिने आहेत. कांहीं ठिकाणीं आपोआप चालणारे लिफ्टस् आहेत. ठराविक वेळानें लिफ्टचे दरवाजे बंद होतात. लिफ्ट चालू होतें. लिफ्ट चालू होण्यापूर्वी दरवाज्यावरील लाऊडस्पीकरमधून दरवाजे बंद होत असल्याची सूचना मिळते.

ही जमिनीखालची रेल्वे गोल बोगद्यांतून गेली आहे. म्हणून हिला ट्यूब रेल्वे म्हणतात. ही रेल्वे पांच ठिकाणीं थेम्स नदीखालून गेली आहे. कांहीं दिवसानंतर मला या ट्यूब रेल्वेनें प्रवास करणें आवडेना. कारण एके ठिकाणीं गुप्त होऊन दुसऱ्या ठिकाणीं प्रकट होण्यासारखाच हा प्रकार होता. शहराची खरी शोभा पाहतां येईना

## लंडनचा भव्य चौक

पहिल्या प्रथम मी ट्रॅफलगार स्क्वेअरमध्यें गेलों. हें ठिकाण फार प्रेक्षणीय आहे. १६८ फूट उंचीच्या स्तंभावर १४ फूट उंचीचा नेल्सनचा पुतळा आहे. स्तंभाच्या चारी बाजूस मोठमोठे दगडी सिंह आहेत. शेजारींच दोन मोठीं कारंजीं आहेत. कारंजाचें पाणी १५ फूट उंच उडतें. आजूबाजूला झाडें लावलीं असल्यामुळें चौकाच्या सौंदर्यात अधिकच भर पडली आहे. या चौकांत पुष्कळ कबूतरें आहेत. तीं इतकीं माणसाळलेलीं आहेत कीं प्रवाशांच्या हातांतील धान्य हातावर बसून खातात. अंगाखांद्यावर कबूतरें बसलीं आहेत असे फोटो काढून घेणें इंग्लीश लोकांना बरेंच आवडत असावें असें दिसतें. कारण या चौकांत वीस बावीस फोटोग्राफर निव्वळ अशा तऱ्हेचे फोटो काढून व्यवस्थित कमाई करीत असतात.

## नेल्सनला टोपी घातली

ट्रॅफलगार चौकांतील खांबावरील नेल्सनच्या पुतळ्याविषयी मला एक गमतीदार हकीकत ऐकण्याला मिळाली. कांहीं विद्यार्थ्यांनीं इतक्या उंचीचा खांब चढून जाऊन नेल्सनच्या डोक्यावर एक टोपी घातली आणि हें सर्व काम त्यांनीं रात्रीं केलें. नेल्सनला टोपी घालणाऱ्या विद्यार्थ्यांचा खूप शोध केला. पण तो मिळाला नाहीं. विद्यार्थी मिळाला नसला तरी, त्यानें घातलेली टोपी मात्र अनेक दिवस तशीच होती व लंडनमध्यें तो एक चर्चेचा विषय होऊन बसला होता.

## नॅशनल आर्ट गॅलरी

ट्रॅफलगार स्क्वेअरजवळ नॅशनल आर्ट गॅलरी नांवाचें एक प्रचंड चित्र–संग्रहालय आहे. संग्रहालयाची इमारत भव्य आहे व अनेक खोल्यांतून शास्त्रीय पद्धतीनें चित्रांची रचना केली आहे. गेल्या

लढाईत हीं सर्व चित्रें सुरक्षित स्थळीं हलविलीं होतीं लढाई संपल्यानंतर चित्रें परत बसविण्याचें काम चाललें होतें. या संग्रहालयांत प्रसिद्ध चित्रकारांनीं काढलेलीं मोठमोठीं चित्रें आहेत. मला चित्रकलेंतलें कांहीं समजत नसलें तरी चित्रें पहात असतांना तीन तासांचा कालावधी कसा निघून गेला हें समजलें देखील नाहीं. अशा तऱ्हेच्या लहान मोठ्या आर्ट गॅलऱ्या डझनावारी लंडनमध्यें आहेत आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक गॅलरींत माणसांची गर्दी असते. कांहीं गॅलरींत प्रवेश करण्याला फी पडते; तर कांहीं ठिकाणीं प्रवेश विनामूल्य आहे.

## टॉवर ऑफ लंडन

आर्ट गॅलरीनंतर मी "टॉवर ऑफ लंडन" पाहण्यास गेलों ह्या टॉवर म्हणजे एक छोटासा भुईकोट किल्लाच आहे. इंग्लंडचा सारा इतिहास या टॉवरमध्यें भरला आहे. १३ एकराच्या आवारांत असलेल्या या टॉवरचें जेवढें वर्णन करावें तेवढें थोडेंच आहे. मी आंत गेलों. तेव्हां एक रक्षक टॉवरबद्दल माहिती सांगत होता. तो इतक्या तन्मयतेनें बोलत होता कीं त्याच्या शब्दांबरोबर आम्ही निरनिराळ्या शतकांतून प्रवास करीत होतों. "ब्लडी टॉवर" नावाच्या बुरुजाजवळ तो आला तेव्हां म्हणाला, "आजचा काळ विसाव्या शतकांतला आहे. आज ही भिंत जीर्ण झालेली दिसत असली तरी, चार शतकांपूर्वीं याच भिंतीवर कितीतरी लोकांचें रक्त सांडलें होतें. त्या वेळीं रक्ताच्या तुषारांनीं लाल झालेली भिंत त्या काळच्या राजकारणी लोकांच्या मनोवृत्तीचें खरें खुरें प्रतिबिंब आहे."

## इतिहासाचे अवशेष

टॉवरमधील वर्तुळाकार जिना चढून आम्ही वर गेलों. अनेक प्रकारचीं शस्त्रें तेथें होतीं. धनुष्यबाणापासून ते आधुनिक शस्त्रांपर्यंत सर्व कांहीं तेथें पाहाण्याला सांपडलें. पूर्वीचीं चिलखतें लाकडी

पुतळ्यांना घालून ठेवलीं होतीं व त्याखालीं हें चिलखत कोणी व केव्हां वापरलें याची माहिती लिहिली होती. लॉर्ड क्लाईव्हनें वापरलेलें पिस्तूल मला तेथें पहायला सांपडलें.

शस्त्राप्रमाणें पूर्वीचे कपडेसुद्धां या टॉवरमध्यें आहेत. इतके जुने कपडे; पण अगदीं व्यवस्थित असल्यामुळें नव्याप्रमाणें दिसतात. इमारतीच्या तळघरांत साखळदंड व तोफेचे गोळे आहेत. टॉवरच्या कांहीं इमारतीत संरक्षण करणाऱ्या लोकाचीं ऑफिसें आहेत व कांहीं भागांत मिलिटरी आहे. टॉवरमधील सर्वांत प्रसिद्ध भाग म्हणजे "रत्न–भांडार" किंवा ट्रेझरी म्हणतां येईल. या भागांत राजघराण्यांतील सर्व दागिने पाहण्याला मिळतात. सोन्याचे राजदंड हिऱ्यानें मढविले आहेत. लहानमोठे अनेक राजमुकूट येथें आहेत. राणीला देणग्या म्हणून आलेले अनेक हिरे या ठिकाणीं पहायला सांपडतात. राजमुकुटांत निरनिराळ्या रंगांचे हिरे चमकतांना दिसतात आणि त्यांतच आपला कोहिनूर हिराहि उठून दिसतो.

## श्री. लाटे यांचें बहुमोल सहाय्य

मी रोज लंडनमधील निरनिराळीं स्थळें पाहात होतों; पण माझ्या प्रयोगाबद्दल अजून कांहीच ठरलें नव्हतें. मीं कांहीं महाराष्ट्रीय लोकांना भेटलों; पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. कारण ते सर्व लोक आपापल्या कामांत गुंतलेले असत. लंडनचें आयुष्य विलक्षण धकाधकीचें आहे हेंच खरें. सर्व कामें अगदीं घड्याळाबरहुकूम चाललेलीं पहावयास सांपडतात. श्री. कानिटकरांनीं त्यांच्या खाणावळींत एक प्रयोग केला. तेथील लोकांनीं मला उत्तेजनार्थ चौदा पौंड दिले. त्यांची ही मदत मला फार उपयोगी पडली. मुंबईचे मोटार व्यापारी श्री. गरवारे यांच्याकडे एक तासाचा कार्यक्रम झाला व त्याचे पांच पौंड मिळाले.

श्री. कानिटकरांकडे लाटे नांवाचे महाराष्ट्रीय गृहस्थ आले होते. त्यांच्याशीं माझी ओळख झाली. देश पहाणें व प्रयोग करून दाखविणें याकरितां मी येथें आलों आहें, हें त्यांना

समजलें तेव्हां त्यांनीं मला सर्वतोपरी मदत करण्याचें कबूल केलें. श्री. लाटे यांचीं पन्नास साठ घरें लंडनच्या आसपास आहेत व आज बरेच वर्षांपासून ते येथें स्थाईक झाले आहेत. त्यांच्या सांगण्याप्रमाणें मी कानिटकरांकडील जागा सोडली व श्री. लाटे यांच्या एका बंगल्यांत रहावयाला गेलों. श्री. लाटे यांच्या प्रयत्नामुळेंच माझे टेलिव्हिजनमध्यें व एका व्हरायटी शो-मध्यें ट्रायल शो झाले. कांहीं इंग्लिश वर्तमानपत्रांतून माझ्याविषयीं माहिती प्रसिद्ध झाली व मला एका पार्टींत काम दाखविण्याची संधि मिळाली.

श्री. लाटे यांच्याविषयीं बरेंच लिहितां येईल. पन्नास साठ घरांचे मालक म्हणजे गंभीर चेहऱ्याचे व सदा कामांत गढलेले असे गृहस्थ असतील अशी माझी प्रथम कल्पना झाली होती. पण श्री. लाटे यांचा स्वभाव अगदीं याच्या विरुद्ध आहे. अनेक माणसांना तासन् तास हंसत ठेवण्याची कला त्यांच्या मिठ्ठास वाणींत आहे. विनोदाच्या मेजवानीप्रमाणेंच निरनिराळ्या हिंदी पक्वान्नांची मेजवानी देण्याला श्री. लाटे सदैव तयार असतात. मोदक, पुरणपोळ्या, जिलब्या इत्यादि पक्वान्नें तयार करण्यांत श्री. लाट्यांचा हातखंडा आहे. दर रविवारीं निरनिराळे पदार्थ बनविण्यांत लाटे कुटुंब अगदीं गढून गेलेलें असतें. हिंदी लोकांप्रमाणेंच अनेक इंग्लिश लोक येऊन श्री. लाटे यांच्याकडे हिंदी भोजनाचा समाचार घेत असतात.

## दिलदार महाराष्ट्रीय


एकदां माझा एका पार्टींत ट्रायल शो होता. मला एका साथीदाराची आवश्यकता होती. मीं श्री. लाटे यांना माझी अडचण सांगितली. त्यांनीं मला साथिदार देण्याचें कबूल केलें. मला वाटलें, श्री. लाटे आपल्या दहा बारा इंग्लिश नोकरांपैकीं एकाद्याला मदतीला देतील. पण ज्या वेळीं प्रत्यक्ष लाटे स्टेजवर मदत करण्याला उभे राहिले त्या वेळीं मला आश्चर्याचा धक्का बसला. माझ्या प्रयोगांत, कपाळा-



रहदारीला अडथळा न आणतां फुटपाथवर चित्र काढून
उदरनिर्वाह करणारा चित्रकार



इंग्लंडमधील कांहीं शेतकरी मित्रांबरोबर श्री. रघुवीर



टॉवर ऑफ लंडन. इंग्लिश लोकांच्या पराक्रमाचा सारा इतिहास या टॉवरमध्यें सांठविलेला आहे.



लंडनच्या एका प्रमुख चौकांत चाललेला जादूचा प्रयोग जादूगार आपल्या शिष्याला पोत्यांतून बाहेर येण्याला सांगतो व २५ रुपये मिळवितो.

वरच्या नाण्यावर एअरगनची गोळी मारून तें वाकवून दाखविणें हा प्रयोग आहे. हा प्रयोग रद्द करावा असें लाटे म्हणतील अशी माझी कल्पना झाली होती. पण त्यांनीं स्वतःच्या कपाळाला नाणें चिकटवून घेतलें व ते माझ्यासमोर उभे राहिले. बंदुकींतून गोळी सुटली व कार्यक्रम यशस्वी रीत्या पार पडला.

## पार्टी धरली व सोडली

'पेटेक्वॉलीन्स व्हरायटी शो' पार्टीशीं माझें ॲग्रिमेंट झालें. आठवड्याला १४ पौंड पगार ठरला व तालमींना सुरुवात झाली. बँडच्या तालावर रघुवीर कार्यक्रम करूं लागले व लोकांच्या टाळ्यांच्या कडकडाटांत स्टेजवर प्रवेश करूं लागले. आमच्या त्या पार्टींत ४० मुली होत्या व ८ पुरुष होते. मी एकटाच परदेशी होतों. बाकीचे सर्व युरोपियन होते. पार्टीतील गोंधळ सर्वत्र सारखेच. त्यांतून आमच्या पार्टींत स्त्रियांची संख्या जास्त असल्यामुळें पुरुषांना फार जपून वागावें लागे. माझे प्रयोग चांगले होत. त्यामुळें माझ्यावर खूष असलेल्या व्यक्तींची संख्या बरीच होती. जेमतेम कांहीं आठवडे पार्टींत काम केलें. या अवधींत नको ती पार्टी असें झालें. कारण पगार भरपूर मिळत असला तरी त्यांतून इन्कमटॅक्स बराच जात असे. परदेशी कलाकार म्हणून वरच्या दर्जाची राहणी ठेवावी लागे व आठवड्याच्या शेवटीं कांहीच शिल्लक रहात नसे. दुसऱ्या पार्टी-तले लोक कलाकारांना फोडतात. या तडाख्यांत मी सांपडूं नये म्हणून बाहेरून येणाऱ्या माणसाशीं मला बोलण्याला परवानगी नसे आणि एकादे वेळीं कोणी भेट घेतलीच तर कंपनीचा मनुष्य जवळ असे. एकंदर या सर्व प्रकाराला कंटाळून मीं पार्टी सोडली व खेडोपाडीं स्वतंत्रपणें कार्यक्रम करण्याचें ठरविलें. मीं पार्टी सोडली तेव्हां अनेक एजंटांनीं मला मोठ्या पगारांचीं आमिषें दाखविलीं. अर्थात् त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

## इंग्लंडमधील खेड्यांतील जीवन

खेडेगांवांतून हिंडायला सुरुवात केल्यामुळें अनेक इंग्लिश कुटुंबांत

राहाण्याची मला संधी मिळाली व इंग्लिश लोकांचें जीवन अगदीं जवळून पाहतां आलें.

इंग्लंडमधील खेड्यांत प्रयोग करणें अत्यंत सोपें. प्रत्येक खेडेगावांत पोलीस असतोच. प्रथम पोलीस चौकींत जाऊन पोलीसाकडून गांवांतल्या लोकांविषयीं माहिती काढून घ्यावयाची व एकाद्या वजनदार गृहस्थाचा पत्ता विचारावयाचा. खेड्यांतील वजनदार गृहस्थ म्हणजे 'पाटील' किंवा 'पब'चा (दारुगुत्त्याचा) मालक. पबच्या मालकाला जाऊन भेटल्यास तो तावडतोब कार्यक्रम करायला परवानगी देई व तशा अर्थाची नोटीस बोर्डावर बाहेर लावी. नोटीस बोर्डाच्या शेवटीं "कार्यक्रमानंतर हॅट कलेक्शन होईल" अशी एक ओळ असे. या पद्धतीमुळें मला बरेच पैसे मिळूं लागले. कार्यक्रम रात्रीं ८ वाजतां सुरू केल्यास बरेच पैसे मिळत. परंतु सुरुवात होण्याची वेळ एक तास पुढें ढकलली गेली कीं पैसे कमी मिळत. कारण लोकांचे बरेचसे पैसे बियर पिण्यांत खर्च होत. तें कांहींही असलें तरी, या 'हॅट–कलेक्शन'मुळें माझ्या शिलकेंत बरीच भर पडली. शिवाय कार्यक्रमानंतर जेवणाचीं व राहण्याचीं आमंत्रणें येऊं लागलीं. ज्या गांवांत अशी सोय होत नसे तेथें पोलीस चौकीमध्यें झोंपण्याची व्यवस्था होत असे. इंग्लंडमधील बहुतेक पोलीस चौकींतून प्रवाशाकरितां एकादी कॉट ठेवलेली असते. गांवांत आग लागली अगर घरांत कोणाचें भांडण झालें तर त्या घरांतील व्यक्तीस या कॉटचा उपयोग करण्यास परवानगी असे.

## प्रेमळ इंग्रज

खेड्यांत असतांना दुपारच्या वेळीं मी शेतकऱ्यांबरोबर शेतांत काम करीत असे. या कामाबद्दल मला ताशी दीड शिलिंग (सुमारें १ रुपया) मिळत असे. काम सोपें; पण तें सतत करावें लागे. शेतावरचीं होईंग, हे मेकिंग, थ्रशिंग इत्यादि कामें मीं थोड्याच अवधींत आत्मसात केलीं. शेतांत काम करीत असतांना पाऊस आल्यास रेन कोट घालून काम करावें लागे अगर पाऊस थांबेपर्यंत झाडाखालीं उभे

रहावें लागे. सायंकाळीं कामावरून घरीं आल्यावर शेतकरी कुटुंबांत माझी चांगलीच सरबराई ठेवली जात असे. प्रत्येक पदार्थ अगदीं आग्रह करून वाढला जाई. एकादे वेळीं जेवण कमी गेलें तर 'प्रकृति ठीक आहे ना ? कांहीं होत नाहीं ना ?' अशी चौकशी केली जाई. बेनसन येथें एका शेतकऱ्याकडे मुक्काम असतांना माझें डोकें दुखत होतें. त्या वेळीं त्यानें स्वत: माझ्या डोक्याला बाम चोळला. एका परदेशी प्रवाशाबद्दल इतकें प्रेम दाखवितांना या इंग्लिश लोकांना पाहिलें कीं त्यांच्या वागणुकीला कसली उपमा द्यावी हेंच समजेनासें होतें

## हिरवळीवरील गप्पा

इंग्रज शेतकरी काम करायला जितका काटक तितकाच तो कलेचा भोक्ता आहे. प्रत्येक खेडेगांवाची रचना आकर्षक असते. शेतकरी आपलें घर अगदीं अद्यावत् साधनांनीं सुसज्ज ठेवतो. खेडेगांव असलें तरी कोठेंहि घाण दिसणार नाहीं. जिकडे पहाल तिकडे स्वच्छता. कागदाचा तुकडा टाकावयाचा असेल तरी तो प्रत्येकजण रस्त्याच्या कडेला असलेल्या टोपलींत टाकील. टोपली-बाहेर कागद टाकणें म्हणजे गुन्हा करणें अशी त्यांची समजूत होऊन बसली आहे. गांवाच्या मधोमध हिरवळ असते. हिला व्हिलेज ग्रीन म्हणतात. याच हिरवळीवर सायंकाळच्या वेळीं खेडूत फिरावयाला येतात व आपल्या सुखदु:खाच्या गप्पा मारतात. पिकावर झालेल्या नवीन संशोधनावर चर्चा करणें, देशांत व परदेशांत चाललेल्या राजकीय घडामोडींची माहिती एकमेकांना सांगणें इत्यादि गोष्टी तेथें घडत असतात. हिरवळीवर झालेली चर्चा हां हां म्हणतां गांवांत पसरते. जणू एक प्रकारचें 'बोलकें वर्तमानपत्र' अशी उपमा या हिरवळीला देतां येईल. अर्थात् कांहीं वेळां एकमेकांना नांवें ठेवण्याचे अगर कुचाळक्या करण्याचे प्रकार येथेंच घडत असतात हें निराळें सांगणें नको.

## फिरतें वाचनालय

ज्या खेड्यांत दवाखाना नसेल तेथें सरकारी फिरत्या

दवाखान्याची मोटार आठवड्यांतून दोन वेळां येते. दवाखान्याप्रमाणेंच वाचनालयाची मोटारसुद्धां आठवड्यांतून दोनदां येते. मोटार येतांच शेतकरी पुस्तकें बदलून घेतात. ज्या शेतकऱ्यांना मोटार येण्याच्या वेळी थांबायला सवड नसेल तो पोलीसाजवळ आपलें वाचलेलें पुस्तक व नवीन हव्या असलेल्या पुस्तकाच्या नांवाची चिठ्ठी देतो. मोटार आल्यानंतर पोलीस नवीन पुस्तकें घेऊन ठेवतो व सायंकाळीं शेतकरी ती घरी नेतात.

## 'खेड्याकडे चला'

जगांतल्या सर्व देशांत तरुणांचा ओढा शहरांत राहण्याकडे वाढत आहे. मग त्याला ब्रिटन तरी कसें अपवाद असू शकेल? तरुणांचा शहराकडे धांव घेणारा लोंढा थांबविण्याकरितां येथें अनेक प्रयत्न चालू आहेत. मुख्य प्रयत्न म्हणजे दर आठवड्याला खेडुतांना नवीन नवीन सिनेमा दाखविला जातो. त्यांचीं घरें कीटकांपासून संरक्षित व्हावींत म्हणून डी. डी. टी. सारख्या द्रव्यांचे फवारे उडविले जातात. रेडीओ, टेलिव्हिजनसारखीं करमणुकीचीं साधनें त्यांना सवलतीच्या दरांत दिलीं जातात. इतकेंच नव्हे तर, 'शहरवासीयांनो, खेड्यांत जा' असा प्रचारहि केला जातो.

## हातानें जेऊन दाखवा!

माझा मुक्काम ऑक्सफर्डशायरमधील एका खेड्यांत असतांना एक मजेशीर प्रकार घडला. तेथील शाळेंतील हेडमास्तरांनीं मला बोलावणें पाठविलें व मुलांना हिंदुस्थानविषयीं माहिती सांगण्याची विनंति केली. मीं सुमारें एक तासभर हिंदुस्थानविषयीं माहिती सांगितली; मराठी, हिंदी, गुजराथी भाषा बोलून दाखविल्या व एक गाणें म्हणून दाखविलें. भाषणाच्या शेवटीं मुलांनीं अनेक प्रश्न विचारले. हिंदी विद्यार्थी, हिंदी लग्नपद्धति, भिकारी आणि वाघ, सिंह व साप या विषयावर बहुतेक प्रश्न होते. भाषणाचा कार्यक्रम संपल्यानंतर हिंदी लोक मांडी कशी घालतात व हातानें कसें जेवतात

हें दाखविण्याविषयीं विनंति केली. मी टेबलावर मांडी घालून बसलों. माझ्यापुढें राईस पुडींग ठेवलें होतें. पुडींगमध्यें मुद्दामच दूध जास्त घातलें होतें. मीं हात धुवून जेवायला सुरुवात केली व भराभर डिश-मधील भात खाऊन दाखविला. माझें जेवण झालें तेव्हां कांहीं मुलांनीं माझ्या हाताचा पंजा तपासला. त्यांना वाटलें होतें, ज्या अर्थी माझ्या हातांतून भात सांडत नाहीं, त्या अर्थी माझ्या बोटांमध्यें बदकांप्रमाणें पातळ पडदा असला पाहिजे; पण माझे हातहि त्यांच्या हाताप्रमाणें साधे आहेत हें त्यांना दिसलें, तेव्हां बऱ्याच लहान मुलांना आश्चर्य वाटलें.

## शिक्षित पण देवभोळा

युरोपियन शेतकरी सुशिक्षित असला तरी देवभोळा आहे. भुतां-खेतांच्या अनेक गोष्टी शेतकऱ्यांत प्रचलित दिसल्या. आठवड्यांतून दोन तीन वेळां चर्चमध्यें जाणें व आपल्या कुटुंबियांना सुखी ठेवण्या-बद्दल प्रार्थना करणें इत्यादि गोष्टी करणारे बरेच शेतकरी आहेत. गांवावर अगर देशावर संकट आल्यास सामुदायिक प्रार्थना करण्याची प्रथा युरोपांत प्रचलित दिसली. इतकेंच नव्हे, तर मुलगा आजारी असल्यावर खेडूत स्त्री औषध आणतांना चर्चमध्यें जाऊन प्रार्थना करून आल्याशिवाय राहाणार नाहीं. तरुणांचा देवावर कमी विश्वास असणें व म्हाताऱ्या माणसांनी तरुणांना नांवें ठेवणें हा प्रकार येथेंसुद्धां पाहण्यास सांपडतो.

## ‘ मे क्वीनची ’ निवड

युरोपियन शेतकऱ्यांत एकी फार. कोणताहि सण ते अगदी एकत्र मिसळून आनंदानें साजरा करतील. सणाच्या वेळीं आपसांतील हेवे दावे विसरून ते सर्वजण हिरीरीनें भाग घेतात. त्यांचा उन्हाळ्यांतील आवडता दिवस म्हणजे मे महिन्यांतील पहिला शनिवार होय. या दिवशीं सर्व लोक उन्हाळ्याचें स्वागत करण्याकरितां ‘ व्हिलेज ग्रीन-’ वर जमतात. हिवाळा संपून उन्हाळा आला, या एकाच आनंदांत

सर्व लोक असतात. मैदानांत मध्यभागीं एकेक खांब पुरलेला असतो. त्याला 'मे पोल' म्हणतात. कांहीं ठिकाणीं या मेपोलची प्रचंड मिरवणूक काढण्याची प्रथा आहे. मैदानांत रोवलेल्या खांबाच्या वरच्या बाजूला दोर बांधलेले असतात. दोराचें दुसरें टोंक हातांत धरून मुली नाच करतात व गाणी म्हणतात. नाचतां नाचतां दोराचा गोफ विणला जातो. नाचगाण्यानंतर 'मे क्वीन' निवडण्याचा समारंभ होतो. या स्पर्धेकरतां गांवांतील सुंदर मुली निरनिराळे पोषाख करून आलेल्या असतात. सुंदर मुलीची निवड पंच करतात व ती मुलगी त्या वर्षाची 'मे क्वीन' म्हणून ओळखली जाते. तिच्या डोक्यावर फुलांचा मुगुट घालतात व गांवांतून तिची मिरवणूक निघते.

## विद्यार्थ्यांच्या सहवासांत

शेतकऱ्यांचीं करमणुकीचीं साधनें अनेक, तसे व्यवसायसुद्धां अनेक. फावल्या वेळीं डुकरें, कोंबड्या व ससे पाळणें हे व्यवसाय नित्याचेच आहेत. हंगामाच्या वेळीं शेतकऱ्यांना शेतांत खूप काम करावें लागतें. अशा वेळीं शहरांतून बरेच विद्यार्थी शेतकऱ्यांच्या मदतीकरतां येतात. 'लेंड युवर हँड ऑन दि लँड' असा प्रचार करणारी एक सरकारी संस्था आहे. या संस्थेमार्फत विद्यार्थी निरनिराळ्या शेतावर काम करायला जातात. मी बेनसन या गांवीं असतांना केंब्रीजचे बरेच विद्यार्थी शेतावर काम करण्याकरितां आले होते. त्यांचा कॅंप एका जुन्या विमानतळाच्या रिकाम्या इमारतींत होता. मी जादूगार आहें हें समजतांच मला कॅंपवर येण्याचा त्यांनीं आग्रह केला. माझ्या शेतकरी मित्राची परवानगी काढून मी कॅंपवर गेलों. मी ज्या दिवशीं कॅंपवर गेलों त्याच दिवशीं रात्रीं माझा कार्यक्रम झाला. सर्व विद्यार्थ्यांना तो इतका आवडला कीं त्यांनीं मला कॅंप संपतांच केंब्रीजला येण्याचें आमंत्रण दिलें. बेनसन येथील विद्यार्थ्यांच्या कॅम्पमध्यें मी तीन दिवस होतों. शेवटच्या दिवशीं बियरची पार्टी झाली व रात्रीं सर्व विद्यार्थी–विद्यार्थिनी गांवाबाहेर गाणीं म्हणत फिरायला गेले. मी त्यांच्याबरोबर होतोंच. 'डाऊन डाऊन

दि स्ट्रॅन्ड ' हें खाणी कामगारांचें गाणें किंवा ' हा हा हा हा ही ही ही लिट्ल वन ब्राऊन जग ' वगैरेसारखीं लोकगीतें मला त्या वेळीं प्रथमच ऐकायला मिळालीं. अगदीं थोडयाशा संवयीनें गाण्याचें पालुपद मी सुद्धां खडया आवाजांत म्हणूं लागलों.

## इंग्लंडमधील पुणें

वेनसन येथील कॅंप संपवून मी ऑक्सफर्ड येथें रहात असलेल्या माझ्या मिलर नांवाच्या मित्राला भेटण्याकरितां गेलों. मला ऑक्सफर्ड गांव फारच आवडलें. हें गांव म्हणजे भारतांतलें पुणें शहर आहे. लहान लहान रस्ते, आजूबाजूची गर्द झाडी व जवळून वाहणारी नदी पाहून मला पुण्याची आठवण होई. या गांवांत २६ कॉलेजें आहेत. पैकीं ४ कॉलेजें निव्वळ मुलींकरतां आहेत व बाकीच्या कॉलेजांतून मुलें–मुली एकत्र शिक्षण घेत आहेत. सर्वांत जुन्या कॉले-जांत सर्व प्रसिद्ध विद्यार्थ्यांच्या खोल्या ठेवल्या आहेत व प्रत्येक खोलींत कोण कोण प्रसिद्ध लोक रहात होते त्यांचीं नांवें तेथें लिहून ठेवलीं आहेत. याच कॉलेजांत रात्रीं ९ वाजतां घंटेचे १०१ ठोके वाजविले जातात. कारण जेव्हां हें कॉलेज सुरू झालें तेव्हां त्यांत फक्त १०१ विद्यार्थी होते व त्यांच्या स्मृतीकरतां म्हणून हे ठोके वाजविले जातात. अनेक भारतीय विद्यार्थी निरनिराळ्या कॉलेजांतून शिक्षण घेत आहेत व त्यांची तेथें एक छोटी संघटना आहे.

## शाळांतून कार्यक्रम

ऑक्सफर्ड येथें असतांना सहज विचार आला कीं येथील कांहीं शाळेंतून आपण कार्यक्रम केल्यास शालेय जीवनाची बरीच माहिती मिळेल व पैसेहि मिळतील. परंतु हे कार्यक्रम ऑक्सफर्ड येथें न करतां लंडनला करावयाचें ठरविलें व मी परत लंडनला गेलों. शाळेंत कोणताहि कार्यक्रम करावयाचा असेल तर लंडन कौन्टी कौन्सिलला भेटावें लागतें. त्यांचे चार सभासद कार्यक्रम चांगला आहे कीं नाहीं

याची खात्री करून घेतात व कलाकाराला योग्य त्या सूचना देऊन शाळांतून हिंडण्याची परवानगी देण्यांत येते. मला कार्यक्रम करण्याची परवानगी मिळाली.

मी ज्या शाळेंतून गेलों त्यांत बहुतेक ठिकाणीं छोटासा हॉल होता. ज्या शाळांतून हॉल नव्हते तेथें व्हरांड्यामध्यें अगर बागेंत कार्यक्रम करावा लागला. माझ्या कार्यक्रमाविषयीं विद्यार्थ्यांत बरेंच कुतुहल होतें. कार्यक्रम कसा पहावा याचें ज्ञान विद्यार्थ्यांना असल्याचें दिसलें. कारण प्रत्येक प्रयोगाच्या शेवटीं टाळ्या वाजविणें, प्रत्येक प्रयोग चौकस दृष्टीनें पाहणें इत्यादि गोष्टी इंग्लीश विद्यार्थ्यांच्या बद्दल नमूद करण्यासारख्या आहेत. विद्यार्थ्यांना "गप्प बसा" असा हुकूम शिक्षकांना द्यावा लागत नसे. कार्यक्रमाच्या शेवटीं "आम्हाला तुम्ही हे प्रयोग शिकवाल का ?" असा प्रश्न आपल्याकडील विद्यार्थ्यांप्रमाणें हे विद्यार्थीसुद्धां विचारीत. त्यांतल्या त्यांत माझ्या धनुर्विद्येबद्दल सर्वांना आश्चर्य वाटत असे.

## शिक्षणांतील विविधता

इंग्लंडमधील शाळा सकाळीं ९ वाजतां सुरू होतात व सायंकाळीं ४ वाजतां मुलें घरीं येतात. दुपारचें जेवण अगदीं थोड्या मोबदल्यांत विद्यार्थ्यांना मिळण्याची सोय शाळेतर्फे केलेली असे. शाळेंत अभ्यासाप्रमाणें थोडें धंदेशिक्षणहि दिलें जातें. बागकाम, मातकाम, सुतारकाम इत्यादींच्या शिक्षणाला शाळेंतूनच सुरुवात होते. हायस्कूलमधील मुलांना तर अनेक विषयांचें शिक्षण घ्यावें लागतें. झाडावर चढणें, डोंगर चढणें, स्केटिंग व दोरावरून चढणें हे कांहीं विषय नमुन्यादाखल सांगतां येतील. डोंगर चढण्याचें शिक्षण देण्याकरतां खास शिक्षक असतात. शिक्षक विद्यार्थ्यांना घेऊन गांवाबाहेरच्या डोंगरावर जातात व अवघड कड्यावर चढण्याचें शिक्षण त्यांना देतात. हेच आजचे छोटे वीर भावी कालांत गिर्यारोहक होतील याची कल्पना सर्वांना असते व प्रत्येकजण त्या दृष्टीनें प्रयत्न करीत असतो.

## मोटारींचे नंबर टिपण्याचा छंद

निरनिराळ्या ठिकाणीं सफरी काढणें हें इंग्लिश जीवनाचें वैशिष्ठ्य म्हणतां येईल. वर्षांतून दोन वेळां संपूर्ण शाळेची सफर निघते. सफरींत सर्व विद्यार्थी मनापासून भाग घेतात. सफरीला निघालेल्या विद्यार्थ्यांजवळ लहान लहान वह्या असतात. त्यावर प्रवासांत आलेले अनुभव व प्रेक्षणीय स्थळाविषयीं माहिती लिहिलेली असते. सफरी-मध्यें कांहीं विद्यार्थी झाडांचीं पानें गोळा करीत असतांना दिसले. मुद्दाम केलेल्या वहींत प्रत्येक झाडाचें पान व्यवस्थित बसविलें जातें. पानाखालीं थोडक्यांत त्या झाडाची माहिती लिहिलेली असते. मुलांच्या या छंदाला शिक्षक उत्तेजन देतांना दिसतात. इंग्लिश विद्यार्थ्यांशीं माझा जसजसा जास्त संबंध आला तसे त्यांचे अनेक छंद माझ्या ध्यानांत आले. पोष्टाची तिकिटें जमविणें व पत्ते जमविणें हे नेहमींचे छंद झाले. या छंदापेक्षां अनेक गमतीदार छंद येथील मुलांना आहेत. सुटीच्या दिवशीं रस्त्याच्या कोपऱ्यावर शाळकरी विद्यार्थी बसलेले दिसतील. हे सर्व विद्यार्थी जाणाऱ्या येणाऱ्या मोटारींचे नंबर टिपण्यांत गढून गेलेले असतात. मीं एका शिक्षकांना 'या विचित्र छंदाचा उपयोग काय?' असा प्रश्न विचारला. त्यांनीं जें उत्तर दिलें तें खरोखरीच मननीय होतें. ते म्हणाले, "आजचे हे विद्यार्थी उद्याचे नागरिक आहेत. यांच्यापैकीं कांहीं मुलें पोलीस खात्यांत नोकरी करण्याकरितां जातील. धावणाऱ्या वाहनांचे नंबर टिपण्याचें काम पोलीसांना अनेक वेळां करावें लागतें आणि हें काम वाटतें तितकें सोपें नाही. धावणाऱ्या वाहनांचा नंबर चटकन् टिपतां यावा म्हणून विद्यार्थ्यांना आतांपासूनच शिक्षण दिलें जातें. पोलीसा-प्रमाणेंच या गोष्टीची नागरिकांना सुद्धां आवश्यकता आहे. एकादा ड्रायव्हर अॅक्सीडेंट करून पळून जात असेल तर, त्याच्या वाहनाचा नंबर नागरिकांनीं लिहून तो पोलीसांना कळविण्याची जबाबदारी नागरिकांवरच असते."

मुलांना असलेल्या या नानाविध छंदांची चढाओढ वर्षांतून एकदां घेतली जाते व त्यांत उत्तीर्ण होणाऱ्या मुलांना बक्षीसें दिलीं जातात.

## मुलींचे विलक्षण छंद

मुलांच्या छंदाप्रमाणेंच कांहीं मुलींचेहि छंद मला नाविन्यपूर्ण वाटले. केंटमधील एका मुलीनें आपल्या सुटीचा काळ 'बायका मेकप करण्यांत रोज किती वेळ खर्च करतात' हें शोधून काढण्याकडे खर्च केला. तिनें निरनिराळ्या वयाच्या ३०० स्त्रियांचें निरीक्षण केलें व पुढील अनुमान काढलें. ती म्हणते, "१२ ते १७ वयाच्या मुली रोज ६ मिनिटें आरशासमोर वेळ घालवितात. १८ ते २५ या वयाच्या स्त्रिया रोज ३० मिनिटें खर्च करितात. २६ ते ३५ वयाच्या स्त्रिया रोज ३५ मिनिटें खर्च करतात आणि ३६ ते ४५ वयाच्या स्त्रियांचीं रोज ४७ मिनिटें खर्च होतात. यानंतर मात्र वेळेचें प्रमाण खालीं घसरूं लागलें. ४६ ते ६० वयाच्या स्त्रिया जेमतेम दहा बारा मिनिटें मेकप करण्यांत घालवितात. यापुढील वयाच्या स्त्रिया मेकप न करण्याकडे लक्ष देतात." शेवटीं दोन ओळींत ती लिहिते, "३६ ते ४५ वयाच्या स्त्रिया सर्वांत जास्त वेळ खर्च करतात. याचें कारण म्हणजे त्या वेळीं त्यांच्या तारुण्याला ओहटी लागलेली असते व ती लोकांच्या नजरेंत येऊं नये म्हणून त्या इतका वेळ खर्च करीत असाव्यात. त्याचप्रमाणें म्हाताऱ्या स्त्रियांना आरशांत पाहतांना तारुण्याची आठवण असह्य होत असेल; म्हणून त्या मेकप करण्याची टाळाटाळ करीत असाव्यात."

मुलीच्या या अनुमानाबद्दल अनेक वर्तमानपत्रांतून चर्चा झाली होती व तिची स्तुति करणारें बरेंच लिखाण प्रसिद्ध झालें होतें.

## स्वावलंबी कॉलेज विद्यार्थी

विद्यार्थ्यांचें सामान्य ज्ञान इतकें चांगलें असलें तरी कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचें प्रमाण मात्र फारच थोडें आहे. जेमतेम शेंकडा ७ विद्यार्थी कॉलेजमध्यें जातात व बाकीचे निरनिराळ्या व्यवसायांत पदार्पण करतात. कॉलेजमध्यें गेलेल्या विद्यार्थ्यांचा अभ्यास केल्यास मोठी गंमत दिसते. लंडन युनिव्हर्सिटींत सध्य

ठा. ग्रं. स्थळप्रत.



अठरा हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांपैकीं बारा हजार विद्यार्थी सरकारी अगर तत्सम स्कॉलरशिप्स घेऊन शिकत आहेत व बाकीचे फी भरण्याची ऐपत असून हुषार असलेले विद्यार्थी आहेत. वडील श्रीमंत असले तरी, मुलांचें शिक्षण करणें त्यांना तितकेसें परवडत नाहीं. म्हणूनच कॉलेज विद्यार्थी फावल्या वेळीं लहान सहान कामें करतांना दिसतात.

विद्यार्थी फावल्या वेळी जीं कामें करतात त्या कामांचें स्वरूप पुढीलप्रमाणें असतें. दूध घालणाऱ्या गवळ्याला मदत करणें; लोणी, पाव अंडीं विकणाऱ्या लोकांबरोबर जाऊन निरनिराळ्या घरीं माल पोचविणें; सिनेमाला गेलेल्या माणसांचीं मुलें संभाळणें इत्यादि कामें मुलें करीत असतात. त्याबद्दल त्यांना ताशीं पांच आण्यापासून ते दीड रुपयापर्यंत मोबदला मिळत असतो. आमच्या घरीं दूध घालायला येणाऱ्या मुलाला पैशाच्या विनियोगाबद्दल मीं विचारलें. तो म्हणाला, " माझ्या शाळेला फी नाहीं. परंतु हे सर्व पैसे मी माझीं पुस्तकें, वह्या व इतर सामानाकरतां जमवितों. उरलेले पैसे ट्रिपच्या वेळीं अगर गांवांत भरणाऱ्या जत्रेच्या वेळीं खर्च करतों. हे सर्व पैसे मी माझ्या आईजवळ ठेवतों. "

## मजुरांचें जीवन अनुभवलें

लंडनच्या मुक्कामांत मला विद्यार्थी जीवनाविषयीं बरीच उपयुक्त माहिती मिळाली. मजुरांची माहिती मिळविण्याकरतां मला एका कारखान्यांत नोकरी करावयाची होती व त्याकरतां श्री. लाटे यांच्या संमतीनें स्टॅन्डर्ड टेलीफोन कंपनींत अर्ज केला होता. त्या अर्जाचें ताबडतोब उत्तर आलें व मला प्लॅस्टीक मोल्डर म्हणून नोकरी मिळाली.

## कारखान्यांतील पहिला दिवस

कारखान्यांत नोकरी मिळाल्याबरोबर मी लंडनहून सिडकप या गांवीं गेलों. सिडकपला श्री. नोलन यांच्या कुटुंबांत माझी राहण्याची

सोय झाली व तेथून फूटस्क्रे या गांवीं वसनें मी कारखान्यांत कामाला जात असे. ३५०० मजूर काम करीत असलेल्या त्या कारखान्यांत प्रवेश करीत असतांना छाती धडधडत होती. कारण तेथील सर्व गोष्टी मला नवीन होत्या. इंग्लीश मजुरांइतकें सफाईदार काम जमेल कीं नाहीं याची शंका होती. माझ्या सेक्शनमध्यें मी गेलों. मोल्डिंग खात्यांत ५२ प्रेस होते व जवळ जवळ ६० माणसें काम करीत होतीं. मी आंत गेल्यावर एका गृहस्थांनीं, मजूर कपडे कोठें ठेवतात, कोठें जेवतात हें दाखविलें. मला कोट काढायला सांगण्यांत आलें. मीं निळसर रंगाचा डगला अंगावर चढविला. माझ्या बरोबर आलेल्या माणसानें सांगितलेल्या प्रेसजवळ जाऊन उभा राहिलों. या मोल्डिंग खात्यांत उष्णता फार होती. प्रत्येक प्रेसचें उष्णतामान ३८० फॅरनहॅट होतें. इतक्या प्रचंड उष्णतामानाच्या जागीं काम करण्याचा माझा तो पहिलाच प्रसंग. त्यामुळें कामाला सुरुवात करतांच जरा घेरी आल्यासारखें झालें. मी प्रेसशेजारीं असलेल्या खुर्चीवर बसलों. मला काम शिकविणारा माणूस म्हणाला, " येथें नवीन येणाऱ्या प्रत्येक माणसाला असें होतें. याचें कारण म्हणजे प्रेसची उष्णता व पावडरीचा विशिष्ट प्रकारचा वास. "

प्रेसवरचें काम समजावून घेण्याला सुमारें एक तास लागला व नंतर मी स्वतंत्रपणें काम करूं लागलों. चहाची सुटी झाली तेव्हां एका मजुरानें मला पेला आणून दिला. येथें प्रत्येक मजुराला अशा तऱ्हेचा पेला घरुन आणावा लागतो. चहाच्या सुटीच्या वेळांत सर्व मजुरांचा घोळका माझ्या भोंवतीं जमला. त्यांनीं मला अनेक प्रश्न विचारले. एक हिंदी माणूस अशा तऱ्हेचें काम हौसेनें करायला आलेला पाहून बहुतेकांना आश्चर्य वाटलें. मजूर म्हणत, या कारखान्यांत सर्वांत अवघड व त्रासाचें काम याच खात्यांत आहे. पण पैसेसुद्धां येथेंच जास्त मिळतात. माझ्याभोंवतीं जमलेल्या घोळक्यांतील तीन चार मजूर लढाईच्या वेळीं हिंदुस्थानांत आले होते. त्यांनीं माझ्याशीं मोडक्या तोडक्या हिंदी भाषेंत बोलण्याचा प्रयत्न केला. मजुरांच्या आपुलकीच्या वागणुकीमुळें मला या खात्यांत निश्चितपणें काम करतां येईल असा आत्मविश्वास उत्पन्न झाला.

इंग्लीश मजुरांची भाषा अगदींच गांवढळ. परक्या माणसाला ती समजणें कठीण. कांहीं प्रसंगीं मजुरांनीं सांगितलेल्या लांबलचक गोष्टीतील फक्त वोटावर मोजण्याइतके शब्द समजत आणि या शब्दांच्या आधारावर गोष्टीचा अर्थ जुळवावा लागे मजूर भाषा बोलतांना अपभ्रष्ट शब्द फार वापरतात. पण थोड्या संवईनें मजुरांची भापा सुद्धां समजू लागते.

चौकस दृष्टीनें मजुरांच्या जीवनाकडे पाहिल्यास तें तितकेसें चांगलें नाहीं, असें म्हणावें लागेल. मात्र इतर देशांच्या मानानें तेथील मजुरांनीं आपली बरीच प्रगति करून घेतली आहे हें खरें. मजुराला दर आठवड्याला सर्वसाधारणपणें ५ ते ७ पौंडांच्या दरम्यान पगार मिळतो. हाच पगार ओव्हरटाईम केल्यास ८ ते ९ पौंडापर्यंत मिळू शकतो.लग्न झालेले बहुतेक मजूर ओव्हर टाईम काम करतात. कारण त्यांना मिळणारा पगार पुरत नाहीं. येथील प्रत्येक मजूर इन्कम्-टॅक्स भरीत असला तरी बँकेंत भरपूर शिल्लक असलेले मजूर सांपडणें कठीण. सुरुवातीला मला कामाचा त्रास झाला, पण नंतर मी ब्रिटिश मजुरांच्या बरोबरीनें काम करूं लागलों.

मला वाटलं, मजुरांमध्यें राजकारणावर वादविवाद ऐकण्याला मिळतील; पण या बाबतींत माझी संपूर्ण निराशा झाली. दीड वर्षाच्या मुक्कामांत एकदांहि राजकारणावर झालेली चर्चा ऐकायला मिळाली नाहीं. मजूर परक्या माणसासमोर राजकारणावर चर्चा करीत नसतील; पण तसेंहि नाहीं. मी मजुरांच्या घरीं गेलों; त्यांच्या-बरोबर ट्रीपला गेलों; पण कोठेंही राजकारणावर चर्चा ऐकली नाहीं. माझी ही शंका मीं लंडनमध्यें स्थायिक झालेल्या डॉक्टर कौल यांना विचारली. ते अनेक वर्षें इंग्लंडमध्यें रहात आहेत. तरीसुद्धां निवडणुकीच्या दिवसाव्यतिरिक्त इतर वेळीं रस्तोरस्तीं मजुरांचे वादविवाद त्यांना ऐकायला मिळाले नव्हते. जी गोष्ट मजुरांची, तीच शाळाकॉलेजमधील विद्यार्थ्यांची सांगतां येईल.

## मजुरांचीं घरें

निरनिराळ्या प्रसंगीं बऱ्याच मजुरांनीं कार्यक्रम करण्याकरतां मला घरीं बोलाविलें. बहुतेक मजुरांचीं घरें स्वच्छ दिसलीं. छोटेखानी घर; पण त्यांत रेडीओ, पियानो व मागच्या अगर पुढच्या बाजूला छोटीशी बाग. या गोष्टी हमखास असावयाच्याच. कांहीं मजुरांनीं थोडे थोडे पैसे सांठवून टेलिव्हिजन सेट्स खरेदी केलेले दिसले. सुटीचा उपयोग बागेंत काम करण्याकडे केला जातो. घरीं आलेल्या पाहुण्याचें स्वागत जो तो आपल्या कुवतीप्रमाणें करतो. विनाकारण ऋण काढून सण करण्याची प्रथा नाहीं. रेडीओवर रात्रीच्या बातम्या बहुतेक मजूर ऐकतात. कांहीं मजूर अत्यंत गरीब आहेत. त्यांना रेडीओ घेणें परवडत नाहीं. अशा मजुरांना गांवांतील एकाद्या रेडीओच्या मोठ्या दुकानांतून स्पीकरद्वारें कार्यक्रम ऐकविले जातात. या स्पीकरचें भाडें महिना ३ शिलिंग असतें.

## कारखान्यांतील सुखसोयी

आमच्या विभागांत इतके मजूर होते तरी त्यांच्यावर देखरेख करणारा एकहि मुकादम नव्हता. एक 'चार्ज हँड' होता. तो मशीन बिघडलें तर दुरुस्त करीत असे. प्रत्येक मजूर आपलें काम चोख बजावी. मजूर आपण होऊन काम करण्याचें कारण म्हणजे येथील काम वाटण्याची पद्धती होय. कारखान्यांतील प्रत्येक मशीनला दर ( रेट ) असतो. दर याचा अर्थ प्रत्येक मजुरानें किती काम करावयाचें तें ठरविलेलें असतें. हा कामाचा दर काढण्याची पद्धत म्हणजे नवीन मशीन बसवितांच कारखान्याचा मालक एक माणूस घेऊन येतो. हा मनुष्य त्या मशीनवर सुमारें ३।४ तास काम करतो. त्यानें केलेल्या कामाची सरासरी काढली जाते व ती सरासरी म्हणजे त्या मशीनचा दर होय. जो मजूर या सरासरीपेक्षां जास्त काम करील त्याला जास्त पैसे मिळतात व जास्त पैसे मिळविण्याकरितां मजूर कामावर अक्षरशः तुटून पडतात.

## मजुरांचे आवडते खेळ

मजुरांत राजकारणावर गप्पा चालत नाहींत, तर मग येथील मजूर बोलतात तरी काय ? अशी शंका येण्याची शक्यता आहे. मजुरांचा आवडता विषय म्हणजे फूटबॉल पूल. फूटबॉल पूल म्हणजे फूटबॉलच्या खेळावर चालणारा जुगार. या जुगाराला कायद्यानें बंदी नाहीं. त्यामुळें त्याचें लोण सर्व थरांतील लोकांत पसरलेलें आहे. दर आठवड्याला २०।२५ फूटबॉलच्या मॅचेस होतात. जो मनुष्य कोणते खेळाडू जिंकतील हें बरोबर लिहून कळवील त्याला शेंकडों पौंडाचें बक्षीस असतें आणि हें मिळविण्याकरितां मजूर दर आठवड्याला आठ आठ शिलिंग खर्च करतात.

फूटबॉलप्रमाणेंच मजुरांत आणखी एक जुगाराचा प्रकार रूढ आहे. त्याला "वुईल ऑफ दी वुईक" असें म्हणतात. दररोज मरणाऱ्या श्रीमंत माणसांचे पैसे किती मागें राहिले हें कांहीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होतें. त्यांतल्या त्यांत सायं दैनिकांत प्रसिद्ध होणाऱ्या आकड्यावर हा जुगार फार चालतो. आठवडा सुरू होण्या-अगोदर सहा पेन्सला एक याप्रमाणें चिठ्ठ्या वाटल्या जातात. ज्या माणसाच्या चिठ्ठींत प्रसिद्ध झालेला आंकडा निघेल त्याला ३५ पौन्ड मिळत असतात. ज्याचे अर्धे आंकडे बरोबर येतील त्याला २ पौन्डांची रक्कम मिळते. या जुगाराचा प्रचार मजूर व झाडूवाले यांच्यांत फार आहे.

जुगाराप्रमाणेंच सिनेमा हा एक त्यांचा चर्चेचा विषय आहे. नवीन आलेल्या चित्रपटावर कडाक्याची चर्चा होते. कोणती नटी कोठें चुकली हें सामान्य मजूर सुद्धां दुसऱ्याला पटवून देण्याचा प्रयत्न करीत असतो. मजुरांना सिनेमाचें वेड फार. आठवड्यांतून दोन दोन सिनेमा पाहणारे कांहीं मजूर आहेत.

## मुलखावेगळी वसाहत

बिल पियर्न नांवाच्या माझ्या मित्राबरोबर मी चेस्टनट नटग्रोव्ह येथील 'न्यूडीस्ट' कॉलनींत जाण्याचें ठरविलें. तो या कॉलनीचा बरींच वर्षे मेंबर आहे. १९५१ सालीं जगांतील सर्व न्यूडीस्ट लोक इंग्लंडला जमले होते व त्यांची एक रॅली पण होणार होती. या संधीचा मीं फायदा घेतला.

न्यूडीस्ट कॉलनी म्हणजे एका बंदिस्त जागेंत नग्नस्थितींत रहाणाऱ्यांची वस्ती. इंग्लंडसारख्या सूर्यप्रकाश कमी असलेल्या देशांत या कॉलनीची अत्यंत आवश्यकता आहे, असें कॉलनीवाल्यांचें मत आहे. परंतु न्यूडीस्ट कॉलनी हें एक फॅड आहे, असें म्हणणाराहि एक मोठा वर्ग आहे. हे लोक कॉलनीवाल्यांना नेहमींच विरोध करीत असतात. मला प्रथम वाटलें होतें, या कॉलनींत जाणें म्हणजे एक दिव्य करण्यासारखेंच आहे. परंतु माझा मित्र म्हणाला, "या सर्व गोष्टी बाहेरून वाटतात तितक्या अवघड नाहींत." त्याचें हें म्हणणें बरोबर होतें.

आम्ही सकाळीं ९ वाजतां कॉलनीच्या ऑफीसमध्यें जाऊन नांवें नोंदविलीं. बाहेरच्या बाजूनें कॉलनीमधलीं माणसें दिसत नाहींत. ऑफीसमधील लोकांनीं माझें स्वागत केलें. आम्हाला फक्त एकच दिवस तेथें रहावयाचें होतें. त्यामुळें एका छोटचा तंबूंत त्यांनीं आमची उतरण्याची सोय केली. नेहमीच्या सभासदांच्या मालकीचे तंबू असतात. मी जेव्हां आंत गेलों तेव्हां मला कोणीच माणसें दिसलीं नाहींत. एक प्रकारची माझी निराशा झाली म्हणानात ! कॉलनी ४०।५० एकरांत वसविलेली असून भोंवती सर्वत्र गर्द झाडी आहे. नवीन आलेल्या माणसाला एकदम सर्व कपडयांचा त्याग करावा लागत नाहीं. कारण तसें केल्यास त्याच्या प्रकृतीवर थंड हवेचा परिणाम होण्याचा संभव असतो. नवीन येणाऱ्या माणसांनीं रोज थोडे थोडे कपडे कमी करावयाचे असतात.



बर्फाच्या प्रदेशांतील एक अस्वल व त्याचें पिल्लू. या पिल्लानें लंडनच्या प्राणीसंग्रहालयाला हजारों पौण्ड मिळवून दिले.



बागेंतील थिएटरमध्यें मुलांनीं केलेल्या 'हिमगौरी व सात बुटकें' या विनोदी नाटकांतील एक प्रसंग–



श्री. हेन्री नोलन या इंग्रज गृहस्थांच्या कुटुंबांत श्री. रघुवीर

आम्ही आमच्या तंबूत गेलों. बिल उन्हांत आरामखुर्चीत वाचीत बसला. कांहीं वेळानें ४।५ तरुण माझी चौकशी करण्याकरतां तंबूंत आले. बराच वेळ चर्चा झाल्यावर ते निघून गेले. दुपारीं आम्हा सर्वांचें जेवण एकत्र झालें. सायंकाळच्या वेळीं व्याख्यान व सिनेमाचा कार्यक्रम झाला. कॉलनींत जाण्यापूर्वी जी भीति वाटत होती ती कोठल्या कोठें नाहींशी झाली. कॉलनींत लहान मुलांपासून ते वृद्धां-पर्यंत सर्व वयाचे स्त्री-पुरुष होते. बहुतेक लोक सहकुटुंब आलेले होते. कॉलनींत रस्ते तयार करणें, बागा लावणें, जमीन खणणें वगैरे कामें सभासद नग्नावस्थेंत करतांना दिसले.

कॉलनींतून घरीं गेल्यावर मी ज्यांचेकडे रहात असें त्या श्री. हेन्री नोलननें मला अनेक प्रश्न विचारले. त्याच्या एकंदर प्रश्नांवरून सर्वसामान्य युरोपियन माणसाला सुद्धां या कॉलनीविषयीं कुतुहल असल्याचें दिसून आलें.

## वधूवरांची मिरवणूक

इंग्लंडच्या मुक्कामांत साधारणपणें दर रविवारीं सायंकाळीं मी चर्चमध्यें जात असें. निरनिराळ्या पंथांच्या चर्चमध्यें मी गेलों. त्यांच्या प्रार्थना करण्याच्या पद्धतींत विशेष फरक नव्हता. आमच्या घराशेजारीं कॅथॉलिक चर्च होतें. या चर्चमध्यें नेहमींच भरपूर गर्दी असे व दररोज एकादें तरी लग्न होत असे. येथील लोक कितीहि सुधारक असले तरी बहुतेकजण चर्चमध्यें जाऊन लग्न करणें पसंत करतात. या पद्धतीमुळें दोन हेतु साध्य होतात. म्हाताऱ्या लोकांचा रोष रहात नाहीं व खर्चहि कमी येतो. लग्नाच्या वेळीं कोणी किती खर्च करावा हें ठराविक नसतें. लग्नाच्या शेवटीं चर्चबाहेर वधूवरांचा फोटो काढला जातो. फोटोनंतर एका सजविलेल्या मोटारींतून वधूवर घरीं जातात. या मोटारीमागें दोरीच्या सहाय्यानें फुटके डबे, फाटके बूट बांधलेले असतात. मोटार चालूं लागली कीं या वस्तू जमीनीवरून खडखड करीत जातात. रस्त्यामध्यें या वस्तू तुटून पडल्यास वधूवरांना लग्नानंतरचा काळ सुखाचा जातो अशी कल्पना आहे. एकादे वेळीं डबडें तुटलें नाहीं तर तें तुटेपर्यंत मोटार फिरवीत रहावें लागतें.

कांहीं चेष्टेखोर लोक मुद्दाम भक्कम दोरीला वस्तू बांधून वधूवरांना बऱ्याच चकरा मारावयाला लावतात.

## धार्मिक कार्यांत शिस्त

मी चर्चमध्यें वारंवार गेल्यानें तेथील कांहीं लोकांच्या ओळखी झाल्या. बायबलमधील अनेक तत्त्वें धर्मगुरूंच्या मुखांतून ऐकायला मिळालीं. दुसऱ्याच्या धनावर लक्ष ठेऊं नका, आलेल्या पाहुण्यांचें स्वागत मनापासून करा, दुसऱ्याचें दुःख जाणा इत्यादि तत्त्वें हिंदू माणसाला नवीन नाहींत. जगांत एकच देव आहे, त्याचा पुत्र येशू हा त्यानें जगाला दिला. जगांत दुसरा कोणताहि देव नाहीं हें तत्त्व मला पटण्यासारखें नव्हतें. ज्यानें त्यानें आपल्या धर्माप्रमाणें देव मानावा व सर्व देव सारखेच आहेत, हें तत्त्व ख्रिश्चन मानीत नाहींत. पण मी तेथें वादविवाद करण्याला जात नसल्यामुळें धर्मगुरूंचें म्हणणें ऐकून घेऊन गप्प बसत असे. एक गोष्ट मात्र खरी, कीं या लोकांनीं सर्व धर्मप्रकार शिस्तीच्या व शांततेच्या कक्षेंत बसविले आहेत. देवापुढें होणारी प्रार्थना ठराविक पद्धतीनें होई. सर्व प्रार्थनागीतें सामुदायिक रीत्या अगदीं एका आवाजांत म्हटलीं जात. इतर वेळीं सर्वत्र शांतता असे. गडबड, आरडाओरडा असले प्रकार चुकूनसुद्धां होत नसत.

## खेळाच्या तिकीटासाठीं रांगा

रविवारीं मी चर्चमध्यें जात असें, त्याचप्रमाणें खेळाच्या मैदाना-वरहि जात असें. इंग्लंडविरुद्ध ऑस्ट्रेलिया ही मॅच त्या वेळीं ओव्हल मैदानावर खेळली गेली. खेळाला इतकी अफाट गर्दी मीं तरी त्यापूर्वीं पाहिली नव्हती. तिकिटाकरितां मी अर्धा तास ओळींत उभा होतों. मागाहून मला वर्तमानपत्रांत वाचायला मिळालें कीं कांहीं माणसांनीं रात्रीं १२ पासूनच तिकिटें आधीं मिळावींत म्हणून रांग धरली होती. खेळाडूंना टाळ्या वाजवून उत्तेजन दिलें जात होतें. केळीच्या साली मारणें, शिव्या देणें असले प्रकार दिसले नाहींत. ओव्हलवरची मॅच इंग्लंडचे लोक हरले. जमलेल्या लाखों लोकांना

वाईट वाटलें. मॅच हरणें म्हणजे राष्ट्राला कमीपणा येणें असें येथील लोकांचें मत आहे.

इंग्लंडला 'दि लँड ऑफ स्पोर्टस्' असें म्हणतात तें अगदीं योग्य आहे. या छोटयाशा देशांत अनेक प्रकारचे खेळ सदोदित खेळले जातात. खेळ आणि शर्यती या दोन गोष्टी इंग्लीश जीवनांत अगदीं एकरूप झाल्या आहेत.

## एक लाख प्रेक्षक

क्रिकेट हा इंग्रजांचा राष्ट्रीय खेळ असला तरी हिवाळयांत ६ महिने फुटबॉलचा मोसम असतो. मोसमांत जिकडे तिकडे प्रेक्षकांनीं मैदानें तुडूंब भरलेलीं असतात. फुटबॉलची मॅच पाहण्याला कमींत कमी १ ते १॥ शिलींग तिकीट असतें. दोन नांवाजलेल्या संघांमध्यें सामना असतो त्या वेळीं तो टेलिव्हिजनवर दाखविला जातो. एक लाख लोकांनीं फुलून गेलेलें मैदान मला 'चेलसी' विरुद्ध 'ब्लॅक पूल' या कप फायनलच्या वेळीं पहावयाला मिळालें. या सामन्याला ब्रिटिश राजा-राणी हजर असल्यामुळें लोकांचा उत्साह गगनांत मावत नव्हता.

फुटबॉलप्रमाणें लोकांचा आवडता खेळ म्हणजे बॉक्सींग. या खेळालासुद्धां अतोनात गर्दी होत असते. एकदां सामना ठरला कीं फोनवरून ताबडतोब तिकिटें रिझर्व होतात. त्यांतल्या त्यांत वरच्या वर्गाचीं तिकिटें अगदीं थोडया अवधींत संपतात. माझ्या मुक्कामांत शुगर रे रॉबिनसन व टर्पीन या खेळाडूंचा सामना विशेष रंगला. सामना २ वेळां होऊन अनिर्णित राहिला. शेवटीं तो न्यूयॉर्कला घेण्याचें ठरले व त्याकरतां खास विमानानें दोन्ही बॉक्सर न्यूयॉर्कला गेले. न्यूयॉर्कला सामना चालू असतांना त्याचें प्रत्यक्ष वर्णन इंग्लंड-मध्यें रेडिओवर ऐकायला मिळत होतें. साऱ्या इंग्लंडचे कान रेडीओ-कडे लागले होते. कांहीं ठिकाणीं सामना ऐकण्याला इतकी गर्दी झाली होती कीं तिचा अडथळा वाहनांच्या रहदारीला होऊं लागला. या सामन्यांत इंग्लंडचा टर्पीन हरला. या सामन्याची फिल्म दुसऱ्या दिवशीं थिएटरमध्यें पाहण्याला मिळाली.

## धनुर्विद्येची आवड

इंग्लिश लोकांना धनुर्विद्येची वरीच आवड आहे. मी स्वत: धनुर्विद्येचे प्रयोग करणारा असल्यामुळें येथील क्लबांची मला पहाणी करावयाची होती. मी प्रथम "लंडन आर्चर्स" या सोसायटीच्या सभासदांना भेटलों. धनुर्विद्येचे नियम, बाणांची लांबी, जाडी ठरविणाऱ्या ज्या संस्था आहेत त्यांत या सोसायटीचा बराचसा भाग आहे. या सोसायटीप्रमाणें इंग्लंडमध्यें धनुर्विद्या शिकविणारे ४२५ च्या आसपास क्लब आहेत. दरवर्षी क्लबांची संख्या वाढतच आहे. सर्व क्लबांत मिळून पंधरा हजारांवर स्त्री-पुरुष धनुर्विद्या शिकत आहेत. आठवड्यांतून ठराविक दिवशीं सर्वजण क्लबांत जातात व नेमबाजी शिकतात. धनुर्विद्येच्या चढाओढी वर्षांतून एकदां होतात. चढाओढी पाहण्याकरतां इतर खेळाप्रमाणेंच लोकांची गर्दी होते.

मला धनुष्यबाण तयार करण्याचे कारखाने पहावयाचे होते. मीं कारखानदारांना अनेक पत्रें पाठविलीं. निरनिराळ्या लोकांतर्फे वशिले लावले. पण हे कारखाने मला पाहण्याला मिळाले नाहींत. कारखाने न दाखविण्याचें कारण म्हणजे इतर लोक कारखान्यांतील काम पाहून घरींच धनुष्यबाण तयार करतात, असें सांगण्यांत आलें. त्याचप्रमाणें मागें कारखाना पाहण्याकरितां ऑस्ट्रेलियांतील कांहीं लोक गेले होते. कारखाना पाहून ते परत गेले तेव्हां त्यांनीं तेथें नवीन कारखाना सुरू केला व इंग्लंडच्या मालाची बाजारपेठ कमी झाली. असे अनेक अनुभव आल्यामुळें बाहेरच्या माणसांना कारखाना दाखविण्याचें धोरण चालकांनीं बदलून टाकलें. खुद्द लंडनच्या आसपास धनुष्यबाण पुरविणारे दोन कारखाने आहेत.

## बोट रेससाठीं गर्दी

खेळांप्रमाणें वारंवार अनेक प्रकारच्या शर्यती चालू असतात. लंडनला वर्षांतून एकदां हिवाळ्याच्या सुरुवातीला एक बोट रेस होते. मी कारखान्यांत असतांना दहा बारा मजुरांच्या बरोबर थेम्स नदीवर असलेली ही रेस पाहण्याला गेलों. त्या वेळीं फायनलला ऑक्सफर्ड

व केंब्रिज होते. रेसचें अंतर ११ मैलांचें होतें. इतकें मोठें अंतर; पण नदीचे दोन्ही काठ संपूर्णपणें माणसांनीं फुलून गेले होते. ही रेस टेलीव्हिजनवर दाखविली होती. त्यामुळें लोकांना वाटलें, गर्दी कमी होईल; पण अंदाज चुकीचा ठरला. झालेली गर्दी तुटपुंज्या स्वयं-सेवकांना आवरणें कठीण झालें. पहिल्या दिवशीं नदी खवळलेली होती. त्यामुळें ऑक्सफर्डची बोट दोन वेळां पाण्यांत बुडाली. म्हणून रेस दुसऱ्या दिवशीं ठेवली. दुसऱ्या दिवशीं सुद्धां लोकांची भरपूर गर्दी होती. रेसमध्यें केंब्रिजचा विजय झाला.

बोट रेसप्रमाणें घोड्यांच्या शर्यतीसुद्धां लोकांच्या आवडत्या आहेत. आठवड्यांतून एकदां अगर दोनदां या शर्यती होत असतात. जगप्रसिद्ध घोड्यांची शर्यत म्हणजे 'डर्बी' होय. या रेसला इंग्लीश लोक 'डार्बी' म्हणतात. रेसमध्यें घोडे सरळ धांवत नाहींत. तर त्यांना मध्यें जागजागीं ठेवलेल्या अडथळ्यांवरुन उड्या मारीत पळावें लागतें. सर्व जगांतून या रेसवर पैसे लावले जातात. इंग्लंड-मध्यें रेसकोर्सवर मोठे बुकी ज्याप्रमाणें पैसे एकत्र करतात त्याप्रमाणें गांवोगांव छोटे खासगी बेटिंग घेणारे अनेक लोक आहेत. कारखान्यांत प्रत्येक सेक्शनमध्यें बेटींग घेतलें जातें. इतकेंच नव्हे तर शाळा कॉलेजांतील कांहीं विद्यार्थीहि या डर्बी रेसवर पैसे लावतांना आढळले.

## कुत्र्यांच्या शर्यती

घोड्यांच्या शर्यतीप्रमाणें दुसऱ्या अनेक शर्यती आहेत. आठवड्यांतून दोन वेळां होणारी शर्यत म्हणजे 'ग्रेहाउंड शर्यत' होय. या शर्यतींत घोड्याप्रमाणें ग्रेहाउंड जातीचीं कुत्रीं पळत असतात. प्रथम मला वाटलें कीं घोड्यावर जॉकी बसतो त्यामुळें तीं विशिष्ट दिशेनें पळूं शकतात. पण या कुत्र्यांना कोण हाकणार? मी लंडनच्या मुक्कामांत ही रेस पाहण्याकरतां मुद्दाम गेलों होतों. ज्यांनीं घोड्याची रेस अगर रेस कोर्स पाहिलें असेल त्यालाच नव्हे तर, इतरांना सुद्धां या रेसची सहज कल्पना येईल. घोड्यांप्रमाणें कुत्र्यांना पळण्याची जागा वर्तुळा-कार असते व तें अंतर फक्त ५५० यार्डाचें असतें. एका रेसमध्यें सहा कुत्रीं पळत असतात. कुत्रीं ठराविक दिशेनें पळावींत म्हणून एक

गवत भरलेला ससा मैदानांत वर्तुळाकार विजेच्या तारेच्या सहाय्यानें फिरत असतो. सर्व कुत्रीं एका पेटींत ठेवलेलीं असतात. विजेचा प्रवाह सुरू करून ससा जवळ आला कीं पेटीचें दार झटकन उघडतें व कुत्रीं सशाला पकडावयाला धांवू लागतात. हें ५५० यार्डाचें अंतर फक्त ३० ते ३१ सेकंदांत तोडलें जातें.

रेस खेळणाऱ्या माणसाच्या मनांत शुभाशुभ कल्पना बऱ्याच असतात आणि त्या निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या आहेत. मीं रेसकोर्सवरील एका तरुणाला या कल्पनाविषयीं विचारलें. तो म्हणाला, " कांहीं लोक अगोदर कुत्रीं दाखविण्याला आणतात. त्या वेळीं एकादें कुत्रें भुंकलें, तर तें जिंकणार असें समजतात. कांहीं लोक मैदानांत निसर्गविधी करणारें कुत्रें शुभ समजतात. कांहीं लोक रेस सुरू होतांच आपण काढलेलीं तिकिटें पायाखालीं दावून ठेवतात."

## कासवाची सुद्धां रेस

कुत्र्यांप्रमाणें ससे, कासवें व उंदरांच्या शर्यती होतात. या शर्यती मोठ्या हॉलमधून होतात. ससे व कासवाच्या शर्यती बागेंतील हिरवळीवर होतात. कासवांची रेस मोठी मजेशीर असते. वर्तुळाच्या मध्यभागीं एका पाटीखालीं १०।१५ कासवें झांकून ठेवलेलीं असतात. कासवांच्या पाठीवर नंबर असतात. पाहणारे व खेळणारे लोक वर्तुळाकार उभे राहतात. पाटी उचलली कीं कासवें हालचाल करूं लागतात. जें कांसव वर्तुळाबाहेर अगोदर येईल तेंच जिकतें. कुत्र्यांची रेस एका मिनिटाच्या आंत संपते. तर कासवांच्या एका रेसला अर्ध्या तासाहून अधिक वेळ लागूं शकतो. कारण एकादे वेळीं अगदीं बाहेर येत असलेलें कासव माणसांच्या गोंगाटामुळें घाबरतें व चटकन् मागें फिरतें. घोड्याप्रमाणें कासवांना शिक्षण दिलें जातें व त्यांची वंशावळ ठेवली जाते.

मला एका वर्तमानपत्रांत मुंगळ्यांच्या रेसबद्दल बातमी वाचण्याला मिळाली. हे मुंगळे खास आफ्रिकेंतून आणले होते. निरनिराळ्या गंमती जमती काढून रेस खेळण्याचे प्रकार इंग्लंडमध्यें वारंवार ऐकण्याला मिळतात.

लोकांचें लक्ष खेळांकडे व शर्यतीकडे खेचण्याचें काम येथील वर्तमानपत्रें करीत असतात. निव्वळ खेळाकरतां वाहिलेलीं अनेक वर्तमानपत्रें व मासिकें आहेत. पण दररोज निघणाऱ्या वर्तमानपत्राचें एक पान खेळांच्या बातम्यांनीं भरलेलें असतें. या पानावर निरनिराळ्या खेळाडूंचे फोटो वारंवार प्रसिद्ध होत असतात. वृत्तपत्रें नवीन खेळाची माहिती वाचकांना देतात व परदेशांत कोणते खेळ खेळले जातात याचें ज्ञान सामान्य नागरिकांना करून देतात. आपल्याकडील हुतुतुचें वर्णन मला मँचेस्टरच्या एका साप्ताहिकांत वाचायला मिळालें. लेखकानें लिहिलें होतें, ' हा खेळ दिसायला सोपा असला तरी त्यामुळें दुसऱ्या पार्टीवर चढाई करणें व चढाई करणाराला कौशल्यानें पकडणें हे दोन महत्त्वाचे गुण खेळाडूंचे अंगीं येतात. हा खेळ खेळणारा खेळाडू दुसरा कोणताहि खेळ उत्तम प्रकारें सहज खेळूं शकेल. '

## अस्वलाच्या पिलासाठीं गर्दी

जीवनाचा आनंद उपभोगण्याची ब्रिटीशांची तऱ्हा कांहीं औरच आहे. या लोकांना केव्हां कोणता छंद लागेल, हें सांगतां येत नाहीं. एकाद्या गोष्टीची वर्तमानपत्रांनीं स्तुति केली कीं बस. सारे लोक तेथें तुटून पडतील. १९५० सालच्या सुरुवातीला लंडनच्या प्राणीसंग्रहालयांतील बर्फाळ प्रदेशांतील अस्वलीला (पोलर बियर) पिलूं झालें. आजपर्यंत या अस्वलीला झालेलीं पिलें वाचलीं नव्हतीं. पण हें पिलू जगणार असें डॉक्टरांनीं जाहीर केलें. वर्तमानपत्रांतून रोज त्या पिलाच्या प्रकृतीचे रिपोर्ट येऊं लागले. त्याच्या बागडण्याच्या छायाचित्रांनीं वर्तमानपत्रांचीं पानेंच्या पानें भरूं लागलीं. लोकांना तेंच हवें होतें. दररोज हजारों लोकांच्या रांगा प्राणीसंग्रहालयाच्या चारहि दरवाजावर लागूं लागल्या. ओळींतल्या माणसांना पिलाला पाहीपर्यंत ६—७ तास रांगेंत उभें रहावें लागे. उभे राहून थकल्यामुळें कांहीं लोकांना घेरी येत असे. इतकें असून सुद्धां लोकांची गर्दी प्रतिदिनीं वाढतच होती. या पिलाची फिल्म घेऊन ती थिएटर्स व टेलीव्हिजनवर दाखविली गेली. अफाट गर्दीमुळें प्राणीसंग्रहालयाचे

दरवाजे वारंवार बंद करावे लागत. अशा तऱ्हेनें एका सामान्य पिलानें प्राणीसंग्रहालयाला हजारों पौन्ड मिळवून दिले. पिलाचा वाढदिवसहि मोठ्या थाटानें साजरा झाला. खूप लोकांनीं पिलाला 'बर्थ डे केक्स' पाठवून दिले.

## यात्रेंतील जुगार

वरील उदाहरण प्राण्यांविषयीं अति आवड म्हणून सांगतां येईल· परंतु सर्वसाधारण इंग्लीश माणूस स्वभावतःच आनंदी आहे. कोणत्याहि बाबतींत तो आनंदानें भाग घेण्याला तयार असतो. इंग्लंडमध्यें उन्हाळ्यांत जत्रांचा मोसम असतो. या जत्रा बहुतेक खेड्यांतून भरतात. आपल्याकडील उरसाशीं या जत्रांचें थोडें साम्य आहे. मीं आठ नऊ जत्रा पाहिल्या. पर्ली गांवीं पाहिलेल्या जत्रेचें वर्णन माझ्या त्या दिवशीच्या डायरींत लिहिलें तें असें:—'आज प्रथमच इंग्लंडमधील जत्रा पाहिली. नेहमीं शांत व गंभीर दिसणारे इंग्रज लोक आज अगदीं बदलून गेलेले दिसत होते. सर्वच लोक आपलें मोठेपण सोडून थट्टा, विनोद, खेळ करण्यांत गुंग झाले होते. प्रत्येकाच्या डोक्यावर रेडइंडियन लोकांप्रमाणें पिसांची टोपी अगर मुगुट दिसत होता. या टोप्या जत्रेंतच विकत मिळत. आज सूर्य तळपत असल्यामुळें जो तो उन्हाचें वर्णन दुसऱ्याजवळ करण्यांत रंगून गेला होता. दीड मैलाच्या परिसरांत पसरलेल्या या जत्रेमध्यें हजारों दुकानें होतीं. दुकानांतून जुगारीसारखे खेळ चालले होते. जुगारीच्या प्रकारांतहि नाविन्य व यांत्रिक योजनेचें कौशल्य दिसून आलें. मला कांहीं स्टॉल्स फारच आवडले. एके ठिकाणीं विजेनें फिरणारा एक पंखा होता. पंख्याचा वेग मध्यम होता व प्रत्येक पात्याला भोकें होतीं. पंख्याचा मालक एका शिलिंगाला चार चेंडू विकत देई. जो मनुष्य जवळचा चेंडू भोकांतून आरपार घालवील त्याला निरनिराळीं घड्याळें इनाम मिळत. माझ्यादेखत जवळ जवळ ८०–९० माणसांनीं प्रयत्न केले; पण फक्त एकाच माणसाला बक्षीस मिळालें.

'तरुण तरुणींच्या करमणुकीकरतां तेथें भुताची गाडी होती. या

ाडींत वसण्याकरतां प्रवाशांची फार मोठी रांग होती. गाडींत ासतांच गाडी अंधाऱ्या खोलींत जाई व जवळ जवळ ५।६ मिनिटांनीं ाहेर येई. गाडी आंत जातांच तरुण तरुणींच्या आवाजानें खोली ारून जाई. या खोलींत विजेच्या सहाय्यानें निरनिराळे भुताचे ायानक आकार दाखविले जात होते.

## शेंकहँड करा, वजन सांगतों'

या सर्व जत्रेंत मला दोन अगदीं निराळे व्यापारी दिसले. त्यापैकीं ्क होते हिंदी व दुसरे इजिप्तचे. हिंदी व्यापाऱ्याजवळ अनेक प्रकारचीं ात्तरें होतीं. अत्तरांचा खपहि बराच होत होता. बाटलीवरच्या ेबलावर 'मेड इन इंडिया' हीं अक्षरें हिंदींत व इंग्लिशमध्यें होतीं. इजिप्तच्या व्यापाऱ्याजवळ एक वजन करण्याचें मशीन व एक बोर्ड होता. बोर्डावर लिहिलें होतें, 'माझ्याशीं शेकहँड करा. मी आपलें वजन बरोबर सांगतों. वजनाचा अंदाज चुकल्यास मी आपणास एक अंगठी बक्षीस देईन; परंतु अंदाज बरोबर आला तर आपण मला फक्त ६ पेन्स द्या.' वजनाचा अंदाज करून घेण्याकरतां किती तरी लोक या अजब माणसाशीं शेकहँड करीत आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे शेंकडा ९० माणसांचें वजन तो मनुष्य फक्त शेकहँड करून बरोबर सांगत असे.

## कुत्र्यांचें बोर्डिंग

हा झाला जत्रेचा प्रकार. आतां आपण आणखी एक नाविन्यपूर्ण प्रकार पाहूं. हॅकब्रिज स्टेशनवर एक जाहिरात होती. "हॅकब्रिज हाऊस. राहण्याची उत्तम सोय. तज्ञ डॉक्टरांची व नर्सेसची खास देखरेख, उत्तम अन्न व गरम पाण्यानें आंघोळ." मी जाहिरात वाचून थंडच झालों. सर्वसाधारण माणसांना वाटेल कीं ही जाहीरात रोग्यांकरतां किंवा लहान मुलांकरतां असेल; पण ती कल्पना चुकीची आहे. हें हाऊस कुत्र्यामांजरांकरतां आहे.

इंग्लिश लोकांना प्राण्यांची आवड फार. त्यामुळें बहुतेक घरांत मांजर व कुत्रें पाळलेलें असतेंच. उन्हाळयाच्या सुटींत हे लोक

दरवाजे वारंवार बंद करावे लागत. अशा तऱ्हेनें एका सामान्य पिलानें प्राणीसंग्रहालयाला हजारों पौन्ड मिळवून दिले. पिलाचा वाढदिवसहि मोठ्या थाटानें साजरा झाला. खूप लोकांनीं पिलाला 'बर्थ डे केक्स' पाठवून दिले.

## यात्रेंतील जुगार

वरील उदाहरण प्राण्यांविषयीं अति आवड म्हणून सांगतां येईल' परंतु सर्वसाधारण इंग्लीश माणूस स्वभावतःच आनंदी आहे. कोणत्याहि बाबतींत तो आनंदानें भाग घेण्याला तयार असतो. इंग्लंडमध्यें उन्हाळ्यांत जत्रांचा मोसम असतो. या जत्रा बहुतेक खेड्यांतून भरतात. आपल्याकडील उरसाशीं या जत्रांचें थोडें साम्य आहे. मीं आठ नऊ जत्रा पाहिल्या. पर्ली गांवीं पाहिलेल्या जत्रेचें वर्णन माझ्या त्या दिवशीच्या डायरींत लिहिलें तें असें :—'आज प्रथमच इंग्लंडमधील जत्रा पाहिली. नेहमीं शांत व गंभीर दिसणारे इंग्रज लोक आज अगदीं बदलून गेलेले दिसत होते. सर्वच लोक आपलें मोठेपण सोडून थट्टा, विनोद, खेळ करण्यांत गुंग झाले होते. प्रत्येकाच्या डोक्यावर रेडइंडियन लोकांप्रमाणें पिसांची टोपी अगर मुगुट दिसत होता. या टोप्या जत्रेंतच विकत मिळत. आज सूर्य तळपत असल्यामुळें जो तो उन्हाचें वर्णन दुसऱ्याजवळ करण्यांत रंगून गेला होता. दीड मैलाच्या परिसरांत पसरलेल्या या जत्रेमध्यें हजारों दुकानें होतीं. दुकानांतून जुगारीसारखे खेळ चालले होते. जुगारीच्या प्रकारांतहि नाविन्य व यांत्रिक योजनेचें कौशल्य दिसून आलें. मला कांहीं स्टॉल्स फारच आवडले. एके ठिकाणीं विजेनें फिरणारा एक पंखा होता. पंख्याचा वेग मध्यम होता व प्रत्येक पात्याला भोकें होतीं. पंख्याचा मालक एका शिलिंगाला चार चेंडू विकत देई. जो मनुष्य जवळचा चेंडू भोकांतून आरपार घालवील त्याला निरनिराळीं घड्याळें इनाम मिळत. माझ्यादेखत जवळ जवळ ८०–९० माणसांनीं प्रयत्न केले; पण फक्त एकाच माणसाला बक्षीस मिळालें.

'तरुण तरुणींच्या करमणुकीकरतां तेथें भुताची गाडी होती. या

गाडींत वसण्याकरतां प्रवाशांची फार मोठी रांग होती. गाडींत वसतांच गाडी अंधाऱ्या खोलींत जाई व जवळ जवळ ५।६ मिनिटांनीं बाहेर येई. गाडी आंत जातांच तरुण तरुणींच्या आवाजानें खोली भरून जाई. या खोलींत विजेच्या सहाय्यानें निरनिराळे भुताचे भयानक आकार दाखविले जात होते.

## 'शेंकहँड करा, वजन सांगतों'

या सर्व जत्रेंत मला दोन अगदीं निराळे व्यापारी दिसले. त्यापैकीं एक होते हिंदी व दुसरे इजिप्तचे. हिंदी व्यापाऱ्याजवळ अनेक प्रकारचीं अत्तरें होतीं. अत्तरांचा खपहि वराच होत होता. बाटलीवरच्या लेबलावर 'मेड इन इंडिया' हीं अक्षरें हिंदींत व इंग्लिशमध्यें होतीं. इजिप्तच्या व्यापाऱ्याजवळ एक वजन करण्याचें मशीन व एक बोर्ड होता. बोर्डावर लिहिलें होतें, 'माझ्याशीं शेकहँड करा. मी आपलें वजन बरोबर सांगतों. वजनाचा अंदाज चुकल्यास मी आपणास एक अंगठी बक्षीस देईन; परंतु अंदाज बरोबर आला तर आपण मला फक्त ६ पेन्स द्या.' वजनाचा अंदाज करून घेण्याकरतां किती तरी लोक या अजब माणसाशीं शेकहँड करीत आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे शेंकडा ९० माणसांचें वजन तो मनुष्य फक्त शेकहँड करून वरोवर सांगत असे.

## कुत्र्यांचें बोर्डिंग

हा झाला जत्रेचा प्रकार. आतां आपण आणखी एक नाविन्यपूर्ण प्रकार पाहूं. हॅकब्रिज स्टेशनवर एक जाहिरात होती. "हॅकब्रिज हाऊस. राहण्याची उत्तम सोय. तज्ञ डॉक्टरांची व नर्सेसची खास देखरेख, उत्तम अन्न व गरम पाण्यानें आंघोळ." मी जाहिरात वाचून थंडच झालों. सर्वसाधारण माणसांना वाटेल कीं ही जाहीरात रोग्यांकरतां किंवा लहान मुलांकरतां असेल; पण ती कल्पना चुकीची आहे. हें हाऊस कुत्र्यामांजरांकरतां आहे.

इंग्लिश लोकांना प्राण्यांची आवड फार. त्यामुळें बहुतेक घरांत मांजर व कुत्रें पाळलेलें असतेंच. उन्हाळ्याच्या सुटींत हे लोक

जेव्हां निरनिराळ्या ठिकाणीं प्रवासाला जातात, तेव्हां कुत्रीं-मांजरें बरोवर नेणें त्रासाचें व खर्चाचें असतें. अशा वेळीं या प्राण्याची सोय वरील प्रकारच्या बोर्डिंगमध्यें केली जाते. ही व्यवस्था बहुतेक प्रमुख शहरांत असते व तेथील लोकांना प्राण्याविषयींचा एक कोर्स पुरा करावा लागतो.

## दारु पिणे परवडत नाहीं

आपणाकडे अशी एक समजूत आहे कीं इंग्लिश माणूस रोज थोडी ना थोडी दारू पितोच; कारण काय तर म्हणे तिकडे थंडी फार. पण ही कल्पना चूक आहे. एक ना दोन, माझा ३५ कुटुंबांतला अनुभव आहे. सर्वसाधारण माणसाला दारु पिणें परवडत नाहीं. वर्षांतून एकदां म्हणजे नाताळच्या वेळीं बहुतेकजण दारु पितात. परंतु दारु पिऊन रस्त्याच्या कडेला झिंगून पडलेला मनुष्य दिसणें कठीण. दारु पिऊन बडबड करणें अगर रस्त्यानें झोकांड्या देत जाणें गुन्हा आहे. सर्वत्र पोलीस बंदोबस्त चांगला असल्यामुळें प्रत्येक-जण आपली कुवत ओळखूनच पीत असतो.

इंग्लंडमध्यें गल्लोगल्लीं बार किंवा ‘ पब्लिक हाऊसेस ’ आहेत· त्या ठिकाणीं सायंकाळीं स्त्री-पुरुषांची खूप गर्दी दिसते. कोणी ब्रिज खेळत असतात, तर कोणी डार्टस खेळत असतात. बारमध्यें येणारे सर्वच लोक कांहीं ना कांहीं पीत असतात; पण ज्याला ‘ वाईन ’ म्हणून म्हणतात, ती मात्र सहसा कोणी पीत नाहीं. शेंकडा ८५ लोक बियर पितांना दिसतात. बियरमध्यें ‘ अल्कोहोलचें ’ प्रमाण फारच कमी असतें.

## बागेंतील थिएटर

बारप्रमाणें दुसरें करमणुकीचें ठिकाण म्हणजे ओपनएअर थिएटर्स. यालाच गार्डन थिएटर म्हणण्याची प्रथा आहे. हीं सर्व थिएटरें फक्त उन्हाळ्यांत चालू असतात. एप्रिल ते ऑगस्टपर्यंत त्यांचा मोसम असतो. एकाद्या बागेंत निरनिराळ्या फुलझाडांमध्यें या थिएटरची रचना केलेली असते. बागेंत फिरायला येणाऱ्या लोकांना

पैसे देऊन हे कार्यक्रम पाहतां येतात. आठवड्यांतून ठराविक वेळीं मुलांकरतां खास कार्यक्रम असतात. शाळेंतील सर्व मुलें हा कार्यक्रम पहावयाला येतात. प्रेक्षक उघड्यावर बसल्यामुळें मोकळी हवा, वनश्री व नाटक या तिन्हींच्या सान्निध्यांत ते असतात.

## हरवल्याचा शोध

मी प्रथम क्रॉयडनला गेलों तेव्हां मला जादूगारांच्या सोसायटीचा पत्ता सांपडेना. मी ताबडतोब O. C. I. मध्यें गेलों. ओ. सी. आय. म्हणजे ऑफीस ऑफ दि सेंट्रल इन्फर्मेशन. इंग्लंडमध्यें प्रत्येक गांवीं या ऑफीसची शाखा असते. लंडनमध्यें या ऑफीसच्या ३१४ इमारती आहेत. केवळ लंडनचीच नव्हे तर इंग्लंडमधील सर्व गांवांची माहिती या ऑफिसमध्यें मिळते. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही माहिती अगदीं विनामूल्य मिळते. साधी बक्षिसी सुद्धां द्यावी लागत नाहीं. या ऑफीसचा परदेशी प्रवाशांना हुकमी वाटाड्याप्रमाणें उपयोग होतो.

शहरांतून अशा प्रकारच्या कचेऱ्या असणें शक्य आहे; पण खेड्यांत त्यांची तरतूद काय ? खेड्यांत कचेरी असते म्हणण्यापेक्षां खेड्यांतला पोलीस तिचीं सर्व कामें पार पाडतो. पोलीसाप्रमाणें दारूच्या गुत्त्याचा मालक प्रवाशांना सर्व माहिती देतो. बारमध्यें मिळणाऱ्या माहितीला ' पब इन्फर्मेशन ' म्हणतात. पब इन्फर्मेशन याचा विरुद्ध अर्थहि प्रचारांत आहे. दारूच्या धुंदींत सांगितलेली माहिती म्हणजे पब इन्फर्मेशन होय. परंतु पबमध्यें प्रवाशांना पुरविली जाणारी माहिती सर्वथा खरी असते. एकाद्या माणसाला कांहीं गोष्टींची माहिती नसेल तर तो विनाकारण इकडच्या तिकडच्या गप्पा मारणार नाहीं. अमुक अमुक गोष्ट मला माहीत नाहीं असें स्पष्ट सांगेल.

प्रवाशांना माहिती देणाऱ्या कचेऱ्या आहेत, त्याप्रमाणें प्रवाशांच्या हरवलेल्या वस्तू संभाळून ठेवणाऱ्याहि कचेऱ्या आहेत. ऑफीसमधील लोक वस्तूवरील नांवावरून मालकाचा शोध करून वस्तू परत करतात. मालक मिळाला नाहीं तर वस्तू तशीच पडून राहते व

कांहीं दिवसानंतर तिचा लिलाव होतो. इंग्लिश लोकांच्या प्रामाणिकपणाचा जेव्हां जेव्हां उल्लेख केला जातो, तेव्हां या कचेरीची माहिती प्रथम सांगितली जाते. वरील ऑफिसबद्दलच्या अनेक गोष्टी मला ऐकण्याला मिळाल्या. त्यांपैकीं नमुना म्हणून पुढील सांगतां येईल.

एका इंग्लिश माणसाचें आपल्या पत्नीवर फार प्रेम होतें. तो तिच्या हातचेंच जेवण जेवत असे. इतरांनीं तयार केलेलें जेवण त्याला चालत नसे. रोज दुपारीं बायको डबा घेऊन ऑफीसमध्यें जात असे. एकदां ती बाई नवरा कामावर गेल्यानंतर आजारी पडली. जेवण पोंचविण्याची वेळ झाली. तेव्हां तिनें आपल्या शेजारणीच्या लहान मुलाला हाक मारली व त्याला म्हणाली, "हा डबा घेउन कोणत्याहि एका बसमध्यें ठेऊन दे, म्हणजे तो माझ्या नवऱ्याला मिळेल." बाईच्या म्हणण्याचा अर्थ मुलाला समजला नाहीं. बाईनें लगेच खुलासा केला, "अरे, पहात काय बसलास ? माझा नवरा हरवलेल्या वस्तूंच्या ऑफिसमध्येंच कामाला आहे ना ! "

ही गोष्ट सत्य आहे कीं कल्पित आहे हें सांगतां येणें कठीण. परंतु सर्वसाधारण इंग्लिश माणूस सचोटीनें वागतो हें मात्र निश्चित. मला रेल्वेचें एक 'लॉस्ट प्रॉपर्टी ऑफिस' पाहण्यास सांपडलें. शेकडों प्रकारच्या वस्तू त्यांत होत्या. गबाळे लोक काय काय विसरूं शकतात हें ज्याला जाणून घ्यावयाचें आहे त्यानें हें ऑफिस जरूर पहावें. वर्तमानपत्रें, छत्र्या, कंगवे, हातमोजे, पिशव्या, हॅट्स इत्यादि वस्तू विसरणें नित्याचेंच असतें. परंतु यापेक्षां महत्त्वाच्या वस्तू सुद्धां लोक विसरतात. त्यांत पैशांचीं पाकीटें, रेल्वेचीं तिकिटें कोट, चष्मे, बूट यांचा उल्लेख करतां येईल. आईवडील लहान मुलांना गाडींत विसरून गेल्याचीं उदाहरणें सांपडणें कठीण नाहीं.

## जाहिरातबाजीचा 'स्टंट'

इंग्लंडमध्यें स्टंट वृत्तीनें वागणारेहि कांहीं लोक आहेत. दर वेळीं कांहीं ना कांहीं नवीन स्टंट करून सर्वसामान्य माणसाला आश्चर्य

चकित करणारे कांहीं प्रकार केले जातात. जाहीरातबाजीचे असे कांहीं प्रकार मला पहायला मिळाले. त्यांतल्या त्यांत एक प्रकार मुद्दाम नमूद करीत आहें.

ओव्ह या समुद्रकिनाऱ्यावरच्या गांवीं एका 'व्हरायटी शो' पार्टीचा मुक्काम होता. या पार्टींत नाच व कसरतीचीं कामें चालत. पार्टीचा मुक्काम एका बागेंत होता. तंबूच्या समोर एक ६० फूट उंचीचा खांब पुरला होता. रेनो नांवाचा इटालियन कसरतकार त्या खांबावरील चौकोनी फळीवरील कसरतीचीं कामें करी. त्याचें काम अगदी जीवावरचें होतें. पण असें होतें तरी पार्टीचें उत्पन्न वाढत नव्हतें. एके दिवशीं गांवांत एक खळबळ उडवून देणारी बातमी पसरली. कसरतकार रेनो व पार्टीचे मालक मि. व्हिक टेंपलर यांचें कांहीं कारणावरून विनसलें. रेनो रागाच्या भरांत खांबावर चढून सत्याग्रह करून बसला. रेनोचें म्हणणें होतें कीं, 'मालकांनीं मला पार्टींतून ताबडतोब मोकळें करावें. मला तशी सवलत मिळेपर्यंत मी खालीं उतरणार नाहीं.'

सत्याग्रहाची बातमी हां हां म्हणतां गांवांत पसरली. रेनोला पाहण्याकरतां लोकांचे लोंढेच्या लोंढे तंबूकडे जाऊं लागले. सर्व वर्तमानपत्रांतून खांबाचे व रेनोचे फोटो प्रसिद्ध झाले. चार लोकांची एक कमिटी नेमली गेली. मालकाचें म्हणणें होतें कीं रेनोचें कॉन्ट्रॅक्ट एक वर्षाचें आहे. तेव्हां कांहीं झालें तरी त्याला मध्येंच मोकळें करणें शक्य नाहीं. कमिटीनें दोघांनाहि विनंत्या केल्या; पण फुकट! शेवटीं फायर ब्रिगेडची शिडी आणली गेली. शिडीच्या सहाय्यानें रेनोला खालीं उतरविण्याचें ठरलें. शिडी लावतांच रेनोनें ती ढकलून दिली व तो म्हणाला, "तुम्ही माझ्या वाटेला जाल तर मी वरून खालीं उडी मारीन." सर्व लोक हतबुद्ध झाले. इतक्यांत पावसाला सुरुवात झाली. लोकांना वाटलें, आतां तरी रेनो खालीं येईल. पण छे! रेनो तसाच पावसांत भिजत राहिला. शेवटीं रेनोच्या बायकोनें दोराच्या सहाय्यानें छत्री वर पाठविली. रात्रीचें जेवणसुद्धां असेंच वर पाठविलें गेलें. सर्व उपाय

ढरल्यानंतर मालक टेंपलर यांनीं रेनोला मोकळें करण्याचें आश्वासन दिलें. आश्वासन मिळतांच रेनो खांबाच्या शेंड्यावरून खालीं आला. एकंदर ३७ तास तो खांबावर होता. रेनो खालीं आला तेव्हां त्याच्या बायकोनें त्याला विनंति केली कीं तूं ही नोकरी सोडूं नकोस. रेनोनेंहि ती विनंति एकदम मान्य केली. मालकाची व रेनोची गोडी झाली आणि त्या दिवसापासून पार्टीचें उत्पन्न अनेक पटींनीं वाढलें.

## रस्त्याच्या कडेला जादूचे प्रयोग

आपल्याकडील डोंबाऱ्याप्रमाणें येथेंहि डोंबारी आहेत. रस्त्यावर वाटेल तेथें कार्यक्रम करण्याची त्यांना परवानगी नाहीं. कांहीं ठराविक चौकाच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागीं हे लोक आपलें कौशल्य दाखवितात. येथें सापवाले गारुडी नाहींत. जादूगार,, कसरतकार व कुत्र्यांचे प्रयोग रस्त्यावर पहायला मिळतात. एकाच चौकांत हे लोक आळीपाळीनें प्रयोग करतात. जादूगार अनेक प्रयोग करून दाखवीत असले तरी, ताईत विकणें अगर गंडे दोरे देणें, असले प्रकार रस्त्यावर चालत नाहींत. कसरतकार उड्या मारून दाखवील, बॅलन्सचीं कामें करील; पण पोटावर हात मारून लोकांपुढें गयावया करणार नाहीं. चेरींग क्रॉस रोडवर एक मनुष्य आपल्या साथीदाराला बेड्या घालून व साखळदंडानें बांधून पोत्यांत घालीत असे. पोत्याला सर्व बाजूंनीं दोरीनें तलवारी बांधी व नंतर एक, दोन, तीन, म्हणतांच आंतला मनुष्य धडपड करीत सर्व बंधनें तोडून बाहेर पडे. रस्त्यावरच्या कलाकारांच्या भोंवतीं जे लोक जमतात ते त्यांचा खेळ कधींहि फुकट पहात नाहींत. आपल्या ऐपतीप्रमाणें प्रत्येकजण पेनी, दोन पेनी त्याच्या हॅटमध्यें टाकल्याशिवाय जात नाहीं. खिशांत पैसा नसलेला मनुष्य कार्यक्रम पाहण्याकरितां चुकूनसुद्धां थांबणार नाहीं.

# २

## प्रामाणिकपणाचीं उदाहरणें

इंग्लीश लोकांचा प्रामाणिकपणा पदोपदीं दिसून येतो. आपण कोणत्याहि दुकानांत गेलों तरी सर्व पदार्थावर किंमतींचीं लेबलें लावलेलीं दिसतील. लहान मूल गेलें तरी त्याला त्याच भावानें माल मिळतो. फसवाफसवी सहसा होत नाहीं. कांहीं दुकानांतून टाचणी-पासून तों अगदीं मोठ्या इंजीनपर्यंत सर्व वस्तूंच्या किंमती काचेच्या खिडकींतून पाहण्याला सांपडतात. या पद्धतीमुळें भाव ठरविण्यांतला वेळ वाचतो व गिऱ्हाइकाला फसल्यासारखें वाटत नाहीं. जी गोष्ट दुकानदारांची तीच हॉटेलवाल्यांची म्हणतां येईल. खाण्यापिण्याच्या सर्व पदार्थावर किंमती लिहिलेल्या असतात. इतर ठिकाणीं सुद्धां असाच प्रामाणिकपणाचा प्रत्यय येतो. बसमध्यें ५६ प्रवासी असतात व एक कंडक्टर असतो. एकाद्या माणसाला लवकर उतरावयाचें असेल व कंडक्टर दूर असेल तर तो आपल्या जागेवर पैसे ठेवतो व खालीं उतरतो. कंडक्टर पैसे उचलून घेऊन त्या माणसाचें तिकिट फाडतो. ही झाली अगदीं थोडचा रकमेची गोष्ट. सायंकाळच्या वेळीं अंडर ग्राऊंड रेल्वेमध्यें माणसांची खेचाखेच झालेली असते. त्या वेळेला 'रश आवर्स' म्हणतात. कितीतरी लोक तिकिट न काढतांच गाडींत बसतात. इच्छित स्टेशनावर उतरल्यावर तिकिट कलेक्टरच्या हातांत पैसे देतात. एक गाडी गेल्यावर साधारणपण एक दीड पौन्डाची रक्कम कलेक्टरजवळ जमत असेल. जमलेल्या पैशांची एक पावती करून ते सर्व पैसे तो ताबडतोब जमा करतो.

या प्रामाणिकपणाचा थोडक्यांत परामर्ष घ्यावयाचा झाल्यास थोडचा अतिशयोक्तीनें असें म्हणतां येईल की, 'हाईड पार्कमधील


खुर्चीवर बसलेला चोर समोरच्या माणसाचा खिसा कापण्याकरितां जात असेल तर, तो अगोदर खुर्चीचें दोन पेनी भाडें काढून खुर्चीवर ठेवील व नंतर चोरी करण्यास जाईल.'

## युद्धाचा जीवनावर परिणाम

प्रामाणिकपणाप्रमाणें नागरिक नीतीचे आणखी कांहीं उत्तम नमुने मला पहावयास मिळाले. रस्त्यानें जातांना लोक फुटपाथ सोडून चालत नाहींत. एकादा मनुष्य गर्दीमुळें फुटपाथवरून रस्त्यावर ढकलला गेला तर तो सैरावैरा मधूनच धांवत सुटणार नाहीं. थोडा वेळ थांबेल व लगेच फुटपाथवरून चालेल. व्याख्यानाचे वेळीं शांतता ठेवण्याची शिस्त तर वाखाणण्यासारखी आहे. माझ्या शाळेंतील प्रयोगांच्या वेळीं कोठेंहि गोंधळ झालेला मला आठवत नाहीं. मीं एका प्रोफेसरबरोबर इंग्लिश लोकांच्या या चांगल्या संवयीच्या कारणमीमांसेवर चर्चा केली. ते म्हणाले, "या सर्व गोष्टीला युद्ध कारणीभत आहे. युद्धामुळें अनेक वाईट गोष्टी येत असतील. पण त्याचबरोबर अनेक चांगल्या गोष्टी सुद्धां येतात. युद्धाच्या वेळीं फूटपाथ सोडून चालणें कठीण होतें. कारण रस्त्यावरून सारखे रणगाडे धावत होते. त्या वेळीं लागलेली संवय लोकांच्या ध्यानांतून गेलेली नाहीं. प्रामाणिकपणासुद्धां युद्धामुळेंच वाढला. असावा. युद्धकाळीं एकाद्याचें घर बॉंबमध्यें उध्वस्त झालें व त्यांतल्या कांहीं वस्तू इतस्ततः फेंकल्या गेल्या तर लोक त्या चोरीत नसत. कारण त्यांना वाटे, आज हें घर पडलें आहे, कदाचित् उद्यां आपलें पडण्याचा संभव आहे आणि त्या वेळीं आपल्या वस्तू लोकांनीं नेल्या तर?

मुलांच्या शिस्तीविषयीं ते म्हणाले, "युद्धकाळांत आईवडील कामांत होते व मुलें सरकारी व खासगी संस्थांच्या ताब्यांत होती. त्या वेळेपासून त्यांना वरिष्ठांचे हुकूम मानणें व सर्वांशीं खेळीमेळीनें वागणें ही संवय लागलेली आहे. अर्थात् हा केवळ एकाच युद्धाचा परिणाम आहे असें म्हणतां येणार नाहीं. हा पूर्वापार घडत आलेल्या अनेक प्रसंगांचा परिपाक आहे."

हें सर्व वाचून असें वाटेल कीं इंग्लंडमध्यें चोऱ्या अजिबात होत



साठ फूट उंचीच्या खांबावर ३७ तास सत्याग्रह करून बसलला रेनो.
बायकोनें शिवयांत ठेवलेले खाण्याचे पदार्थ रेनो वर ओढून घेत आहे.



जपानी भोजनपद्धति

नसतील. परंतु तसें नाहीं. तेथील चोरहि महावस्ताद आहेत. पोलीसांना हातोहात फसविण्यांत त्यांचा अगदीं हातखंडा. चोर कितीहि हुषार असला तरी त्याचा शेवट मात्र दुःखद होतो असें दिसलें.

या देशांतील सर्वसामान्य नागरिक सुखांत दिसला तरी कुरकुरत दिवस काढणारे लोक कांहीं कमी नाहींत. जिवाला कंटाळलेल्या लोकांची संख्यासुद्धां बरीच आहे. दर दोन दिवसांनीं थेम्स नदीवर तरंगणारें प्रेत किंवा गॅस भरलेल्या खोलींत मरून पडलेली व्यक्ति याचेंच द्योतक म्हणून म्हणतां येतील. तसेंच पशानें व्यवस्थित असलेल्या कुटुंबांत मारामाऱ्या झालेल्या मीं पाहिल्या आहेत. हे सर्व लोक सुशिक्षित होते. साध्यासुध्या कारणावरून त्यांचीं भांडणें होत. नवरा बायकोला रागावून बोले, बायको जवळ असलेल्या कप व बशा नवऱ्याच्या अंगावर फेंकी. दोन चार बशा फुटल्या कीं आपोआप भांडण मिटे. शेवटीं रागाच्या भरांत आपण काय करीत होतों, याची कल्पना आल्यावर दोघेहि खजील होत. अशा तऱ्हेचे हे प्रकार आफिरकेपासून इंग्लंडपर्यंत सर्वत्र सारखेच चालू आहेत. त्यांत कोणाला सरस ठरवावें हा एक प्रश्नच आहे. मानवी स्वभावांतील मूलभूत प्रवृत्तीचाच तो एक भाग म्हटला पाहिजे.

## चोरी करणारा मजूर

आजूबाजूच्या परिस्थितीमुळें मनुष्य चोऱ्या कसा करतो याचा एक अनुभव मला इंग्लंडच्या प्रवासांत आला. मी कॅनेडियन कंन्स्ट्रक्शन कंपनीमध्यें कामाला होतों. आमची कंपनी जुन्या घरांची डागडुजी करीत असे. कंपनींत फक्त ७।८ माणसें कामाला होतीं. मी नोकरी करीत असलेल्या काळांत कंपनीनें ३०—३५ घरांची डागडुजी केली. त्या वेळीं कोणाहि मजुरानें सुतळीच्या तोड्याला सुद्धां हात लावला नाहीं. प्रत्येक घरमालक घराच्या किल्ल्या आम्हा मजुरांच्या ताब्यांत देऊन कामाला जात असे. मजूरसुद्धां आपलें काम बरें व आपण बरें, या तत्त्वानें वागत. घरमालकांचा अपरिचित मजुरावरील विश्वास पाहून मला आश्चर्य वाटत असे. एकदां आमच्या कंपनीला एका जळक्या घराच्या सफाईचें काम मिळालें. घर नुकतेंच जळलेलें

असल्यामुळें बिन्हाडकरूंच्या बऱ्याच मौल्यवान वस्तू पडून राहिल्या होत्या. मजूर त्या वस्तू बाजूला नीट ठेऊन देत. एकदां एका मजुराला २॥ शिलिंगाचें एक नाणें सांपडलें. त्यानें तें इतरांना दाखवून खिशांत घातलें. झालें, प्रत्येकजण कामांत चुकारपणा करूं लागला. रोज निर्मळ हातानें घरीं जाणाऱ्या मजुरांचे खिसे व पिशव्या फुगूं लागल्या. ज्याला जें सांपडेल तें त्यानें पिशवींत घालून घरीं नेण्याला सुरुवात केली. एकदां तर सर्वांनीं दगडी कोळशानें आपल्या थैल्या भरून घरीं नेल्या. कंपनीच्या मालकाच्या लक्षांत ही गोष्ट येतांच त्यानें त्या घरावर काम करणारी तुकडी दुसरीकडे पाठविली व नवीन तुकडी जळक्या घरावर कामासाठीं धाडली.

## जादूगारांची संस्था

लंडनला आल्यानंतर मला मॅजिक सर्कलचा सभासद व्हावयाचें होतें. या सर्कलमध्यें जादूचा शास्त्रोक्त अभ्यास चालतो व तें सर्वांत जुनें विद्यालय आहे असें मी ऐकलें होतें. सर्कलचा पत्ता काढून मी क्लबाच्या ऑफिसांत गेलों. क्लबांतल्या लोकांची सभा चालू होती. येणारा मनुष्य जादूगार आहे याची खात्री झाल्याशिवाय कोणाला आंत सोडलें जात नाहीं. माझ्याजवळ कोणाचें ओळखपत्र नव्हतें. मी दारावरच्या माणसाला माझ्याविषयीं थोडक्यांत माहिती सांगितली. तो आंत गेला व थोडचा वेळानें एका गृहस्थाला घेऊन आला. थोडचा बोलाचालीवरून बाहेर आलेले गृहस्थ सर्कलचे सेक्रेटरी असल्याचें समजलें. त्यांनीं मला आंत येण्याला सांगितलें व सर्व सभासदांची ओळख करून दिली. ह्या क्लबाची अशी पद्धत आहे कीं ज्या वेळी नवीन आलेल्या जादूगाराची ओळख करून दिली जाते त्या वेळीं त्यानें कांहीं प्रयोग करून दाखवावयाचे असतात. तज्ज्ञ लोकांसमोर थोडचा वेळांत पण महत्त्वाचे प्रयोग करण्याचा हा माझा पहिला प्रसंग होता. छाती धडधडत होती. मी गप्प बसलों असतों तर माझें इच्छित कार्य सफल झालें नसतें. ताबडतोब प्रयोग करण्याला सुरवात केली. रुमालांतून पोपटाचा आवाज, सुरीवर हात मारणें व डोळ्यांत खिळा घालून दुसऱ्या डोळ्यांतून बाहेर काढणें हे प्रयोग मी केले. शेवटच्या प्रयोगाला सर्वांनीं मनापासून

टाळचा वाजविल्या. दुसऱ्या सभेंत मला सभासद करून घ्यावें कीं न घ्यावें हा ठराव मताला टाकण्यांत आला व मला ताबडतोब सभासद करून घ्यावें, असें सर्वानुमतें ठरलें.

मी मॅजिक सर्कलचा सभासद झालों. दर आठवड्याला निरनिराळचा वेळीं ऑफिसमध्यें जाऊन पुस्तकें वाचूं लागलों व नविन संशोधनांत लक्ष घालूं लागलों. पंधरा दिवसांतून एकदां ठराविक विषयावर चर्चा होत असे. एकदां इंडियन रोपट्रीकवर चर्चा होती व मला त्यावर बोलण्याविषयी सांगण्यांत आलें. रोपट्रीकविषयीं माझे अनुभव मीं सांगितले व रोपट्रीक सध्यां अस्तित्वांत नाहीं व हिंदुस्थानांत ती करणारा माझ्या पाहण्यांत आला नाहीं, असें मी सांगितलें. माझ्या या मताला बऱ्याच लोकांनी पुष्टी दिली. त्या वेळीं कराचीहून एक श्रीयुत मेसन नांवाचा गृहस्थ आला होता. तो युद्धकाळांत तेथें रॉयल वेस्ट केंट पलटणीचा कंपनी ऑफिसर होता. त्यानें कराचीला असतांना रोपट्रीक प्रत्यक्ष पाहिली होती व तिची त्यानें फिल्म घेतली होती. आमच्या मॅजिक सर्कलच्या स्पेशल ब्रँचनें त्या फिल्मची छाननी केली व त्यांत सत्यता ततकीशी नमल्याचें दिसून आलें.

अशा छोटचा मोठचा प्रसंगामुळें मॅजिक सर्कलच्या सर्व सभासदांशीं माझी ओळख झाली. सर्कलच्या हॉलमध्यें माझे कांहीं प्रयोगसुद्धां झाले. मॅजिक सर्कलमधील प्रयोगाच्या वेळीं मीं जो बाण प्रथम मारला, तो सर्कलच्या म्युझीयममध्यें ठेवण्यांत आला.

मॅजिक सर्कलव्यतिरिक्त इतर कांहीं संस्थांतून माझे खाजगी प्रयोग झाले. हे प्रयोग मी पैसे ठरवून करीत नसे. कार्यक्रमाच्या शेवटीं तेथील लोक देणगी म्हणून कांहीं रक्कम देत असत. आफ्रिकेप्रमाणें शैक्षणिक संस्थांच्या मदतीकरतां म्हणून येथें प्रयोग झाले नाहींत. जादूच्या प्रयोगाप्रमाणेंच योगाच्या प्रयोगांविषयी येथील लोकांत बरेंच कुतुहल आहे. कांहीं इंग्लिश लोकांनीं हिंदुस्थानांत मुद्दाम येऊन योगाचें शिक्षण घेतलें. आतां लंडनमध्यें खास वर्ग चालवून त्यावर पैसे मिळवीत आहेत. योगासनाचे कार्यक्रम टेलिव्हिजनवर होतात. कार्यक्रमांत मुलें व मुली भाग घेतात.

# ३

## लोकभ्रमाच्या तडाख्यांत

एकदां मी बर्ट नांवाच्या माझ्या एका मित्राबरोबर स्कॉटलंड-मधील खेडचांत गेलों होतों. रस्त्यानें चालत असतांना त्याला एक नाणें सांपडलें. त्यानें तें हातांत घेतलें, त्यावर तो थुंकला व जाकीटाच्या खिशांत ठेऊन दिलें. त्याच्या या कृतीचें मला जरा आश्चर्य वाटलें. माझी शंका मी त्याला विचारली. तो म्हणाला, "रस्त्यांत नाणें सांपडल्यानंतर त्यावर थुंकून तें जाकीटाच्या खिशांत आठ दिवस ठेवून मग खर्च करावयाचें असतें. हें नाणें आठ दिवस खिशांत ठेवल्यास भाग्यवान ठरतें." मी त्याला म्हणालों, "तुझा याच्यावर विश्वास आहे का?" तो म्हणाला, "तितकासा विश्वास नाही, पण माझे पूर्वज ही गोष्ट करीत आले आहेत म्हणून मींहि केली." जी गोष्ट बर्टची, ती थोडचा फार प्रमाणांत इतरांबद्दल सुद्धां सांगतां येईल. या सुधारलेल्या देशांत अनेक भोळचा समजुती प्रचलित आहेत. अगदीं सुधारलेले लोकहि या समजुतीच्या तडाख्यांतून सुटलेले नाहीत. विश्वास–अविश्वासाचा प्रश्न निराळा; 'इतर लोक करतात म्हणून मी करीत आहें' असें ते म्हणतात.

## पावसांत भिजली तर मुलगा होणार

कोणत्याहि देशांत पुरुषांपेक्षां स्त्रियांचा या भोळचा समजुतीवर विश्वास जास्त; म्हणून मीं ज्या इंग्लिश व स्कॉटिश कुटुंबांत राहिलों तेथील स्त्रियांना अनेक प्रश्न विचारले. भोळचा समजुती निर-निराळचा प्रांतांत भिन्न आहेत, असें आढळून आलें. येथील कांहीं समजुती अगदी आपल्याकडील भोळचा समजुतीप्रमाणें आहेत, तर कांही अगदीं विरुद्ध अर्थाच्या आहेत. कांहीं अगदींच अपरिचित

वाटतात. प्रथम आपण समान समजुती पाहूं. कुत्रें रडलें असतां मरणाची कल्पना, किंवा दिवा पडला असतां अपघाताची सूचना इत्यादि. इंग्लंडमध्यें आपल्याकडीलप्रमाणें रॉकेल अगर गोड्या तेलाचे दिवे नाहींत. तेव्हां तेथें मेणबत्ती पडून विझणें घातक समजतात. यानंतर कांहीं कल्पना आपल्या अगदीं विरुद्ध आहेत. त्या अशाः—रस्त्यांत काळें मांजर आडवें गेलें असतां तें अत्यंत शुभ समजलें जातें. भांड्याला भांडें लागून अवाज निघाल्यास आपण भांडण होणार म्हणून समजतों, तर इंग्लीश लोक शुभ वर्तमान ऐकायला मिळणार असें समजतात. यानंतर आपणांपेक्षां भिन्न, परंतु गमतीशीर अशा कांहीं समजुती पुढीलप्रमाणें आहेत. (१) गरोदर स्त्री अचानकपणें पावसांत भिजली तर तिला मुलगा होणार (२) बाहेर जातांना अंगावरच्या कपड्यावर सूत सांपडल्यास तें घेऊन डाव्या हाताच्या मधल्या बोटाला गुंडाळतात व त्याचा एक वेढा पूर्ण झाल्यास आपल्या आवडीच्या माणसाचें लवकर पत्र येणार अशी समजूत (३) नवीन आणलेले पायमोजे टेबलावर ठेवल्यास तें साऱ्या घराला अशुभ. (४) चहाच्या कपांत चहाचें पान दिसल्यास तें डाव्या पालथ्या हातावर ठेवतात व उजव्या हातानें खालून फटका मारतात. पान ज्या दिशेला उडून पडेल त्या दिशेकडील मित्र भेटायला येणार. (५) ज्याच्या अगर जिच्या बशींतल्या केकवर माशी बसलेली दिसेल तो अगर ती कोणाच्या तरी प्रेमांत सांपडली आहे. (६) स्कॉटिश लोक शुक्रवारीं नखें काढीत नाहींत. (७) घरांत कोळी अगर कातीण दिसल्यास लवकरच धनप्राप्ती होणार. (८) जेवत असतांना वीज पडल्याची बातमी कोणी सांगितल्यास लवकरच युद्ध होणार. (९) कात्री ज्याच्या हातून खालीं पडेल तो ती उचलीत नाहीं; दुसऱ्याला उचलण्याला सांगतो. (१०) डाव्या हाताला खाज सुटेल तर पैसे येणार व उजव्याला सुटल्यास पैसे जाणार. (११) हातून मीठ सांडणें अत्यंत वाईट. एकाद्याच्या हातून मीठ सांडल्यास तो मिठाची चिमूट घेऊन आपल्या डाव्या खांद्यावरून मागें फेकतो. (१२) प्रेत आडवें आल्यास प्रवास सुखकर होणार असें समजावें. (१३) जेवत असतांना काटा अगर चमचा हातांतून पडल्यास पाहुणा येणार;

परंतु पाणी पिण्याचा ग्लास पडल्यास आपण कोणाकडे तरी पाहुणा जाणार असें समजतात. (१४) चुकून एकाद्याच्या चहाच्या बशीत दोन चमचे ठेवले गेले तर घरांत मुलाचा जन्म होणार. (१५) लागोपाठ तीन शिंका आल्यास घर बदलावें लागणार.

## माझी चूक लक्षांत आली

वरील प्रकारच्या समजुती लोकांच्या कृतींत दिसून येतात. त्यांतल्या त्यांत शहरी लोकांचा तर असल्या गोष्टींवर अजिबात विश्वास नाहीं. परंतु 'आमचा विश्वास नाहीं' म्हणणाऱ्या लोकांकडेहि गमती पाहण्यास सांपडल्या. एकदां मी माझे मित्र मि. स्टेनिगस् यांच्याकडे गेलों होतों. जातांना वाटेंत मला मे नांवाच्या झाडाचीं लाल लाल सुंदर फुलें दिसलीं. एक फूल घेऊन मीं कोटाला लावलें. मी जेव्हां त्यांच्या घरांत गेलों तेव्हां सर्वजण आश्चर्यानें माझ्याकडे पाहूं लागले. मला कांहीं समजलें नाहीं. पण नंतर मिसेस स्टेनिगनें खुलासा केला कीं, सदर झाडाचें फूल कोणताहि इंग्लिश माणूस कोटाला लावतांना दिसणार नाहीं; कारण तें अशुभ आहे. दिसण्याला सुंदर, पण जनतेच्या भोळ्या समजुतीमुळें अशुभ ठरलेल्या मे फुलाकडे पाहून मला त्या वेळीं काय वाटलें हें सांगणें कठीण. या अशुभ फुलाप्रमाणें कांहीं शुभ गोष्टीहि पाहण्याला मिळाल्या. खेड्यांतील शेतकऱ्याच्या घरीं मला सशाचे पाय दिसले. कांहीं शेतकरी खेड्यांतून शहरांत जातांना सशाच्या पायाचा तुकडा खिशांत घालून नेतात. त्यामुळें कामांत यश मिळतें अशी समजूत. 'व्हाईट हिदर' नांवाचें फूल शुभ समजण्याची प्रथा स्कॉटलंडमध्यें दिसली.

## घराची सजावट

इंग्लिश लोक ख्रिसमस्मध्यें आपापल्या घराला खूप सजवितात, पताका लावतात व कागदांच्या फुलांच्या माळांनीं खोल्या सजवतात. आरास करतात. त्यांत पैसा व वेळ भरपूर खर्च होतो. गत वर्षापेक्षां चालू वर्षाच्या आराशीमध्यें नाविन्य आणण्याचा जो तो प्रयत्न करीत असतो. आरास पाहण्याकरतां शेजारी व नात्यांतील कितीतरी

माणसें येऊन जातात. या आराशीचें इतकें वर्णन करण्याचें कारण म्हणजे ख्रिसमसनंतर बारा दिवसांच्या आंत ही आरास काढून टाकावी लागते. बाराव्या रात्रीनंतर तेरावी रात्र या आराशीनें पाहिल्यास घरांतील लोकांना सारें वर्ष हालांत काढावें लागेल अशी समजूत आहे.

## लोकभ्रमांतून बाहेर पडण्याची धडपड

एक गोष्ट मात्र खरी कीं लहान मुलांची दृष्ट काढणें, गाईच्या कासेला नजर लागू नये म्हणून कांही दैवी उपाय करणें अगर पाऊस पडला नाहीं तर चर्चमध्यें जाऊन प्रार्थना करणें, असले प्रकार मला पाहण्यास मिळाले नाहींत. गेल्या शतकापर्यंत खेड्यांतून पावसाकरतां प्रार्थना करण्याची प्रथा होती. पण दृष्ट लागणें हा प्रकार येथील लोकांना माहित नसावा असें दिसतें.

लोकभ्रम मानवी जीवनांत कां व केव्हां आले हें सांगणें कठीण आहे. परंतु हे समज घालविण्याकरितां लोकांनीं केलेले प्रयत्न सांगतां येणें शक्य आहे अंगांत येणें वगैरेसारखे प्रकार इंग्लंडमध्यें नाहींत. एकाद्या बाईला मूल होत नसेल तर हे लोक देवाला नवस अगर जोतिष्याला हात दाखविणार नाहींत. सरळ डॉक्टरकडे जाऊन पती-पत्नीची तपासणी करून घेतील. तसेंच आजारी माणसाला घरगुती औषधें अगर झाडपाल्याचे रस देण्याची पद्धत दिसली नाहीं. सर्व खेड्यांतून फिरत्या दवाखान्यांतील औषधें रोग्यांना दिलीं जातात. इंग्लिश लोकांच्या पांचशें वर्षांपूर्वीच्या इतिहासाकडे पाहिल्यास आपणाला असें दिसून येईल की, त्या वेळची जनता देवाचे वारे अंगांत येणाऱ्या लोकांना अगर चेटकीणींना दगडानें ठेचून मारीत असे किंवा पाण्यांत बुडवून ठार करीत असे. अशा प्रकारचा त्रास गैर-समजानें कांहीं शास्त्रज्ञांना सुद्धां भोगावा लागल्याचीं उदाहरणें आहेत.

सध्यां हे लोकभ्रम घालविण्याकरतां बहुतेक लोक हातभार लावीत आहेत. वर्तमानपत्रांत त्यावर चर्चा होते, प्रार्थना मंदिरांत भाषणें होतात व खेड्यापाड्यांतून तरुण प्रचारक हिंडतात.

## लोकभ्रम घालविला

इंग्लंडमधील सर्वांत घातकी लोकभ्रम म्हणजे भिंतीला उभ्या केलेल्या शिडीखालून न जाणें. शिडीखालून गेल्यास आयुष्य कमी होतें असें मानतात. मी डार्टफर्ड गांवीं असतांना एक विशेष प्रसंग पाहण्याला मिळाला. एके दिवशीं सकाळींच गांवांत गडबड दिसली. त्या गांवीं आदल्या दिवशीं एक भयंकर अपघात झाला होता. अपघाताचें कारण शुभाशुभ कल्पनामुळें उद्भवलें होतें. एका इमारतीवर कांहीं गवंडी काम करीत होते. त्यांनीं आपली शिडी फूटपाथ व घराची भिंत यावर लावली होती. एक २७ वर्षें वयाची स्त्री आपल्या लहान मुलाला बाबागाडींत घालून त्याच फूटपाथ-वरून चालली होती. फूटपाथवरून जायचें म्हणजे शिडीखालून जावें लागणार होतें. शिडीखालून गेल्यास आपलें व आपल्या मुलाचें आयुष्य कमी होईल असें तिला वाटलें असावें. ती झटकन फूटपाथ-वरून सडकेवर उतरली. मागून भर वेगांत लॉरी येत होती. लॉरीचा धक्का लागून मुलगा जागच्या जागीं ठार झाला व बाईच्या डोक्याला जबर मार लागला. एका क्षुल्लक समजुतीमुळें हा अपघात घडला होता. असे अपघात परत होऊं नयेत म्हणून त्या गांवांतील तरुण तरुणींनीं एक मिरवणूक काढावयाचें ठरविलें. गांवांतील बहुतेक रस्त्यावरून शिड्या लावल्या गेल्या. भिंतीला लावलेल्या शिड्या-खालून मिरवणुकींतील तरुण तरुणींनीं जाऊन दाखविलें व शिडी-खालून गेल्यानें आयुष्य कमी होत नाहीं हें भोळ्या लोकांना समजाऊन दिलें. तरुणांची ही टोळी दुसऱ्या कांहीं खेड्यांतून प्रचाराकरतां जाणार होती असें समजलें.

## शिष्टाचाराच्या पद्धति

इंग्लीश मनुष्य शिष्टाचाराचा फार भोक्ता. आलेल्या माणसाचें स्वागत हंसतमुखानें करायला तो नेहमींच तयार असतो. कोणी सहज भेटायला आला आणि ती चहाची वेळ नसेल तर त्याच्याकरतां मुद्दाम चहा केला जाणार नाहीं किंवा उगीचच त्याला आग्रह पण केला

जाणार नाहीं. कामाकरतां आलेला मनुष्य ज्या कामाकरितां आला असेल तें काम अगोदर सांगेल. अगदींच घरोबा असेल तर, इकडच्या तिकडच्या चार गप्पा मारील. अर्थहीन गप्पा मारून वेळ खर्च करण्याला कोणीहि तयार नसतो.

प्रत्येक सरकारी नोकर अगर दुकानदार जनतेशीं सामान्यतः अदबीनें वागतो व येणाऱ्या माणसाला 'सर' म्हणून संबोधतो. रस्त्यानें जातांना आपला धक्का दुसऱ्याला लागणार नाहीं याची खबरदारी प्रत्येकजण घेतो. चुकून धक्का लागल्यास, 'सॉरी, एक्स्क्यूज मी' वगैरे म्हणून ताबडतोब क्षमा मागतो. माझ्या मतें प्रत्येक माणसाला दिवसांतून शंभर वेळा 'प्लीज' व 'थँक्यू' म्हणावें लागत असेल.

ब्रिटिश मनुष्य स्वच्छताप्रिय आहे. स्वतः तर स्वच्छ राहीलच; पण आपल्याबरोबर आपल्या कुटुंबांतील सर्व माणसांच्या स्वच्छतेची काळजी घेईल. घर, बाग, दारासमोरचा फूटपाथ सर्व कांहीं स्वच्छ राखील. रोज सकाळीं स्वतः घरमालक अगर मालकीण घराची स्वच्छता करते. नोकर ठेवणें मध्यम स्थितींतील माणसांना परवडत नाहीं. ब्रिटिश लोकांच्या अस्वच्छतेच्या कांहीं तऱ्हा मात्र मला पसंत पडल्या नाहींत. विशेषतः स्वच्छतेच्या बाबतींत तो स्वतःकरतां कांहींच करीत नाहीं. अंथरुणांत असतांनाच चहा पिऊन रात्रभर तोंडांत साठलेली घाण तो पोटांत लोटतो; इतकेंच नाहीं तर जेवणाच्या अगोदर व नंतर तोंड धुण्याची पद्धत नाहीं. जेवणाकरतां ज्या बशा वापरल्या जातात त्या साबणाच्या पाण्यांतून नुसत्या खळबळून काढलेल्या असतात. बशा कशा विसळाव्या यावर पुस्तकें लिहिलेलीं असलीं तरी प्रत्यक्ष व्यवहारांत त्याचा उपयोग फारच थोडे लोक करीत असतात. त्याप्रमाणें मांस तळण्याचें 'फ्राईंग पॅन' रोज स्वच्छ करण्याची पद्धत मला कोठेंच दिसली नाहीं.

## चहा सिगारेटचें वेड

इंग्लिश लोकांना चहाची आवड खूप दिसली. बहुतेक लोक चहा

सिगारेटचे भोक्ते आहेत. मजुरांना चहा नसेल तर काम सुचणार नाहीं. मी बांधकामाच्या कंपनींत कामाला होतों तेव्हां तर चहाकरतां मैल मैल चालत जाणारे मजूर दिसले. कांहीं वेळा हा चहा जेव्हां मजूर स्वत: तयार करतात तेव्हां त्याची चव कांहीं औरच असते. मजुरांना चहांत साखर नसली तरी चालते व जेव्हां दुधाचा अभाव असेल तेव्हां कोराच चहा पिऊन मजूर आपली चहाची तल्लफ भागवीत असतात. इंग्लंडमध्यें प्रत्येक जेवणाच्या शेवटीं चहा पिण्याची पद्धत दिसली. त्याचप्रमाणें रात्रीं झोपण्याला जाण्यापूर्वी चहा व थोडें कांहीं खाऊन नंतर झोपण्याला जाण्याची पद्धतही कांहीं ठिकाणीं प्रचलित आहे. इंग्लिश मनुष्य रोज सरासरी ५ कप चहा पितो. मजुरांचा चहाचा कप इतर कपापेक्षां मोठा असतो. त्याला 'लार्ज टी' म्हणतात. चहाप्रमाणें सिगारेटसहि भरपूर लागतात. येथें स्त्री पुरुष सिगारेट ओढत असल्यामुळें कुटुंबाचा बराच पैसा सिगारेटवर खर्च होतो. सिगारेटच्या एका आठवड्याच्या खर्चांत त्या आठवड्याचें रेशन सहज आणतां येईल. परंतु एक गोष्ट खरी कीं १६ वर्षांच्या आंतला एकहि मुलगा सिगारेट ओढतांना मला दिसला नाहीं.

## रस्त्यांवर भिकारी नाहींत

इंग्लंडमध्यें आपण कोठेंहि जा, वेडे अगर भिकारी दिसणार नाहीत. वेड्याच्या माठीमागें मुलें लागलीं आहेत व तो रस्त्यांत वाटेल ते चाळे करीत धांवत आहे असें दिसत नाहीं. कांहीं लोक अर्धवट वेडे आहेत. हे लोक एकादी बाग अगर निवांत जागा पाहून तेथें तासन्तास हातवारे करीत बसलेले असतात मला ऑक्सफर्ड सर्कस नांवाच्या चौकांत एक असाच वेडा दिसला. तो तोंडानें कांहीं तरी पुटपुटत उभा होता. जाणारे येणारे लोक त्याच्याकडे ढुंकूनसुद्धां पहात नव्हते. मी बी. बी. सी. मधील काम संपवून दोन तासांनीं आलों तरी सदर महाशय तेथेंच बसलेले होते. त्या वेळीं नुसतें हातवारे न करतां वर्तमानपत्र वाचीत तो मध्येंच वर पाहून हंसत

होता. हा गृहस्थ असें कां करितो ? असें मी एका माणसाला विचारलें. त्यावर तो म्हणाला, "हा गृहस्थ पूर्वी हाईड पार्कमध्यें धर्मपर व्याख्यान देत असे. एकाएकीं त्याच्या मेंदूत विकृति निर्माण झाली व आज बरींच वर्षें तो असाच निरनिराळ्या ठिकाणीं उभा राहून पुटपुटत असतो. सांपत्तिक स्थिति बरी असल्यामुळें त्याला इतर कशाची ददात नाहीं.'

## वेड्याकडे कशाला लक्ष द्या

जी गोष्ट वेड्यांची तीच भिकाऱ्यांची म्हणतां येईल. येथें भिकारी अजिबात नाहींत असा मात्र अर्थ नाहीं. मोठमोठ्या चौकांतून अगर रेल्वे स्टेशनच्या कोपऱ्यांत बाजा वाजवीत उभा असलेला एकादा मनुष्य दिसेल. त्याच्या जवळ उपडी हॅट असेल. तो सतत बाजा वाजवीत राहील. ज्याला वाटेल तो हॅटमध्यें पैसे टाकील. लोकांच्या मागें लागून पैसे मागण्याची पद्धत नाहीं. बाजा वाज-विणाऱ्याप्रमाणें गरीबीमुळें काड्याच्या पेट्या विकणारे कांहीं स्त्री-पुरुष आहेत. ट्रे अडकवून ते उभे असतात. लोक त्यांना मदत म्हणून जास्त पैसे देऊन पेट्या विकत घेतात. कांहीं स्त्रिया, 'मी गरिब आहें व मला तीन चार मुलांचें पालनपोषण करावें लागत आहे' अशा अर्थाची पाटी विक्रीच्या खोक्यावर लावतात.

सामुदायिक रीत्या पैसे गोळा करण्याचा एक प्रकार तिकडे आहे. पैसे गोळा करणारे लोक लढाईमध्यें अधू झालेले असतात. पांच सात लोक रस्त्यानें बँड वाजवीत जातात. त्यांच्या बरोबरचीं दोन माणसें डबडीं हातांत घेऊन जाणाऱ्या येणाऱ्या लोकांकडे पैशाची याचना करतात.

## डोळस आंधळे

प्रथम मला वाटलें होतें कीं इंग्लंडमध्यें आंधळेच नसावेत; कारण बरेच महिने मला एकसुद्धां आंधळा दिसला नाहीं. मी जेव्हां कार-खान्यांत कामाला गेलों, तेव्हां तेथें मला चार पांच अंध स्त्रीपुरुष दिसले. हे लोक एका मोटारींतून येत व सायंकाळीं कारखाना सुटल्यावर त्याच

मोटारींतून परत जात. या लोकांकडे रेडीओचे कांहीं भाग बसविण्याचें काम होतें. एक वेळ डोळस माणसाच्या हातून कामाची चूक होईल; पण त्यांच्या हातून होत नसे. ते लंडनच्या अंध संरक्षण सोसायटीकडून येत असत. या सोसायटीतर्फे निरनिराळ्या कंपन्यांतून लोक कामाला पाठविले जातात. सोसायटीमध्यें अंधाकरतां सर्व सुखसोयी आहेत, असें मला समजलें. रेडीओ, वर्तमानपत्रें व अनेक प्रकारचे खेळ व त्यांच्या साधनांनीं या सोसायटचा सुसज्ज आहेत. अंधांना बागकाम, वाद्यवादन अशासारख्या अनेक कलांचें शिक्षण मिळतें.

## रस्त्यावरचे चित्रकार

इंग्लंडमध्यें प्रवास करीत असतांना आणखी एक गोष्ट चटकन् लक्षात येते. हे लोक कलेचे फार भोक्ते आहेन आणि म्हणूनच चौकांतील रस्त्याच्या कडेच्या जागेंत रंगीबेरंगी खडूंनीं सुंदर देखावे चित्रित करून गरीब चित्रकार त्यावर गुजराण करीत आहेत. चित्रकारांनीं काढलेलीं चित्रें जाणारे येणारे लोक पाहतात, त्यांचें कौतुक करतात व जातांना पेनी, दोन पेनी जवळ ठेवलेल्या टोपींत टाकून निघून जातात. रस्त्यावरच्या या चित्रकारांत म्हाताऱ्या लोकांचा भरणा अधिक आहे. म्हातारपणचा काळ घरीं आळसांत बसून फुकट घालविण्यापेक्षां कांहींतरी करून चार पैसे मिळवावेत असें या लोकांना वाटत असावें.

म्हाताऱ्या कलाकारांप्रमाणें तरुण कलाकारांनींहि आपली सोय करून घेतली आहे. हे लोक रस्त्यावर बसत नाहींत. ड्रॉईंग पेपरवर चांगले देखावे काढून तीं चित्रें सायंकाळच्या वेळीं एका ठराविक जागीं सर्वजण विकण्याकरितां बसतात. लंडनमध्यें हॅमस्टेडहीथवर ही व्यवस्था आहे. तेथें सायंकाळीं चित्रांचें जणू प्रदर्शन भरलेलें असतें. शेंकडों लोक चित्रें पाहण्याकरितां येऊन जातात व आवडलेलें चित्र खरेदी करतात. या चित्रांच्या किंमती फार कमी असतात.

✦ ✦ ✦

# ४

## आळशी हिंदी लोक

इंग्लीश लोकांना आम्हा हिंदी लोकांबद्दल काय वाटतें ? अशा अर्थाचा प्रश्न मला बरेच मित्र विचारीत असत. त्याचा प्रत्यय तेथील निरनिराळ्या क्लबांतून प्रवासवर्णनात्मक होणाऱ्या व्याख्यानांवरून येतो. प्रवासी लोकांचीं व्याख्यानें ऐकण्याची येथील जनतेला फार आवड. कांहीं प्रवाशांचीं व्याख्यानें क्लबांत होतात, तर दूर देशांचा प्रवास करून आलेल्या धाडसी प्रवाशांचीं व्याख्यानें मोठमोठ्या हॉलमधून होतात. व्याख्यानाला ५ पौन्डापर्यंत सुद्धां तिकिट असूं शकतें. इतकें भारी किंमतीचें तिकिट असून लोकांची गर्दी भरपूर होते.

हिंदुस्थानमध्यें १३ वर्ष राहिलेल्या फोर्ड नांवाच्या एका गृहस्थाचें व्याख्यान ऐकायला मिळालें. त्यांनीं युद्धांत व युद्धापूर्वीं हिंदुस्थान पाहिला होता. त्यांची निरीक्षणशक्ति दांडगी होती. हिंदी लोकांच्या चालीरीती मोठ्या विनोदी भाषेंत त्यांनीं सांगितल्या. खरें सांगायचें म्हणजे त्यांनीं सांगितलेल्या चालीपैकीं मला सुद्धां कांहीं माहिती नव्हत्या. त्यांच्या व्याख्यानाचा रोख टीका करण्याकडेहि होता. हिंदी लोक कसे आहेत याचें वर्णन त्यांनीं पुढील शब्दांत केलें; ते म्हणाले, "स्वतः कष्ट करण्यापेक्षां दुसऱ्याकडून कसे कष्ट करून घेतां येतील याकडे प्रत्येकजण लक्ष देतो. घरांतील साधींसुधीं कामें नोकराकडून करून घेतलीं जातात. स्वतःचें अंगण अगर संडास साफ करणें हें कमीपणाचें लक्षण समजलें जातें. नोकराला काम करायला लावून स्वतः आळसांत लोळत पडणें हें श्रीमंतीचें लक्षण समजलें जातें. स्वच्छता व नागरिकशास्त्राचें ज्ञान सर्वसामान्य लोकांना फारच कमी. सार्वजनिक ठिकाणच्या लहान सहान वस्तू पळविण्याची

प्रवृति कांहीं लोकांत दिसते. उदाहरणार्थ, रेल्वेंतले बल्ब, वाचनालयांतील पुस्तकें आणि पडक्या घरांची माती इत्यादि वस्तू चोरीला गेल्याच्या बातम्या वर्तमानपत्रांत नेहमीं येत असतात. पत्नी नवऱ्याबरोबर अगर देवदर्शनाला २–२ मैल चालत जाईल. पण अंधार पडतांच घरांतील कचरा सार्वजनिक रस्त्यावर हळूंच फेकून देईल; पण जवळ असलेल्या कचरा पेटींत टाकणार नाहीं. रस्त्यावर कचरा टाकण्यांत आपण कांहीं सामाजिक गुन्हा करीत आहोंत ही कल्पना तिच्या मनाला शिवणार नाहीं. सिनेमांतून राष्ट्रगीताच्या रेकॉर्डस् वाजवितात; पण राष्ट्रगीताला मान द्यावा ही कल्पना अजून पुढाऱ्यांना सुद्धां नाहीं. राष्ट्रगीत चालू असतांना मोठमोठे पुढारी स्तब्ध उभे न राहतां चुळबुळ करतांना मी स्वत: अनेक वेळां पाहिलें आहे."

अशा प्रकारच्या आणखीहि कांहीं गोष्टी त्यांनीं सांगितल्या; परंतु शेवटीं समारोप करतांना ते म्हणाले, "अलिकडे मात्र हा देश नवचैतन्याच्या जोमानें भराभर प्रगतीपथाकडे चालला आहे. तरुणांच्या मनांत देशप्रेमाचें बीज रुजूं लागलें आहे. भारताची संस्कृति अत्यंत वरच्या दर्जाची आहे. मीं मघा सांगितलेल्या गोष्टी एकादा प्रवासी दहा वर्षांनंतर भारतांत गेला तर कदाचित त्याला पहावयाला देखील सांपडणार नाहींत. एके काळीं वैभवाच्या शिखरावर व सुसंस्कृत असलेला हा देश भावी कालांत साऱ्या जगाला मार्गदर्शन करील असें वाटतें."

## हिवाळ्यांतील धुकें

दीड वर्षाच्या मुक्कामांत मला सर्व ॠतुंचा चांगला अनुभव आला. उन्हाळ्यांतील इंग्लंड आणि हिवाळ्यांतील इंग्लंड यांत जमीन अस्मानाचें अंतर असतें. ज्यांनीं उन्हाळ्यामध्यें इंग्लंडचें 'पऱ्यांचा देश' म्हणून वर्णन केलें आहे, त्या कवींना हिवाळ्यामध्यें तेथें राहण्याचा प्रसंग आला तर, त्यांची स्थिति मोठी शोचनीय होईल. उन्हाळ्यांत सूर्य सकाळीं ५॥ वाजतां उगवून रात्रीं ९॥ ते १० च्या दरम्यान मावळतो. इतकेंच नव्हे तर संधिप्रकाश किती तरी वेळ

असतो, पण हिवाळ्यांत सकाळीं ९ वाजतां सूर्य उगवतो. परंतु उगवलेला सूर्य दिसेलच असें सांगतां येणार नाहीं. कारण आकाशांत सर्वत्र ढग व धुकें असतें. तें इतकें दाट असतें कीं कांहीं वेळां ३ फूट अंतरावरचा मनुष्य सुद्धां दिसत नाहीं. हिवाळ्याची सुरुवात सप्टेंबरपासून होते. या दिवसांत झाडांचीं पानें पिकून तीं गळायला लागतात. बागेंतलीं फुलें कोमेजून जातात. झाडांच्या पानांचा रस्त्यावर इतका खच पडतो कीं तो सर्व काढण्याचें काम पुढें बरेच दिवसांत संपत नाहीं.

## बर्फाच्या म्हाताऱ्या

अशा प्रकारें सर्व वातावरण थंड व भकास झाल्यानंतर ऑक्टोबरच्या सुरुवातीला जमिनीवर पडलेल्या दंवबिंदूचे पांढरे बर्फाचे दाणे दिसू लागतात. हेंच तें फरॉस्ट. असेच कांहीं दिवस फरॉस्ट दिसत असतांना अचानक आकाशांतून बर्फवृष्टीला सुरुवात होते. आकाशांतून पडणारें बर्फ कापसाप्रमाणें असतें. वाऱ्यामुळें सायरीच्या झाडावरच्या कापसाच्या म्हाताऱ्या उडतांना जसें आल्हाददायक दृश्य दिसतें, तसेंच हें दृश्य असतें. कापसाच्या म्हाताऱ्या वर उंच उंच जातात, तर या बर्फाच्या म्हाताऱ्या वरून खालीं येत असतात. बर्फ पडत असतांना बाहेर फिरण्यांत फार गंमत वाटते. तोंडांतून निघणाऱ्या वाफेचा फवारा धुराप्रमाणें दिसतो. अंगाखांद्यावर बर्फ पडल्यामुळें त्याचे छोटे छोटे गुच्छ जमतात. लहान लहान मुलें आनंदानें उड्या मारूं लागतात व जमीनीवर पडलेल्या बर्फाचे चेंडू बनवून एकमेकांना मारतात. मोठ्या मुली व मुलें एकत्र बर्फ जमवून त्याचा मनुष्य तयार करतात. या 'स्नो मॅन' ला नाक, डोळे व पोट असतें. हातपाय नसतात. याच्या डोक्यावर हॅट ठेऊन तोंडांत चिरूट देतात.

बर्फ पडण्यामुळें मुलांना आनंद होत असला तरी बस कंपनीवाले व मोटारच्या मालकांची मात्र या बर्फवृष्टीमुळें त्रेधा उडते. रस्त्यावर बर्फ पडल्यामुळें रस्ते गुळगुळीत होतात. मोटारी पुढें न जातां त्यांचीं चाकें जागच्या जागीं फिरत राहतात. कामाला जाणारे मजूर एक-

प्रवृति कांहीं लोकांत दिसते. उदाहरणार्थ, रेल्वेंतले बल्ब, वाचनालयांतील पुस्तकें आणि पडक्या घरांची माती इत्यादि वस्तू चोरीला गेल्याच्या बातम्या वर्तमानपत्रांत नेहमीं येत असतात. पत्नी नवऱ्याबरोबर अगर देवदर्शनाला २–२ मैल चालत जाईल. पण अंधार पडतांच घरांतील कचरा सार्वजनिक रस्त्यावर हळूंच फेकून देईल; पण जवळ असलेल्या कचरा पेटींत टाकणार नाहीं. रस्त्यावर कचरा टाकण्यांत आपण कांहीं सामाजिक गुन्हा करीत आहोंत ही कल्पना तिच्या मनाला शिवणार नाहीं. सिनेमांतून राष्ट्रगीताच्या रेकॉर्डस् वाजवितात; पण राष्ट्रगीताला मान द्यावा ही कल्पना अजून पुढाऱ्यांना सुद्धां नाहीं. राष्ट्रगीत चालू असतांना मोठमोठे पुढारी स्तब्ध उभे न राहतां चुळबुळ करतांना मी स्वत: अनेक वेळां पाहिलें आहे."

अशा प्रकारच्या आणखीहि कांहीं गोष्टी त्यांनीं सांगितल्या; परंतु शेवटीं समारोप करतांना ते म्हणाले, "अलिकडे मात्र हा देश नवचैतन्याच्या जोमानें भराभर प्रगतीपथाकडे चालला आहे. तरुणांच्या मनांत देशप्रेमाचें बीज रुजूं लागलें आहे. भारताची संस्कृति अत्यंत वरच्या दर्जाची आहे. मीं मघा सांगितलेल्या गोष्टी एकादा प्रवासी दहा वर्षांनंतर भारतांत गेला तर कदाचित त्याला पहावयाला देखील सांपडणार नाहींत. एके काळीं वैभवाच्या शिखरावर व सुसंस्कृत असलेला हा देश भावी कालांत साऱ्या जगाला मार्गदर्शन करील असें वाटतें."

## हिवाळ्यांतील धुकें

दीड वर्षाच्या मुक्कामांत मला सर्व ऋतुंचा चांगला अनुभव आला. उन्हाळ्यांतील इंग्लंड आणि हिवाळ्यांतील इंग्लंड यांत जमीन अस्मानाचें अंतर असतें. ज्यांनीं उन्हाळ्यामध्यें इंग्लंडचें 'पऱ्यांचा देश' म्हणून वर्णन केलें आहे, त्या कवींना हिवाळ्यामध्यें तेथें राहण्याचा प्रसंग आला तर, त्यांची स्थिति मोठी शोचनीय होईल. उन्हाळ्यांत सूर्य सकाळीं ५॥ वाजतां उगवून रात्रीं ९॥ ते १० च्या दरम्यान मावळतो. इतकेंच नव्हे तर संधिप्रकाश किती तरी वेळ

असतो, पण हिवाळ्यांत सकाळीं ९ वाजतां सूर्य उगवतो. परंतु उगवलेला सूर्य दिसेलच असें सांगतां येणार नाहीं. कारण आकाशांत सर्वत्र ढग व धुकें असतें. तें इतकें दाट असतें कीं कांहीं वेळां ३ फूट अंतरावरचा मनुष्य सुद्धां दिसत नाहीं. हिवाळ्याची सुरुवात सप्टेंबरपासून होते. या दिवसांत झाडांचीं पानें पिकून तीं गळायला लागतात. बागेंतलीं फुलें कोमेजून जातात. झाडांच्या पानांचा रस्त्यावर इतका खच पडतो कीं तो सर्व काढण्याचें काम पुढें बरेच दिवसांत संपत नाहीं.

## बर्फाच्या म्हाताऱ्या

अशा प्रकारें सर्व वातावरण थंड व भकास झाल्यानंतर ऑक्टोबरच्या सुरुवातीला जमिनीवर पडलेल्या दंवबिंदूचे पांढरे बर्फाचे दाणे दिसूं लागतात. हेंच तें फ्रॉस्ट. असेच कांहीं दिवस फ्रॉस्ट दिसत असतांना अचानक आकाशांतून बर्फवृष्टीला सुरुवात होते. आकाशांतून पडणारें बर्फ कापसाप्रमाणें असतें. वाऱ्यामुळें सायरीच्या झाडावरच्या कापसाच्या म्हाताऱ्या उडतांना जसें आल्हाददायक दृश्य दिसतें, तसेंच हें दृश्य असतें. कापसाच्या म्हाताऱ्या वर उंच उंच जातात, तर या बर्फाच्या म्हाताऱ्या वरून खालीं येत असतात. बर्फ पडत असतांना बाहेर फिरण्यांत फार गंमत वाटते. तोंडांतून निघणाऱ्या वाफेचा फवारा धुराप्रमाणें दिसतो. अंगाखांद्यावर बर्फ पडल्यामुळें त्याचे छोटे छोटे गुच्छ जमतात. लहान लहान मुलें आनंदानें उड्या मारूं लागतात व जमीनीवर पडलेल्या बर्फाचे चेंडू बनवून एकमेकांना मारतात. मोठ्या मुली व मुलें एकत्र बर्फ जमवून त्याचा मनुष्य तयार करतात. या 'स्नो मॅन' ला नाक, डोळे व पोट असतें. हातपाय नसतात. याच्या डोक्यावर हॅट ठेऊन तोंडांत चिरूट देतात.

बर्फ पडण्यामुळें मुलांना आनंद होत असला तरी बस कंपनीवाले व मोटारच्या मालकांची मात्र या बर्फवृष्टीमुळें त्रेधा उडते. रस्त्यावर बर्फ पडल्यामुळें रस्ते गुळगुळीत होतात. मोटारी पुढें न जातां त्यांचीं चाकें जागच्या जागीं फिरत राहतात. कामाला जाणारे मजूर एक-

मेकांचा हात धरून चालत जातात. इतकें असून सुद्धां पाय घसरून पडणारांची संख्या भरपूर असते. एकादी स्त्री घसरून पडली कीं तिच्या मैत्रिणी मनापासून हंसतात. परंतु थोड्या वेळानें त्यांच्यावर जेव्हां तीच पाळी येते त्या वेळीं हास्याला पारावार रहात नाहीं. एकदां बर्फ पडून गेला कीं नंतर नगरपालिकेच्या मोटारी रस्त्यावर वाळू टाकण्यास सुरुवात करतात. वाळू टाकण्याचें काम रात्रंदिवस चालतें. वाळू टाकून झाली कीं बसची वाहतूक सुरू होतें. कांहीं प्रसंगीं अचानक बर्फवृष्टी सुरू झाली तर रस्त्यांत उभ्या केलेल्या बसेसची मोठी थोरली रांग लागलेली दिसते.

याच दिवसांत इंग्लंडमध्यें कोळशाचें वाटप रेशनपद्धतीनें केलें जातें. कारण प्रत्येक घरांत व ऑफीसांत हीटरचा उपयोग केला जातो. हीटर पेटविला नाही तर घरांत बसणें अशक्य असतें. बाहेर बर्फांत हिंडतांना थंडी वाजत नाहीं. पण घरांत मात्र खूप थंडी वाजते. दुसरी एक गोष्ट माझ्या निदर्शनाला आली. बर्फ पडतांना जी थंडी वाजते तिच्यापेक्षां जास्त थंडी बर्फ वितळतांना वाजते. या दिवसांत रात्रीं झोंपतांना अंथरुणामध्यें गरम पाण्याच्या पिशव्या व बाटल्या घेऊन झोंपावें लागतें.

बर्फवृष्टी नोव्हेंबर डिसेंबरमध्यें जास्त होते. 'व्हाईट ख्रिसमस' (पांढरा नाताळ) असेल तर पुढील वर्षांत भरपूर सूर्यप्रकाश मिळेल अशी समजूत आहे. बहुतेक ख्रिसमसमध्यें बर्फ पडतो. पण पुढील वर्षांत उन्हाळा चांगला लाभेलच असें सांगतां येत नाहीं.

हिंवाळ्याची तीव्रता जानेवारीच्या शेवटीं कमी होते. त्यानंतर वातावरणांत एकदम फरक पडूं लागतो. बागेंत झाडांना कोंब फुटूं लागतात. फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यांत घरांतील मुलांना झाडावर कोवळीं पानें–फुलें पाहून विलक्षण आनंद होतो.

## उन्हाळ्याचा आनंद

फेब्रुवारी महिन्यांत उन्हाळा आला या एका कल्पनेनें सर्वत्र बदल

दिसतो. शेतकरी आपल्या ट्रॅक्टर्स आदि अवजारांना तेल देऊन साफ करतात. शहरी लोक आपल्या बागकामाच्या हत्यारांना धार लावतात. रेकचा दांडा अगर विळ्याची मूठ ठीक आहे कीं नाहीं याची खात्री करून घेतात. सायंकाळच्या वेळीं घरांतील सर्व लोक बागेची आखणी करण्यांत गुतलेले दिसतात.

जी गोष्ट घरमालकांची, तीच दुकानदारांची. अनेक प्रकारच्या फुलझाडांचीं चित्रें दुकानांवर दिसूं लागतात. जातां येतां प्रवाशाचें लक्ष वेधावें म्हणून चौकाच्या कोपऱ्यावर बी-बियाणांच्या व्यापाऱ्यांच्या मोठमोठ्या जाहिराती दिसतात. पंधरा दिवसांत फुलें येणारीं झाडें, एकाच वेळीं तीन रंगांचीं फुलें येणारीं झाडें, अशा तऱ्हेच्या जाहिराती वाटल्या जातात. या दिवसांत या दुकानांत ग्राहकांची अक्षरशः गर्दी उसळलेली असते.

रेल्वे स्टेशनावर आपण गेलों तर तेथें समुद्रकिनाऱ्यावरील गांवांच्या जाहिराती दिसतील. कारण बहुतेक लोक आपली उन्हाळ्याची सुटी समुद्रकिनारीं घालवितात. या जाहिरातीकडे नीट पाहिल्यास मोठी गंमत दिसते. त्यांत आपल्या गांवचें वैशिष्टय चित्ररूपानें व शब्दरूपानें थोडक्यांत प्रवाशांपुढें मांडण्याचा प्रयत्न केलेला असतो. जाहिरातीवरील चित्रें मोठीं आकर्षक असतात. स्टेशनावर नवीन जाहिरात लागली कीं शाळेंतले विद्यार्थी तिचे पहिले वाचक. जवळ आलेल्या परीक्षेपेक्षां त्यानंतर मिळणाऱ्या सुटीविषयींच त्यांच्यांत चर्चा चाललेली ऐकूं येईल. मुलांना सुटी ७ आठवडे असते.

हां हां म्हणतां उन्हाळा येतो. एकामागून एक फुलझाडें फुलूं लागतात. दूर गेलेले पक्षी परत येतात व जिकडे तिकडे आनंदीआनंद होतो. खडतर हिवाळ्यानंतर आलेल्या या नयनरम्य उन्हाळ्याचें स्वागत अनेक प्रकारांनीं केलें जातें. उन्हाळ्याचें स्वागत करणारे अनेक सण आहेत व या सणावारीं गायलीं जाणारीं गाणींहि भरपूर आहेत.

## हिंदबद्दल गैरसमज

इंग्लिश कुटुंबाबद्दल मला बरेच निरनिराळे अनुभव आले. मी

एक काळा मनुष्य आहें, म्हणून मात्र मला कोणी कमी लेखलें नाहीं. हिंदुस्थान-पाकिस्तानबद्दल त्यांच्यांत खूप गैरसमज दिसले. हिंदी जीवनावर तर लोक अनेक प्रश्न विचारीत. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, शहरी लोकांना हिंदुस्थानविषयीं थोडी तरी कल्पना आहे; पण खेडेगांवांत ती अजिबात नाहीं. लढाईच्या वेळीं गेलेल्या अनेक सैनिकांनीं कांहीं भयंकर वातम्या येथें सांगून ठेवल्या आहेत. लोक मला विचारीत, "तुमच्या देशांत सर्वत्र विषारी साप आहेत का? आम्हीं असें ऐकलें आहे कीं रोज रात्रीं घरांतून साप हिंडतांना दिसतात." दुसरा प्रश्न हिंदी लोकांच्या नीतिमत्तेविषयीं. ते म्हणत, "हिंदी स्त्री अगदीं थोड्या मोबदल्यांत आपलें सर्वस्व अर्पण करण्याला तयार असते असें आम्हीं ऐकलें आहे." त्यांच्या असल्या अनेक प्रश्नांना मला शांततेनें उत्तरें द्यावीं लागत. कपाळाला कुंकू लावणारी स्त्री ही उच्चवर्णीय असते अशी एक समजूत येथील लोकांत आहे. कांहीं लोकांनीं मोठालें कुंकू लावलेल्या वेश्यांबरोबर काढलेले फोटो दाखविले. हे फोटो दाखवून म्हणत, "या कुंकू लावलेल्या स्त्रिया उच्चवर्णीय आहेत ना?" त्यांच्या या प्रश्नाला काय उत्तर द्यावें हेंच समजत नसे. जेव्हां मी खरा प्रकार सांगें तेव्हां मात्र ते खजील होत.

## केवढी ही बडदास्त !

येथील कांहीं कुटुंबांत मी अगदीं त्यांतील एक याप्रमाणें रहात असें. सायंकाळीं कामावरून येण्याला उशीर झाला तर ते लोक माझी वाट पहात असत. सायंकाळचीं जेवणें ६॥ वाजतां होत; परंतु माझी वाट पहात ते ७ वाजेपर्यंत थांबत. श्री. डेव्हीस यांच्या कुटुंबांत असतांना एकदां मी प्रयोगाकरतां बाहेरगावीं गेलों होतों. परत येतांना जोराच्या पावसाला सुरुवात झाली. मी रेनकोट नेला नव्हता. माझे सर्व कपडे ओले चिंब झाले होते. सर्व लोक माझी वाट पहात थांबले होते. घंटा वाजविण्याच्या अगोदरच पुढचें दार मुलांनीं उघडलें. श्री. डेव्हीसनीं माझी बॅग बाजूला ठेवली. ओले कपडे काढल्यानंतर

सर्वांनीं माझें अंग पुसलें. जेवण झाल्यावर अंथरुणांत गरम पाण्याच्या पिशव्या श्री. डेव्हीसनें ठेवल्या. इतकें करून मुद्धां मला दुसऱ्या दिवशीं ताप आला. सबंध दिवसभर कोणी ना कोणी माझ्याजवळ बसून होतें. "रॅगू, ( रघुवीर या नांवाचें इंग्लंडमधील रूप ) तूं लवकरच बरा होशील" असें म्हणून प्रत्येकजण मला धीर देत.

## मनाचा थरकाप करणारी हकीकत

ब्रायटन येथें एका स्कॉटिश बाईकडे मुक्काम होता. बाईचीं दोन मुलें गेल्या लढाईंत मारलीं गेलीं होतीं. युद्धकाळीं ती स्वतः एका कारखान्यांत काम करीत असे. तिनें सांगितलेल्या युद्धांतील कांहीं आठवणी अंगावर काटे आणणाऱ्या होत्या. इतकी म्हातारी बाई, पण आठवणी सांगत असतांना ढसढसा रडत असे. एक आठवण सांगतांना ती म्हणाली, "माझा थोरला मुलगा रणांगणावर गेला होता व १० वर्षांचा डेव्हीड माझ्या जवळ होता. बरेच दिवस जर्मनांचे बॉंब शहरावर पडले नव्हते; म्हणून मीं त्याला खेडयांतील सरकारी केंद्रांतून एक दिवसाकरतां घरीं आणलें. सायंकाळची वेळ ! मी व तो बाजारांत चाललों होतों. एकाएकीं हल्ल्याची सूचना देणारे भोंगे सुरू झाले. डेव्हिडचा हात पकडून मी तावडतोब शेजारच्या भुयाराकडे धांव घेतली. भुयारांत माणसांची खूप गर्दी होती, तरी येणाऱ्या माणसाकरतां तावडतोब जागा करून दिली जात होती. आम्ही आंत गेलों तोंच बॉंब पडण्याला सुरुवात झाली. बॉंबच्या स्फोटाबरोबर सर्व जमीन हादरत असे. विमान-विरोधी तोफा विमानांचा समाचार घेत होत्या. एक बॉंब जवळच असलेल्या पाण्याच्या टाकीवर पडला. पाण्याचा लोंढाच्या लोंढा भुयारांत शिरला. दुसऱ्या दारानें प्रत्येकजण जीव बचावण्याकरतां बाहेर पडण्याची धडपड करीत होता. गडबडींत मी बाहेर पडलें. डेव्हिडचा हात केव्हांच सुटला होता. बाहेर आल्यावर मी त्याची वाट पाहिली. तो मला दिसला नाहीं. मला वाटलें, तो इतरांच्या बरोबर दुसरीकडे कोठेंतरी जीव बचावण्याकरतां गेला असेल. सारी रात्र मी जागून काढली. डेव्हीड गेला तो, कायमचाच गेला. अजून त्याचा पत्ता लागलेला नाहीं. डेव्हीड जाऊन

एक काळा मनुष्य आहें, म्हणून मात्र मला कोणी कमी लेखलें नाहीं. हिंदुस्थान-पाकिस्तानबद्दल त्यांच्यांत खूप गैरसमज दिसले. हिंदी जीवनावर तर लोक अनेक प्रश्न विचारीत. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, शहरी लोकांना हिंदुस्थानविषयीं थोडी तरी कल्पना आहे; पण खेडेगांवांत ती अजिबात नाहीं. लढाईच्या वेळीं गेलेल्या अनेक सैनिकांनीं कांहीं भयंकर वातम्या येथें सांगून ठेवल्या आहेत. लोक मला विचारीत, "तुमच्या देशांत सर्वत्र विषारी साप आहेत का? आम्हीं असें ऐकलें आहे कीं रोज रात्रीं घरांतून साप हिंडतांना दिसतात." दुसरा प्रश्न हिंदी लोकांच्या नीतिमत्तेविषयीं. ते म्हणत, "हिंदी स्त्री अगदीं थोड्या मोबदल्यांत आपलें सर्वस्व अर्पण करण्याला तयार असते असें आम्हीं ऐकलें आहे." त्यांच्या असल्या अनेक प्रश्नांना मला शांततेनें उत्तरें द्यावीं लागत. कपाळाला कुंकू लावणारी स्त्री ही उच्चवर्णीय असते अशी एक समजूत येथील लोकांत आहे. कांहीं लोकांनीं मोठालें कुंकू लावलेल्या वेश्यांबरोबर काढलेले फोटो दाखविले. हे फोटो दाखवून म्हणत, "या कुंकू लावलेल्या स्त्रिया उच्चवर्णीय आहेत ना?" त्यांच्या या प्रश्नाला काय उत्तर द्यावें हेंच समजत नसे. जेव्हां मी खरा प्रकार सांगें तेव्हां मात्र ते खजील होत.

## केवढी ही बडदास्त !

येथील कांहीं कुटुंबांत मी अगदीं त्यांतील एक याप्रमाणें रहात असें. सायंकाळीं कामावरून येण्याला उशीर झाला तर ते लोक माझी वाट पहात असत. सायंकाळचीं जेवणें ६॥ वाजतां होत; परंतु माझी वाट पहात ते ७ वाजेपर्यंत थांबत. श्री. डेव्हीस यांच्या कुटुंबांत असतांना एकदां मी प्रयोगाकरतां बाहेरगावीं गेलों होतों. परत येतांना जोराच्या पावसाला सुरुवात झाली. मी रेनकोट नेला नव्हता. माझे सर्व कपडे ओले चिंब झाले होते. सर्व लोक माझी वाट पहात थांबले होते. घंटा वाजविण्याच्या अगोदरच पुढचें दार मुलांनीं उघडलें. श्री. डेव्हीसनीं माझी बॅग बाजूला ठेवली. ओले कपडे काढल्यानंतर

सर्वांनीं माझें अंग पुसलें. जेवण झाल्यावर अंथरुणांत गरम पाण्याच्या पिशव्या श्री. डेव्हीसनें ठेवल्या. इतकें करून मुद्धां मला दुसऱ्या दिवशीं ताप आला. सबंध दिवसभर कोणी ना कोणी माझ्याजवळ बसून होतें. "रॅगू, ( रघुवीर या नांवाचें इंग्लंडमधील रूप ) तूं लवकरच बरा होशील" असें म्हणून प्रत्येकजण मला धीर देत.

## मनाचा थरकाप करणारी हकीकत

ब्रायटन येथें एका स्कॉटिश बाईकडे मुक्काम होता. बाईचीं दोन मुलें गेल्या लढाईंत मारलीं गेलीं होतीं. युद्धकाळीं ती स्वतः एका कारखान्यांत काम करीत असे. तिनें सांगितलेल्या युद्धांतील कांहीं आठवणी अंगावर काटे आणणाऱ्या होत्या. इतकी म्हातारी बाई, पण आठवणी सांगत असतांना ढसढसा रडत असे. एक आठवण सांगतांना ती म्हणाली, "माझा थोरला मुलगा रणांगणावर गेला होता व १० वर्षांचा डेव्हीड माझ्या जवळ होता. बरेच दिवस जर्मनांचे बाँब शहरावर पडले नव्हते; म्हणून मीं त्याला खेड्यांतील सरकारी केंद्रांतून एक दिवसाकरतां घरीं आणलें. सायंकाळची वेळ ! मी व तो बाजारांत चाललों होतों. एकाएकीं हल्ल्याची सूचना देणारे भोंगे सुरू झाले. डेव्हिडचा हात पकडून मी तावडतोब शेजारच्या भुयाराकडे धांव घेतली. भुयारांत माणसांची खूप गर्दी होती, तरी येणाऱ्या माणसाकरतां तावडतोब जागा करून दिली जात होती. आम्ही आंत गेलों तोंच बाँब पडण्याला सुरुवात झाली. बाँबच्या स्फोटाबरोबर सर्व जमीन हदरत असे. विमान-विरोधी तोफा विमानांचा समाचार घेत होत्या. एक बाँब जवळच असलेल्या पाण्याच्या टाकीवर पडला. पाण्याचा लोंढाच्या लोंढा भुयारांत शिरला. दुसऱ्या दारानें प्रत्येकजण जीव बचावण्याकरतां बाहेर पडण्याची धडपड करीत होता. गडबडींत मी बाहेर पडलें. डेव्हिडचा हात केव्हांच सुटला होता. बाहेर आल्यावर मी त्याची वाट पाहिली. तो मला दिसला नाहीं. मला वाटलें, तो इतरांच्या बरोबर दुसरीकडे कोठेंतरी जीव बचावण्याकरतां गेला असेल. सारी रात्र मी जागून काढली. डेव्हीड गेला तो, कायमचाच गेला. अजून त्याचा पत्ता लागलेला नाहीं. डेव्हीड जाऊन

दोन दिवस होतात न होतात तोंच दुसरा मुलगा लढाई चालू असतांना कामीं आल्याचें सरकारनें तारेनें कळविलें. मी कांहीं दिवस अगदीं वेडी झालें होतें. वाटे, मी जर पुरुष असतें तर विमान घेऊन दुष्ट नाझीवर सरळ चाल केली असती. पण ते सर्व केवळ विचार होते. स्वस्थ बसण्याशिवाय मला कांहींच करतां येत नव्हतें. मीं तावडतोब युद्धसाहित्य तयार करणाऱ्या कारखान्यांत नोकरी धरली. युद्धानंतर कारखाना बंद झाला. सरकारकडून थोडे पैसे मिळाले. मुलांच्या गोड आठवणी मनाशीं रंगवीत मी कसे तरी दिवस काढीत आहें."

इंग्लंडमधील अनेक लोकांवर असले प्रसंग आले. त्यांना त्यांत कांहीं नवीन वाटत नव्हतें; पण माझ्या डोळ्यासमोर त्या म्हातारीनें सांगितलेला प्रसंग किती तरी दिवस हुबेहुब उभा रहात असे. त्यामुळें मन थरारून जाई.

## हवा भरलेल्या पुऱ्या

वरील प्रसंगाप्रमाणेंच कितीतरी मजेदार प्रसंगहि अनुभवण्यास मिळाले. एकदां स्टेनिंग कुटुंबांत असतांना सौ. स्टेनिंग म्हणाल्या, "रॅगू, आज तूं हिंदी पद्धतीचा सैपाक कर." घरांतल्या सर्व माणसांनीं या गोष्टीला पाठिंबा दिला. घरांत मसूराची डाळ, बटाटे व गव्हाचें पीठ होतें. मी तावडतोब सैपाकाला लागलों. अनाथ विद्यार्थी गृहांत असतांना सैपाकाची मला चांगलीच संवय झालेली होती.त्यामुळें कोठेंहि अडण्याचा संभव नव्हता. बटाटे उकडून घेऊन त्यांची कोरडी भाजी केली. भाजीला फोडणी देतांना मोहऱ्या नव्हत्या. हिंग येथील लोक खात नाहींत. मसुरीच्या डाळीची आमटी तयार केल्यानंतर भिजविलेल्या गव्हाच्या पिठाच्या पुऱ्या लाटायला घेतल्या. पण नंतर लक्षांत आलें कीं येथील लोकांकडे लाटणें पोळपाट नसतें; थोडा विचार केल्यावर युक्ती सांपडली. टेबलाचें पोळपाट बनविलें व बिलच्या क्रिकेटच्या स्टंपचें लाटणें केलें. पुऱ्या तळण्याकरितां खोलगट कढई नव्हती, म्हणून फराईंग पॅन घेतलें. तुपाऐवजीं फॅट वापरण्याचें ठरलें. मीं पुरी लाटायला सुरुवात केली. घरांतील सर्व लोक माझ्या-भोंवतीं गोळा झाले होते. सौ. स्टेनिगनें तर हातांत वही घेऊन सर्वांची

टिपणें घेण्याला सुरुवात केली होती. पुरी लाटून झाल्यावर ती उकळत्या फॅटमध्यें सोडली. पुरी फुगूं लागतांच सर्वांना आश्चर्य वाटलें. मुलें तर आनंदानें टाळ्या वाजवून पुरीच्या हलण्याबरोबर नाचूं लागलीं. सौ. स्टेनिंग घाईघाईनें बाहेर गेल्या व २।३ शेजारणींना घेऊन आल्या. थोडें मोहन घातल्यामुळें पुऱ्या फुगत होत्या. सर्वांना त्याचें आश्चर्य वाटलें. एक बाई म्हणाल्या, "रंगू, तूं त्यांत हवा कशी भरतोस?" "हं ही आमची इंडियन जादू आहे. ती कोणाला सांगायची नाहीं." माझ्या या उत्तरानें सर्वजण पोट धरून हंसले. पुऱ्यांची कृति नवीन आलेल्या बायकांनीं लिहून घेतली. कणकींत पाणी किती औंस घालावयाचें, यासारख्या प्रश्नांना उत्तर देतांना माझी फारच त्रेधा उडाली.

## बडबडे स्कॉटिश

माझा प्रवास युरोपांत बऱ्याच ठिकाणीं झाला. परंतु इंग्लिश जीवन जितकें जवळून पाहतां आलें तितका दुसऱ्या देशांतील लोकांशीं माझा संबंध आला नाहीं. इंग्लंडपेक्षां स्कॉटलंड बरें. कारण उंच पर्वत, हिरवीगार झाडी व लोकांचा बोलका स्वभाव यामुळें तेथें मला कधींच कंटाळा आला नाहीं. आयरिश लोक मेंढपाळी करणारे. रस्त्यावर गप्पा मारणें, मोठ्यानें बोलणें आणि विनोदानंतर आकाश गडगडल्याप्रमाणें हंसणें हें त्यांना फार प्रिय. इंग्लिश माणसाचा स्वभाव कांहींसा निराळा. तो कोणाशीं उगाचच गप्पा मारणार नाहीं. गाडींत कोणी कोणाशीं बोलणार नाहीं. आपण एकादा प्रश्न विचारला तर त्याचें अगदीं थोडक्यांत इंग्लिश माणसाकडून उत्तर मिळेल. इंग्लिश लोक स्कॉटिश लोकांना चिक्कू म्हणतात. त्यांच्या चिक्कूपणाच्या अनेक गोष्टी रंगवून सांगतात. "स्कॉटिश माणसाला एकाद्याचें पत्र आल्यास तो पत्रांतील मजकूर वाचण्यापूर्वीं स्टँपकडे पाहील. स्टँपवर शिक्का बसला नसेल तर स्टँप काढून झाल्यावर मग तो तें पत्र वाचील." अशा तऱ्हेचे अनेक चुटके आहेत. माझा अनुभव मात्र वेगळा आहे. माझ्या कार्यक्रमानंतर स्कॉटिश लोक मला घरीं बोलावित व पाहुणचार करीत.

## मजूर बंधूंनीं पार्टी दिली

इंग्लंडमध्यें दीड वर्ष होतों. त्यानंतर मात्र छोटया विजयची रोज आठवण होऊं लागली. प्रवासाला निघण्याच्या वेळीं पावणे दोन महिन्याचा असलेला विजय मोठा झाला होता. लहानपणच्या त्याच्या गमती जमती मला पत्रानें कळत होत्या; पण पत्रांत वाचणें व प्रत्यक्ष पाहणे यांत फरक आहे, ही जाणीव मनाला तीव्रतेनें होऊं लागली. माझें मन त्या वेळीं दोन विरुद्ध परिस्थितींत सांपडलें होतें. अनेक प्रेमळ मित्रांना सोडून जावें लागणार, या कल्पनेनें मनाला उदासीनता वाटे, तर आपणाला घरीं जायला मिळणार या कल्पनेनें चेहरा प्रफुल्लित होई. मी सामानाची बांधाबांध करण्याकरतां म्हणून दोन दिवस घरांत राहणार होतों. कारखान्याच्या मासिकांत व 'डेली मिरर' मध्यें मी परत जाणार याची वातमी प्रसिद्ध झाली. वातमी वाचून 'प्रवास सुखाचा होवो' अशीं बरींच पत्रें आलीं.

जाण्याच्या आदल्या दिवशीं सकाळींच माझ्याकडे कोणीतरी आल्याची खबर हेन्रीच्या रॉबर्टनें आणली. मी खालीं जाऊन पाहतों तों मी काम करीत होतों त्या कारखान्यांतील माझे मजूर मित्र. मला जरा आश्चर्य वाटलें. गुड मॉर्निंग करून मी खालीं वसतांच ते म्हणाले, "आज रात्रीं आम्ही तुझ्याकरतां एक पार्टी ठरविली आहे व तुला यायला हवें." माझीं बरींच कामें राहिलीं होतीं, अनेक मित्रांच्या भेटी घ्यावयाच्या होत्या. लंडनला जाऊन वी. बी. सी. वर झालेल्या भाषणाचे पैसे आणावयाचे होते व सामान तर बांधण्याचें तसेंच पडून राहिलें होतें. माझी अडचण मी त्यांना सांगतांच त्यांनीं सामान बांधून देण्याचें व मोटारनें टिलबरी डॉकवर पोंचविण्याचें कबूल केलें. त्यानंतर मात्र मला पार्टीला जाणें भागच होतें.

रात्रीं दोन वाजेपर्यंत खाणेंपिणें चाललें होतें. पार्टीकरितां २५।३० माणसें हजर होतीं. प्रत्येकजण कामावरच्या कांहीं ना कांहीं आठवणी काढून गप्पा मारीत होता. आपुलकीच्या त्या गप्पागोष्टींत दोन केव्हां वाजले तें समजलें देखील नाहीं. शेवटीं एकमेकांना निरोप दिला व मी घरीं आलों. अगदीं थकून गेलों होतों. सकाळीं ९ वाजतां

मजूर मित्र आले. सुमारें अर्ध्या तासांत पॅकिंग केल्यावर मी टिलबरी डॉककडे जाण्याला निघालों. नोलन कुटुंबाचा निरोप घेतला. मी बरेच दिवस त्यांच्याकडे रहात असल्यामुळें फार घरोबा निर्माण झाला होता. मी त्यांच्या मुलांना आठवण म्हणून खेळणीं आणून दिलीं होतीं. त्यांनींहि विजयकरता व शकूकरतां बऱ्याच लहान मोठ्या वस्तू दिल्या होत्या.

## इंग्लंडला 'गुड बाय !'

टिलबरी डॉकवर २४ हजार टनी चुसान उभी होती. हीच बोट मला भारताला घेऊन जाणार होती. आम्ही सर्वांनीं दुरूनच बोट न्याहाळली. कस्टमचें काम संपतांच मजूर मित्रासह सर्व बोट पाहिली. इतक्या प्रचंड बोटींत मी प्रथमच बसत होतों. दुपारीं दोन वाजतां बोटीनें इंग्लंडचा किनारा सोडला.

त्या सुमारास इंग्लंड व इराण यांच्या दरम्यान तेलाविषयीं चाललेला तंटा हमरीतुमरीवर आला होता. त्यामुळें तेल घेण्याला आमच्या बोटीला स्पॅनिश मोरोक्कोंतील सुईटा नांवाच्या बंदरीं थांबावें लागलें.

## गाढवावर पाव

बंदराचा दुरून दिसणारा देखावा नयनरम्य होता. त्यापूर्वीं प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या बोटी तेथें थांबत नसाव्यात असें एकंदर वातावरणावरून दिसलें. आम्ही दहाबाराजण एकत्र जमून गांव पाहण्याला गेलों. प्रवाशांना पाहण्याकरितां गांवांतील स्त्रिया घरांच्या गॅलरींत उभ्या असलेल्या दिसल्या. हिंदी स्त्रियांच्या पोशाखाबद्दल येथील स्त्रियांना बरेंच कुतुहल वाटलें. कारण त्या वळून वळून स्त्रियांच्या पोशाखाकडे पहात होत्या. कांहीं स्त्रिया खुणा करून आजूबाजूच्या लोकांना त्याबद्दल विचारतांना दिसल्या. गांव स्वच्छ असलें तरी मच्छीमार्केटमध्यें बरीच घाण दिसली. बेकरीवाले लोक गाढवावरून पाव विकित होते व लहान मुलें ते खरेदी करीत होतीं.

... ग्रंथ, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम .............. वि: ..............

या गांवांत बुलफायटिंग (बैलाची झुंज) चालते असें आमच्या गाईडनें सांगितलें. आम्हांला वेळ नव्हता. म्हणून झुंज नाहीं तर नाहीं, निदान झुंज खेळण्याची जागा पाहून येण्याचें ठरविलें. वाटेंत पिवळे कपडे घातलेले कांहीं धर्मगुरु दिसले. त्यांचा पोशाख मोठा मजेशीर होता. मीं त्यांचा फोटो घेण्याकरितां कॅमेरा उघडला. पण त्यांनीं ताबडतोब छत्री उघडी करून आपल्या तोंडासमोर धरली.


## चिरंजिवाकडून स्वागत

सायंकाळीं आम्ही सर्वजण गप्पा मारीत बसलों होतों. प्रत्येकजण गांवांत काय पाहिलें व काय खरेदी केलें याची माहिती सांगत होता. विलायतला राहून नागरी शास्त्राचे धडे घेऊन आलेल्या कांहीं हिंदी लोकांनीं दुकानांतून दाढीचे ब्रश, स्टेनलेसच्या माळा व सिगारेटच्या पेटचा उचलून आणल्या होत्या व आपण किती शिताफीनें दुकानदाराला फसविलें याचें जो तो रसभरीत वर्णन करीत होता.

सुईटानंतर पोर्टसय्यद व तेथून एकदम एडनला आमची बोट थांबली. मला एडन गांव आवडलें नाहीं. या गांवांत अजिबात झाडी नाहीं. डोंगर आहे; पण तो संपूर्ण उघडा. अनेक हिंदी व्यापारी येथें बस्तान मांडून बसले आहेत. मालावर जकात नसल्यामुळें बहुतेक जिनसा स्वस्त मिळतात. मीं फक्त एक लायटर खरेदी केला. सहा तासाच्या मुक्कामानंतर बोट मुंबईला येण्याकरितां निघाली.

हिंदुस्थान जवळ येत होता व कधीं एकदां मायभूमीचें दर्शन घेतों असें मला झालें होतें. बंदरांतील दिव्यांकडे रात्रीं चार तासपर्यंत आम्ही सर्वजण पहात होतों. उद्यां किनाऱ्यावर उतरणार, प्रियजनांना भेटणार ! कोण कोण बरें आले असतील किनाऱ्यावर ? मित्र आले असतील, तर त्यांच्याशीं काय व कसें बोलावें, वगैरे हजारों विचारांनीं मनांत गर्दी माजविली होती. किनाऱ्यावर येतांच माझ्या पत्नीनें चिरंजिवांशीं ओळख करून दिली. बोबडचा शब्दांनीं त्यानें माझें स्वागत केलें, त्या वेळच्या आनंदाचें वर्णन मला करणें शक्य नाहीं !

# पूर्वेकडील फेरफटका




जपानच्या प्रवासांत जादूगार रघुवीर यांनीं भेट दिलेलीं प्रमुख शहरें

# १

## सिंदबादच्या सफरी

सिंदबाद खलाशाला एका देशाची सफर करून आल्यावर स्वदेशी कांहीं दिवस राहणें आवडे व नंतर कोठल्यातरी नवीन देशाच्या सफरीवर जावेसें वाटे. मला सिंदबादच्या त्या सात सफरी अजूनहि आवडतात आणि त्याच्याप्रमाणेंच एका देशाची सफर करून परत आल्यावर कांहीं दिवसानंतर पुन्हा दुसऱ्या देशीं जावेसें वाटतें. युरोपहून येतांनाच मी ऑस्ट्रेलियाला जाण्याचें ठरविलें. घरीं आल्यावर त्या दृष्टीनें मी प्रयत्नहि चालू केले. परंतु ऑस्ट्रेलियन हायकमिशनरनें मला ऑस्ट्रेलियाचा व्हिसा नाकारला. त्यांत त्यांनीं लिहिलें होतें, "ऑस्ट्रेलियांत येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाजवळ येथें व्यवस्थित राहतां येईल इतका पैसा असावयास हवा. शिवाय, या देशांत परदेशी प्रवाशांना कोणत्याहि प्रकारें द्रव्यार्जन करतां येणार नाहीं."

हायकमिशनरच्या उत्तरानंतर मी थोडा निराश झालों. कारण माझ्याजवळ त्यांच्या म्हणण्याप्रमाणें लागणारा अफाट पैसा नव्हता. तेव्हां ऑस्ट्रेलियाला जाण्याचा बेत रहीत करून मीं जपान व जपानहून अमेरिकेला जाण्याचा बेत नक्की केला. त्या दृष्टीनें पत्रव्यवहाराला सुरुवात केली. जपानमध्यें अमेरिकन लोक भरपूर आहेत व ते डॉलरमध्यें पगार देतात असें मला समजलें. मी अमेरिकन क्लबांकडे कांहीं पत्रें पाठविलीं व त्यांचीं सम्मतिदर्शक उत्तरें येतांच पासपोर्टची तयारी करण्यास लागलों.

## जपानविषयीं कुतुहल

मी शाळेंत असतांना जपानविषयीं बरीच माहिती वाचली होती.

‘जपानी मुलें आणि त्यांचीं कलाकुसरीचीं कामें,’ हें सचित्र पुस्तक एका वाचनालयांत मीं पाहिलें होतें. त्या वेळीं नकळत जपानविषयीं माझ्या मनांत आदराची भावना निर्माण झाली होती. त्यानंतर ब्रिटिशांनीं गेल्या युद्धाच्या काळांत जपानी लोकांचे राक्षसासारखे चेहरे रेखाटून त्यांचीं चित्रें शहरोशहरीं भिंतीवर लावलेलीं माझ्या पाहण्यांत आलीं होतीं. ‘जपानी लोक निर्दय आहेत. तुमच्या बायका मुलांचा ते संहार करतील.’ अशा अर्थाचीं कांहीं भडक प्रचारकी वाक्यें चित्रांखालीं लिहिलेलीं असत. अर्थात् हा भडकपणा जपानविषयीच्या माझ्या मूळ कल्पनांशीं अगदीं विसंगत होता. थोड्याच दिवसांत युद्ध थांबलें आणि तेंहि जपानवर पडलेल्या ॲटमबाँबमुळें. पण त्या घटने-मुळेंच जपानला जाऊन तेथील लोकांचें प्रत्यक्ष निरीक्षण करावें असें तीव्रतेनें वाटूं लागलें. आमच्या अनाथ विद्यार्थी गृहांतील श्री. दि. दा. गांगल व डॉ. ग. श्री. खैर पूर्वीं जपानला जाऊन आले होते. त्यांनीं सुद्धां जपानविषयीं मोठीं मनोरंजक माहितीपूर्ण व्याख्यानें आम्हा विद्यार्थ्यांपुढें दिलीं होतीं. जपानला जाण्यापूर्वीं मी त्यांचीं ओळखपत्रें बरोबर नेणार होतों.

पासपोर्ट तयार झाला, चार ठिकाणीं सत्कार झाले व बोट सुटण्याच्या अगोदर घरांतील सर्व मंडळीसह मी मुंबईला गेलों. अगोदरच्या दोन सफरींची माहिती असल्यामुळें या वेळीं कोणत्याहि कामाला त्रास पडला नाहीं. सर्व कामें भराभर होत होतीं. मी इंग्लंडहून ज्या चुसान बोटीनें हिंदुस्थानला आलों होतों, तीच चुसान बोट मला जपानला घेऊन जाणार होती. बोटींत १२०० प्रवासी होते. ता. ३ एप्रिल १९५४ रोजीं दुपारीं १ वाजतां बोटीनें मुंबईचा किनारा सोडला.

## पूर्वेकडचा प्रवास

हा पूर्वेकडचा प्रवास मोठा मजेशीर. प्रवाश्यांना कधींच कंटाळा यायचा नाहीं. दर २।३ दिवसांनीं आमची बोट कोणत्यातरी बंदराला थांबणार होती व तिचा प्रत्येक बंदरांत ३।३ दिवस मुक्काम होता.

ज्या कॅबीनमध्यें मी होतों तेथें घड्याळाचा अभ्यास करण्याकरतां चाललेले अहमदाबादचे एक बोहरी व्यापारी होते. त्यांचें आडनांव घडीयाली होते. श्री. घडीयाली फार चौकस होते. त्यांनीं माझ्यापासून बरेच जादूचे प्रयोग शिकून घेतले. बोटींतल्या इतर प्रवाशांत पारशी व सिंधी लोकांचा भरणा जास्त होता. बहुतेक लोक एकादा महिना जपानला राहून परत येणार होते व कांहीं लोक तर फक्त चारच दिवस जपानला राहणार होते.

भरपूर वेगानें चालणाऱ्या आमच्या बोटीला हिंदुस्थानची हद्द संपविण्याला २ दिवस लागले. यावरून हिंदुस्थानचा विस्तार किती मोठा आहे याची सहज कल्पना येते. तिसरे दिवशीं सकाळीं ७ वाजतां बोटीनें कोलंबो बंदरांत नांगर टाकला.

## कोलंबो शहर

कोलंबो बंदर मोठें असलें तरी बंदराला एकहि धक्का नाहीं. मोठ्या बोटींना पाण्यांत दोन मैल दूर थांबावें लागतें व प्रवाशांना तेथून छोट्या बोटीनें बंदरांत जावें लागतें. बंदराचा देखावा दुरून मोठा नयनमनोहर दिसतो. हिरव्यागार टेकड्या व लाल फुलांचीं झाडें यामुळें बंदराकडे तासन् तास पहावेसें वाटतें. बंदरांत जाण्यापूर्वी आम्हीं दहाजणांची एक तुकडी तयार केली व सर्वांनीं मिळून एकत्रित गांव पाहण्याचें ठरविलें

डॉकबाहेरच्या कोपऱ्यावर आम्ही जरा उभे राहिलों. बाजूला दिसणाऱ्या उंच इमारती व रुंद रस्ते यांमुळें गांवाविषयीं प्रथमदर्शनीं सर्वांचें चांगलें मत झालें. माझी गांव पाहण्याची नेहमीची पद्धत म्हणजे गांवांतीलच एकादा मनुष्य गाठावयाचा व त्याला गांवांत पाहण्यासारखें चांगलें काय आहे हें विचारावयाचें. त्यानें सांगितलेल्या स्थळांची यादी तयार करावयाची. नंतर थोड्या वेळानें दुसऱ्या एकाद्या माणसाला परत तोच प्रश्न विचारून कोणतें स्थळ जवळ आहे व कोणतें दूर आहे याची नोंद करावयाची. जवळ असलेलीं स्थळें पायीं हिंडून पहावयाचीं. पायीं हिंडल्यानें गांवाची यथार्थ


कल्पना थोडक्यांत येते. दुकानांची मांडणी, नवीन प्रकारचा माल, लोकांचे पेहराव, वागणें, बोलणें, स्वच्छता इत्यादि गोष्टी निदर्शनाला येतात.

## हत्तीची चहा पार्टी

कोलंबोला येणाऱ्या प्रत्येक माणसानें तेथील प्राणी संग्रहालय अवश्य पहावें तर्कें तें चांगलें आहे. कोलंबो शहरापासून तीन साडे-तीन मैल दूर हें प्राणीसंग्रहालय आहे. बसनें अगर स्पेशल मोटारनें जातां येतें. दारावरच्या मोठ्या फलकावर संग्रहालयांतील कांहीं प्राण्यांचीं आकर्षक चित्रें काढलीं आहेत. प्रवेश फी देऊन आंत गेल्या-वर संग्रहालयाची खरी कल्पना येते. बागेंत कमालीची स्वच्छता आहे. कोणता प्राणी कोठें आहे हें आंत असलेल्या नकाशावरून समजतें. वाघ, सिंह, माकडें, साप व अनेक रंगाचे पोपट यांचा नमुनेदार संग्रह येथें आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे हत्तीची जलक्रीडा व हत्तींची चहापार्टी. जलक्रीडेला दुपारीं ४ वाजतां सुरुवात होते. हत्तीच्या मारामाऱ्या व सोंडेनें एकमेकांच्या अंगावर पाणी फेकण्याचे प्रकार झाल्यावर सर्व हत्ती चहापार्टीकरतां खास जागेकडे जातात. येथें एक हत्ती सर्वांना चहा देतो. इतर हत्ती नृत्यासारख्या गंमती जमती करून दाखवितात. ही चहापार्टी पाहण्याकरतां विद्यार्थी वर्ग व इतर लोक मोठ्या संख्येनें हजर राहतात.

## सिलोनचे गारुडी

हत्तीची चहापार्टी पाहून आम्ही परत गांवांत येण्याला निघालों. दुपारचें कोलंबो व रात्रीचें कोलंबो यांत बराच फरक आहे. दिवसा मुंबईपेक्षांसुद्धां जास्त उकडत असतें. सायंकाळीं गार वारा वाहूं लाग-तांच कितीतरी लोक हवा खाण्याकरतां बाहेर पडतात. बाहेर पडलेल्या माणसांचें मनोरंजन करण्याकरतां अनेक लोक आपले कसरतीचे खेळ रस्त्यावर दाखवितात. सिलोनचे गारुडी फार प्रसिद्ध. अत्यंत विषारी सापाला पकडण्यांत व खेळविण्यांत ते फार हुषार आहेत. आम्हांला ३ गारुड्यांच्या जवळ १२।१३ नाग दिसले. त्यांनीं ते सर्व



जपानी जादूगारांनीं टोकिओ येथें श्री. रघुवीर यांचा सन्मान केला त्या प्रसंगाचें छायाचित्र



कामाकुरा येथील महात्मा बुद्धाच्या भव्य मूर्तीपुढें लेखक उभे
आहेत. मनुष्याची उंची व शरीरयष्टी यावरून तुलना
केल्यास पुतळ्याची भव्यता विशेषच
डोळ्यांत भरते

नाग जमिनीवर सोडले होते. तोंडानें पुंगी वाजविल्याबरोबर सर्व नाग फणा काढून डोलूं लागले. इतक्या नागांना लीलेनें खेळवितांना पाहून कोणाहि माणसाला आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. कांहीं नाग ६।७ फूट लांब होते.

किनाऱ्याजवळ कांहीं लोक लाकडी काड्यांच्या छड्या व लाकडी वाहणा विकण्याकरतां बसले होते. सिलोनमध्यें बहुतेक लोक अशा प्रकारच्या वाहणा वापरतांना दिसतात.

## बोट परत फिरली

कोलंबोहून पेनँगला जाण्याकरतां आमची बोट रात्रीं ८ वाजतां निघाली. कोलंबो ते पेनँग हा फक्त दिवसा दीड दिवसाचा प्रवास. इतक्या थोड्या वेळानें आम्हाला दुसरें बंदर पहावयाला मिळणार या कल्पनेनेंच सर्वांना आनंद झाला. रात्रीं साडेआठ वाजतां प्रवाशाकरतां बोटीवर सिनेमा होता. सर्व प्रवासी सिनेमा हॉलमध्यें जमले होते. प्रत्येकजण आपण काय काय पाहिलें तें दुसऱ्याला सांगत होता. सिनेमा जेमतेम अर्धा झाला असेल नसेल तोंच बोट थांबली. कांहीं तरी कारण असल्याशिवाय समुद्रांत अशी बोट उभी करीत नाहींत. चौकशी करतां समजलें कीं बोटीच्या नांगराच्या साखळीला एक तिढा पडला आहे व त्यामुळें नांगर खालींवर होत नाहीं. प्रवासी आपसांत चर्चा करीत आहेत तोंच बोट मागें फिरली व कोलंबोच्या दिशेनें चालूं लागली. दोन तासानंतर आम्ही परत कोलंबोजवळ आलों. बोट उथळ पाण्यांत आल्यानंतर नांगराच्या दुरुस्तीला सुरुवात झाली. साखळीला पडलेला तिढा निघाला व बोट परत पेनँगच्या दिशेनें चालूं लागली.

कोलंबो ते पेनँग प्रवास फार चांगला. दोन्ही बाजूला दूर अंतरावर टेकड्या दिसतात. त्याचप्रमाणें मासे पकडण्याकरतां आलेले पडाव मधून मधून दिसत असतात. पेनँगच्या खाडीजवळ बोट येतांच पायलट आला. ही खाडी फार अरुंद आहे म्हणून पायलट ३।४ तास अगोदर येतो. पायलट आल्यानंतर या बेटाचें मुख्य बंदर जें पेनँग त्या बंदराकडे बोट रवाना झाली.

## निसर्गसौंदर्य

माणसी एक पौंड दिल्यास सबंध पेनँग बेटाला मोटारींतून फेरी मारतां येते हें समजतांच आम्ही चार लोकांनीं एक टॅक्सी ठरविली. पेनँगला मलायांतील नमुनेदार बंदर म्हणून संबोधतात. गांवांत सर्वत्र स्वच्छता आहे. रस्त्याची आखणी व दुकानांची मांडणी युरोपियन पद्धतीची आहे. टॅक्सीवाल्यानें प्रथम आम्हांला गांवांतून हिंडविलें व नंतर बेटाला प्रदक्षणा घालण्याकरतां नेलें. बेटाला प्रदक्षणा घालण्याला ३ ते ३॥ तास लागतात. बेटावरील सृष्टीशोभा पाहण्यासारखी आहे. ज्यानें वेंगुर्लें अगर गोवा पाहिलें असेल त्याला या सौन्दर्यांत नाविन्य दिसणार नाहीं; पण इतरांस मात्र येथील निसर्गाची जादू मोहून टाकल्यावांचून राहणार नाहीं.

प्रथम आम्ही धबधब्याच्या बागेंत गेलों. धबधबा मोठा नाहीं. परंतु आजूबाजूच्या सृष्टीसौन्दर्यामुळें याचें महत्त्व वाढलें आहे. येथील युरोपियन लोक रोज या ठिकाणीं येऊन तासन् तास बसत असतात. या बागेंत थोडा वेळ थांबून आम्ही पुढें निघालों. वाटेंत निसर्गशोभेशिवाय पाहण्यासारखें कांहींच नव्हतें. त्यामुळें मोटार भर वेगानें चालली होती. येथील रस्ते मात्र चांगले आहेत. त्यामुळें प्रवासाचा कंटाळा येत नव्हता. सुमारें दोन तासानंतर आम्ही एका मंदिराजवळ थांबलों. ड्रायव्हर म्हणाला, " हें स्नेक टेंपल आहे. या मंदिरांत साप आहेत, ते आंत जाऊन पहा. " आम्ही कॅमेरे घेतले व मंदिरांत गेलों. अनेक प्रवासी अगोदर आलेले होते व इतर प्रवाशांची ये जा सारखी चालली होती.

## सापाचें देऊळ

पेनँगचें हें स्नेक टेंपल (सापाचें देऊळ) खरोखरीच पाहण्यासारखें आहे. देवळाचा आकार चिनी पद्धतीचा आहे व आंत सर्व वातावरण चिनीच आहे. देवळांत सर्वत्र सापच साप होते. तसबिरींच्या चौकटीवर, खुंट्यावर व फुलदाणीवर साप लोंबकळतांना दिसले. मध्यभागीं वाळलेल्या लाकडांच्या फांद्या ठेवल्या होत्या. त्या फांद्या-



जपानी शेतकरी व त्याचे वैशिष्ठ्य पूर्ण इरलें




जपानी मुलांच्या विनंतिवरून पंडित
नेहरूंनीं पाठविलेली 'इंदिरा' हत्तीण



श्री. कात्झुशो असानो या जपानी गृहस्थांच्या कुटुंबांत श्री. रघुवीर



जपानी शेतकऱ्यांच्या कुटुंबियांसमवेत श्री. रघुवीर

वर कांहीं साप सुस्त होऊन पडले होते. येथील सापांचा रंग हिरवा होता व डोकें चपटें होतें. सापांना हात लावला तरी सुद्धां ते हालचाल करीत नव्हते. एकाद्या माणसानें त्यांना डिवचलें तर तेवढ्यापुरती ते थोडी हालचाल करीत असत. सापांना खाण्याकरतां अंडीं ठेवलीं होतीं. पुजारी म्हणाला, "साप रात्रींच्या वेळीं अंड्याला बारीक भोंक पाडतात व आंतला रस चोखून खातात. ते अंडें फोडीत नाहींत." आणखीहि त्यानें बरीच माहिती सांगितली. युद्धाच्या पूर्वी तेथें अंगावर केस असलेला एक साप होता व तो प्रवाशांच्या नवसाला पावत असे. युद्धाच्या वेळीं जपानी लोकांनीं त्याला ठार मारलें. देवळांतले साप आपण होऊन येतात व त्यांना वाटेल तेव्हां ते निघून जातात. आमच्या जवळच पेनँगचा एक युरोपियन रहिवासी उभा होता. तो म्हणाला, "या लोकांनीं विनाकारण या देवळाला दैवी स्वरूप देऊन ठेवलें आहे. येथें असलेले साप न चावणाऱ्या जातीचे आहेत. शिवाय येथें ज्या विशिष्ट वासाच्या उदबत्त्या जळत आहेत, त्यांच्या वासामुळें साप सुस्त होऊन पडून राहिले आहेत. पुजारी सकाळच्या वेळीं मंदिरांत प्रथम प्रवेश करतो तेव्हां उदबत्त्यांचा एक जुडगा पेटवून घेऊन येतो. प्रथमत: तो सबंध देऊळ धुरानें भरवितो व नंतर प्रवाशांना आंत सोडतो."

## टेकडीवरील रेल्वे

पेनँगची टकडीवरील रेल्वे पाहण्यासारखी आहे. ही रेल्वे २५०० फूट सरळ चढत जाते. पायथ्याशीं एक स्टेशन आहे. तेथें १ रुपयाचें तिकिट काढून गाडीची वाट पहात उभें रहावयाचें. थोड्याच वेळांत वरून एक डबा रुळावरून घसरत येत असलेला दिसतो आणि हा एक डबा म्हणजेच 'हिलरेल' किंवा टेकडीवरची रेल्वे होय. या एका डब्यांत दोन क्लास असतात व अडीचशें माणसांची बसण्याची सोय असते. घंटा वाजतांच डबा सरळ टेकडी चढूं लागतो. ज्या वेळीं एक डबा वर जात असतो त्याच वेळीं दुसरा खालीं येत असतो. त्यामुळें दोघांचा तोल सांभाळला जातो. हे दोन्ही डबे लोखंडी

दोरानें एका मोठ्या चाकाला बांधलेले असतात. चाक फिरूं लागतांच डबे एकमेकांच्या विरुद्ध रहाट पाळण्याप्रमाणें चालूं लागतात. अडीच हजार फुटाचें अंतर चढून जाण्याला फक्त अर्धा तास लागतो. या रेल्वेपासून मलायन सरकारला बराच फायदा होतो.

## सुपारीचें बेट

पेनँग या मलायी शब्दाचा अर्थ सुपारी; आणि हें सुपारी नांव या बेटाला दिलें तें योग्यच आहे. कारण जिकडे जाल तिकडे सुपाऱ्यांचीं झाडेंच झाडें दिसतील. प्रत्येक दुकानदाराच्या व बागाईतदाराच्या परसांत सुपाऱ्याचे फड वाळतांना दिसतात. त्याचप्रमाणें बंदरामध्यें कथील व सुपाऱ्यांच्या पोत्याचे ढीग पाहण्याला मिळतात.

पेनँगमधील दिवस भराभर निघून गेले. मधल्या काळांत बोटींत बंदरावरील माल भरण्याचें काम चालूं होतें. बहुतेक माल जपानला चालला होता. त्यांत कथील अधिक होतें. पेनँगला नविन प्रवासी बोटींत आले. बहुतेक लोक चिनी होते. ते हाँगकाँगला जाणार होते. यापुढचा मुक्काम सिंगापूरला होता व पेनँगहून सिंगापूरला जाण्याला फक्त २३ तास लागतात. येथून रेल्वेनें सुद्धां सिंगापूरला जातां येतें; परंतु बोटीपेक्षां जास्त वेळ लागतो.

## पूर्वेकडील मोठें बंदर

बोटीतील नविन प्रवाशांची ओळख होते न होते तोंच बोट सिंगापूर बंदरांत आली. येथें बोटीचा मुक्काम चार दिवस होता. सिंगापूर पूर्वेकडील सर्वांत महत्त्वाचें बंदर. एकाच वेळीं ३५।४० बोटी थांबूं शकतील अशा तऱ्हेचे प्रशस्त धक्के येथें आहेत. इंग्लीश सैनिक जिकडे तिकडे हिंडतांना दिसले. धक्क्यावर बरेच गुरखा सैनिक दिसले.

## चिनी संस्कृतीचें प्रदर्शन

सिंगापुरांत पाहण्यासारखीं ठिकाणें बरींच आहेत. आम्ही प्रथम 'हाऊपार व्हिला' किंवा टायगर बाम गार्डन नांवाच्या बागेंत गेलों. ही बाग गांवाबाहेर आहे. तिच्यामध्यें सबंध चिनी संस्कृति

पुतळ्यांच्या रूपानें उभी केली आहे. लहानमोठे २००० पुतळे या बागेंत आहेत व ते सर्व रंगीत आहेत. ही बाग श्री. आऊ बून नांवाच्या चिनी गृहस्थाच्या मालकीची आहे. श्री. बून यांचें वय ७३ वर्षांचें असून ते तरुणाला लाजवितील इतक्या तडफेनें काम करीत असतात. अशाच प्रकारची आणखी एक बाग त्यांनीं हाँगकाँग येथें तयार करवून घेतली आहे. पुतळे तयार करण्याकरितां त्यांनीं अक्षरशः पाण्यासारखा पैसा खर्च केला आहे. सिंगापूर येथील ७ एकराच्या परिसरांत असलेली ही बाग पाहण्याला कोणत्याहि प्रकारचें तिकीट पडत नाहीं.

## मातेचें ऋण

आम्ही बागेच्या भव्य प्रवेशद्वारांतून आंत गेलों. प्रथमदर्शनीं चिनी कुबेराची एक जाडीजुडी प्रतिमा दिसते. हा देव आपल्याकडील शिराळशेटप्रमाणें ढेरपोटचा आहे व त्याला धनाचा देव म्हणून संबोधतात. या देवानंतर चिनी लोकांची यमपुरी लागते. मृत्युलोकांत पाप करणारांना मृत्यूनंतर कशा प्रकारच्या शिक्षा होतात हें या विभागांत दिखविलें आहे. यमपुरी पहात असतांना मला आपल्याकडील यमपुरींतील वहुतेक कल्पना येथें दिसल्या. थोडें पुढें गेल्यावर एक म्हातारी बाई आपल्या मुलीचें दूध पीत आहे असा देखावा दिसला. या पुतळ्याचा प्रथम कांहींच उलगडा झाला नाहीं. बाजूला वसलेल्या एका चिनी गृहस्थाला विचारतां तो म्हणाला, "आमच्यात हा समारंभ प्रसूतीनंतर १६ व्या दिवशीं होतो. त्या दिवशी बाळंतीण बाईची आई येते व धार्मिक विधी झाल्यावर आपल्या मुलीचें थोडें दूध पिते. मातेचें ऋण फेडण्याकरितां हा समारंभ असतो. चिनी लोकांत सर्वत्र पाळला जाणारा हा विधी आहे." अशा प्रकारचे नानाविध प्रकार पाहिल्यानंतर आम्ही बाहेर पडलों. एका गोष्टीची उणीव या बागेंत होती. परदेशी माणसाला व्यवस्थित माहिती सांगणारा एकादा गाईड या बागेंत हवा होता किंवा बागेंतील पुतळ्यांची माहिती देणारें एकादें पुस्तक तेथें विक्रीला ठेवलें असतें तर फार बरें झालें असतें.

**‘ मोलें घातलें रडाया ’**

पुतळ्यांच्या बागेंतून बाहेर पडल्यानंतर आम्हाला एक स्मशान दिसलें. स्मशानांत एक नवीन आलेलें प्रेत पुरण्याचा विधी चालला होता. स्मशानांतलीं थडगीं जरा निराळीं वाटलीं म्हणून मी मोटार थांबवून बाजूला उभा राहून प्रेत पुरण्याचा विधी पहात होतों. प्रेत सजविलेल्या मोटारींतून आणलें होतें. प्रेताबरोबर बरेचसें तळलेलें मांस व कपडे होते. बाजूला काळे कपडे घातलेले कांहीं स्त्री-पुरुष गुडघे टेकून रडत होते. माझा मित्र म्हणाला, “ हे लोक भाड्यानें रडण्याकरितां आणले आहेत. यांना बराच पगार दिला जातो.” आपल्याकडे सुद्धां कांहीं जातींत अशी पद्धत असल्याचें मला माहीत होतें. एक चिनी म्हातारी रडणाऱ्या लोकांना मधून अधून पाणी व चहा देत होती. इतकेंच नाहीं तर कांहीं पुरुषांना तिनें सिगारेटस् पेटवून दिल्या. रडणाऱ्या माणसांनीं तोंडावर बुरखा घेतलेला असल्यामुळें त्यांचीं तोंडें दिसणें कठीण होतें. सिगारेट ओढून होतांच पुरुषांनीं जोरांत हेल काढून रडण्याला सुरुवात केली. शेवटीं प्रेत पुरून झाल्यावर एक मोठा कागदाचा ढीग त्यावर ठेवला. कागदाच्या तुकड्यावर सोनेरी शाईनें शिक्के मारले होते. हे कागद म्हणजे स्वर्गांतील नोटा होत. स्वर्गांत गेल्यावर पैशाची टंचाई पडूं नये म्हणून या नोटा प्रेतावर ठेवल्या जातात.

**हाँगकाँग**

सिंगापूरनंतर दोन दिवसांनीं बोट हाँगकाँगला पोंचली. हाँग-काँगला बोट येतांच सर्व वातावरणांत फरक पडला. मुख्य म्हणजे हवेंतील उष्मा कमी झाला. सर्व सुती कपडे बॅगेंत गेले व प्रत्येकाच्या अंगांत उलन सूट दिसूं लागले. बोटींतल्या कारवा नांवाच्या प्रवाशाची मावशी येथें रहात आहे. आम्ही सर्वजण त्याच्या घरीं एक दिवस राहण्याकरतां गेलों.

श्री. कारवा व मी श्री. कादरभाई यांच्याकडे राहण्याकरतां गेलों. आम्हाला घेण्याकरता ते स्वतः गाडी घेऊन आले होते. श्री. कादर-

भाई गेलीं २० वर्षे हाँगकाँगला आहेत. त्यांचा लोखंडी सामानाचा व्यापार आहे. त्यांच्या दुकानाची एक शाखा जपानमध्येंहि आहे. कादरभाईंचा बंगला फारच चांगला आहे. घरांत १०–१२ माणसें दिसलीं. हे लोक जातीनें बोहरी असून हिंदी लोकांबद्दल त्यांना बरेंच प्रेम दिसलें. मीं लहान मुलांना जातां जातां दोन तीन जादूचे प्रयोग दाखविले. त्यामुळें तर सर्वांशीं माझी चांगली ओळख झाली. दुपारच्या जेवणाच्या वेळीं बरेच नवीन पदार्थ होते. त्यांतला नूडल नांवाचा पदार्थ मला आवडला. घरांत कामाला चिनी बायका होत्या व घरांतील सर्व लोक चिनी भाषा बोलत होते.

जेवणानंतर कादरभाईच्या मुलानें त्यांच्या मोटारींतून हाँगकाँग बेट दाखविण्याकरतां आम्हाला नेलें. हाँगकाँग बेटाची लांबी १० मैल व रुंदी ५ मैल आहे. हें बेट ब्रिटिशांना १८४२ सालीं मिळालें. तेव्हांपासून तें त्यांच्याच ताब्यांत आहे. बेटावरचें मुख्य गांव हाँगकाँग ( या शहराचें खरें नांव व्हिक्टोरिया आहे ) टेकडीला पायऱ्या पाडून वसविलें आहे. ज्या टेकडीवर हें गांव वसलें आहे तिची उंची २००० फूट आहे. या गांवाचा देखावा रात्रीं फार चांगला दिसतो. टेकडीवर जाण्याकरतां पेनँगप्रमाणें रेल्वे आहे.

हाँगकाँगमध्यें बरींच बुद्धाचीं देवळें दिसलीं. या देवळांत भविष्य सांगणारे लोक आहेत. कांहीं स्त्रिया देवळांतील लहान लाकडी पादुका घेऊन डोक्यापर्यंत नेऊन जमिनीवर टाकीत. या पादुका जमिनीवर पडल्यानंतर एक उताणी व एक पालथी पडल्यास दिवस भाग्याचा जाईल अशी समजूत आहे. देवाची प्रार्थना करण्याकरतां कांहीं स्त्रिया जमल्या होत्या. पुरुष नव्हते म्हटलें तरी चालेल. देवळांतून मोठमोठ्या बुद्ध प्रतिमा आहेत. बाहेर भीक मागणाऱ्या स्त्रिया दिसल्या. चिनी स्त्रियांचा पोषाख म्हणजे काळी लांब विजार (लेंगा) व काळा शर्ट असा होता.

## चिनी लोकांचे देव

एका दिवसांत आम्ही फक्त हाँगकाँग शहर व हाँगकाँग बेटाला

चक्कर मारूं शकलों. प्रत्येक गोष्ट व्यवस्थित पाहतां आली नव्हती. बेटाला प्रदक्षणा घालीत असतांना समुद्रकिनारीं बरेच युरोपियन लोक पोहतांना दिसले. एके ठिकाणीं एक गोल्फचें मैदान होतें. इतकें सुंदर मैदान पूर्वेकडे दुसऱ्या कोणत्याहि शहरांत नसल्याचें समजलें. प्रवास करीत असतांना कांहीं ठिकाणीं रस्त्याच्या कडेला चिनी देव दिसले. या देवापुढें फुलें व लाल कागद ठेवले होते व पूर्वी कोणी तरी उदबत्त्या लावलेल्या असाव्यात असें तेथें शिल्लक राहिलेल्या लहान तुकड्यांवरून दिसत होतें.

## जपानी किनारा

हिंदुस्थानचा किनारा सोडल्यानंतर १६ दिवसांनीं आमची बोट योकोहामाला पोंचली.

बोट थांबल्यानंतर दोन तासांनीं जपानी अधिकारी आले. पासपोर्ट तपासणीला व इतर चौकशीला सुरुवात झाली. जपानी लोकांना चांगलें इंग्लिश येत नसावें; कारण साध्या चार ओळी वाचण्याला बराच वेळ लागे. आत्तांपर्यंतच्या प्रवासांत प्रवाशांना त्रास देणारी तपासणी फक्त जपानमध्यें दिसली. आम्ही ब्रेकफास्ट न घेतां चार तास ओळींत उभे होतों. सर्व कामें अगदीं हळू हळू चाललीं होतीं. त्याच बोटीनें भारतचे जपानमधील वकील डॉ. रौफ आले होते. त्यांची मुलाखत घेण्याकरतां वर्तमानपत्रांचे बातमीदार आले होते. श्री. रौफ यांची मुलाखत संपतांच मीं बातमीदारांपुढें जाऊन माझ्या स्वत:विषयीं थोडक्यांत माहिती सांगितली. त्यांना त्यांत बरीच गंमत वाटली. सर्व बातमीदारांनीं प्रश्नांचा नुसता भडिमार चालविला होता. एकानें विचारलें, "तुम्ही हा जो तीन खंडांचा प्रवास केला आहे त्याला कांहीं श्रीमंत लोकांनीं मदत केली आहे का?" मी फक्त "नाहीं" येवढेंच म्हणालों. कारण श्रीमंत लोकांकडे मदत मागण्याला गेलों असतांना आलेले कांहीं कटु अनुभव त्या वेळी मला आठवले.

दुसरे दिवशीं सकाळीं सर्व वर्तमानपत्रांत फोटोसह माझी माहिती प्रसिद्ध झाली. टेलिव्हिजनवर कार्यक्रम ठरला व निरनिराळ्या जादूगारांच्या संस्थांचे चालक भेटण्याला आले. जादूगारांच्या सोसायटींत दुसरा कार्यक्रम ठरला.

## पहिल्याच प्रयोगाचें स्वागत

टोकियो स्टेशनच्या समोरील भव्य मारूनीची इमारतींत तळ-मजल्यावर जपानमधील ऐंशीं-नव्वद जादूगार जमले होते. बहुतेकजण आपापसांत चर्चा करीत होते. माझी मनःस्थिति पहिल्याच दिवशीं परीक्षा मंडपाकडे निघालेल्या उमेदवाराप्रमाणें झाली होती आणि अशी अवस्था जेव्हां जेव्हां मी परदेशी जादूगारांसमोर प्रयोगाकरतां प्रथम उभा रहात असतों त्या वेळीं होते. कारण एक हिंदी जादूगार या नात्यानें माझ्या प्रत्येक हालचालींवर सर्वांचें लक्ष असणार याची जाणीव होते.

जपानी लोक धनुर्विद्येचे भोक्ते म्हणून मी माझ्या प्रयोगाची सुरुवात व शेवट धनुर्विद्येनेंच करण्याचें ठरविलें. माझी ही कल्पना फार यशस्वी ठरली. प्रत्येक बाणागणिक होणाऱ्या टाळ्यांच्या कडकडाटा-मुळें प्रेक्षक खुष झाल्याचें समजणें कठीण नव्हतें. एक तास ठरलेला कार्यक्रम दीड तासानंतर संपला. छोटींमोठीं दहाबारा बक्षिसें आणि अनेक मित्र त्या पहिल्याच प्रयोगामुळें मिळाले.

जपानी लोक कलेचे खरे उपासक आहेत. एकादी गोष्ट समजली नाहीं तर ती समजून घेण्याचा ते प्रयत्न करतील. इतकेंच नव्हे तर ते शिकविणाराचे अनेक वेळा आभार मानतील. माझ्या प्रयोगांत हातावर सुरी मारून घेण्याचा एक खेळ आहे. तो जपानी जादूगारांना खूप आवडला. त्या खेळाचे मोबदल्यांत जवळजवळ सतरा अठरा प्रयोग मला शिकण्यास मिळाले. सुरीच्या प्रयोगाप्रमाणेंच 'डोक्यावर भात शिजविणें' या माझ्या प्रयोगाबद्दलहि वर्तमानपत्रांत बरेंच लिखाण प्रसिद्ध झालें.

## नाटचप्रवेशांच्या रूपानें प्रयोग

जपानमध्यें तीन तास निव्वळ जादूचे प्रयोग करण्याची प्रथा नाहीं. असे प्रयोग नाटच-प्रवेशांच्या रूपानें प्रेक्षकांसमोर सादर केले जातात. अशा तऱ्हेचें एक नाटक मला ' उयोनो पार्क 'मध्यें पहावयास मिळालें. एका जपानी कुटुंबांत एक चिनी म्हातारा येतो व बोलतां बोलतां आपण जादूगार असल्याचें सांगतो. घरांतील मुलें त्याच्या मागें लागतात व ' आम्हाला खाऊ द्या ' म्हणतात. लगेच तो आपल्या रिकाम्या टोपींतून चॉकोलेट काढतो. मुलें चॉकोलेट खात आहेत इतक्यांत तो टॉवेलांतून गोल्डफिश असलेला पाण्यानें भरलेला वाडगा काढतो. मासे पाहून मुलें आनंदानें उड्या मारतात. मुलांचें नाचणें चालू असतांनाच स्टेजवर स्फोट होऊन जादूगार नाहीसा होतो.

छोटासा प्रसंग, पण नाटचरूपानें प्रेक्षकांना दाखविला गेल्यानें त्याची गंमत कांहीं निराळीच वाटते. अशा तऱ्हेचे छोटे छोटे प्रवेश शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं संमेलनप्रसंगीं करण्यास हरकत नाहीं.

## स्त्री जादूगाराचे नृत्यप्रयोग

जपानमध्यें पुरुष जादूगारांप्रमाणें कांहीं स्त्री-जादूगारहि आहेत. त्यांनीं जादूचे कांहीं प्रयोग नृत्यावर बसविले आहेत. जादूगारास नेहमीं बोलावें लागतें; पण स्त्री-जादूगार एक शब्दसुद्धां न बोलतां अर्धा अर्धा तास प्रयोग करतात. जादूच्या प्रयोगास वाद्याची साथ अत्यंत आवश्यक समजली जाते. प्रत्येक जादूगाराजवळ त्यासाठीं खास रेकॉर्ड्स असतात.

आपल्याकडील मदाऱ्याप्रमाणें रस्त्यावर जादूचे प्रयोग करणारे लोक मला जपानमध्यें आढळले नाहींत. कांहीं मोठमोठ्या दुकानांच्या गच्च्यांवरून ग्राहकांची करमणूक करण्याकरतां दुकानदारांनीं जादूगार नोकरीस ठेवल्याचें मात्र आढळून आलें. छोट्याशा स्टेजवर दर दोन तीन तासांनीं जादूगार आपले प्रयोग करण्यास सुरुवात करतो. सर्वांना हे प्रयोग फुकट पहाण्यास मिळतात. अर्थात् प्रयोग पाहून झाले कीं प्रेक्षक दुकानांतून परत जातांना कांहीं ना कांहीं माल खरेदी करतात हा भाग निराळा.

## हातगाडीवरील थिएटर

जादूच्या प्रयोगाविषयीं जपानी लोकांची आवड पाहिल्यानंतर त्यासारखी आणखी कांहीं करमणूक जपानमध्यें आहे का, याचा मीं शोध घेतला. 'कामी शिबाई' किंवा 'कागदी चित्रांचें थिएटर' हें एक जपानी मुलांचें आवडीचें आकर्षण आहे. आइस्क्रीमवाला मनुष्य आपल्या गाडीवर हें छोटें कागदी थिएटर घेऊन येतो. निरनिराळ्या लढाईच्या चित्रांची त्यांत गर्दी झालेली असते. आइस्क्रीमवाला तोंडानें गोष्ट सांगत असतो व हातानें चित्रें दाखवीत असतो. हा चित्रांचा खेळ पाहण्याकरतां मुलांना पैसे लागत नाहींत; मात्र त्यांना आइस्क्रीम विकत घ्यावें लागतें.

## धनुर्विद्या परवडेना

जपानी लोकांना धनुर्विद्येची आवड फार हें सुरुवातीस लिहिलें आहेच; पण गेल्या कांहीं वर्षांत , विशेषतः लढाईनंतर, या कलेकडे लोकांचें दुर्लक्ष होऊं लागलें. पूर्वी सायंकाळीं जेवण झालें कीं माणसें बाहेर फिरावयास जात व धनुष्यबाणाचे दुकानांत जाऊन १० येन देऊन पांच बाण उडवून येत. प्रत्येक गल्लींत धनुष्यबाणाचें एकतरी दुकान असे. शाळेंत विद्यार्थी-विद्यार्थिनींना धनुर्विद्या शिकवली जाई. पण हें दृश्य सध्यां अजिबात दिसत नाहीं. गल्ली-बोळांतील दुकानें नाहींशीं झालींच; पण शाळेंतसुद्धां धनुर्विद्येकडे लक्ष दिलें जात नाहीं. एका शिक्षकाला धनुर्विद्येच्या ऱ्हासाचीं कारणें विचारतां तो म्हणाला, "सध्याच्या यांत्रिक युगांत धनुर्विद्येचा तितकासा उपयोग होत नाहीं आणि शाळांतून या खेळाकरितां पैसा खर्च करणें परवडत नाहीं."

शाळा-कॉलेजांतून धनुर्विद्या हलके हलके नष्ट होत असली तरी, जेव्हां आपण पश्चिम जपानच्या भागांत हिंडूं लागतों तेव्हां कितीतरी खेडूत धनुष्यबाणाच्या पेटया घेऊन रेल्वेंतून प्रवास करतांना अगर जंगलांतून हिंडतांना दिसतात. कांहींची निशाणबाजी इतकी अचूक आहे कीं धावतें जनावरसुद्धां त्यांच्या बाणाच्या तडाख्यांतून सुटणें कठीण !

## माकडाची निशाणबाजी

धनुर्विद्येचा उपयोग शिकार व करमणूक याकरतां होत असला तरी नेमबाजीचे प्रयोग करून दाखवून पैसे मिळविणारे डोंबाऱ्या-सारखे कांहीं लोक आहेत. समोर उभ्या असलेल्या साथीदाराच्या तोंडांतील सिगारेट बाणानें विझविणें किंवा हवेंत फेंकलेला चेंडू बाण मारून आणखी उंच उडविणे अशा तऱ्हेचे प्रयोग पाहण्यास मिळतात. 'होकायदो' येथील एका खेड्यांत माकडाकडून निशाण-बाजी करविणारा एक मनुष्य पहावयास सांपडला. माकडाकरतां त्यानें एक खास धनुष्य तयार केलें होतें.

माकडाकडून खेळ करवून घेणाऱ्या माणसास 'सारू-मावाशी' म्हणतात. माकडांच्या खेळाबद्दल खेडूत व मुलें यांच्यामध्यें खूपच आकर्षण आहे. माकडवाला आला रे आला कीं त्याचेभोंवतीं उभें रहाण्यास जागा मिळणें कठीण. माकडवाला व त्याचे खेळ याविषयीं लोकांकडून अनेक गोष्टी ऐकावयास मिळतात. पूर्वी योद्धे आपल्या घोड्यासमोर माकडवाल्याचा खेळ करण्यास सांगत. माकडाच्या खेळापासून घोड्याची करमणूक होते अशी त्यांची समजूत होती.

जपानमधील मुक्कामांत मी चौदा जपानी कुटुंबांत राहिलों. त्यांच्या चालीरीति व दैनंदिन व्यवहाराचें अगदीं जवळून निरीक्षण केलें! या लोकांबद्दल एका वाक्यांत लिहावयाचें झाल्यास, 'कष्टमय काम सतत करीत रहाणारांचा आदर्श देश' असें लिहितां येईल. सकाळपासून सायंकाळपर्यंत, नव्हे, रात्री झोपेपर्यंत कांहीं ना कांही काम चालू असतेंच. "कामांत बदल हीच विश्रांति" हें तत्त्व जाणत्यांनीं अंगीं पुरेपूर बाणवून घेतलें आहे. उदाहरणार्थ, आपण आसोनी-सान (मि. असानो) यांचेंच उदाहरण पहा. सदर गृहस्थ त्रेचाळीस वर्षांचे आहेत. एका घड्याळाच्या कारखान्यांत ते काम करतात. सकाळीं ९ ते सायं-काळी ६ पर्यंत त्यांचा वेळ तेथें जातो. इतकेंच नव्हे तर, कधीं कधी 'ओव्हरटाईम' काम करावें लागतें. 'ओव्हरटाईम' करण्यास दोन

कारणें; एक म्हणजे महागाईचे दिवसांत पगार पुरत नाहीं व दुसरें कारखान्याचे मालास खूपच मागणी असल्यामुळें काम खूप सांचून राहिलें आहे.

## स्वयंपाकघरांत मदत

आसानो-सान घरीं येतांच प्रथम कारखान्यांतील कपडे बदलून 'किमोनो' घालतात व हात-तोंड स्वच्छ धुवून कपभर हिरवा चहा ( साखर व दूध नसलेला ) घेतात. जपानी लोक हा चहा सकाळ-पासून रात्रीं झोपेपर्यंत अनेक वेळा घेतात. चहा घेऊन होतांच मुलांशीं व बायकोशीं गप्पा. मात्र गप्पा चालू असतांना पत्नीस सैपाकघरांत मदत करण्याचें काम चालूच असतें. सायंकाळचें जेवण लवकर होतें व नंतर त्यांचा आवडीचा छंद म्हणजे नवीन नवीन जादूचे प्रयोग बसविणें व 'सामीसेन' नांवाचें वाद्य वाजविणें. हा कार्यक्रम अगदीं दहा साडेदहा वाजेपर्यंत चालतो.

आतां असानोफुजीन (मिसेस आसानो) यांचा दैनंदिन कार्यक्रमहि लक्षांत ठेवण्यासारखा आहे. आपल्या दोन मुलांची प्रकृति उत्तम रहावी म्हणून त्या त्यांना सतत जपत असतात. घरांत सर्वत्र स्वच्छता ठेवतात. बाजारहाट, सैंपाक, आल्यागेल्याचें आदरातिथ्य यांतून वेळ वाचतो तो त्या आपल्या घिराभोंवतालच्या बागेंत उपयोगांत आण-तात. जपानमधील इतर घरांप्रमाणें यांच्याहि घराचे आजूबाजूस थोडीसुद्धां जागा रिकामी पडलेली दिसणार नाहीं. बागेंत काम म्हणजे नुसतें गवत उपटणें व झाडांना पाणी घालणें एवढेंच नसून पुस्तकें वाचून झाडावर कांहीं नवे प्रयोग करणें, खतांत सुधारणा करणें व झाडांचा आकार डौलदार दिसेल याविषयीं काळजी घेणें. यांतून जो वेळ मिळेल त्या वेळीं मुलांना गोष्टी सांगणें व शाळेंतल्या अभ्यासाची उजळणी करून घेणें हा उद्योग त्या करतात. रात्रीं पतीच्या छंदांत लक्ष घालून शक्य तों त्याला मदत करणें हें तर त्यांच्या परिपाठाचें होऊन बसलें आहे.

## महोत्सवाचा आनंद

प्रत्येक दिवसाप्रमाणेंच जपानी लोकांचा सबंध वर्षाचा कार्यक्रमहि भरगच्च असतो. सतत कांहीं ना कांहीं समारंभ अगर सण चालू असतात. सर्वांत मोठा महत्त्वाचा सण म्हणजे 'वर्षप्रतिपदा' किंवा 'ओशोगात्सु.' हा दिवस नुसताच सण म्हणून साजरा केला जात नाहीं, तर त्या दिवशीं प्रत्येक जपानी आनंदाच्या सागरांत अगदीं बुडून गेल्याचा भास होतो. गेल्या वर्षी झालेलें नुकसान अगर संकटें तो विसरून जातो व नवीन वर्षांत हंसतमुखानें व अनेक आशा-आकांक्षा मनांत धरून प्रवेश करतो. मोठ्या माणसाप्रमाणें लहान मुलांचाहि उत्साह दुथडी भरून वहात असतो. अनेक गोडगोड पदार्थ त्यांना सतत आठवडाभर खाण्यास मिळतात.

## 'दुःखसुद्धां हंसूं लागतें'

दुकानदार आपलीं दुकानें विशिष्ट प्रकारच्या माळा-तोरणांनीं सजवितात. या सणाच्या वेळीं मित्रांच्या घरीं जाऊन त्यांची विचार-पूस करण्याची (ओमोदेतो) प्रथा आहे. म्हणूनच जपानीमध्यें 'नव्या वर्षांचे आरंभीं दुःखसुद्धां हंसूं लागतें' अशा अर्थाची म्हण रूढ आहे.

या सणानिमित्त अनेक खेळ खेळले जातात. त्यांतल्या त्यांत 'कारुता' (कविता असलेले १०० पत्ते) हा खेळ मोठ्या माणसांचें महत्त्वाचें आकर्षण आहे. त्याचप्रमाणें तरुणींचा आवडता खेळ 'हागोईता' हा होय. हा खेळ घराच्या बाहेर बॅट व पिसांचा गुच्छ यांच्या सहाय्यानें खेळला जातो. साधारणपणें बॅडमिंटनप्रमाणें हा खेळ आहे.

## घेवडा--बिया फेकण्याचा समारंभ

नूतन वर्षांचे सणानंतर जपानी लोकांत नवचैतन्य उत्पन्न करणारा 'सेत्सुबून' किंवा घेवड्याच्या बिया फेकण्याचा समारंभ होय. हा समारंभ फेब्रुवारी ३ अगर ४ तारखेस असतो. या दिवशी वसंत ऋतूस सुरुवात होत असल्याकारणानें हा समारंभ साजरा केला जातो. प्रत्येक घरांतून तर तो होतोच; परंतु मोठ्या प्रमाणांत तो देवळांतून

साजरा केला जातो. लोकांचें लक्ष वेधण्याकरतां व गर्दी जमविण्या-करतां बिया फेकण्याचे कामीं प्रसिद्ध पैलवानाची अगर नटीची निवड केली जाते. बिया फेकणारी व्यक्ति आपल्या हातांत बिया घेऊन 'ओनी वा सोतो, फुकू वास ऊची' असें जोरानें ओरडून समोर जमलेल्या जमावांत त्या फेकून देते. फेकलेल्या बिया गोळा करण्या-करतां लोकांची एकच धांदल उडते. जितक्या जास्त बिया मिळतील तितके पुढील वर्षांतील दिवस आनंदांत जातील असें समजण्याची प्रथा आहे. या दिवशीं प्रत्येकजण आपलें वय जितकें असेल तितक्या बिया व पुढील वर्षाकरतां म्हणून आणखी एक अशा सर्व बिया खातो. हा समारंभ राजघराण्यांतहि साजरा केला जातो.

## दारावर रेशमाचे मासे

जपानमध्यें लहान मुलींकरितां ता. ३ मार्च व लहान मुलांकरितां ता. ५ मे असे दोन समारंभ आहेत. या दोन्ही समारंभाचे वेळीं आपल्या-कडील 'हळदी–कुंकु' समारंभाप्रमाणें आरास केली जाते व मुलेंमुली खेळ खेळतात. मात्र ता. ५ मेस होणाऱ्या मुलांचे समारंभाच्या दिवशीं दारासमोर रेशमी कापडाचे रंगीबेरंगी मासे तयार करून लावण्याची प्रथा आहे. 'कार्प' जातीचा मासा चपलता व धैर्याचें प्रतीक समजला जातो.

## पाण्यांत दिवे

'तानाबाता' किंवा चांदण्याचा उत्सव ७ जुलै रोजीं साजरा करतात. सदर समारंभ तीन हजार वर्षांपूर्वी चीनमधून आलेला आहे. त्या दिवशीं दोन प्रेमी तारे एकमेकांस भेटतात अशी समजूत आहे. त्या प्रेमी जोडप्यांचे स्वागतार्थ निरनिराळे केक, भाज्या व फळें अर्पण करण्यांत येतात. त्याचप्रमाणें हे सर्व पदार्थ व नव्या रचलेल्या कविता बांबूच्या फांद्यांना बांधून ठेवतात. रात्रीं पाण्यांत हजारों दिवे सोडले जातात व दुसरे दिवशीं बांबूहि पाण्यांत बुडविले जातात.

नवीन वर्षदिनाप्रमाणेंच महत्त्वाचा व आनंदाचा सण म्हणजे 'ओबोन' (मृतात्मा उत्सव) होय. ता. १३ ते १५ जुलै रोजीं तो

साजरा केला जातो. त्या दिवशीं परगांवीं नोकरीस असलेले सर्व स्त्री-पुरुष आपल्या घरीं येतात. पूर्वीं नोकरांना वर्षांतून दोनदांच सुट्टी मिळत असे. एकदां वर्षप्रतिपदेस व दुसऱ्यांदा 'ओबोन' सणाचे दिवशीं. या दिवशीं मृतमाणसांचे आत्म्यास शांति मिळावी म्हणून पुरोहितास घरीं बोलावून त्याचेकडून मंत्र म्हणवून घेण्याची प्रथा आहे. निरनिराळीं पक्वान्नें करून मृत आत्म्यास अर्पण केलीं जातात. रात्रीं खेडूत नाच—गाणीं सुरू करतात. वाद्य वाजविणारांच्या बाजूस वर्तुळ करून नाचास सुरुवात होते व उजाडेपर्यंत हा कार्यक्रम चाललेला असतो.

## वाढदिवसाचा आनंद

आणखी एका महत्त्वाच्या दिवसाचा उल्लेख करावयास हवा. हा दिवस म्हणजे २१ एप्रिल. या दिवशीं सर्व जपानभर सुट्टी असते. बस, ट्राम, आगगाड्या, टॅक्सी वगैरे वाहनांवर व इमारतींवर जपानचा राष्ट्रध्वज फडकतो. हा दिवस म्हणजे बादशहा हिरोहिटोचा वाढदिवस होय. त्या दिवशीं सर्वांना राजवाड्यांत जाण्यास मोकळीक असल्यामुळें मी माझे मित्राबरोबर त्या ठिकाणीं गेलों. राजास उत्तम आरोग्य व शुभेच्छा चिंतण्याकरतां हजारों जपानी तासन् तास तेथें उभे होते. राजानें एकंदर सहा वेळां जनसमूहास दर्शन दिलें. समारंभाकरतां खास चबुतरा बांधला होता. राजा चबुतऱ्यावर उभा रहातांच सर्वांनीं हात वर करून अभिवादन केलें. याच वेळीं आकाशांतून विमानेंहि घिरट्या घालीत होतीं. इंग्रजांप्रमाणें किंबहुना थोड्या जास्तच प्रमाणांत जपानी लोकांस आपल्या राजाबद्दल प्रेम व आदर वाटतो यांत शंका नाहीं.

## कागद व बांबूचीं घरें

आतां आपण जपानी घरें पाहूं. जपानी घरें म्हणजे कागद आणि बांबूचीं घरें, असें सर्वसाधारण म्हणण्याची प्रथा आहे आणि हें विधान असत्य आहे अशांतला भाग नाहीं. वारंवार भूकंप व वादळें यामुळें जपान्यांना आपलीं घरें वजनानें हलक्या सामुग्रीपासून बांधावीं लागलीं आहेत. इतकें असलें तरी, जपानी पद्धतीचें घर बांधणें अगदींच

सोपें आहे असें मात्र नाहीं. माझे जपानी मित्र मि. वेहारा यांच्या भावाचें घर बांधण्याचें काम पहाण्याची संधि मला मिळाली. दुरून साधें दिसणारें हें छोटेसें घर बांधण्यास सात लोकांना जवळजवळ साडेतीन महिने लागले. घराचा प्रत्येक भाग अगदीं काळजीपूर्वक जोडला जात होता. तुळई व खांब यांतील सांधा सहजासहजीं दिसणें अशक्य होतें.

## फुलांच्या रचनेची कला

बाहेरून काळपट दिसणारें घर आंतून अगदीं निराळें असतें. प्रत्येक खोलीची सजावट आकर्षक असते. भिंतीला खुंट्या अगर फडताळें नसतात. प्रत्येक खोलींत चित्रें व फुलें व्यवस्थित ठेवलेलीं असतात. फुलदाणींत फुलें ठेवण्याचें एक तंत्र आहे. वाटेल तशीं फुलें ठेवून चालत नाहीं. या कलेस 'इकेबाना' म्हणतात. तरुण मुलींना ही कला लग्नाअगोदर येणें आवश्यक असतें. स्वर्ग, पृथ्वी व मनुष्य हे तीन भाग फुलांच्या कमीअधिक उंचीनें दाखविले जातात. फुलांच्या रचनेंत बांबूच्या काड्या, पानें व गवत यांचाहि उपयोग केला जातो.

## स्वच्छतेकडे लक्ष

जपानी घरांत प्रवेश करतांना एक महत्त्वाची खबरदारी घ्यावी लागते. पुढील दरवाज्याच्या आंत एक छोटीशी खोली असते. तेथें बूट काढून ठेवून कापडी स्लीपर्स घालून घरांत प्रवेश करावयाचा. बुटामुळें बाहेरची घाण घरांत येते व तें घाण होतें. तेव्हां स्वच्छतेच्या दृष्टीनें हा नियम जपानमध्यें सर्वत्र कसोशीनें पाळला जातो. प्रत्येक घरांत पादत्राणें बदलण्याची खोली आवश्यक आहे. बागेची रचना नैसर्गिक ठेवली जाते. छोटीशी टेकडी, छोटें तळें आणि लाकडी नळींतून झुळझुळ वाहणारा झरा वगैरे गोष्टी परदेशी प्रवाशांचें मन चटकन् आकर्षून घेतात. कांहीं बागांतून लहान लहान देवळें व दगडी दिवे ठेवण्याची प्रथा आहे. बागेची स्वच्छता घरांतील प्रत्येक खोलीइतकी कसोशीनें ठेवली जाते आणि म्हणूनच 'जगांत स्वच्छता कोणत्या देशांत असेल तर ती फक्त जपान-

मध्येंच ' अशा अर्थाची वाक्य अनेक प्रवाशांनीं आपल्या प्रवासवर्णनांत लिहून ठेवल्याचें आढळतें.

## झोपण्यापूर्वी स्नान

इंग्लंडमध्यें आठ दिवसांतून एकदां स्नान केलें जातें तर जपानमध्यें रोज स्नान झालेंच पाहिजे, यावर भर दिला जातो. लोक रोज रात्रीं झोपण्याअगोदर स्नान करतात. तांब्याच्या बंबांत गरम केलेलें पाणी मोठ्या लाकडी टबांत घेऊन अंगास साबण लावून होतांच तें अगदी गरम गरम अंगावर ओतून घेतलें जातें. पाणी इतकें गरम असतें कीं आपण आंत हात घातला तर चटका बसल्याशिवाय राहणार नाही.

जपानमध्यें गरम पाण्यानें स्नान फक्त घरीच केलें जातें अशांतला भाग नाहीं. चैनी लोकांकरितां व प्रवाशाकरितां कित्येक स्नानगृहें बांधली आहेत. तेथें स्त्रियांकडून अंगास मालीश करण्याची स्नान-गृहाच्या मालकाकडून सोय केलेली असते व तशा प्रकारच्या जाहिराती वर्तमानपत्रांतून दिल्या जातात

वरील प्रकाराशिवाय आणखी स्नानाचा एक प्रकार जपानमध्येंच प्रचलित आहे. जपान देश ज्वालामुखीनिर्मित असल्यामुळें गरम पाण्याचे शेंकडो झरे देशांत सर्वत्र पसरले आहेत. झऱ्यांची संख्या ११०० च्या वर आहे. त्यांचें पाणी सार्वजनिक स्नानगृहाला उपयोगांत आणलें जातें. स्त्री-पुरुषांकरितां वेगवेगळीं स्नानगृहें बांधलेलीं असतात.

## ' चेरी ' नृत्याची आवड


जपानमध्यें गरम पाण्याच्या झऱ्याप्रमाणें चेरी वृक्षहि भरपूर आहेत. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यांत ' चेरी ' वृक्ष फुलण्यास सुरुवात होते. या वृक्षांना इतकीं फुलें येतात कीं झाडांचीं पानें व फांद्या दिसत नाहीत. जगांत जपानमधील ' चेरी ब्लॉसम ' प्रसिद्ध आहे. या दिवसांत शाळा व कारखाने यांनाहि सुट्या मिळतात व लोकांचे थवेच्या थवे ही निसर्गशोभा पाहण्याकरितां रात्रं-दिवस इकडून तिकडे हिंडत असतात. टोकिओंतील ' उयनो





अणुबांबमुळें भाजून विद्रूप झालेलें शरीर



श्री. किकावा यांच्या जखमी पाठीचा अधिक जवळून घेतलेला फोटो. त्यावरून जखमांची भेसूरता स्पष्टपणे दिसून येते



अणुबाँबच्या स्फोटामुळें जळून बेचिराख झालेलें हिरोशिमा शहर



त्याच जागेवरून नव्या हिरोशिमाचें घेतलेलें छायाचित्र

पार्क ' तर अगदीं माणसांनीं फुलून गेलेला असतो. याच दिवसांत प्रत्येक थिएटरमधून 'चेरी' नृत्य चालू असतात. येथेंहि गर्दी भरपूर असते. हीं नृत्यें चालू असतांना एक प्रसिद्ध नाटक कंपनी परदेशांतून जपानमध्यें आली होती. तिला कितीतरी दिवस थिएटर मिळूं शकलें नाहीं. इतकी आवड या नृत्यांनीं लोकांत उत्पन्न केली आहे.

## स्टेजवरून पात्रें प्रेक्षकांत येतात

'चेरी' नृत्यें कांहीं आठवडेच चालू असतात. परंतु इतर वेळीं सुद्धां सदोदित नृत्यें, नाटकें व संगीताचे कार्यक्रम चालू असतात. हल्लीं पाश्चिमात्य नृत्य–संगीतानें बऱ्याच प्रमाणांत जपानी जीवनांत प्रवेश केलेला असला, तरी 'नाह' व 'काबुकी' सारख्या अस्सल जपानी प्रकारास अजूनहि भरपूर लोकाश्रय आहे. मी गिजा स्ट्रीटच्या बाजूस असलेल्या 'काबुकी' थिएटरांत गेलों होतों. थिएटर अगदीं भरलें होतें. मी जवळजवळ दीड तास बसलों होतों. परकीय माणसास जसें आपलें शास्त्रीय संगीत, तसें मला हें 'काबुकी' नाटक होतें. या नाटकांत तीन चार गोष्टी मात्र नवीन वाटल्या. 'स्टेज' वरून प्रेक्षकांच्या मधोमध पात्रांना येण्यास एका उंच रस्त्याची सोय होती. 'मेकप' अगदीं भडक होता. सर्व भूमिका पुरुषांनीं केल्या होत्या आणि गाणीं, नृत्यें व भाषणें तिन्हीहि गोष्टींचा समावेश त्यांत होता.

## गोंदून घेण्याचा छंद

करमणुकीचे जे अनेक प्रकार आहेत त्यांत अंगावर गोंदून घेणें हा एक आहे. सध्यां ही प्रथा कमी होत असली तरी, जेव्हां आपण सार्वजनिक गृहांत स्नान करण्यास जातों तेव्हां तेथें अंगावर गोंदून घेतलेले बरेच लोक दिसतात. रोज थोडें थोडें याप्रमाणें अगदीं सर्वांगावर ( हात, पाय सोडून ) गोंदलें जातें. गोंदण्याचें काम करणारे या कलेंत अगदीं वाकबगार दिसतात. कारण अंगावरची नक्षी मोठी आकर्षक दिसते. गोंदून घेण्याचा प्रकार फक्त पुरुषांतच रूढ दिसला.

## बाजारांत फिरल्यानेंच भाषा येते

हिंदुस्थानमधील शाळा-कॉलेजांतून मी माझ्या प्रवासाची माहिती सांगत असें. तेव्हां मला एक प्रश्न प्रामुख्यानें विचारला जाई. तो म्हणजे भाषेबद्दलचा. निरनिराळ्या देशांतल्या भाषा तुम्हीं कशा शिकतां? किंवा भाषेचा प्रश्न तुम्ही कसा सोडवितां? कदाचित् हा प्रश्न वाचकांपैकींहि बहुतेकांच्या मनांत आल्यावांचून राहिला नसेल.

भाषा पुस्तकावरून शिकतां येत असली तरी भाषा लवकर शिकण्याचें स्थान म्हणजे बाजार. बाजारांतून फेरफटका मारतांच बरींचशीं निरनिराळीं वाक्यें आपल्या कानावरून जातात. शिवाय एकादें वाक्य अगर शब्द अडल्यास साधारणपणें दुकानदारांना मोडकें तोडकें तरी इंग्रजी येतेंच. आफ्रिकेंत असतांना मी फक्त पंधरा दिवसांत स्वाहिली भाषा बोलू लागलों, तर जपानमध्यें सहाव्या दिवशींच.

## यजमानांची धांदल

असानोसानच्या घरीं एक गंमतीदार प्रसंग घडला. रात्रीं माझें अंथरूण बैठकीच्या खोलींत घातलें होतें. स्नान करून मी झोपण्यास गेलों तेव्हां पांढरी शुभ्र चादर व रजई पाहून चटकन् मी म्हणालों, "ताईहेन कितानाई." माझें हें वाक्य ऐकतांच असानोफुजीन व असानोसान चटकन् माझ्या खोलींत आले. त्यांच्या येण्याचें मला जरा आश्चर्यच वाटलें. पण लगेच शंका आली कीं आपलें बोलणें तर चुकलें नाहीं? परत तेंच वाक्य मी मनाशीं म्हणून पहातां लक्षांत आलें कीं 'किरेइना' म्हणण्याऐवजीं मी 'कितानाई' म्हणालों आणि या दोन्ही शब्दांचा अर्थ अगदीं विरुद्ध आहे. 'किरेनाई' म्हणजे स्वच्छ, तर 'कितानाई' म्हणजे घाणेरडें. मला काय म्हणावयाचें होतें हें सांगतांच हास्यानें खोली भरून गेली.

जशी आपली गंमत होते तशी जपानी लोक इंग्रजी बोलतांनाहि होते. एकादा मनुष्य तुम्हांस 'गुडमॉर्निंग' म्हणेल. तुम्ही सुद्धां त्याला त्याच स्वरांत उत्तर द्याल. पण चार पावलें पुढें चालून जाल

न जाल तोंच तो मधाचा मनुष्य झपझप चालत माघारीं येईल व म्हणेल ' नो नो सर, गुड इव्हिनिंग. ' कारण मागाहून त्याचे लक्षांत आलेलें असतें कीं आपण सायंकाळीं ' गुड मॉर्निंग ' म्हणालों होतों म्हणून.

## बोलण्यास सोपी, लिहिण्यास अवघड

जपानी भाषा बोलण्यास सोपी असली तरी लिहिण्यास मात्र फार अवघड आहे. जपानी भाषेंतल्या शेंकडों खुणा प्रत्येक जपान्यास माहीत असतील कीं नाहीं कोण जाणे. या सर्व खुणा चिनी आहेत. परंतु जपाननें स्वतःची अशी छोटी लिपी तयार केली आहे. त्यांतहि दोन प्रकार आहेत. एक ' काताकाना ' व दुसरा ' हिरागाना ' चिनी अक्षरांना ' कांजी ' म्हणतात.

जपानी भाषा हिंदुस्थानमध्यें बसून शिकावयाची असेल तर अनाथ विद्यार्थी गृहाचे पुणें येथील श्री. गांगल यांनीं जपानी भाषेवर दोन पुस्तकें लिहून ती सोय केली आहे. शिवाय जपानमध्यें ' तीन आठवड्यांत जपानी ', ' तीस तासांत जपानी ' वगैरे शीर्षकें असलेलीं बरींच इंग्लिश-जपानी पुस्तकें आहेत. या सर्वांत जास्त खपणारें पुस्तक म्हणजे ' तीन आठवड्यांत जपानी ' हें होय. याची ३४ वी आवृत्ति चालू आहे व किंमत फक्त पावणेदोन रुपये आहे.

## देशांदेशांतील खुणांतहि फरक

माझे एक मित्र मला म्हणाले, " जगांत कोठेंहि जा, खुणांची भाषा सर्वत्र सारखीच. भूक लागली कीं जेवण्याची खूण करून पोटास हात लावला म्हणजे भूक लागली आहे हें जाणणें कठीण नाहीं. " माझ्या मित्राचें म्हणणें सत्य असलें तरी कांहीं खुणा अशा आहेत कीं त्यांचे निरनिराळ्या देशांत निरनिराळे अर्थ होतात. उदाहरणादाखल पुढील कांहीं खुणा पहा. आपणाकडे लहान मुलें अंगठा उभा करून व इतर चार बोटांची मूठ मिटून ' माझं अडलंय खेटर ' हें वाक्य म्हणतांना आपण ऐकलें असेल. पण याच खुणेचा अर्थ इंग्लंडमध्यें ' ओ के ' (सब ठीक) असा आहे, चीनमध्यें ' फार

छान ' असा अर्थ आहे, तर जपानमध्यें ' मित्र ' असा अर्थ आहे. पैशाची खूण आपण अंगठा व अंगठ्याशेजारचें बोट यांचे सहाय्यानें दाखवितों. तीच खूण इंग्लिश माणूस दोन हातांनी नोटा मोजतांना जी कृति होते ती करून दाखवितो. पण जपानी मनुष्य अंगठा व अंगठ्याशेजारील बोटाचें वर्तुळ करून दाखवील. असो.

## बालक--कथेचा नमुना

रोज सायंकाळीं जपानी मुलें माझ्याकडून गोष्टी सांगून घेत. मी त्या अर्धवट अँग्लो–जपानीमधून सांगे. मुलांचे वडील अगर कॉलेज-मधील बहीण भाऊ त्यांचें भाषांतर करुन सांगत माझी गोष्ट सागून होतांच तीं मुलेंहि ' मुकाशी मुकाशी ओजी ईसान तो ओबा–सान गा ओरिमाशीता ' ( फार फार पूर्वीं एक होता म्हातारा आणि एक होती म्हातारी) असें म्हणून गोष्ट सांगण्यास सुरुवात करीत. माझ्या येथील वास्तव्यांत मला बऱ्याच गोष्टी ऐकावयास मिळाल्या. कांहीं गोष्टींत इसापनीतीप्रमाणें उपदेश होता, तर कांहीं गोष्टी निव्वळ गंमत म्हणून होत्या. धाडसाला व समुद्रफेरीला उत्तेजन देणाऱ्याहि बऱ्याच गोष्टी आहेत. जपानी मुलांची सर्वांत आवडती गोष्ट म्हणजे ' उराशीमा तारो. ' ही गोष्ट बहुतेक मुलांना सांगतां येत होती. ही गोष्ट अशी आहे–उराशीमा तारो नांवाचा एक गरीब कोळी होता. त्यानें एकदां एका कासवाचा प्राण वांचविला. कासवानें त्यास पाठीवर घेऊन समुद्राच्या तळाशीं असलेल्या दिव्य नगरींत नेलें. तेथें रत्नांचा राजवाडा होता, शेंकडों नोकरचाकर होते व राज–वाड्यात फक्त राजकन्या होती. प्राण वाचविलेलें कासव राजकन्येचें आवडतें होतें. उराशिमा तेथें अनेक वर्षे राहिला. कांहीं काळानंतर त्यास घराची आठवण झाली. तो राजकन्येचा निरोप आणि तिनें दिलेली पेटी घेऊन वर आला. राजकन्येनें सांगितलें होतें कीं ही पेटी उघडू नकोस. पण उराशीमानें तें ऐकलें नाहीं व वर आल्यावर पेटी उघडली. ती उघडतांच आंतून धुराचा लोट बाहेर आला व उराशीमा तरुणाचा जख्ख म्हातारा झाला.

# २

## छोटे कारखाने अधिक

जपानमधील मुक्कामांत मोठे कारखाने फक्त दोनच पाहण्यास मिळाले. मात्र अनेक छोटे छोटे उद्योगधंदे जवळून पाहतां आले. मोठ्या कारखान्यांपैकीं 'आयरेस कॅमेरा फॅक्टरी' हा कारखाना टोकिओमध्यें मोठ्या इमारतींत आहे. जपानमध्यें प्रत्येक दुकानांत या कंपनीचे कॅमेरे आहेत. इतकेंच नव्हे तर, कंपनीच्या कॅमेऱ्यास हिंदुस्थान, अमेरिका व युरोपची बरीच मागणी असते. आयरेस रिफ्लेक्स व आयरेस आटोमॅट हे कॅमेरे इतर देशांतील प्रसिद्ध कॅमेऱ्याची बरोबरी करणारे असून, किमतींत अतिशय स्वस्त आहेत.

## घरोघर उद्योगधंदे

या मोठ्या कंपनीच्या कामाची पद्धत मात्र अगदीं निराळी आहे. कॅमेऱ्याचे बरेच भाग दुसरीकडे बनविले जातात व कांहीं भाग कंपनींत बनवून कॅमेरा जोडणी व तपासणी कंपनींत केली जाते. निरनिराळे भाग बनविणारे तेरा लोक आहेत. या लोकांना कंपनी आपणास हव्या असलेल्या भागांचा आराखडा काढून देते व घरगुती छोट्या यंत्रावर भाग बनवून कंपनीस विकतात. मात्र त्या भागांवर नांव कंपनीचें घातलेलें असतें आणि अशा तऱ्हेनें काम विभागून देणें हेंच तर जपानचें वैशिष्ट्य आहे. एक कारखाना अनेक घरांतून पसरलेला असतो आणि म्हणूनच जपानमध्यें घरोघर उद्योगधंदे चाललेले दिसतात.

सर्वांत चटकन् लक्षांत भरणारा धंदा म्हणजे सुताराचा होय. जपानी सुताराचीं हत्यारें अगदीं निराळीं आहेत. करवत छोटी असून

पुढील टोकास तिची रुंदी आपल्याकडील करवतीप्रमाणें लहान नसते, तर ती दांडयाजवळच्या रुंदीपेक्षां मोठी असते. वाकस, पटाशी अगदींच निराळ्या वाटतात.

सुताराचें मुख्य काम म्हणजे लाकडाचीं भांडीं बनविणें होय. हीं भांडीं फळयाचे तुकडे एकमेकांस जोडून बनविलेलीं असतात. त्यांचा आकार आईस्क्रीम पॉटप्रमाणें असतो. त्यांतून पदार्थ बराच वेळ गरम रहातो. मोठमोठालीं भांडीं आंघोळीकरितां बनविलीं जातात. शेतकरी खताकरितां मैला वाहून नेण्यास लाकडाचींच भांडीं वापरतात. कावडीप्रमाणें दोन भांडीं वाहून नेण्याची तेथें प्रथा आहे.

## फुलपाखरांसारख्या वहाणा

कांहीं सुतारांचा लाकडी वहाणा ( गेटा ) बनविण्याचा धंदा असतो. या वहाणांवर भरपूर संशोधन झालें आहे. कोणत्या झाडाचें लाकूड जास्त दिवस टिकूं शकेल, याचासुद्धां अभ्यास सुतारांनीं केलेला दिसला. सुताराकडे संपूर्ण वहाणा तयार होत नाहींत. फक्त तळवाच तयार होतो. बंद बनविणारे, वहाणांवर नक्षीकाम करणारे व हे सर्व एकदम जोडणारे लोक निरनिराळे आहेत. वहाणा बनविणाऱ्या सुतारांचे बहुतेक कारखाने खेडयांतून पहाण्यास सांपडतात. टोकियोंतील असाकूसा भागांत वहाणांच्या बंदांचा व्यापार करणारे लोक आहेत. हे रेशमी बंद इतके सुंदर दिसतात कीं जेव्हां संपूर्ण वहाणा तयार होतात तेव्हां त्या दुरून रंगीबेरंगी फुलपांखराप्रमाणें दिसतात.

आतां फक्त वरील वहाणांचीच गोष्ट घेतल्यास लाकूड जोडणारे सुतार, बंद तयार करणारे, रंगविणारे व शेवटीं संपूर्ण भाग एकत्र जोडणारे असे पांच लोक त्यांत गुंतलेले दिसतात. विकणारा व्यापारी तो सहावा म्हणतां येईल.

## लहान लहान धंदे

मी कामाकुरांत असतांना मला खूपच लहान लहान धंदे पहा-

ण्यास सांपडले. कामाकुरा येथील बुद्धाचा पुतळा पहाण्याकरतां अनेक प्रवासी येत असल्यामुळें संग्राह्य वस्तूंचीं बरींच दुकानें येथें आहेत. तेथील दुकानांना माल पुरविणारे लहान मोठे कारागीर कामाकुराचे पंचक्रोशींत आज पिढ्यान् पिढ्या राहिले आहेत.

कामाकुरांत बांबूच्या व शिपल्यांच्या वस्तू मुख्यत्वें बनविल्या जातात. बांबूचा बारीकसा तुकडासुद्धां वाया जाऊं देत नाहींत. बांबूच्या टोपल्या, पाट्या, सुपें आणि करंड्या हे सर्वत्र पहाण्यास मिळतात; पण येथें बांबूचे साप, मगरी, पंखे, सायकली वगैरे अनेक प्रकार बनविले जातात. बांबूची सायकल नुसती दिखाऊ नसते तर तिच्यावर बसतांसुद्धां येतें. बांबूचा पंखा अगदीं स्वस्त म्हणजे एक पैशांत किंवा दुकानांत माल घेतल्यास फुकटसुद्धां मिळू शकतो. मी ज्या बांबूच्या वस्तू आणल्या आहेत त्या आमच्या मंडईतील कांहीं बुरडांना फारच आवडल्याचें दिसलें.

## शिपल्यापासून फुलें

बांबूप्रमाणेंच शिपल्याचा एक कणसुद्धां वाया जात नाहीं. शिपल्यापासून मुख्यत्वें माळा, फुलें, टेबलावर ठेवण्याचे पेपरवेटस् वगैरे वस्तू तयार करतात. जपानी पेपरवेटस् जगांत प्रसिद्ध असल्याचें मला एका व्यापाऱ्यानें सांगितलें. शिपल्याच्या वस्तू तयार करून जो कचरा उरतो त्याचा खताकडे उपयोग केला जातो.

शिपल्याबरोबरच मोत्यापासून तयार केलेले ससे, घोडे, हत्ती, सिंह इत्यादि प्राणी विकले जातात. हे अखंड असतात व रंग मोत्यासारखा असतो.

## बाहुल्यांचा धंदा

बांबू-शिपल्याच्या वस्तूप्रमाणें खेळणीं तयार करणारे अनेक कारागीर कामाकुरा येथें आहेत. हे लोक कापडी व मातीच्या बाहुल्या तयार करतात. जपानमध्यें प्रत्येक बेटावरील बाहुल्याचे प्रकार निरनिराळे आहेत. कांही बाहुल्या रंगविल्या जातात, तर कांहींना लहान लहान कपडे करून घातले जातात. क्योतोमधील इनोयूये कुटुंबाचा

बाहुल्या तयार करण्याचा धंदा आज ३०० वर्षें चालत आला आहे. जपानी मुलांना यांत्रिक खेळण्यापेक्षां हातानें तयार केलेल्या खेळण्यांची आवड जास्त आहे. जपानी यांत्रिक खेळण्यांचा खप परदेशांतच खूप होतो.

## कागदाच्या दिव्यांची फार आवड

जपानी लोकांना कागदी दिव्यांची खूपच आवड. हे दिवे परदेशीं खपले जात नाहींत, पण जपानमध्यें यांचा खप फार मोठ्या प्रमाणांत आहे. मी कोबे येथील एका दिवे तयार करणारांच्या दुकानांत गेलों होतों. दिव्याच्या किंमतीची चौकशी करतां त्यानें सांगितलें कीं कागदी दिव्यांची किंमत १५० रुपयांपर्यंत असूं शकते. दिव्याची किंमत कागदावर आणि दिव्यावर काढलेल्या नक्षीवर अवलंबून असते. साधा दिवा चार आण्यामसुद्धां मिळूं शकतो.

## बाहुल्या

प्रत्येक जपानी घरांत आपणांला दोन प्रकारच्या बाहुल्या दिसतात. एक काकेशी आणि दुसरी मायोके. काकेशी बाहुली भाग्य देणारी समजली जाते, तर मायोके घरांतील सर्वांचें संकटापासून रक्षण करते. काकेशी दिसण्यांत सुंदर आहे, तर मायोके ओबडधोबड असून तिचें तोंड राक्षसाप्रमाणें असतें.

## प्रेक्षक स्वतः यंत्रें चालवून पहातात

टोकियो शहरांत प्रवाशांना पहाण्यासारख्या ज्या अनेक गोष्टी आहेत, त्यात संग्रहालयाचा क्रमांक प्रथम लावतां येईल. रोज एक संग्रहालय पहावयाचें ठरविलें तरी पंधरा दिवस सहज लागतील.

'ट्रॉन्स्पोर्टेशन म्युझियम' पहाण्याकरतां आपणास अकिहाबारा स्टेशनवर उतरावें लागेल. तेथें जवळच हें संग्रहालय आहे. आंत जाण्याकरतां वीस येनचें तिकिट काढावें लागतें. जपानमध्यें अशा प्रकारचें हें एकच संग्रहालय आहे. दारांत उभें असतांनाच धड्धड खड्खट्, फुस्ऽऽ असे आवाज ऐकूं येतील. हे सर्व आवाज आंत प्रेक्षक निरनिराळीं यंत्रें चालवून पहात आहेत त्यांचे होतात.

प्रवेशद्वारांतून आंत जातांच एक रेल्वे इंजिन अर्धे उघडें करून ठेवलेलें दिसेल. इंजिनचा प्रत्येक भाग प्रेक्षकास दिसावा हा त्यांतील

हेतु आहे. इंजिनच्या खालीं व वर जाण्याचीहि सोय केली आहे. शेजारचें बटन दाबतांच इंजिनचीं चाकें जागचे जागीं फिरूं लागतात व इंजिनमधील प्रत्येक भागाची हालचाल दिसते.

## इंजिनें उलटीं करून पाहतां येतात

या इंजिनचे बाजूस जपानमध्यें पूर्वीपासून आतांपर्यंत ज्या प्रकारचीं इंजिनें वापरलीं गेलीं त्या सर्वांचीं मॉडेल्स ठेवलेलीं आहेत. मोठ्या एंजिनप्रमाणेंच हीं लहान मॉडेल्ससुद्धां चालवून पहातां येतात. कांहीं इंजिनें खालून पहाण्याकरतां बटन दाबून उलटीं करतां येतात. इंजिनाप्रमाणेंच आगगाडीच्या डब्याची रचना कशी असते हेंहि निरनिराळ्या आकृत्यांनीं दाखविलें आहे. जपानी रेल्वेडब्यांचीं दारें आपोआप बंद होतात व उघडतात. दारांची ही उघड-झाप हवेच्या दाबानें कशी होते हें पाहतां येतें. शाळकरी विद्यार्थ्यांची गर्दी या डब्याजवळ सदोदित असते व प्रत्येक मुलगा दाराची उघडझाप करीत असतो. नेहमीं प्रवास करीत असलेला मनुष्य संग्रहालयांतील डब्यांत आरामांत विश्रांति घेत असलेला पहाण्यास सांपडतो.

## हिरव्याऐवजीं पांढरें निशाण

या संग्रहालयाचें वैशिष्टच म्हणजे इंजिनें व गाडीचे डबे नमून येथें रेल्वे खात्यांत उपयोगांत आणली जाणारी प्रत्येक वस्तु पहाण्यास सांपडते. रूळ, सांधे, सिग्नल, दिवे, निशाणें, फिशप्लेटस् वगैरे सर्व कांहीं मूळच्या स्थितींत व मॉडेल रूपानें पहाण्यास मिळतें. जवळच्या छोट्या कॅबिनमध्यें जाऊन सांधे बदलतां येतात, तर तांबडीं पांढरीं निशाणें हातीं घेऊन गार्डास सलामी देतां येते. जपानमध्यें मार्गांतील चौक्यांवर हिरव्या निशाणाऐवजी पांढरें निशाण दाखविण्याची पद्धत आहे.

सिग्नल रूमच्या शेजारीं एक स्पेशल खोली आहे. या खोलींत सध्यांच्या राजाचे वडील बादशहा ताईशो यांनीं स्वतःच्या राज्या-रोहणप्रसंगीं जो खास डबा वापरला तो ठेवलेला आहे. या डब्यांत प्रेक्षकांना जातां येत नाहीं. डब्यांमधील नक्षीकाम व मखमलीच्या बैठकी अजून व्यवस्थित ठेवल्या आहेत.

... ग्रंथालय, ठाणे. स्थळप्रत.

अनुक्रम ........... वि: ...........

जपानमध्य हिंवाळ्यांत अतिशय बर्फ पडतें. कांहीं वेळां तर रूळावर इतकें बर्फ साठलेलें असतें कीं गाड्या जाऊं शकत नाहींत. अशा वेळीं बर्फ काढण्याकरतां एका विशिष्ट प्रकारच्या इंजिनाचा ( स्नोपोलो ) उपयोग करावा लागतो. हीं इंजिनेहि एका भागांत ठेवलीं आहेत.

## समुद्राखालून जाणारा बोगदा

बोगद्यांतून गाडी गेलेली पहाण्यास मिळतें, पण बोगदा कसा बांधला जातो हें पहाण्यास मात्र कोठें मिळत नाही. सर्वसामान्य माणसाची ही अडचण या म्युझियममध्यें दूर करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. नुसता डोंगरांतील बोगदाच नव्हे, तर समुद्राखालून गेलेला क्युशू बेटावरील बोगदासुद्धां कसा बांधला गेला याचे अनेक फोटो, मॉडेल्स व आराखडे ठेवले आहेत.

रेल्वेप्रमाणेंच आगबोटी, मोटारी, विमानें याविषयीं माहिती देणारे निरनिराळे विभागहि आहेत. दरवर्षीं पांच लाख लोक हें प्रदर्शन पाहून जातात. त्यांत पुन्हापुन्हा पहाणारांची संख्या बरीच असते असें स्टोअरमध्यें काम करीत असलेल्या माणसानें सांगितलें. तेथें लहान आगगाड्या, रूळ, इंजिनें वगैरे विकत मिळतात.

## ग्रामीण जीवनाच्या उपयोगी वस्तू

ट्रान्स्पोर्टेशनच्या खालोखाल प्रसिद्ध असलेलें म्युझियम म्हणजे 'फोक क्राफ्ट आर्ट म्युझियम.' म्युझियमच्या आवारांत एक खेडेंच खेडें उभें केलें आहे. जपानी शेतकरी, त्याला लागणाऱ्या नित्योपयोगी वस्तू, शेतीचीं अवजारें, गवती चटया, वहाणा, इरलीं वगैरे सर्व कांहीं येथें पहाण्यास मिळतें. जपानमधील ग्रामीण भागांत उपयोगांत आणल्या जाणाऱ्या दुर्मिळ वस्तू येथें पहाण्यास सांपडतात. विशेष म्हणजे हें म्युझियम खाजगी आहे.

## इंजेक्शन घरींच घेण्याची प्रथा

एकदां मी मित्रावरोबर 'रेडक्रॉस म्युझियम' पहाण्यास गेलों. या म्युझियममध्यें पहाण्यासारखें तें काय असेल असें मला वाटलें होतें.

पण चोवीस खोल्यांत असलेलें हें म्युझियम एका दिवसांत पाहून होणें कठीण. सारें वैद्यकीय शास्त्र येथें ओतप्रोत भरलें आहे. रोग, रोगांचीं कारणें, प्रथमोपचार, रोगाचे प्रकार वगैरे सर्व कांहीं येथें पहाण्यास सांपडतात. आठवड्यांतून एकदां इंजेक्शन्स देण्यास शिकविण्याचा वर्ग चालू असतो. जपानमध्यें प्रत्येकानें घरींच इंजेक्शन घेण्याची प्रथा असल्यामुळें हा वर्ग भरविला जातो. डॉक्टरला फक्त औषधाचा सल्ला विचारावयाचा व घरीं येऊन इंजेक्शन घ्यावयाचें अशी पद्धत जपानमध्यें आहे

'उयेनो पार्क'च्या नॅशनल म्युझियममधील बऱ्याच वस्तू सध्याचे राजे हिरोहिटो यांच्या मालकीच्या आहेत. या म्युझियमची इमारत इतकी प्रचंड आहे कीं ती पहात असतांना दोन वेळां बसून विश्रांति घ्यावी लागते. चांगल्या वस्तू मनुष्य खूप वेळ पाहूं लागला कीं त्याचे मेंदूसहि थकवा येतो असें म्हणतात. त्याचें प्रत्यंतर नॅशनल म्युझियम-मध्यें येतें. म्युझियम दर महिन्यास बदललें जातें. म्युझियममधील वस्तू बदलण्याचे वेळी सवड असल्यास बादशहा स्वतः येतो असें म्हणतात. म्युझियमशेजारीच आर्ट गॅलरी आहे. जुन्या चित्रकारांनीं काढलेलीं मोठमोठीं चित्रें तेथें आहेत.

उयेनोपार्कमध्यें जपानमधील प्रसिद्ध प्राणिसंग्रहालय आहे. त्यांत जगांतील बहुतेक प्राणी आहेत. प्रत्येक प्राण्याच्या पिंजऱ्यावर प्राण्याचें नांव व जगाचा एक छोटासा नकाशा काढून त्यांत तो प्राणी कोठें सांपडतो हें दाखविलेलें असतें. अशा तऱ्हेनें नकाशावर देश दाख-विण्याची पद्धत लंडनच्या झूमध्येंसुद्धां नाहीं. या पद्धतीमुळें विद्या-र्थ्यांचा फायदा होत असावा असें दिसतें. प्राणिसंग्रहालयांत जपानी मुलांचा एक आवडता विभाग म्हणजे हत्तींचा होय. आफ्रिकेंतून आणलेले हत्ती येथें जगेनात, तेव्हां जपानी मुलांनीं नेहरूंकडे एका हत्तीची मागणी केली. नेहरूंनीं पाठविलेल्या इंदिरा हत्तिणीची कवायत जेव्हां दुपारीं ३॥ वाजता सुरू होते तेव्हां सारें संग्रहालय टाळ्यांच्या कडकडाटानें दुमदुमून जातें.

✦ ✦ ✦

# ३

" कशाला जाताय् तुम्ही हिरोशिमाला ? तिथं अॅटम बाँबचा मागमूससुद्धां लागणार नाहीं. सर्व शहर पूर्ववत् बांधून झालं आहे ! " कोबे येथील एका माझ्या हिंदी मित्रांनीं सल्ला दिला. सदर गृहस्थ आज वीस वर्षें जपानमध्यें आहेत. सारी लढाई त्यांनीं पाहिली होती. हिरोशिमास न जाणें हेंच बरें, असा एक विचार माझ्या मनांत येऊन गेला. मी त्यांना म्हणालों, " आपण केव्हां गेला होतां हिरोशिमाला ? " त्यावर त्यांनीं उत्तर दिलें, " आम्ही व्यापारी आहोंत. सवड मिळत नाहीं धंद्यामुळं. मीं अजून हिरोशिमा पाहिलं नाहीं ! " काशीस राहून गंगास्नान न करणारे किंवा मुंबईंत राहून समुद्र न पाहणारे जे कांहीं महाभाग आहेत त्यांच्यापैकींच हे गृहस्थ एक असावेत.

## इंग्रजी बोलणारी जपानी महिला

दुसरे दिवशीं सकाळीं तिकिट काढून मी हिरोशिमाला जाणाऱ्या एक्स्प्रेसमध्यें बसलों. आपला शुभ वेळेवर विश्वास आहे कीं नाहीं हें मला सांगतां येणार नाहीं; पण मी ज्या वेळीं गाडींत बसलों ती वेळ शुभ असली पाहिजे. माझ्या म्हणण्याची सत्यता आपणांस पुढील प्रसंगावरून खास पटेल. एकादा सिनेमांतील प्रसंग घडावा तशा तऱ्हेचा हा प्रसंग घडला.

गाडी कोको नांवाचे गांवीं थांबतांच दोन लहान मुलें घेऊन एक मध्यम वयाच्या बाई आमच्या डब्यांत चढल्या व माझे शेजारीं बसल्या. मी खिडकीजवळ बसून बाहेरची शोभा पहात होतों. गाडीनें स्टेशन सोडतांच मुलांची चुळबुळ सुरू झाली. त्यांना खिडकींतून डोकावून पहावयाचें होतें. मी चटकन् एका मुलास उचलून खिडकी-

जवळ बसविलें व दुसऱ्याला मांडीवर घेतलें. मुलाला मांडीवर घेतल्या-वर बाईनीं माझे " थँक यू " असें म्हणून आभार मानले. मला जरा आश्चर्यच वाटलें. कारण उत्तमपैकीं इंग्लिश बोलणाऱ्या जपानी बायका थोड्या आहेत. बहुतेक " आरीगातो गोजाईमास " म्हणून आभार मानतात.

बोलतां बोलतां सदर बाई हिरोशिमाच्या असून त्यांचा नवरा अॅटम बॉंबच्या हल्ल्यांत सांपडून वाचलेला आहे वगैरे माहिती मला समजली. मी हिंदुस्थानमधून आलों आहे व निरनिराळ्या शाळा-कॉलेजांतून माझ्या प्रवासाविषयीं माहिती सांगत असतों हें त्यांना जेव्हां समजलें तेव्हां त्यांनीं मला हिरोशिमांत कोठें उतरणार, असा प्रश्न विचारला. 'अजून निश्चित कांहीं नाहीं. उतरेन एखाद्या हॉटेलांत !' असें उत्तर देतांच त्यांनीं मला त्यांचे घरीं उतरण्याविषयीं विनंति केली. त्या वेळीं मला किती आनंद झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी.

## सात नद्या

हिरोशिमा शहर हें जपानमधील सातव्या नंबरचें मोठें शहर आहे. या गांवांतून निरनिराळ्या सात नद्या वाहतात. युद्धपूर्वकाळांत हें महत्त्वाचें सैनिकी केंद्र असलें तरी 'सिटी ऑफ श्राईन्स अँड टेंपल्स '–धार्मिक मंदिरें व यात्रांचें ठिकाण–म्हणून ओळखलें जात असे. कलाकुसरीचे उत्तमोत्तम नमुने येथें पहाण्यास सांपडत. पण आज.... ?

आजचें हिरोशिमा अगदीं वेगळें आहे स्टेशनवर उतरतांच एक गोष्ट चटकन् लक्षांत येते. ती म्हणजे शहरामध्यें मोठे वृक्ष नाहीत. नवीन लावलेलीं लहान लहान झाडें फक्त दिसतात. रस्ते तयार करण्याचें व घरें बांधण्याचें काम संपत आलें आहे. अगदीं क्वचित् ठिकाणीं रस्ता बांधणीचें काम चालू असलेलें दिसतें.

आम्ही बसमधून मि. किकावा यांच्या घरीं गेलों. घर छोटेसें पण स्वच्छ होतें. माझी ओळख त्यांचे पत्नीनें करून देतांच त्यांनाहि

आनंद झाला. गप्पा मारतां मारतां सकाळ संपून गेली व दुपारीं आम्ही शहरांतील अॅटम बाँबच्या खाणाखुणा पहाण्यास बाहेर पडलों.

## पाषाणहृदयीसुद्धां हादरून जाईल

ज्या ठिकाणीं बाँबचा स्फोट झाला होता तेथें एक म्युझियम ठेवलें आहे. या म्युझियममध्यें अॅटॉमिक किरणांचे निरनिराळ्या वस्तूंवर झालेले परिणाम पहावयास सांपडतात. प्रदर्शनांतील वस्तू व फोटो पहात असतांना अगदीं पाषाणहृदयी माणसांचे मनसुद्धां हादरल्याशिवाय रहाणार नाहीं.

म्युझियम पाहून होतांच 'एक्झिबिशन हॉल' पहाण्यास गेलों. हा हॉल बाँबचा स्फोट झाला त्या ठिकाणापासून फक्त कांहीं पावलांच्या अंतरावर आहे. हिरोशिमांतील ही अत्यंत भक्कम अशी इमारत शहराचे मध्यभागीं होती. परंतु अॅटम बाँबनें तिच्या फक्त भिंतीच शिल्लक ठेवल्या. "इतर इमारतींचा चक्काचूर झाला, मग हिच्या भिंती उभ्या कशा?" माझ्या या प्रश्नास उत्तर देतांना मि. किकावा म्हणाले, "अॅटम बाँबचा स्फोट होतांना रिंग तयार होते. त्यामुळें ज्या ठिकाणीं प्रत्यक्ष त्याचा स्फोट होतो, तेथील इमारती पडतीलच असें सांगतां येत नाहीं. शिवाय या हॉलची बांधणी अगदीं उत्तम होती."

अॅटमबाँबच्या प्रलयाची आठवण लोकांना सतत रहावी म्हणून हिरोशिमा येथील हा हॉल पडक्या स्थितींत ठेवला आहे.

## अॅटमबाँब पडतांना–

अॅटमबाँब केव्हां व कसा पडला याविषयीं पुढीलप्रमाणें माहिती समजली. ही माहिती एका हवाईहल्ला–प्रतिबंधक अधिकाऱ्याच्या निवेदनावरून समजली.

"६ ऑगस्ट १९४५ रोजीं सकाळीं सहा वाजतां नेहमींप्रमाणें मी माझ्या ऑफिसमध्यें होतों. सकाळीं सव्वा आठ वाजतां समोरील यंत्रावरून एक 'बी २९' प्रकारचें विमान उंच आकाशांत आलेलें दिसलें. विमानाचें निश्चित ठिकाण मी अजमावीत होतों, इतक्यांत तीन पॅराशूटस् खालीं येतांना दिसले. हें काय असावें याविषयीं विचार

करण्यापूर्वी एक निळसर पांढरा प्रकाशगोल झपाट्यानें खाली येतांना दिसला. जणू सूर्यच आपली जागा सोडून पृथ्वीवर येत आहे! क्षणांत या गोळ्याचें वर्तुळ तयार झालें आणि कांहीं क्षणाचे आंत हिरोशिमाचे मधोमध आदळलें. जो मोठा हादरा बसला त्यानें मी खालीं पडलों. माझे डोळे मिटलेले होते व कानांत बोटें घातलीं होतीं. सुमारें अर्ध्या मिनिटानंतर मी उठलों. समोर हिरोशिमा शहरांतून धुराचा एक प्रचंड ढग वर जातांना दिसला. विजेचें कनेक्शन तुटल्यामुळें सर्व यंत्रें बंद पडलीं होतीं. प्रचंड उष्णता व हवेच्या दावाचे धक्के सेकंदागणिक बसू लागले व हा ॲटमबाँब असल्याचें माझ्या लक्षांत आलें.'

## पाऊण लाखावर ठार

सदर विमान अधिकारी हिरोशिमा शहराबाहेर सुमारें सहा मैलावर होता. त्यामुळें त्याला फक्त हवेचा धक्का व उष्णतेचा चटका बसला. पण प्रत्यक्ष जे लोक शहरामध्यें होते त्यांचें काय झालें? काय झालें हें सांगण्याच्या स्थितींत कोणी उरलें नाहीं. एका क्षणांत ७८१५० लोक मेले, ३७४२५ जखमी झाले व अनेकांना थोड्याफार प्रमाणांत चटके बसले. सकाळच्या वेळीं कामावर जाणारांची गर्दी ट्राममध्यें होती. अशा १०८ ट्राम्स् जळून खाक झाल्या. मोठमोठ्या इमारतींचे सांगाडे उरले व लहान इमारतींचा मागमूसमुद्धां राहिला नाहीं. नद्यांचें पाणी आटलें. अंगावरचे कपडे जळून गेले व स्त्री आहे की पुरुष आहे हें ओळखूं न येण्यापर्यंत भाजून निघालेले लोक, पाणी पाणी करीत पाण्याचे शोधार्थ सैरावैरा धावूं लागले. थोड्या अवधीनंतर धुरामुळें काळ्या रंगाचा पाऊस पडला. तहानेनें व्याकूळ झालेल्या लोकांनीं हें विषारी पाणी पितांच शेवटची धडपड शांत झाली. पाण्याचे डबक्यांतून प्रेतांचे ढीग दिसू लागले.

## स्फोटानंतर घडलेला चमत्कार

स्फोटानंतर कांहीं विचित्र गोष्टी लोकांना दिसून आल्या. घराच्या व झाडांच्या सावल्या दिसल्या; पण झाडें नव्हतीं. बँकेच्या पायरीवर बसलेला मनुष्य जागचे जागी नाहींसा झाला. पण त्याची सावली अजूनहि पहाण्यास सांपडते. घड्याळांचें तीन मजली एक दुकान

होतें. खालचे दोन मजले अजिबात साफ झाले. वरचा मजला व्यवस्थित खालीं येऊन बसला. इंडस्ट्रियल हॉलच्या जवळच एक दगडी दिवा आहे. या दिव्याचा कळस हवेच्या दाबानें वर उंच उडाला. बाजूचा दुसरा दगड दिव्याचे उरलेल्या भागांवर बसला. दुसरा दगड बसतांच हवेंतील दिव्याचा कळस नवीन बसलेल्या दगडावर येऊन बसला. अशा अनेक गोष्टी आपणांस [अजूनसुद्धां प्रत्यक्ष पाहण्यास मिळतात.

मी ज्यांच्याकडे उतरलों होतों ते मि. किकावा सहा वर्षें व पांच महिने रेडक्रॉस हॉस्पिटलमध्यें होते. त्यांच्यावर सोळा ऑपरेशन्स झालीं आहेत. पाठ व हात संपूर्ण भाजून निघाले आहेत. इतकेंच नव्हे, तर हें भाजणें नेहमींच्या भाजण्यापेक्षां विचित्र दिसतें.




जपानी पैलवानाच्या सलामीचा एक प्रकार. कुस्ती सुरू होण्या–पूर्वी अशा अनेक प्रकारच्या सलाम्या देण्याची त्यांची प्रथा असते

★



याच इमारतीनजिक जगांतील पहिला अणुबाँब टाकला गेला. त्याच ठिकाणीं श्री. रघुवीर अणुकिरणाचे परिणाम झालेल्या कांहीं वस्तू स्वीकारीत आहेत.



जपानमधील एका घराभोंवतालच्या बागेची कौशल्यपूर्ण केलेली बांबूची भिंत. पाण्याची तोटी देखील बांबूचीच बनविलेली आहे.

# ४

## सोळा वर्षांचा शिक्षणक्रम

जपानच्या शिक्षणपद्धतीत गेल्या लढाईनंतर मोठा बदल घडून आला आहे. युद्धापूर्वी ६ वर्षे प्रायमरी, ५ वर्षे ज्युनियर हायस्कूल, ३ वर्षे सिनियर हायस्कूल, व ३ वर्षे कॉलेज असा कोर्स होता. आतां तोच अनुक्रमें ६, ३, ३ व ४ वर्षे असा केला आहे. पूर्वी फक्त सहा वर्षांचें प्रायमरी शिक्षण सक्तीचें होतें. सध्यां त्यांत ३ वर्षें ज्युनियर हायस्कूलची भर पडली आहे.

## विद्यार्थ्यांचा गणवेश

येथील शाळा–कॉलेजांतील विद्यार्थ्यांचा गणवेश ठरलेला आहे. प्रत्येक शाळेचा वेगळा युनिफॉर्म नाही. सर्वत्र एकच आहे. काळ्या रंगाचा कोट व काळ्या रंगाची पँट असा विद्यार्थ्यांचा पोषाख. मात्र टोपीचा आकार निरनिराळा असतो. जपानी विद्यार्थ्यांच्या टोपीचा पुढील भाग ' कौंटीकॅप ' प्रमाणे उन्हापासून संरक्षण करणारा आहे. मुलांप्रमाणें मुलींनाहि गणवेश आहे.

## बूट काढून वर्गांत बसतात

कॉलेजमधील अगर शाळेमधील विद्यार्थी आपापल्या वर्गात गेल्यावर टोप्या व बूट काढून सेल्फमध्यें ठेवतात. वर्गांतील जमीन स्वच्छ राखण्याकरतां बुट काढण्याची पद्धत आहे. विद्यार्थी डोक्यावर केस राखीत नाहींत.

## शाळेंतील उपस्थिति

जपानचें शिक्षणमान जगांत वरच्या क्रमांत बसेल एवढें आहे. खेड्यापाड्यांतून सर्वत्र शाळा दिसतात व शाळेंतील उपस्थिति

सरासरी ९५ टक्के असते. एकूण शिक्षणाचें प्रमाण शेंकडा ९९·६ इतकें आहे. मात्र एक गोष्ट सध्यां जिकडे तिकडे दिसते ती म्हणजे जागेची टंचाई. शाळेंतील एका शिक्षकानें सांगितलें कीं लढाईनंतर जागेची टंचाई फार भासूं लागली. त्याला कारण म्हणजे तीन वर्षें ज्युनियर हायस्कूलचें शिक्षण सक्तीचें केलें हें होय. खेड्यांतून असलेल्या शाळांतून विद्यार्थी जमिनीवर बसलेले दिसले. मात्र शहरांत ही प्रथा नष्ट होत आहे. शहरांतील शाळांतून बाकें व स्टुलांची सोय केली जाते.

शाळांतून काय काय शिकवितात हें मला पहावयाचें होतें. आमच्या घराजवळ असलेल्या 'यामावाकी हायस्कूल' मध्यें मी दोन दिवस शिक्षणपद्धति पहाण्यास जात होतों. ही शाळा खासगी आहे. शाळेंत येणारे विद्यार्थी श्रीमंताचीं मुलें आहेत. मोळाशें विद्यार्थी असलेल्या या शाळेंत शिस्त कमालीची दिसली.

## पहिला तास व्यायामाचा

शाळा सकाळीं साडेआठ वाजतां सुरू होते. सुरुवातीस प्रार्थना नसते. ती शेवटीं म्हटली जाते. मुलींचा पहिला तास गाण्याचा असतो, तर मुलांचा व्यायामाचा. बँडचे तालावर किंवा शिक्षकांचे शिटीचे तालावर व्यायाम चालतो. बँडच्या ग्रामोफोन रेकॉर्डस् घेतल्या आहेत. पहिल्या तासानंतर इंग्लिश, भूगोल, इतिहास, नागरिकशास्त्र, सायन्स वगैरे तास सुरू होतात. ४० मिनिटांचा तास व दर दोन तासांनीं छोटी सुटी. जेवणाची सुटी एक तास असते.

नेहमीच्या तासाप्रमाणेंच इतर अनेक विषय मुलांना शिकविले जातात. मुलींना नृत्याचें शिक्षण दिलें जातें. हीं नृत्यें युरोपियन व जपानी पद्धतीचीं असतात. सर्व काम बँडचे तालावर चालतें.

## मुलींना स्वयंपाकाचेंहि शिक्षण

नृत्याप्रमाणेंच मुलींना स्वयंपाकाचेंहि शिक्षण शाळेंत दिलें जातें. त्याकरतां प्रत्येक शाळेंत खास स्वयंपाकघराची व्यवस्था केलेली असते. सुमारें चाळीस मुली एका वेळीं स्वयंपाकघरांत शिक्षण घेऊ

शकतात. ज्या वेळीं विद्यार्थिनी शाळा सोडते त्या वेळीं ती उत्तम प्रकारची सैंपाकीणहि झालेली असते. इतकेंच नाहीं तर विणकाम, शिवणकाम, चित्रकला, बाजारहाट वगैरे अनेक उपयुक्त बाबींचें ज्ञान तिला प्राप्त झालेलें असतें.

## व्यावहारिक शिक्षण

जी गोष्ट मुलींची तीच मुलांचीहि सांगतां येईल. नेहमीच्या विषयांव्यतिरिक्त अनेक विषय विद्यार्थ्यांना शिकविले जातात. घड्याळें आणि फाऊंटनपेन दुरुस्त करणें हे विषय उपजीविकेचे म्हणून सांगतां येतील; पण रोजच्या व्यवहारांत उपयोगी पडणाऱ्या गोष्टीसुद्धां तो शिकतो. फोन करणें, मनीऑर्डरचा किंवा तारेचा फॉर्म भरणें वगैरे दिसण्यांत सोप्या, पण खरोखरीच महत्त्वाच्या अनेक गोष्टी तो आत्मसात करतो. जपानी विद्यार्थी ज्या वेळीं शाळा सोडतो त्या वेळीं तो नुसता पोपटपंची करणारा असत नाहीं, तर बाहेरच्या जगांत व्यवस्थित वागणारा आदर्श नागरिक झालेला असतो.

इतर सर्व विषयांप्रमाणें विद्यार्थ्यांकडून नाटकें व नाट्यप्रवेश अगर संवाद स्नेहसंमेलनप्रसंगीं बसवून घेतले जातात. त्या वेळीं पालकांना खास आमंत्रण असतें. आपल्या मुलांची निरनिराळ्या विषयांतील प्रगति पालकांना पहातां येते व शाळेंतील मुख्याध्यापकाशीं त्यावर चर्चा करतां येते.

## चोरण्याची संवय नाहीं

आपल्याकडील कांहीं शाळांतून पुस्तकें चोरण्याचें व तीं बाजारांत विकण्याचें प्रमाण अलीकडे वाढलें आहे. असे प्रकार जपानमध्यें घडतात का ? माझ्या मनांतील हा प्रश्न मी यामावाकी हायस्कूलचे हेडमास्तरांना विचारला. माझा प्रश्न ऐकून त्यांना जरा आश्चर्यच वाटलें. ते म्हणाले, " पुस्तकें चोरण्याचे प्रकार आमचे शाळेंत अजिबात घडत नाहींत. सर्व विद्यार्थ्यांची दप्तरें वर्गांत राहिली किंवा एखादें पुस्तक विसरून विद्यार्थी घरीं गेला तरी त्याला तें परत मिळ

शकतें. मात्र विसरलेलीं पुस्तकें अगर वस्तू ज्याच्या त्यांनीं नेल्या नाहींत, तर त्या शाळेच्या स्टोअरमध्यें तशाच पडून राहतात. पुस्तकावर सही (मोन) असेल तर विद्यार्थ्यांचा शोध करून तें दिलें जातें. पण कांहींच खाणाखुणा नसल्या तर तें तसेंच शाळेंत पडून रहातें. अशा वस्तूंची व पुस्तकांची संख्या विशेष नसते.

जी गोष्ट चोरीची तीच भांडणाची व अपशब्द बोलण्याची होय. शाळा कॉलेजांतील विद्यार्थी लहान असले, असमंजस असले तरी भांडणें व शिव्यागाळीचे प्रकार होत नाहींत. तसा एकादा प्रसंग घडलाच तर त्यावर जालीम उपाय योजला जातो. युद्धापूर्वी शिक्षक विद्यार्थ्यांना मारीत असत. पण सध्यां मारण्याचा प्रकार अजिबात नाहीं. वर्गाबाहेर उभें करणें, घरीं पाठविणें अगर पाठांतर करण्यास लावणें वगैरे शिक्षा केल्या जातात व मुलाचा गुन्हा पालकांना ताबडतोब कळविला जातो.

## सफरी काढतात

प्रत्येक शाळा वर्षांतून कमींत कमी दोन मोठ्या व दोन लहान अशा चार सफरी काढते. या सफरी निरनिराळी वस्तुसंग्रहालयें, प्रेस, कारखाने, प्रेक्षणीय स्थळें, बोटी उतरण्याचीं ठिकाणें, पर्वत, प्राणिसंग्रहालयें वगैरे ठिकाणीं काढल्या जातात. प्रत्येक सफरीची माहिती विद्यार्थ्यांनें लिहावयाची असते. जपानी विद्यार्थी ज्या वेळीं शालेय शिक्षण थांबवितो त्या वेळीं त्याला संपूर्ण जपानविषयीं माहिती झालेली असते. इतका त्या सफरीचा त्या विद्यार्थ्यांना फायदा होतो. सहलीला लागणारे पैसे विद्यार्थी फावल्या वेळीं उद्योग करून मिळवितो. लहान मुलांना घरांतून पैसे मिळतात.

## धंदेशिक्षणाच्या शाळा

धंदेशिक्षणाच्या अनेक शाळा आहेत. या शाळांतून केस कापणें, दुकानाच्या शोकेसेस सजविणें, प्रवाशांना माहिती सांगण्याचें शिक्षण, वृत्तपत्रीय शिक्षण वगैरे विषय शिकण्यास मिळतात. सुतारकाम,

गवंडीकाम, लोहारकाम आणि खेळणीं बनविण्याचें काम शिकण्याची सोय निरनिराळ्या संस्थांकडून केली जाते.

## जपानी शेती

जपान देश पर्वत टेकड्यांचा. सपाट मैदानें नाहींत म्हटलें तरी चालेल. मग जपानी लोक शेती कशी व कुठें करतात ? लोकसंख्या भरपूर असलेल्या या देशांत जमिनीचा अगदीं लहान तुकडासुद्धां रिकामा सोडलेला नाहीं. पर्वताचे माथ्यापासून ते समुद्राचे सपाटी-पर्यंत सर्वत्र भातशेतें दिसतात. पर्वत व डोंगर-टेकड्यांना पायऱ्या पाडून शेतें तयार केलीं आहेत. तर समुद्रसपाटीजवळ कोंकण-पट्टी-प्रमाणें चौकोनी लहान लहान शेतें आहेत.

डोंगरावरील शेतीस जनावरें अगर यंत्रें तितकीशीं उपयोगी पडत नाहींत. सर्व कामें माणसास करावीं लागतात. जमीन नांगरण्याऐवजीं कुदळीसारख्या हत्यारानें खणली जाते. म्हणून जपानी शेतकऱ्यांचा कष्ट करण्याचे बाबतींत पहिला नंबर आहे.

## गप्पा मारतांनाहि काम चालू

जपानी शेतकरी व आपणाकडील शेतकरी यांत बरेंच अंतर आहे. तसें असण्याचें एक कारण म्हणजे शिक्षण. प्रत्येकास वाचतां येत असल्यामुळें आपण कोण आहोंत व जग कोठें जात आहे याची त्यांना सतत जाणीव असावी असें दिसतें. दिवसांतील अगदीं थोडा वेळसुद्धां वाया घालविण्यास ते तयार नसतात. गप्पा मारतांना हातानें पेंढ्याच्या चटया अगर दोर वळण्याचें काम चालू असतें. पेंढ्याच्या चटयांचा उपयोग पोत्याप्रमाणें केला जातो. कारण जपानमध्यें ताग नाहीं व तो विकत घेणें त्यांना परवडत नाहीं.

## कलात्मक दृष्टि

जपानी शेतकऱ्याच्या घरांत जाण्यापूर्वी आपण त्याचें घर दुरूनच पाहूं. पाना–गवताचें घर, पण कलापूर्ण पद्धतीनें शाकारलेलें दिसेल. समोर लोंबकळलेली केंबूळ ( गवत ) कात्रीनें व्यवस्थित कापून आकर्षक बनविलेली दिसेल. आजूबाजूस नवीन घर बांधण्याचें काम

चालू असेल तर त्या घराच्या आढ्यावर पांढऱ्या कागदाच्या झिळमिळ्या दिसतील. आपल्याकडे आढ्यास नारळ बांधण्याचा जो हेतु तोच त्यांचा त्यांत आहे.

## लाकडी चमच्याचें तोरण

घरांत शिरतांच दारावर तोरणाप्रमाणें लाकडी चमचे चुकांनीं घट्ट मारलेले दिसतील. हे चमचे भात वाढण्याचे असतात. ते निरनिराळ्या देवालयांतून आणलेले असतात. प्रत्येक चमच्यावर मुलाचें नांव लिहिलेलें असतें. शेतकऱ्यांमध्यें अशी समजूत आहे कीं हे चमचे दारावर असल्यानंतर मुलास वाईट बाधेपासून धोका नसतो.

## देव्हाऱ्यावरील दोर

पादत्राणें काढून आपण जरा आंत जाऊं. शेतकऱ्याची सर्वांत महत्त्वाची जागा म्हणजे 'इरोरी-नो-मा.' 'इरोरी' म्हणजे चर अगर जमिनींतील शेगडी. आपल्याकडील यज्ञकुंडाप्रमाणें ही जमिनींत असते व आकारहि असाच चौकोनी असतो. या कुंडांत लाकडाचा भुस्सा घालून त्यावर पेटतीं लांकडें ठेवलेलीं असतात. घरांतील सर्व लोक थंडीच्या अगर पावसाळ्याच्या दिवसांत याच ठिकाणीं जेवतात, झोपतात व चटया विणतात. लहान मलें कुंडाचे राखेंत रताळीं भाजून खातात. कुंडाचे वर एक केटली टांगलेली असते. चहाकरतां सदोदित उकळतें पाणी मिळावें हा त्यांतील हेतु आहे. या इरोरीच्या वर माळा नसतो, कारण धूर छपरांतून गेल्यास तेथें कीटक घरें बनवीत नाहीत व छप्पर जास्त दिवस टिकतें. घरांतील इतर खोल्या, स्वयंपाकघर व साठवणाची खोली पाहून आपण देव्हाऱ्यापाशीं थांबूं. बहुतेक जपान्यांच्या घरांत देव्हारा असतो. देव्हाऱ्यावर गवताचा बारीक दोर टांगलेला असतो. त्या दोरांत पांढऱ्या कागदाच्या पट्ट्या खोचलेल्या असतात. आंत मेणबत्ती लावण्यास पितळेचे स्टँडस् व निरनिराळ्या धातूंचे उभट तुकडे असतात.

मागच्या परस्मांत अगर पुढील दारीं विहिरीवर पंप बसविलेला

दिसेल. उघड्या विहिरी बहुतेक नसतात. त्यांचीं तोंडें झाकलेलीं असतात. परसांत भाजीपाला व एका बाजूस शेतकीचीं अवजारें दिसतील.

## शेत भाजण्याची प्रथा

आपणाकडे शेत भाजण्याची प्रथा आहे; पण जपानमध्यें नाहीं. जेथें भाताचें रोप लावावयाचें आहे ती जागा प्रथम चांगली खत-मिश्रित केली जाते. आजूबाजूस चर खणून पाणी खेळण्याची व्यवस्था करतात. तयार केलेल्या तीन फूट रुंदीच्या व शेताच्या लांबीच्या ओटयावर भात पेरलें जातें. चिमण्यांनीं भात खाऊं नये म्हणून काठ्या रोवून त्यास वाजणारे पत्रे बांधतात. त्यामुळें पक्षी जवळ येत नाहींत. कांहीं ठिकाणीं आपल्याकडील लांब हाताचें व मडक्याच्या डोक्याचें बुजगावणेंहि असतें.

## दुध्या भोपळ्याएवढा मुळा

घराच्या खताव्यतिरिक्त राख, बाजारी, खतें आणि पानें कुजवून तयार केलेलीं खतें घातलीं जातात. खतांमुळें पिकें व भाजीपाला चांगला फोफावतो. जपानइतकीं मोठीं गाजरें व मुळे मला इतरत्र कोठें दिसलीं नाहीत. एकेक मुळा दुध्या भोपळ्याएवढा जाड व हातभर लांब होता. गाजरांचा व मुळ्यांचा आकार सारखाच असतो.

## भूकंप जाणवले

जातां जातां आपण जपानमधील भूकंपाविषयीं माहिती मिळवूं. माझ्या मुक्कामांत मला सहा वेळा धक्के बसले. परंतु हे सर्व जाणवणारे होते. न जाणवणारे, पण यंत्रावर नोंद होणारे बरेच धक्के बसले असतील. जपानमध्यें वर्षाकाठीं हजारांचे वर छोटे मोठे भूकंप होतात. पण त्यापासून नुकसान होत नाहीं. नुकसान करणारे मोठाले भूकंप क्वचितच होतात. आतांपर्यंत सर्वांत मोठा भूकंप १९२३ सालीं १ सप्टेंबरला क्वांतो भागांत झाला. त्यांत १,०५,००० माणसें मेलीं, ६०,००० जखमी झालीं आणि तीस लाख घरें पडलीं व आगींत जळालीं.

## वेशीवरील देवास नमस्कार

कोठेंहि जा, शेतकरीवर्ग देवभोळा असतो. मागें मीं ब्रिटिश शेतकरी देवभोळे असतात हें लिहिलें होतें. येथें जपानी शेतकऱ्यांच्या देवभोळेपणाचें एक उदाहरण देतों.

जपानी खेड्याच्या वेशीवर जीझो नांवाच्या देवाचें देऊळ असतें. प्रत्येक शेतकरी जातां येतां देवास नमस्कार करून एक लहानसा दगड त्याचे डोक्यावर व हातावर ठेवतो. दगड ठेवल्यावर देव आपल्या मुलांचें रक्षण करील असा त्यांचा विश्वास आहे.

## जपानची राजधानी

टोकियो जगांतील चवथ्या नंवरचें मोठें शहर समजलें जातें. पॅरिसच्या खालोखाल याची लोकसंख्या आहे. (७३५०८६२) इतक्या मोठा शहरांत हिंडावयाचें म्हणजे चुकण्याची शक्यता अधिक. पण तसें मनांत कांहींच आणू नका. परदेशी प्रवाशांना सर्वतोपरी सहाय्य करणारी व प्रत्येक मोठ्या रस्त्यावर ऑफिस असलेली जपानमधील आदर्श संस्था म्हणजे 'जपान ट्रॅव्हल ब्युरो' (जे. टी. बी.) होय. या संस्थेमार्फत अगदीं थोड्या खर्चांत सर्व शहर पहाण्याची सोय केली आहे. शिवाय प्रवाशांना नकाशे, माहिती-पत्रकें, टोकियोसंबंधीं माहिती देणारीं छोटीं छोटीं पुस्तकें वगैरे अगदीं मोफत पुरविलीं जातात.

'जे. टी. बी.' मार्फत शहर पहावयाचें नसेल तर एक 'साईट सीईंग बस कंपनी' आहे. या कंपनीच्या सुंदर बसेस शहरांतून अव्याहत हिंडतांना दिसतील. या बसेसना वर प्लॅस्टिकचीं छपरें आहेत. त्यामुळें उंच उंच इमारती बसल्या जागेवरून पहातां येतात. बस-मध्यें परदेशी प्रवाशांकरतां इंग्लिश गाईडची सोय केलेली असते. मार्गदर्शकांचीं कामें करणाऱ्या मुली असतात. मोटारमधील लाऊड-स्पीकरमधून विनोदी भाषेंत त्या सारखी माहिती सांगत असतात. काबुकी थिएटर, जपानी घर, प्राणिसंग्रहालय, म्युझियम , जपानी

हॉटेल, राजवाडा वगैरे स्थळें दाखविलीं जातात. शेवटीं बसमधील लोकांचा एक फोटो काढून तो त्यांना प्रवासाचे शेवटीं मोफत दिला जातो.

## मुलें--म्हाताऱ्यासाठीं खास डबा

अफाट लोकसंख्या असलेल्या टोकिओ शहरांत प्रवासाचीं अनेक साधनें आहेत. सबंध शहरभर रेल्वेचें जाळें पसरलें आहे. रेल्वेंत दोन प्रकार आहेत. एक सरकारच्या मालकीची आणि दुसरी खाजगी कंपनीच्या मालकीची. जास्त करून खासगी कंपनीच्या मालकीची रेल्वेची वहातूक सबर्बमधून चालते.

प्रत्येक स्टेशनांतून कांहीं मिनिटांच्या अंतरानें सदरच्या गाड्या सुटत असल्या तरी गाडींत बसण्यास जागा मिळणें कठीण. माणसांची इतकी खेचाखेच झालेली असते कीं, लहान मुलांना घेऊन डब्यांत चढणें अशक्य असतें आणि म्हणूनच मुलें व म्हाताऱ्या बायका यांच्या-करता एक खास डबा असतो.

टोकियो येथील टोकियो-सेंट्रल स्टेशन सर्वांत मोठें असून तेथें एकंदर १८ प्लॅटफॉर्म्स आहेत. प्रत्येक प्लॅटफॉर्मवर गाडी कोठून येत आहे, कोठें जाणार आहे वगैरे सर्व माहिती लाऊड स्पीकर-मधून प्रवाशांना दिली जाते. एकट्या टोकियो स्टेशनांत चढणाऱ्या–उतरणाऱ्या प्रवाशांची रोजची सरासरी संख्या ४,५२,०७० इतकी आहे.

## टेलिव्हिजनवर खेळ

जमिनीवरून चालणाऱ्या रेल्वेप्रमाणेंच जमिनीखालून जाणारी रेल्वे टोकियोमध्यें आहे. आतापर्यंत हिचा आसाकुसा ते शिबुया असा एकच २२ मैलाचा मार्ग होता; पण गेल्या मार्चमध्यें दुसरा एक नवीन १८ मैलांचा मार्ग चालू केला आहे. जपानी अंडरग्राऊंड रेल्वे लंडनच्या ट्यूबप्रमाणें अगदीं खोलावरून जात नसली तरी पॅरिसच्या मेट्राजपेक्षां हिची खोली जास्त आहे. मॉस्कोच्या अंडरग्राउंड रेल्वे-

प्रमाणें येथेंहि जमिनीखालच्या प्रत्येक स्टेशनांत वैचित्र्य आणण्याचा प्रयत्न केला आहे. गिंजा स्टेशनचे खांब गोल व चांदीचा पत्रा वर बसविल्याप्रमाणें दिसतील, तर शिबाशी येथील भिंतीसकट सर्व चौकटींत नक्षी काढलेली दिसेल. या अंडरग्राऊंड रेल्वेमध्येंहि भरपूर गर्दी असते. एकदां १५ येनचें तिकिट काढलें कीं वाटेल त्या स्टेशन-पासून निघून वाटेल त्या स्टेशनवर उतरतां येतें.

## पैसे खाण्याचे प्रकार नाहींत

जमिनीखालची रेल्वे वाहतुकीस अडथळा न करणारी, तर ट्रामची ये-जा मार्ग अडवून धरणारी. ट्रामला स्ट्रीटकार म्हणतात. या ट्रामचे मार्ग सर्व प्रमुख रस्त्यावर आहेत. ट्राममध्यें फक्त एकच कंडक्टर असतो. तो सर्वांना तिकिटें देतो. प्रवाशांनीं खरीदलेलें तिकिट रेल्वेप्रमाणें जातांना परत द्यावें लागतें. एखाद्या माणसास तिकिट काढण्यास वेळ झाला नाहीं तर तो जातांना कंडक्टरजवळ पैसे देतो. जमलेल्या सर्व पैशांचा हिशेब करून कंडक्टर त्या किमतीचीं तिकिटें फाडून पेटींत टाकतो. अप्रामाणिकपणें पैसे खिशांत घालण्याचे प्रकार येथें होत नाहींत. ट्राम कंपनीच्या रिपोर्टाकडे पाहतां असे गुन्हे केल्याचें कोठेंहि आढळत नाहीं.

## सायकल रिक्षा

प्रवासाच्या वरील सर्व साधनांव्यतिरिक्त दरिद्री परिस्थितींत कसें तरी जीव धरून असलेलें एक साधन म्हणजे सायकल रिक्षा. या मळकट रिक्षा अजूनहि टोकियोंतून इकडे तिकडे हिंडतांना दिसतात. ज्या ज्या वेळीं मी टोकियो स्टेशनसमोरील रिक्षेवाले पहात असे त्या वेळी ते गप्पा मारीत असलेले अगर पेंगत असलेले दिसत. सुधारलेल्या साधनांत रिक्षा अगदीं बेढब दिसतात. वास्तविक पूर्वींच रिक्षांना कायद्यानें बंदी होण्यास हवी होती. कारण रिक्षावाल्यांची परिस्थिति त्यांच्या फाटक्या पोषाखावरून तितकीशी समाधानकारक नसावी असे मला दिसलें.

## कामाकुराचें सृष्टिसौंदर्य

टोकिओजवळचें कामाकुरा हें शहर अनेक दृष्टीनीं प्रसिद्ध आहे- नयनमनोहर सृष्टिसौंदर्य, लांबच्या लांब समुद्रकिनारा, ऐतिहासिक स्थानें व थंड हवा या सर्व कारणांमळें कामाकुरास प्रवाशांचे लोंढेच्या लोंढे जाणें स्वाभाविक आहे. जपानमध्यें येणारा प्रत्येक प्रवासी कामाकुरास गेल्याशिवाय परत जात नाहीं.

टोकियोहून पन्नास मिनिटांचे आंत आपली गाडी स्टेशनांत येईल आणि रिकामी होईल. लोकांचे घोळक्याबरोबर आपणहि स्टेशन-बाहेर येऊं. स्टेशनचे बाहेर रिक्षा, बसेस् आणि टॅक्सीज्‌ची खेचाखेच झालेली दिसेल. आपण जरा विचार करीत उभें आहोंत तोंच निळा पोषाख घातलेली जपानी मार्गदर्शिका आपल्याजवळ येईल व विचारील, "सर, आपण कोठें जाऊं इच्छिता ?" कामाकुरामध्यें पाहण्यासारखीं ठिकाणें कोणकोणती आहेत हें आपण तिलाच विचारूं. हॉटेलमधील मुलगा पदार्थांची यादी जितकी सफाईनें म्हणून दाखवील तितक्याच सफाईनें ती आपणांस कामाकुरांतील प्रेक्षणीय स्थळांची यादी म्हणून दाखवील आणि "दाईबुत्सु इज् दी नियरेस्ट वन्. लेटम् गो देअर फर्स्ट !" हें वाक्य संपण्यापूर्वींच ती दाईबुत्सूच्या दिशेनें चालूं लागलेली दिसेल.

## 'दाईबुत्सु'

'दाईबुत्सु' या जपानी शब्दाचा अर्थ 'मोठा बुद्ध' असा आहे. बुद्धास बुत्सुप्रमाणें बुत्सुदा, होतोके, होतोकेसामा असेंहि संबोधतात. कामाकुरांतील हा बुद्ध जपानमध्यें प्रसिद्ध आहे. उघड्यावर उन्हा-पावसांत ध्यानस्थ बसलेल्या या बुद्धाच्या स्थापनेची हकिकत मोठी मनोरंजक आहे.

११९५ सालीं नारा येथें बुद्धाची एक प्रचंड मूर्ति स्थापण्याचा समारंभ चालला होता. या समारंभास कामाकुरा येथील अधिपति मिनामोतो–नो–योरीतोमो हजर होता. सर्व समारंभ पाहून तो इतका मुग्ध झाला की असली एकादी बुद्धाची प्रतिमा कामाकुरा

येथें स्थापन करावी असे विचार त्याच्या मनांत सारखे येऊं लागले. परंतु मिनामोतो लवकरच मरण पावला. त्याची ही इच्छा पुरी होऊं शकली नाहीं.

मिनामोतोची अपुरी इच्छा पूर्ण करण्यास त्याची एक स्त्री नोकर इदानो पुढें आली. तिनें फंड उभारण्याचें ठरविलें. सदर फंडास सबंध देशांतील लोकांनीं सहाय्य केलें. फंड जमविण्याचें काम १२३८ मध्यें पूर्ण झाल्यावर तावडतोब बुद्धाची लाकडी मूर्ति बनविण्यास सुरुवात झाली. मूर्ति तयार करण्याचें काम पांच वर्षें चाललें होतें. १२४३ मध्यें मूर्ति तयार झाली. परंतु पुढें दोन वर्षानंतर एक मोठें वादळ झालें व त्यांत ती मोडून गेली.

## प्राचीन मूर्ति

त्या वेळचे अधिपति फुजीवारा यांना लाकडी मूर्ति मोडल्याचें समजलें तेव्हां त्यांनीं ब्रान्झ धातूची दुसरी मूर्ति तयार करण्यास सांगितलें. अधिपतींनीं फक्त मूर्तीस लागणारें ब्रांझ दिलें; पण मजुरीस भरपूर पैसा लागणार होता त्याचें काय ? परत इदानो व एक साधु जोको यांनीं प्रयत्न करून पैसा जमविला. १२५५ सालीं ब्रांझचा मोठा थोरला बुद्ध पुतळा तयार झाला आणि आज ७०० वर्षानंतरसुद्धां ती मूर्ति जशीच्या तशीच उभी आहे.

आज ही प्रतिमा उघडी दिसत असली तरी पूर्वी ती तशी बनविली नव्हती. तिच्यावर मंडप बांधण्याचा चार वेळां प्रयत्न झाला; पण प्रत्येक वेळीं वादळें व भूकंपामुळें मंडप पडला. लोकांची अशी समजूत झाली कीं या बुद्धास देवळांत रहाणें आवडत नसावें व म्हणूनच त्यावर मंडप टिकत नाहीं. ही समजूत इतकी दृढ झाली कीं १४९५ नंतर त्यावर कोणी छप्पर बांधण्याचा प्रयत्न केला नाहीं.

## प्रतिमेवर सोन्याचा पत्रा

ही बुद्धाची प्रतिमा म्हणजे कलेचा एक उत्कृष्ट नमुना समजला जातो. पूर्वी या प्रतिमेच्या सर्वांगावर सोन्याचा पत्रा होता; पण तो

काढून टाकण्यांत आला व सध्यां मूर्तीचे गालावर थोडा सोन्याचा पत्रा पहावयास सांपडतो. या बुद्धाच्या कपाळावर गंध आहे. तें चांदीचें आहे. गंध गोळीची उंची सहा इंच आहे.

बुद्धाचे मूर्तीकडे नीट न्याहाळून पाहिल्यास तिच्यांत तीन देशांतील कलांचा संगम दिसून येतो. भारतीय, ग्रीक व जपानी अशा या तीन कला होत. प्रथम आपण भारतीय कला कशांत दिसते तें पाहूं (१) केशरचना, केसांचा कुरळेपणा (२) ध्यानस्थ बसण्याची पद्धत (३) मोठे आणि लांबट कान (४) आगठ्यामधील पूर्णता दाखविणारीं वर्तुळें (५) कपाळावरील गंध वगैरे गोष्टी भारतीय कलेच्या द्योतक होत. ग्रीक कलेची जाणीव करून देणाऱ्या पुढील गोष्टी आहेत– (१) अर्धवर्तुळाकार भुवया (२) जमिनीस समांतर दृष्टि (३) नाकाची कपाळापासून होणारी सुरवात (४) बारीक व लांब मिशा (५) चेहऱ्यावरील प्रसन्न हास्य.

वरील दोन्ही कलांव्यतिरिक्त जपानी कलेचा नमुना म्हणून पुढील गोष्टी दाखवितां येतील. (१) पुढें झुकलेलें डोकें, डोळ्यांची ठेवण (२) शरीराचे कमरेखालचे भागाचे मानानें वरील भाग मोठा.

## बुद्धाच्या मूर्तींत छोटा बुद्ध

बुद्धाचे प्रतिमेशेजारीं एका बोर्डावर बुद्धाचें वजन, उंची वगैरे माहिती लिहिली आहे. ती पुढीलप्रमाणें आहे. उंची ४२ फूट ३ इंच, पायाचा परीघ ९६ फूट ५। इंच, डोक्यावरील केसांचीं वर्तुळें ६५६, मूर्तीचें वजन ९२। टन, चेहऱ्याची लांबी ७ फूट ८ इंच, तोंडाची लांबी २ फूट ९। इंच.

बुद्धाची प्रतिमा पोकळ असल्यामुळे प्रतिमेच्या आंत जातां येतें. मी दहा येनचें तिकिट काढून जेव्हां आंत गेलों तेव्हां प्रतिमेच्या भव्यतेची खरी कल्पना आली. आंतमध्यें छोटें देऊळ आहे व देवळांत एक लहान बुद्धाची प्रतिमा आहे १८ पायऱ्यांचे दोन जिने आहेत. या जिन्यांनीं अगदीं डोक्याजवळ जातां येतें. आंत शुद्ध हवा येण्याकरतां बुद्धाचे पाठीस दोन खिडक्या ठेवल्या आहेत.

प्रतिमेच्या चारहि बाजूस दूरवर झाडी पसरली आहे. या झाडींत प्रवाशांना बसण्याकरितां बाकें आहेत.

बुद्धाचे आवाराचे बाहेर येतांच शेंकडों दुकानें पाहण्यास सांपडतात. या दुकानांतून चैनीच्या वस्तू, बुद्धाच्या प्रतिमा, चित्रें व खाद्यपेयें मिळतात. थोडें अंतर चालून जातों न जातों तोंच हाचिमान श्राईनची कमान दृष्टीस पडते.

## जुने कपडे आणि देवाचे मुखवटे

हाचिमान श्राईन हें जुन्यापैकीं एक ठिकाण आहे. येथें अनेक भाविक येऊन टाळ्या वाजवून नमस्कार करून जातात. या श्राईनचे बाजूस दोन संग्रहालयें आहेत. एकांत पूर्वापार चालत आलेल्या पालख्या ( मिकोशी ) आहेत. त्याचप्रमाणें जुने कपडे आणि देवाचे मुखवटेहि पहाण्यास सांपडतात. दुसरें म्युझियम जरा दूर आहे. या म्युझियममध्यें चित्रें, धातूंच्या प्रतिमा व दागिने आहेत.

हाचिमान श्राईनचे जवळ अनेक मजेशीर गोष्टी पहावयास सांपडतील. आपणाकडे पाखरांकडून भविष्य सांगणारे ज्योतिषी असतात; तशा प्रकारचे अनेक ज्योतिषी आहेत. जपानी भाषेंत भविष्य तर सांगितलें जातेंच, पण इंग्लिश भाषेंतसुद्धां सांगण्याची सोय या ज्योतिष्यांनीं केलेली असते. त्याचप्रमाणें हात पाहूनहि भविष्य सांगणारे लोक आहेत. हे ज्योतिषी पुरुष असो वा स्त्री असो, फक्त डावा हात पाहून भविष्य सांगतात. रात्रीचे वेळीं भविष्य सांगणारे निराळे लोक आहेत. त्यांचे जवळ बॅटरी असते. बॅटरीचा उजेड डोळ्यांत, कानांत व तोंडांत पाडून हे लोक भविष्य सांगतात. युरोपियन लोकांप्रमाणें जपानी लोकांना भविष्य जाणून घेण्याचा नाद आहे आणि म्हणूनच ओसाका येथें तीन हिंदी ज्योतिषी आरामांत राहिलेले दिसतात.

## लग्न जमवून देणारीं झाडें

या भविष्याप्रमाणें श्राईनजवळ आणखी एक मजेशीर गोष्ट दिसते. आजूबाजूच्या सर्व झाडांस पांढऱ्या कागदाच्या चिठ्या बांधलेल्या

आहेत. देवाच्या दारचीं हीं झाडें तरुण–तरुणींना आवडतीं आहेत. कारण, ज्या तरुणास अगर तरुणीस आपलें लग्न मनांत असलेल्या व्यक्तीशीं व्हावें असें वाटतें ते लोक श्राईनमध्यें मिळणाऱ्या कोऱ्या चिठ्ठ्या घेतात, त्यावर स्वतःचें व प्रिय व्यक्तीचें नांव लिहितात व चिठ्ठी फांदीस बांधतात. देवाच्या दारचीं हीं झाडें इंच्छित व्यक्तीशीं लग्न जमवून देतात अशी समजूत आहे.

## व्हिजिटिंग कार्डाची जरूरी

प्रत्येक देशामध्यें परदेशी प्रवाशाच्या चटकन् लक्षांत येतील अशा कांहीं ना कांहीं गोष्टी असतात. जपानमध्यें तर अशा अनेक गोष्टी आहेत. अगदीं प्रथम माझे लक्षांत आलेली गोष्ट म्हणजे व्हिजिटिंग कार्डाची. स्वतःच्या नांवाचें कार्ड अदलाबदल करण्याची पद्धत होय. योकोहामा बंदरांत आमची बोट पोचतांच कांहीं बातमीदार आंत आले- बोटींतील प्रवाशांची यादी अगोदरच पुढें जात असल्यामुळें बोटींत कोण कोण प्रवासी आहेत याची त्यांना कल्पना असते. कांही बातमी-दार माझा तपास काढीत आले. औपचारिक ओळख होतांच प्रत्येकानें मला एकेक व्हिजिटिंग कार्ड दिलें. हें व्हिजिटिंग कार्ड शेकहॅंड करण्यापूर्वी दिलें जाई. शेवटीं मी माझें कार्ड त्यांना दिलें. जपानमध्यें प्रत्येकाजवळ व्हिजिटिंग कार्डस् असतात व ज्या वेळीं तो नवीन माणसाला भेटतो त्या वेळीं प्रथम व्हिजिटिंग कार्ड देऊन नंतर अभिवादन करतो. व्हिजिटिंग कार्ड बरोबर न घेतां घराबाहेर पडणें योग्य समजलें जात नाहीं.

## एकत्र बसून खात नाहींत

जपानी लोकांत आणखी एक नाविन्यपूर्ण पद्धत दिसते. इंग्लंड-मधील लोक आइस्क्रीम, फळें, चॉकोलेट्स वगैरे पदार्थ रस्त्यानें खात जातांना दिसतात, पण जपानी मनुष्य मात्र कोणताहि पदार्थ रस्त्यानें खातांना दिसणार नाहीं; गाडींतील लांबच्या प्रवासांतसुद्धां जें कांहीं खावयाचें असेल तें अगदीं लपवून, कोणास दिसणार नाहीं अशा बेतानें खाल्लें जातें. ट्रीपकरितां एकत्र गेलेले विद्यार्थी [illegible]

अनुक्रम ... दि:

पदार्थ एकत्र बसून खात नाहींत. आजूबाजूस वेगवेगळ्या ठिकाणीं बसून विद्यार्थी फराळ करतात. अशा तऱ्हेनें ट्रीपच्या वेळीं पदार्थ खाण्याची पद्धत असली तरी हॉटेलमध्यें मात्र सर्वजण एकत्र बसून हलक्या आवाजांत गप्पा मारीत भोजन करतांना दिसतात.

## कोठेंहि गोंगाट नाहीं

हलक्या आवाजांत बोलणें हें सुद्धां जपानी लोकांचें वैशिष्टच आहे. कोठेंहि जा, लोकांचा गोंगाट ऐकूं येणार नाहीं. रेल्वेच्या डब्यांत, वेटिंग रूममध्यें, इतकेंच काय, पण भाजी मंडईसारख्या ठिकाणीहि संपूर्ण शांतता असते. विनाकारण कोणाची कोणी चौकशी करणार नाहीं आणि अकारण गप्पा मारणार नाहीं. वर्तमानपत्रवाचन अगर विचार करीत बसणें हें जपानी लोकांना आवडत असावें असें दिसतें. जी गोष्ट शहरी लोकांची तीच खेडुतांबद्दलहि सांगतां येईल.

## वधूच्या डोक्याला शिंगें फुटतात

आपल्याकडे लग्नसमारंभांत डोक्यावर झाल धरण्याची प्रथा आहे. ही झाल कां धरली जाते, प्रथम कोणी धरली व केव्हां धरली याची सर्वसामान्य माणसास माहिती नसते; पण ही रूढी पूर्वापार चालत आलेली आहे, तेव्हां ती बिनबोभाट पार पडलीच पाहिजे असें वडिलधारी माणसें म्हणतात व तें सामान्यतः सर्वजण मान्य करतात. अशा तऱ्हेच्या कांहीं रूढी जपानमध्येंहि आहेत. जपानच काय, पण जगांतील कोणताहि देश त्यास अपवाद असूं शकणार नाहीं, असें जगांत निरनिराळ्या देशांत केलेल्या प्रवासावरून माझें मन झालें आहे.

जपानमध्यें अगदीं प्रथम मला जी रूढी पाहण्यास सांपडली ती म्हणजे ' त्सुनो काकुशी. ' त्सुनो काकुशी याचा अर्थ, ' शिंगें झाकण्याचें कापड. ' हें तांबडें पांढरें रेशमी लांबट कापड लग्नाच्या वेळीं वधूच्या डोक्यास बांधलें जातें. या रूढीचा इतिहास मनोरंजक आहे.

जपानमध्यें मत्सरी स्त्री अगदीं हीन समजली जाते. जेव्हां स्त्रीच्या मनांत मत्सरी भावना उत्पन्न होते तेव्हां तिला दोन शिंगें येतात.


# जपानी समाज—जीवनांतील कांहीं दृश्यें



नाकावर पट्टी बांधून धावण्याची ही शर्यत नव्हे. सर्दी, पडसें झाल्या-वर त्याचा इतरांना उपद्रव पोंचूं नये म्हणून जपानी नागरिक वरील उपयुक्त पद्धति अवलंबितो.



आपल्या मुलांना पाठीवर वाहून नेण्याची जपानमधील ही अभिनव पध्दति परदेशी प्रवाशांचें लक्ष वेधून घेते.



लाकडाच्या ठोकळ्यांचा उशीसारखा उपयोग कसा केला जातो हें वरील चित्रांत दिसून येईल.



एकमेकांसमोर मस्तक नमवून अभिवादन करण्याची ही जपानी पध्दति नाविन्यपूर्ण आहे यांत शंका नाहीं.

अशी समजूत आहे. अशीं शिंगें ऐन लग्नाच्या वेळीं आल्यास सर्व लोकांना तीं दिसतील व मुलीशीं कोणी लग्न करणार नाहीं; तेव्हां शिंगें आलीं तरी लोकांस दिसूं नयेत म्हणून हें कापड बांधलें जातें.

डोक्यास फडकें बांधण्याची प्रथा इक्को पंथीय स्त्रियांकडून आली. या स्त्रिया देवळांत जातांना टोप्या घालून जात. द्वेष भावनेचें निर्मूलन करण्यास बुद्धास विनवीत. पुढें अशा टोप्या स्त्रियांना गैरसोईच्या वाटूं लागल्या व त्यांनीं फडकीं बांधण्यास सुरुवात केली. पुढें ही प्रथा लग्नसमारंभांत रूढ झाली व आज अनेक वर्षे ती तशीच चालूं आहे.

## कुत्र्याच्या पिलाची भेट

त्सुनो काकुशीप्रमाणेंच आणखी एक मजेशीर प्रथा आहे. ज्या वेळीं लहान मुलास प्रथम देवदर्शनास नेलें जातें त्या वेळीं जवळचे नातेवाईक त्या मुलाला लाकडाचीं व मातीचीं कुत्र्याचीं पिलें देणगीदाखल देतात. अशी देणगी देण्याचें कारण म्हणजे तीं गुबगुबीत, चपळ व लवकर वाढणारीं असतात. कुत्र्यांच्या पिलांप्रमाणें मुलानें गुबगुबीत राहून लवकर मोठें व्हावें हा त्यामागील हेतु आहे.

जपानमध्यें लहान मुलाच्या बाळशास कुत्र्याच्या पिलाची उपमा देण्याची प्रथा आहे. 'तुमचा मुलगा किनई अगदीं कुत्र्याच्या पिलाप्रमाणें आहे हं.' अशा तऱ्हेचा वाक्प्रचार जपानी लोक अनेकदां उच्चारतात.

कुत्र्याचीं पिलें देणगी देण्याची प्रथा आठव्या शतकांत रूढ झाल्याचें एका प्राध्यापकांनीं सांगितलें. त्या वेळीं महाराणी कोम्पीनें हिनें एक कुत्र्याचें पिलु प्रथम देणगीदाखल दिलें. त्या वेळेपासून ही प्रथा रूढ झाली. ज्या वेळीं वधू प्रथम सासरीं जाते त्या वेळींहि तिला कुत्र्याच्या पिलाचा मुखवटा असलेला करंडा दिला जातो. तो कशाकरतां दिला जात असेल हें सहज समजण्यासारखें आहे.

## उपरणें नव्हे, हातरुमाल

जगांतील सर्व लोक हातरुमाल वापरीत असले तरी, जपानी

लोकांची हातरुमाल वापरण्याची प्रथा सर्वापेक्षां वेगळीच. या रुमालास जपानी लोक ' फुरोशीकी ' म्हणतात. फुरोशीकीचा आकार एक चौरस फुटापासून तों दहा चौरस फुटापर्यंत असू शकतो. प्रत्येक घराण्यांत फुरोशीकीचे रंग निरनिराळे देण्याची प्रथा ठरून गेलेली आहे.

जपानी माणूस घराबाहेर पडतांना फुरोशीकी बरोबर नेण्यास तो विसरणार नाहीं. बाजारांतील सर्व प्रकारची खरेदी ह्या रुमालांतून बांधून आणण्याची प्रथा आहे. विद्यार्थी आपलीं पुस्तकें, गृहिणी मंडईंतील भाजी, पुरुष ऑफिसमधील कागद वगैरे सर्व कांहीं फुरोशीकींत बांधून आणतात.

## मनाची जागा पोटानें घेतली

जातां जातां जपानी भाषेंत पोटास (हारा) कसा विचित्र अर्थ प्राप्त झाला आहे हें पाहूं. आपण हुषार माणसास तीव्र बुद्धीचा म्हणतों. त्याचप्रमाणें मंदबुद्धी, निर्बुद्ध वगैरे शब्दहि प्रचारांत आहेत. पण जपानी भाषेंत बुद्धीस महत्त्व नसून पोटास महत्त्व दिलें जातें. हारानो हिचो (पोट असलेला माणूस) म्हणजे धैर्यवान, ताकतवान असा अर्थ आहे. हारागा ओकीई (मोठ्या पोटाचा) याचा अर्थ ढेरपोटचा मनुष्य नसून मोठ्या मनाचा मनुष्य असा आहे. कीरेइना हारा (स्वच्छ पोटाचा) म्हणजे शुद्ध मनाचा मनुष्य. त्याचप्रमाणें हारागा नाई (पोट नसलेला) नेभळट मनुष्य दर्शविला जातो. वरील शब्दाशिवाय वाचकांच्या परिचयाचा एक शब्द आहे. तो म्हणजे ' हाराकिरी. ' तसें पाहिलें तर हाराकिरीचा शब्दशः अर्थ पोट कापणें असा आहे.पण प्रचलित अर्थ स्वतःचे हातानें स्वतःचें पोट फाडून घेऊन मरून जाणें हा आहे.

अपण जपानी रूढी व पोटास प्राप्त झालेला विचित्र अर्थ पाहिला. ह्यानंतर जपानी लोक कांहीं नाविन्यपूर्ण भस्में आजार बरे करण्याकरतां वापरतात तीं पाहूं.

## जपानी भस्में

जपानमध्यें सर्वत्र 'कुरोयाकिया' नांवाचीं दुकानें दिसतात. हीं दुकानें म्हणजेच भस्माचीं दुकानें होत. आजारावर निरनिराळीं भस्में देण्याची प्रथा चीनमधून जपानमध्यें आली.

प्राणी अगर फळें जाळल्यानंतर त्यांच्या राखेंत एक प्रकारचा औषधी गुण उत्पन्न होतो असें या शास्त्रांत मानलें जातें. उदाहरणार्थ बगळ्याच्या पायाचें भस्म लहान मुलांच्या डांग्या खोकल्यावर अत्यंत गुणकारी समजलें जातें. कावळ्याचें भस्म हिस्टेरिया बरा करतें, तर सफरचंदाचें भस्म बेरीबेरी रोग घालवितें. थंडी–पडसें बरें करण्यास मोसंब्याचें भस्म गुणकारी मानलें जातें. क्षयासारख्या भयंकर रोगावर नागाचें भस्म खाण्यास देतात. त्याचप्रमाणें चिमणीचें अगर कबूतराचें भस्म दमा बरा करू शकतें. माकडाच्या मेंदूचें भस्म संधीवातावर दिलें जातें. ही पद्धत कितपत शास्त्रीय आहे व तिचा प्रत्यक्ष गुण किती येतो हें मात्र सांगतां येणार नाहीं. तरी पण जपानमध्यें सध्यां तीं प्रचलित आहेत व कांहीं लोक त्यांचा उपयोगहि करीत असतात एवढें खरें.

## अंगांत सुया खुपसतात

औषधावरून आठवण झाली म्हणून एका खास जपानी उपचार-पद्धतिविषयीं सांगतों. ही पद्धति शहर आणि खेडीं दोन्ही ठिकाणीं फार प्रसिद्ध आहे. तिचें नांव 'हारी–योजी' (Hari–Ryoji) हारीऱ्योजी याचा अर्थ शरीरांत सुया खपसण्याची पद्धति. शरीरांत निरनिराळ्या ६६० ठिकाणीं सुया खुपसतां येतात. ही पद्धति अंग दुखणें, संधिवात, क्षय, अर्धांगवायु वगैरे दुखण्यावर फार परिणाम-कारक ठरते, असें सांगण्यांत आलें. सुयांना कोणत्याहि प्रकारचें औषध लावलें जात नाही.

या उपचाराचें शास्त्रीय शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था आहेत. या संस्थांत शिक्षण घेतलेल्या 'हारी-इ' या क्षेत्रांत तज्ज्ञ समजला जातो. शरीरांत खुपसल्या जाणाऱ्या सुयांचे दहा प्रकार आहेत. हे प्रकार

सुयांची जाडी व लांबी यावरून ठरविले आहेत. सुयांची लांबी एक इंचापासून तीन इंचापर्यंत असू शकते. सुया, सोनें, चांदी व प्लॅटीनमच्या असतात.

शरीरांत सुया खुपसण्याचे तीन प्रकार आहेत. पहिल्या प्रकारांत ज्या ठिकाणीं सुई खुपसावयाची असेल तेथें एक पोकळ नळी ठेवली जाते. नळीच्या मधोमध सुई ठेवून अंगठ्यानें आंत दाबावी लागते. दुसऱ्या प्रकारांत बाजूच्या नळीची अजिबात जरुरी लागत नाहीं. दुःखाचे जागीं सुई ठेवावयाची व अंगठ्यानें आंत दाबावयाची कीं झालें. तिसरा प्रकार मात्र निराळा आहे. सुया खुपसणाऱ्या माणसाजवळ एक लहानसा हातोडा असतो. दुःखाचे जागीं सुई ठेवून हातोडीनें ठोकून ती आंत खुपसली जाते. ही पद्धत जितकी वाटते तितकी भयंकर नाहीं. सुया आंत जातांना मुळींसुद्धां त्रास होत नाहीं. अशा तऱ्हेचे उपचार करणाऱ्या लोकांजवळ सरकारनें परीक्षा घेऊन लायसेन्स दिलेलीं असतात.

## खेळाकडे विशेष लक्ष पुरवितात

खेळाकडे नुसती करमणूक म्हणून न पाहतां त्याचा फायदा राष्ट्रीय आरोग्यवाढीस कसा करून घेतां येईल याकडे जपानमध्यें जास्त लक्ष दिलें जातें आणि म्हणूनच युरोप-अमेरिकेप्रमाणें जपानमध्यें खेळांची जोपासना अगदीं काळजीपूर्वक केली जाते. सतत वर्षभर चाललेल्या चढाओढी व त्यांना होणारी अफाट गर्दी पाहिली कीं जपानी लोकांच्या खेळाबद्दलच्या आवडीचें कौतुक करावें तेवढें कमी पडेल असें वाटतें.

जपानमध्यें अनेक प्रकारचे खेळ खेळले जातात. त्यांच्या राष्ट्रीय खेळांप्रमाणेंच पाश्चिमात्य खेळांचीहि भर मोठ्या प्रमाणांत पडली आहे. इतकेंच नव्हे तर, कांहीं खेळांत जपानी खेळाडूंनीं अनेक जागतिक विक्रम केले आहेत. गेल्या कांहीं वर्षांत टेलिव्हिजनच्या शोधामुळें खेळाचें लोण अगदीं घरोघर पोहचलें आहे.

## बेसबॉलला कमालीची लोकप्रियता

जिकडे तिकडे दिसून येणारा खेळ म्हणजे बेसबॉल. अमेरिकेच्या खालोखाल बेसबॉलमध्यें जपानचा नंबर लागतो. अगदीं शाळकरी

मुलापासून तों झाडूवाल्यापर्यंत सर्वांना या खेळाची आवड आहे. साधा मजूरसुद्धां दुपारीं एक तासाची सुट्टी मिळते त्या वेळांत आपल्या मित्राबरोबर बेसबॉलचा चेंडू खेळतांना दिसेल. लहान मुलांना खाऊ-ऐवजीं अगर एखाद्या यांत्रिक खेळण्याऐवजीं आपण बेसबॉलचा चेंडू, ग्लोज किंवा बॅट (दंड) बक्षीस दिली तर त्याला इतका आनंद होतो कीं कांहीं विचारूं नका. गांवांत होणाऱ्या बेसबॉल सामन्याचें वृत्त ऐकण्याकरितां आपल्याकडे क्रिकेट वृत्त ऐकण्यास गर्दी होते तशी येथें होते. टेलिव्हिजनच्या सेटवर माणसांची इतकी खेचाखेच झालेली असते कीं एका सेटवर २०० ते ५०० माणसें मॅच पाहतांना दिसतात. गेल्या मेमध्यें 'निप्पोन टाईम्स' च्या टेलिव्हिजन सेटवर पंधराशें लोकांनीं एकाच वेळीं कार्यक्रम पाहून जागतिक विक्रम प्रस्थापित केला.

## जुजुत्सू खेळाची सर्वत्र आवड

जपानचा 'जुजुत्सु' किंवा 'जुडो' खेळ जगप्रसिद्ध आहे. आपल्या-पेक्षां ताकदीनें भारी असलेल्या माणसास त्याची ताकद त्यालाच मारक बनवून जमीनदोस्त करणें हें मुख्य तत्त्व या कलेंत आहे. जपानी 'जुजुत्सू' प्रवीणांची एक तुकडी तीन वर्षांपूर्वी पॅरीसला खास आमंत्रणा-वरून गेली होती. त्यांचें कौशल्य पाहून फ्रेंचांनीं या कलेची वाढ त्यांच्या देशांत करण्याचें ठरवून 'जुजुत्सू हॉल' बांधले. आज फ्रान्समध्यें या हॉलची संख्या शंभराचे वर आहे.

जपानमधील सर्वांत प्रसिद्ध हॉल 'कोदाकान.' हा टोकियोंत आहे. जपानमधील हॉलची जमीन पेन्ढ्यापासून तयार केलेल्या चटयांची आहे. हॉलमधून अमेरिकन स्त्री-पुरुषहि 'जुजुत्सु' चें शिक्षण घेतांना दिसतात.

## जपानी कुस्त्यांचे प्रचंड सामने

'जुजुत्सु' हें जसें वैशिष्टय तसें 'सूमो' किंवा जपानी कुस्तीचें सुद्धा वैशिष्टय आहे. सुमीदा नदीच्या कांठीं असलेल्या 'कोकूगीकान' ह्यॉलमध्यें या कुस्त्या वर्षांतून दोन वेळां होतात. वर्षांतून या कुस्त्यांचे सामने तीन वेळां भरतात दोन वेळा टोकिओत व एकदां ओसाका-

मध्यें. सामने प्रत्येक वेळीं १५ दिवस चालतात. रोज सकाळीं नऊला सुरू होऊन सायंकाळीं सहा वाजतां ते संपतात. वरील हॉलमध्यें १६००० लोक बसण्याची सोय आहे.

एका रविवारीं मी माझ्या मित्रांबरोबर कुस्त्या पाहण्यास गेलों. आम्ही सकाळीं साडेआठ वाजतां घरून निघालों. जातांना जेवणाचे डबे, पाण्याचें भांडें व चहाचा थर्मास बरोबर घेतला होता. रोग्यूकू स्टेशनवर उतरतांच आमच्याप्रमाणेंच शेकडों लोक कुस्त्यांचे हॉल-कडे जातांना दिसले. मधून अधून कांहीं पैलवानहि तिकडे जातांना दिसले होते. जपानी पैलवानांचें सर्वच कांहीं विचित्र. डोक्यावर शीखांसारखे बांधलेले केस, मात्र दाढी घोटून केलेली. उंची सहा फुटाचे आसपास. पोटाचा ढोल व अंगांत 'युकाता' (चौकटीचा किमोनो). हा सँडो दुरून पाहिल्यास एखाद्या जाड्या बाईप्रमाणें वाटतो. मध्यंतरीं रशियन खेळाडूंची एक तुकडी जपानमध्यें आली होती. त्या लोकांनीं आपल्या डायरीत "आज जाड्याजुड्या व ताकतवान जपानी बायका पाहिल्या" असा मजकूर लिहून ठेवला. पण जेव्हां खरी माहिती समजली तेव्हां त्यांना इतका आनंद झाला कीं कुस्त्यांचे हॉलमध्यें जाऊन ते सँडोंना कडकडून भेटले.

## झोपून कुस्त्या पहाण्याची सोय

मला वाटत होतें, प्रेक्षकांना बसण्यास हॉलमध्यें खुर्च्या असतील; पण आंत जातांच अगदीं निराळी परिस्थिति दिसली. प्रत्येक माण-सास नुसतें बसण्यासच नव्हे, तर झोपून कुस्त्या पहाण्याची सोय होती. चटईवर बसण्यापूर्वीं बूट काढून बसावें लागतें. एकदां मनुष्य आंत आला कीं सायंकाळीं सहा वाजेपर्यंत तेथेंच असतो. जेवणखाण बसल्या जागेवरच करावयाचें असतें.

कुस्ती ज्या जागेवर खेळली जाते तो चौकोनी उंचवटा बारीक वाळूचा तयार केलेला असतो. चौकोनामध्यें १५ फूट व्यासाचें वर्तुळ असतें. या वर्तुळांत कुस्त्या होतात.

## चार मिनिटें सलामीनंतर कुस्ती

कुस्त्या सुरू होण्यापूर्वी दोन्ही बाजूचे सर्व पैलवान रंगीबेरंगी कापड कमरेभोंवती गुंडाळून वर्तुळांत येतात व वंदन करतात. नंतर एक मनुष्य लाकडाचे दोन ठोकळे आपटून आवाज काढतो. पैलवानांचीं नांवें पुकारणारा मनुष्य येऊन हातांतील पंखा उघडून नांवें पुकारतो. सँडो येतांच पांच पंचापैकीं मुख्य पंच एक लाकडी चौकोनी छोटी बॅग घेऊन येतो व ती तोंडासमोर जमिनीस समांतर धरून आरोळी मारतो. सँडो वर्तुळाच्या बाहेर ठेवलेल्या पाण्यानें चूळ भरतात व हातांत मीठ घेऊन तें वर्तुळांत फेकतात. तंगड्या वर करून, जमिनीवर हात टेकून, टाळ्या वाजवून अशा निरनिराळ्या सलाम्या दिल्या जातात. सलाम्या चार मिनिटें चालतात व पांचव्या मिनिटास कुस्ती सुरू होते. ज्या पैलवानाचा तळपायाव्यतिरिक्त कोणताहि भाग जमिनीस लागेल तो हरला असें समजतात आणि जो सँडो वर्तुळाचे बाहेर जाईल तो पराजित होतो. वर्तुळांत मीठ फेकण्याचें कारण म्हणजे त्यानें वर्तुळ शुद्ध होतें. बेसबॉलप्रमाणें या कुस्त्यासुद्धां टेलिव्हिजनवर प्रक्षेपित केल्या जातात.

## लाकडी जमिनीवर ‘ कांदो ’ खेळ

जपानचा आणखी एक खेळ पूर्वापार चालत आलेला आहे. त्याला ‘ कांदो ’ म्हणतात. हा खेळ आपल्याकडील लाठीछूटप्रमाणें आहे. सध्याच्या यांत्रिक युगात तलवारीचा उपयोग होत नसला तरी मन व शरीर चांगलें तयार करण्याकडे या कलेचा चांगला उपयोग होतो असें शास्त्रज्ञांचें मत आहे. प्रॅक्टिस करणारे लोक डोक्यावर शिरस्त्राण घालतात. ज्या हॉलमध्यें सराव केला जातो तेथील जमीन लाकडी असते.

एके काळीं सर्वत्र प्रसिद्ध असलेला व हल्ली नष्ट होत चाललेला खेळ म्हणजे धनुर्विद्या होय. जपानची धनुर्विद्या प्रसिद्ध होती. पण हल्लीं क्वचित् ठिकाणीच ती चालू दिसते.

सध्यां जपानी लोकांना गोल्फ आवडूं लागला आहे. जपानमध्यें

१९१० सालीं प्रथम गोल्फ खेळला गेला. गोल्फचीं एकूण तीस मैदानें आहेत. बहुतेक मैदानांत प्रत्येकीं १८ भोकें आहेत. त्यांतल्या त्यांत हा खेळ श्रीमंत लोक खेळतात.

## हंगामी खेळाकडेहि वाढता कल

वरील नेहमीच्या खेळाव्यतिरिक्त ऋतुपरत्वें खेळले जाणारे अनेक खेळ आहेत. जपानमधील हिंवाळा फारच कडक. सर्वत्र बर्फ पडलेला असतो. या दिवसांतील खेळ म्हणजे 'स्केटिंग' होय. खांद्यावर 'स्कीज' टाकून लोकांचे तांडेच्या तांडे पर्वतावर जातात व घसरत पायथ्याशीं येतात. ओसाकाचे एक हिंदी कापड व्यापारी स्केटिंगचे खेळांत प्रसिद्ध आहेत.

हिवाळ्याप्रमाणें उन्हाळ्यांत पर्वत चढणारे बरेच लोक आहेत. त्यांतल्या त्यांत माऊंट फुजी ( फुजीयामा किंवा फुजीसान ) हा लोकांचा अत्यंत आवडता पर्वत आहे. चैनीकरतांच नव्हे, तर धार्मिक भावनेनें त्यावर चढतात. पर्वतावर जाण्याचा काल वर्षांतून फक्त दोन महिने असतो. (१ जुलै ते ३१ ऑगस्ट). या दोन महिन्यांत हजारों प्रवासी वर जाऊन येतात. पर्वतावर जाण्यास सहा रस्ते आहेत. पर्वताचे अर्ध्या उंचीवर बस जाते व तेथून पायीं चालत जावें लागतें. पर्वताची उंची १२,३९७ फूट आहे. दरवर्षीं पर्वत चढणारे कांहीं प्रवासी आहेत. त्यांचे कपड्यावर अनेक छाप पाहण्यास सांपडतात. हातांत काठ्या घेऊन गाणीं गात गात हे लोक पर्वत चढतात. पर्वताचे चढणीवर दगडी झोपड्या आहेत. त्यांतून रहाण्या-जेवण्याची व झोपण्याची सोय केलेली असते.

पूर्वीं या पर्वतावर जाण्यास स्त्रियांस बंदी होती; पण इ. स. १८०० पासून परवानगी देण्यांत आली.

## जपानचा निरोप घेतला

संपला जपानचा प्रवास. साडेतीन महिन्यांच्या जपानमधील वास्तव्यांत अनेक नवीन प्रयोग शिकण्याला मिळाले. जपानी मित्रांच्या घरीं रहावें लागल्यामुळें त्यांचें जीवन जवळून पाहतां आलें. परंतु

जपाननंतर अमेरिकेला जाण्याचा हेतु मात्र सफल होऊं शकला नाहीं. डॉलर मिळण्याची अडचण पडली. काळ्या बाजारांत भरमसाट किंमत देऊन डॉलर खरेदी करणें माझ्या आवाक्याबाहेर होतें. अमेरिकन बेसमेंटस्‌मधून जो पगार मिळे त्याचा हिशोब डॉलरमधून होई. पण प्रत्यक्ष चेक येनचा मिळे. या अडचणीमुळें पुढें न जातां मलाया व ब्रह्मदेश या देशांत प्रवास करण्याचें ठरवून मी माझ्या जपानी मित्रांना 'सायोनारा' (बाय बाय) म्हटलें.

परत येतांना ब्रह्मदेशाजवळ एक मोठें वादळ लागलें. बोटीच्या दोन्ही बाजूला टेकडीप्रमाणें लाटा उभ्या रहात. अशा प्रसंगीं किनाऱ्यावर बोट नेणें धोक्याचें असतें. शिवाय मशीन बंद करून एका जाग्यावर उभें राहूनहि चालत नाहीं. बाजूचा खवळलेला समुद्र पाहून कॅप्टननें बोट मैलाच्या परिसरांत गोल फिरविण्याला सुरुवात केली. वादळ शांत झाल्यावर बोटीचा मुक्काम चार दिवस रंगूनला होता. रंगूनमध्यें आपल्या हिंदी लोकांच्याकडे माझे सहा कार्यक्रम झाले. जपानहून परत येण्यास लागणाऱ्या खर्चाच्या दीडपट पैसे मला कार्यक्रमामुळें मिळाले.

## प्रवासाची अवीट गोडी

रंगूनहून आमची बोट निघाली. बोटींत १२०० नवीन प्रवासी चढले. ते सर्व हमाल व मजूर होते. दोन दिवसानंतर कलकत्त्याचें सुंदरबन दिसूं लागतें. तेथून प्रत्यक्ष कलकत्त्याला पोंचावयाला तेवीस तास लागणार होते. बोट किनाऱ्याकडे धांवत होती आणि माझें मन घराच्या दिशेनें भरधांव निघालें होतें. किंबहुना, कल्पनाराज्यांतील घरांत मी केव्हांच पोंचलों होतों. पत्नी, मुलगा, मित्र, नातेवाईक, शेजारीपाजारी लोक सभोंवती जमले आहेत. मी त्यांना जपानहून आणलेलीं चित्रविचित्र खेळणीं, रंगीबेरंगी वस्तू, कलाकुसरीचें सामान हें दाखवीत आहें, त्याचबरोबर अनेक गमतीचे अनुभव सांगून त्यांना प्रवासाचा आनंद देत आहें, अशीं कल्पनाचित्रें रेखाटून मी त्यांकडे एकाग्रतेनें पहात किती तरी वेळ बसलों होतों. मला बोटीचा विसर पडला होता. प्रवास संपवून मी केव्हांच

घरीं पोंचलों होतों. पण–पण तेवढ्यांत एकच गर्दी आणि कोलाहल सुरू झाला. झोपेंतून एकदम जागें होऊन पहावें, तसा मी विचार–तंद्रींतून जागा होऊन कसली गर्दी उसळली तें पाहूं लागलों. तेव्हां समजलें कीं कलकत्ता बंदर अगदी नजीक आलें असून जो तो प्रवासी आपल्या सामानाची आवराआवर करीत आहे. त्यांची धांवपळ चालू होती.

मीहि लगेच सामान आवरलें. बोटींतून उतरतांच कस्टम ऑफीस-मधील तपासणी झाली. मी लगेच कस्टमच्या इमारतीबाहेर पडलों. एका अर्थानें माझा प्रवास संपला होता–पण त्याच वेळी एकीकडे मी पुण्याच्या प्रवासाची तयारी करीत होतों, तर दुसरीकडे माझें मन, 'यानंतर कोणत्या देशाची सफर काढावी' यासंबंधीं विचार करण्यांत मग्न झालें होतें. कारण प्रवासांतील अनुभवांची अवीट गोडी मी कधींच विसरूं शकत नाहीं.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९७३९

# सार्वजनिक संस्थांसाठीं सहाय्य



[ नृत्य मुळींच येत नसलेल्या स्त्रीकडून जादूगार रघुवीर हिप्नॉटिझमच्या सहाय्यानें नृत्य करवून घेत आहेत. ]

आपला एखाद्या सार्वजनिक अथवा शैक्षणिक संस्थेशीं संबंध आहे काय? असल्यास तिच्या आर्थिक सहाय्योसाठीं जादूगार रघुवीर यांचें सहकार्य मिळवितां येईल.

हिनॉटिझम, धनुर्विद्या, जादू, टेलिपथी व स्मरणशक्तीचे विविध प्रयोग करून देशांतील व परदेशांतील खालील संस्थांना जादूगार रघुवीर यांनीं पुढीलप्रमाणें आर्थिक सहाय्य मिळवून दिलें—

**आफ्रिका** (१) काठियावाड स्पोर्ट्स क्लब (नैरोबी) २००० शिलिंग
(२) हनुमान व्यायाम शाळा (दारेसलाम) २००० शिलिंग
(३) हिंदु व्हॉलेंटिअर कोअर (मॉंझा) १२०० शिलिंग

**भारत** (१) अनाथ विद्यार्थी गृह (पुणें) ७००० रुपये
(२) रत्नागिरी जिल्हा उन्नति मंडळ (रत्नागिरी) २००० रुपये
(३) पुरुषोत्तम हायस्कूल (नाशिक रोड) १७०० रुपये
(४) वनिता उत्कर्ष मंडळ (विजापूर) ९०० रुपये

लिहा अगर भेटा—'**जादूगार रघुवीर**' ८४१ सदाशिव, पुणें २

# आपणास माहीत आहे काय ?

जादूगार रघुवीर यांनीं जादूच्या निवडक प्रयोगांचीं सर्वांगीण माहिती देणारीं तीन पुस्तकें लिहिलीं आहेत.

हीं पुस्तकें अभ्यासून आपण आपल्या मित्रांची उत्तम प्रकारें करमणूक करूं शकाल.

**( १ ) जादूचे आश्चर्यकारक १३ प्रयोग**

किंमत ४ आणे.

**( २ ) जादूंतील गमती जमती**

या पुस्तकांत नाविन्यपूर्ण जादूचे २५ प्रयोग आकृत्यासह दिले आहेत.

किंमत १ रुपया

**( ३ ) पत्त्यांची पोतडी**

कोणत्याहि पत्त्यांनीं करतां येतील असे नाविन्यपूर्ण २५ प्रयोग.

किंमत १ रुपया

पुस्तकांसाठीं लिहा:—

**जादूगार रघुवीर** M. B. H. S. ( London )

८४१ सदाशिव पेठ, भाऊ महाराज बोळ, पुणें २.

# भारतीय जादूची शाळा

चालकः—जादूगार रघुवीर
M. B. H. S. (London)

मोठमोठ्या अधिकाऱ्यांपासून शाळा—कॉलेजांतील विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांना सहज शिकतां येतील असे जादूचे प्रयोग शिकविणारी एकमेव संस्था.

सभासमारंभ, वाढदिवस, संमेलनें, सहली इत्यादि प्रसंगीं थोड्या पैशांत आणि थोड्या वेळांत आकर्षक जादूचे प्रयोग करून आपल्या व्यक्तित्वाची छाप टाका.

स्वतः हसा व हजारोंना हसवा !

अधिक माहितीसाठीं भेटा अथवा लिहा—

**भारतीय जादूची शाळा**

८४१ सदाशिव पेठ, भाऊ महाराज बोळ, पुणें २.

**टीपः**—जादूच्या प्रयोगाचें अद्यावत् सामान आमचेकडे तयार मिळेल.

## पहिलें पारितोषक

श्री. स. मा. गर्गे यांनीं लिहिलेल्या ' राज्यशास्त्राचा विकास ' या ग्रंथास मुंबई सरकारनें इतिहास विषयांतील दोन हजार रुपयाचें पहिलें पारितोषक देऊन गौरविलें आहे.

लोकशाहीच्या काळांत राज्यशास्त्रांतील विविध-विषय समजून घेणें प्रत्येक नागरिकांचें कर्तव्य ठरतें. त्यासाटीं कांहीं उपयुक्त पुस्तकें:-

# सुलभ राज्यशास्त्र

लेखकः स. मा. गर्गे

पृष्ठें ३१५, किं. ५ रु.

# राज्यशास्त्राचा विकास

लेखकः स. मा. गर्गे

पृष्ठें ३२०, किं. ५ रु.

# समाजवादी समाजरचना

लेखकः स. मा. गर्गे

पृष्ठें २३० डेमी, किं. ४॥ रु.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण:—

**संगम प्रकाशन**

४५९ नारायण, लोखंडे तालमीजवळ पुणें २.

परदेशांतहि आमच्या प्रवासी साहित्याची वाखाणणी झाली.

म्हणून कोठेंहि प्रवास करतांना

**दिनशा आणि कंपनीच्या**

प्रवासी साहित्याची निवड करा !

**सुटसुटीत आकार**

**विविध प्रकार**

**उच्च दर्जा,**

ह्याविषयीं प्रसिद्ध

लेदर सूटकेसेस, होल्डॉलस् व डॉक्यूमेंट बॅग्ज् स्पेशॅलिटी.

हेड ऑफीस

# दिनशा आणि कंपनी

कॉमनवेल्थसमोर, लक्ष्मी रोड, पुणें २.

ब्रँच :—पॅरेमाऊंटजवळ, बुधवार चौक, पुणें २.

मनपसंत व निर्दोष छपाई करून ग्राहकांच्या

विश्वासास पात्र झालेला

# ज्ञानविलास प्रेस

२७ बुधवार, अप्पा बळवंत चौक, पुणें २.

आमचेकडे

★ सर्व तऱ्हेचीं किरकोळ कामें,
आणि पुस्तकांची छपाई
उत्कृष्ट व निर्दोष केली जाते.

REFBK-0009739


★ REFBK-0009739 काम
लेदर)
माफक दरात करून दिलें जातें.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

अनुक्रमांक .................... वि: ....................

क्रमांक .................... नों: दि: ....................



हिप्नॉटिझमनें बधीर केलेल्या हातावर विस्तवाचा परिणाम होत नसल्याचें हें दृश्य जादूगार रघुवीर यांनीं लंडन येथें केलेल्या एका प्रयोगांतील आहे.

★

## हिप्नॉटिझम हें एक शास्त्र आहे.

याच हिप्नॉटिझमचे प्रयोग करून जादूगार रघुवीर यांनीं जगांतील निरनिराळ्या १७ देशांचा दौरा यशस्वी रीतीनें पूर्ण केला आहे. हें शास्त्र कोणाहि जिज्ञासू व्यक्तीला आत्मसात् करतां येणें शक्य आहे·

आपणांस हिप्नॉटिझमविषयी कांही माहिती हवी असेल अथवा त्यासंबंधीं आपल्या कांहीं शंका असतील तर जादूगार रघुवीर यांना लिहा अगर भेटा.

पत्ता—जादूगार रघुवीर M. B. H. S. (London),
८४१ सदाशिव पेठ, भाऊमहाराज बोळ, पुणें २.